मूल्य
सव्वा
रूपाया

# माणूस



वर्षारंभ अंक : जून १९६३

: संपादक :
श्री. ग. माजगावकर

※

वर्ष तिसरे : अंक पहिला

※

जून : १९६३

※

## सूचना

१. कथासाहित्य किंवा लेख पाठविताना सोबत टपालखात्याच्या नवीन नियमानुसार पुरेसे टपाल हशील पाठवावे.
२. कविता पाठविताना, कविता नापसंत ठरून ती परत हवी असल्यास पुरेसे टपाल हशील पाठवावे.
३. नापसंत साहित्य जर परत नको असेल तर केवळ निर्णय कळविण्यास पुरेसे टपाल हशील पाठविल्यास निर्णय कळविण्यात येईल व असे साहित्य निकालात काढले जाईल.
४. प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे सर्व हक्क स्वाधीन.
५. या मासिकात व्यक्त झालेली मते ' माणूस ' मासिकाच्या चालकांची अधिकृत मते असतातच असे नाही.

※

पत्रव्यवहाराचा पत्ता

**' माणूस '**

४१९ नारायण पेठ, पुणे २.

वार्षिक वर्गणी : आठ रुपये

किरकोळ अंक : एक रुपया

या अंकाची किंमत
**एक रुपया पंचवीस नये पैसे**

**कथा-लेख**
आत्मधर्ममंगलार्थ
मरण मी वरी
— कृष्णा मेहता
— सौ. इंदिराबाई मायदेव

**कथा**
आनंद यादव, रामचंद्र हिंगणे, माधव कानिटकर, रतनलाल भंडारी

**लेख**
उषा मोहनी, उमाबाई फडणीस, इंदिरा परांजपे, कमल राजदेरकर, मीना सप्रे

**कविता**
शिरीष पै, मधुकर केचे, सुरेश भट, प्रभाकर सिरास, सुधाकर देशमुख, शांताराम भास्कर, कुसुमानंद, ज्ञानेश्वर शंभरकर, दीक्षित

**समीक्षण**
हिरवे रावे
— रा. म. शास्त्री

**मुलाखती**
लीला चिटणीस — वसंत भालेकर
यमुनाबाई वाईकर — प्रतिनिधि

**नाट्यपरीक्षण**
तीन चोक तेरा
एक होता राजा

**चित्रपटपरीक्षण**
हा माझा मार्ग एकला
ते माझे घर

**मुखपृष्ठ**
' दोन वर्षे पुरी झाली '

**आतील सजावट**
दत्ता महाबळेश्वरकर
वसंत सहस्रबुद्धे




# मरण मी वरी —
# मरण मी वरी —
# मरण मी वरी —

धर्मासाठी मरावे —

हा आदेश, हा मंत्र, ही घोषणा तीनशे वर्षांपूर्वीची आहे.

तीनशेच का ?

त्यापूर्वीहि अनेक शतके

स्वधर्माच्या प्रतिपालनासाठी

मृत्यूचा आनंदाने स्वीकार करणाऱ्या

भारतीय वीरांची आणि वीरांगनांची

परंपरा येथे जागृत होती, जिवंत होती.

चितोडचे ते धगधगते जोहार,
रजपुतांचे ते तेजस्वी 'केशरिये बाणे'
आम्ही कसे विसरू ?
बंदा बैरागी आणि छत्रपति संभाजी
यांच्या वीर मरणांच्या स्मृति कशा नष्ट होतील ?
आज कदाचित् धर्माचे युग संपले असेलहि.
पण कोणी आततायी हल्लेखोर, क्रूर आक्रमक,
पिस्तुलाच्या धाकाने, बंदुकीची नळी रोखून
बळाने, जुलूमजबरदस्तीने
धर्मांतराची सक्ती करू लागला तर ?
प्रतिकार.
आणि प्रतिकार शक्यच नसेल तर मृत्यू.
कारण ? कारण उघड आहे.
सर्व धर्म जरी सारखे असले
तरी भीतीच्या पोटी
सक्तीने करावे लागलेले धर्मांतर
हा भ्याडपणा आहे.
आमच्या व्यक्तिमत्त्वाचा त्यांत नैतिक पराभव आहे.
आमच्या स्वत्वाचा त्यांत बळी आहे.
स्वत्वासाठी मृत्यूला कवटाळणारी परंपरा
आजहि खंडित झालेली नाही
हे सिद्ध करणारी ही एक वीरगाथा.
ती घडली काश्मीरच्या आघाडीवर.
जवळ जवळ पंधरा वर्षांपूर्वी.
गाथा मूळ हिंदीत लिहिली त्यांचे नाव

**श्रीमती कृष्णा मेहता**

—ज्यांचे शूर पतीच या आघाडीवर
'आत्मधर्ममंगलार्थ',
कर्तव्याचे आचरण करीत असतांना
मृत्यूला सामोरे गेले.
मराठी अनुवाद

**सौ. इंदिराबाई मायदेव**

# वादळापूर्वी

काश्मीरच्या पश्चिमोत्तर सीमेजवळ मुजफ्फराबादचा प्रदेश आहे. टोळीवाल्यांच्या चढाईपूर्वी हा भाग काश्मीरमधील एक जिल्हा होता. हा छोटासा प्रदेश पर्वतांनी वेढलेला पण हिरवागार आणि समृद्ध असा आहे. मुजफ्फराबादमधून कृष्णगंगा नदी वाहत जाते. या भागातील लोकांचा पेहराव पंजाबी लोकांप्रमाणे आहे. येथले लोक सरळहृदयी आणि मेहनती आहेत. पण सृष्टिक्रमाप्रमाणे काही धनवान् तर काही निर्धनही आहेत. मात्र ते तुम्हाला बांधेसूद आढळतील. या भागापासून एक रस्ता रावळपिंडीकडे जातो आणि दुसरा एबटाबाद म्हणजे हजारा जिल्ह्याकडे जातो. ही दोन्ही गावे पाकिस्तानात आहेत. मुजफ्फराबादला काश्मीरच्या वतीने एक कलेक्टर (जिल्हाधीश), त्याचप्रमाणे सबजज्ज, अॅसिस्टंट पोलिस इन्स्पेक्टर, इंजिनिअर, असिस्टंट सर्जन, फॉरेस्ट ऑफिसर वगैरे अधिकारीही असत.

मी ज्या काळातील हकीगत लिहिणार आहे ते भारताच्या फाळणीनंतरचे दिवस होते आणि त्या वेळी काश्मीर राज्यातर्फे येथे सैन्याची एक तुकडीही ठेवलेली होती.





नोकराच्या हातून तबक खाली पडले आणि माझे मन चरकले...

१९४७ च्या जुलै महिन्यात माझे पती श्रीयुत दुनीचंद मेहता यांना काश्मीर सरकारने कलेक्टर म्हणून मुजफ्फराबादला पाठविले. श्रीनगरला ते असिस्टंट कलेक्टर होते. तेथून ते आपली नवी जबाबदारी सांभाळण्यासाठी जुलैमध्ये मुजफ्फराबादला गेले. त्या वेळी आमच्या घरी बरेच पाहुणे आलेले असल्यामुळे मी त्यांच्याबरोबर जाऊ शकले नाही. एक महिन्याने ते काही सरकारी कामासाठी श्रीनगरला आले, आणि परत जाताना मुलांना बरोबर घेऊन गेले, आणि दोन तीन दिवसांत आमचे पाहुणे जाणार होते ते गेल्यानंतर तू ये असे मला सांगून गेले. मुजफ्फराबादला गेल्याबरोबर एकटीला श्रीनगरहून तिकडे जाताना काही अडचण भासू नये म्हणून माझ्या पतींनी मला आणण्यासाठी एक नोकरही पाठवून दिला.

एका आठवड्यानंतर मीही मुजफ्फराबादला गेले. तेथे मी पोहोचले खरी, पण का कोण जाणे तेथे मला काही स्वस्थता वाटेना. असे मला का वाटावे हे काही माझ्या लक्षात येईना. मी काही एखाद्या परक्या ठिकाणी आले नव्हते. तसे पाहिले तर ही मी चौथ्यांदा या गावाला आले होते. पण या खेपेला मला जणू काही प्रत्येक वस्तूची भीति वाटत होती. या अस्वस्थ भावनेने माझे मन कसे व्याकुळ होऊन गेले. अगदी जरुरीच्या वस्तूंशिवाय मी बरोबर आणलेले सामानसुद्धा सगळे उघडले नाही. जसेच्या तसे बांधलेले ठेवले. असे वाटत होते की, कुठे दूर पळून जावे. अधूनमधून बोलताना मी त्यांना (श्री. मेहतांना) म्हणतदेखील होते की 'मला सारखा भास होतोय की आपल्याला कुठ तरी दूर जायचय. इथ काही राहायच नाही. म्हणून मी सगळ सामान काही सोडणार नाही.'

त्या दिवसांत माझे पती कामात इतके गढलेले असत की माझ्याजवळ शांत चित्ताने बोलायला त्यांना अवसरच मिळत नसे. कर्नल साहेबांबरोबर ते कधी या सरहद्दीवर तर कधी त्या सरहद्दीवर जात. गावोगाव फिरत. पण त्या भागात काही गडबड होण्याचा संभव आहे, याचा त्यांनी मला बिलकुल सुगावा लागू दिला नाही. पाहता पाहता आमच्या घरासमोर दिसणाऱ्या टेकडीवर मोर्चे बांधले जाऊ लागले. आमचे घर थोड्याशा उंचवट्यावर होते अन् घराच्या सभोवती पुष्कळच मोकळी जागा होती. या मोकळ्या जागेच्या मध्येच थोडेसे सपाट मैदान व बाग होती. बागेच्या व घराच्या चहूबाजूंनी लाकडाच्या फळ्यांचे कुंपण होत. आमच्या घरापासून थोडे दूर असिस्टंट पोलिस इन्स्पेक्टर यांचे घर होते, आणि त्यांच्या घरापलीकडे सुमारे दोन फर्लांगांवर डॉक्टरांचे क्वार्टर्स व हॉस्पिटल होते. आमच्या घराच्या एका बाजूला काही अंतरावर एक मशीद होती व दुसऱ्या बाजूला मुसलमानांची एक तीर्थाची जागा होती. त्यासभोवती गवत, दाट झाडी अन् घनदाट जंगल होते. या पवित्र जागेला व आमच्या घराला जोडणारी एक छोटीशी पाऊलवाट पहाडांच्या मधून गेलेली होती. या वाटेने माणसांची रहदारी फारच कमी होती. पण केव्हा केव्हा गिधाडे किंवा घुबडे ओरडली म्हणजे मात्र त्यांच्या शोधात कुत्री तिकडे जाताना जरूर दिसत असत.

मी मुजफ्फराबादला गेल्यावर तीनच दिवसांनी कृष्णजन्माष्टमीचा सण आला. घरच्या आम्ही सर्वांनी जन्माष्टमी साजरी केली. संध्याकाळी मी देवदर्शनासाठी देवळात गेले. आमचा नोकर फळे, फुले व पूजेचे साहित्य घेऊन बरोबर आला होता. पण मंदिराच्या द्वारापाशी तो पोहोचतो न पोहोचतो तोच त्याला ठेच लागली अन् त्याच्या हातातून तबक खाली पडले अन् त्याच वेळी माझे मन चरकले की काही तरी अगदी विपरीत होणार आहे ! ईश्वराने संकटाची ही जणू सूचनाच दिली होती. सतत दोन दिवस त्या घटनेचा परिणाम माझ्या मनावर टिकून राहिला. तिसऱ्या दिवशी मी सर्व काही विसरून गेले. परंतु त्याच महिन्यात काही चमत्कारिक गोष्टी दिसू लागल्या. साप इतके निघू लागले की, त्यांच्यामुळे आम्ही बेसुमार त्रस्त झालो. कधी ते लहान मुलांच्या पाळण्यात निघत तर कधी बॅडमिंटन कोर्टावर. एक दिवस तर आमच्या घरी झोपलेल्या दोन नोकरांच्या तोंडांवर वरून एक मोठा साप पडला. एवढेच नशीब की तो त्यांना चावला नाही. मला असे भासू लागले की, काळ जणू आम्हांला कसेही करून गिळंकृत करायला टपला आहे. मुलांना घेऊन मी दररोज संध्याकाळी ईश्वराचे भजन व किर्तन करीत असे. त्यामुळे इतके मानसिक समाधान मिळे की, सारा दिवस भजनातच निमग्न राहावे असे वाटे.

मी आमच्या संसाराला एक आदर्श संसार समजत होते. संसारातील माझा उत्साह एक क्षणदेखील कमी झाला नव्हता. आजपर्यंतच्या आयुष्यात मला कितीदा तरी आर्थिक विवंचना अन् संकटे सहन करावी लागली होती. पण माझ्या हृदयेश्वरांच्या सत्यनिष्ठेमुळे मी सदोदित अगदी निश्चित राहू शके. माझा पूर्ण विश्वास होता की, आमच्या बाबतीत असा कधीही प्रसंग उद्भवणार नाही की, ज्यामुळे आम्हांला शरमिंदे वाटेल. माझे पती एका मानाच्या हुद्द्यावर होते. पण आमच्या घरातील राहणी अगदी सामान्य कुटुंबासारखी होती. आमच्या घरात कधी एकही वस्तु पैशाविना किंवा नजराणा अगर भेट म्हणून आलेली कोणाला आढळली नव्हती. माझे पती मला नेहमी म्हणत असत की, आपल्याजवळ श्रीमंती नाही, पण

आपली मुले मेहनत व प्रामाणिकपणा या दौलतीवर वाढवलेली आहेत. तुला पटत असेल तर तू याना सात्त्विक जीवनाचे महत्त्व शिकव. तेच याच्या खरे उपयोगी पडणार आहे. सुखासीन अगर विलासी जीवनाचे मनुष्याला अवजड ओझेच होत असते.

माझी मुले आपल्या वडिलाच्या तालमीत अगदी साधी, सात्त्विक बनली होती. पण त्यांच्या प्रमाणात मी काही स्वतःला तपस्विनी बनवू शकले नाही. एका श्रीमंत पित्याची पहिलीच कन्या असल्यामुळे माझे बालपण श्रीमंतीत व ऐषआरामात गेले होते. लहानपणी घरात पुष्कळ नोकरचाकर असल्यामुळे माझ्या मनावर खानदानी व श्रीमंती थाटाचे सस्कार दृढ होते. प्रथमच मी जेव्हा सासरी आले तेव्हापासून आपल्या पतीप्रमाणेच आपल्या सवयी कष्ट सोसण्यास अनुरूप बनवाव्या अशी माझी इच्छा होती. परंतु प्रत्यक्ष आचरणात मी हे आणू शकले नाही. आपली राहणी साधी व काटक झाली पाहिजे हे मनातून पटत होते परंतु ते घडत मात्र नव्हते. कित्येकदा तर स्वतःच्या कमकुवतपणावर मी अगदी चिडून जात असे.

मुजफ्फराबादमध्ये माझे मन बिलकुल रमेना. तेव्हा मी माझ्या पतीना म्हटले, 'मी दोन चार दिवस श्रीनगरला जाऊन येते. मुल इथच राहू देत. मी लगेच परत येईन.' प्रथम त्यानी माझे म्हणणे कबूल केले अन् मोटरची सीट रिझर्व्ह करण्याची व्यवस्थादेखील केली. पण मागाहून मला म्हणाले, 'सध्याच नको जाऊस. सैन्यातल्या काही अधिकाऱ्याना आपल्याकड जेवायला बोलवायच माझ्या मनात आहे तेवढ होऊन जाऊ दे अन् मग तू जा.'

आणखी काही दिवस असेच गेले. एक दिवस बाहेरून आल्याबरोबर हे मला म्हणाले, 'बर का, आज कर्नलसाहेब मला म्हणत होते की तुमच्या मुलाबाळाना श्रीनगरला पाठवून द्या, अन् तुम्ही स्वतः माझ्याकड येऊन राहा. येथून दोन मैलावर जिथ कर्नलसाहेब राहतात तिथ जीप, फोन सर्व काही आहे. आपल्याला कुणाला सूचना द्यायच्या झाल्या, कुठ जायच-यायच झाल तर प्रसगविशेषी पंचाईत होणार नाही!' मी विचारले. 'मग तुम्ही त्यांना काय उत्तर दिलत?' तेव्हा ते म्हणाले, 'मी कर्नलसाहेबांना सांगून टाकल की माझ्याकडून काही हे होणार नाही. सरकारच्या आदेशाप्रमाण लोकांना मात्र मी गाव सोडून जाऊ देणार नाही, अन् माझ्या मुलाना मात्र बाहेर पाठवू का? जर काही दंगल झाली तर इतर जनतेच जे होईल तेच माझ्या बायकोच नि मुलाच होईल. आपल्या कर्तव्यापासून च्युत होण मला पसत नाही.' हे ऐकून माझे हृदय अभिमानाने अगदी फुलून गेले. आणि माझ्या पतीच्या ठिकाणी आदराने माझे मस्तक विनम्र झाले. त्याचा उत्साह द्विगुणित व्हावा म्हणून मी म्हणाले, 'आपण अगदी योग्य तेच सागितलत. आता आपला निश्चय आपण दृढ ठेवू या. ईश्वर आपल्याला धैर्य देईल.'

इथे एक गोष्ट सागणे जरूर आहे की, मुजफ्फराबाद हा सरहद्दीचा भाग असूनही राज्यकर्त्यांच्या निष्काळजीपणामुळे सुरक्षित नव्हता. आणखी म्हणजे वेळेवर सावध करता येईल अशासाठी टेलिफोन वगैरेची व्यवस्थाही पुरेशी नव्हती. हो! येवढा मात्र हुकूम जरूर होता की घबराटामुळे लोकाना शहर सोडून जाऊ देऊ नये.

आता अधूनमधून होणाऱ्या बोलण्यांवरून माझ्या थोडेसे लक्षात आले होते की इकडे काही तरी गडबड होण्याचा रंग आहे. अन् मी हेही समजून चुकले की याना या बाबतीतली सर्व काही माहिती आहे. आतापर्यंत यानी माझ्यापासून काहीही लपवून ठेवले नव्हते. साधारणपणे प्रत्येक बाबतीत ते माझा सल्ला घेत. घरात बेबनाव म्हणजे कसा असतो याचा मला कधीच अनुभव तव्हता. मीही कधी माझ्या पतीच्या इच्छेविरुद्ध अगर आज्ञेविरुद्ध वागले नाही. त्यानाही मला कधी मुद्दाम काही सागण्याची वेळ आली नाही. आम्ही एकमेकाच्या भावना आपोआप ओळखू शकत होतो. पण या वेळी मात्र सदोदित शात दिसणाऱ्या त्यांच्या मुद्रेवर अस्वस्थतेची स्पष्ट छाया दिसून येत होती. हल्ली ते बाहेरच्या बातम्या मला कळू देत नसत. मलाही मनातून अत्यत काळजी वाटत होती. अन् असा विचार करून स्वस्थ राहत होते की याच्यावरील सध्याच्या जबाबदारीमुळे हे असे वागत असतील. पण असे मनाशी म्हणावे, तो असे दिसे की, एकीकडे हे चिंताग्रस्त दिसत आहेत तर दुसरीकडे बागेत भाजीपाला अन् फुलझाडे लावण्यात मग्न आहेत. असल्या गोष्टीची त्याना फार आवड होती. घरात खाण्यापिण्याच्या निरनिराळ्या पदार्थांचा ते चवीने आस्वाद घेत. अन् घरकामातल्या किती तरी गोष्टीत मला ते आपणहून मदत करीत.

२१ ऑक्टोबर १९४७ रोजी रात्री सैन्यातल्या कॅप्टन, कर्नल वगैरे अधिकाऱ्यांना आमच्या घरी जेवायला बोलावले होते. त्या दिवशी झिमझिम पाऊस पडत असल्यामुळे हवेत जरा गारठाच होता. रात्रीचे दहा वाजले तरी निमंत्रितापैकी कोणीही आले नव्हते. सर्वजण आमच्या घराजवळच असलेल्या पोलिस सुपरिंटेंडेंटच्या घरी बसले होते. सर्व जेवण मी स्वतः तयार केले होते. पोलिस सुपरिंटेंडेंटच्या घरी मी निरोप पाठवला. तेव्हा समजले की जीपमधून कॅप्टन कुठे बाहेर गेले आहेत ते आल्यावर सर्व जेवायला येतील. कॅप्टन हे जातीने मुसलमान होते आणि सरहद्दीवरची परिस्थिति काय आहे आणि तिथे आपली व्यवस्था कितपत आहे हे पाहायला गेले होते. परत येऊन त्यानी 'ऑलवेल' असे सांगितले अन् सगळेजण आमच्याकडे जेवून आपापल्या घरी गेले.

रात्री साडेबारा वाजता मेहतासाहेब आपल्या झोपायच्या खोलीत आले. बिछान्यावर ते पडले पण त्याना झोप लागली नाही. मग त्यांनी सर्व मुलाना उठवून आणले आणि त्यांच्याबरोबर रमीचा खेळ सुरू केला. मलाही नाइलाजाने त्यांच्या खेळात सामील व्हावे लागले. मग काही वेळाने त्यानी चहा करायला सागितला. आज यांनी हे काय चालवले आहे असे मनात येऊन मी अगदी बेचैन झाले. मला त्या वेळी चहा नको असताना आणि मी सारखे तसे म्हणत असतानासुद्धा त्यानी मला चहा प्यायला भाग पाडले. म्हणाले, 'हे पाहा! आज मी तुम्हाला चहा पिण्याबद्दल आग्रह करतो आहे. उद्यापासून तुम्हाला कोणी अस म्हणणार नाही बर! मग पाठीमागून पस्तावाल.' हे ऐकून तर माझ्या पोटात धस्सच झाले. मी चहा घेतला, पाहिले तो कपात काय कोण जाणे पण काही तरी पडले होते. म्हणून चटकन् मी तो फेकून दिला. अन् एखाद्या अपराधी मनुष्याला वारंवार छेडावे ना तसे मी त्याना पुन्हा पुन्हा विचारू लागले. 'तुम्ही आम्हांला सगळ्यांना काय सांगत होता?' ते म्हणाले, 'कुठ काय? काही नाही. तोंडातून सहज काहीतरी निघून गेल.' तसे पाहिले तर बाब छोटीशीच होती. अन् त्यांनीही सहज चेष्टेने म्हणावे तसेच

म्हटले होते. पण माझ्या अंतःकरणाला मात्र ते अगदी लागून राहिले. मी खेळणे थाववले त्यामुळे सर्वांनाच ते थांबवावे लागले. पुष्कळच रात्र झाली होती, अन् सगळी मुले आपापल्या विछान्यात झोपायला गेली. काही क्षणच गेले असतील इतक्यात त्यांनी मला हाक मारली अन् म्हटले की सगळ्या मुलांना आपापल्या खोलीत झोपवून बेबीला (बेबी हा माझा सर्वांत लहान मुलगा त्या वेळी ७ वर्षांचा होता.) माझ्याजवळ घेऊन ये. बेबीवर त्यांचा फार जीव होता. मी बेबीला घेऊन आले अन् त्यांच्या पलगावर त्यांच्या पुढ्यात त्याला निजवले. पडल्या पडल्याच ते म्हणाले, 'पाहिलास, बेबी कसा मस्त झोपलाय तो!' मी यावर काहीच उत्तर दिले नाही. कारण आजचे त्यांचे हे विलक्षण वागणे पाहून माझे मन विचारात पडले की शेवटी यांच्या मनात आहे तरी काय! असाच थोडा वेळ गेला असेल अन् बेबीला कुशीत घेऊन स्वारी अगदी गाढ झोपी गेली.

## प्रत्यक्ष तुफान

पहाटेचे पाच वाजले असावेत. मला सहजच जाग आली. आणि माझ्या कानांवर पर्वताच्या बाजूने पुन्हा पुन्हा प्रतिध्वनित होणारे बंदुकीच्या गोळ्यांचे भयकर आवाज येऊ लागले. मी चटकद् यांच्या पलंगाजवळ जाऊन यांना हालवून उठवू लागले, पण यांना इतकी गाढ झोप लागली होती की, किती वेळ तरी गोळ्याचा गडगडाट झाल्यानंतर ते जागे झाले. माझ्या तोंडून नकळत शब्द बाहेर पडले, 'अहो, हल्ला झाला. तुम्ही उठत कसे नाही?' (हल्ला कोण करते आहे याची मला काहीच दाद नव्हती.) एका कुशीवरून दुसऱ्या कुशीवर वळल्यासारखे करून त्यानी म्हटले, 'हा हल्ला नाही; आपल्या फौजेचे नेमबाजीचे शिक्षण चालू असेल.' मी लगेच त्यांना विचारले, 'कर्नलसाहेबाचे नि तुमचे नेमबाजीच्या बाबत काल रात्री काही बोलणे झाले होते का? त्यानी उत्तर दिले, 'नाही बुवा.' मी गडबडून म्हटले, 'तर मग हल्लाच झाला आहे, उठा ना लवकर. काय विचार करीत बसलाय!' अजूनसुद्धा त्याना विश्वास वाटेना, माझ्या आग्रहास्तव ते उठले अन् बाहेर जाऊन मैदानाकडे त्यानी दृष्टी टाकली. त्या वेळी त्यांना कळले की आमच्या घराच्या दिशेनेच दाणदाण आवाज करीत गोळ्या येत होत्या आणि जगलातल्या झाडावर आदळून खाली पडत होत्या. ते झटकन् पुढ जाऊ लागले; त्यावरोवर मी म्हटले, 'जरा काळजीपूर्वक पुढ जा. एखादी गोळीबिळी लागायची.' 'मला गोळी नाही लागत.' एवढेच शब्द उच्चारून ते आत गेले अन् कपडे करून बाहेर आले.

मी मुलाना घेऊन व्हरांड्यात आले अन् ज्या दिशेने गोळ्या येत होत्या तिकडे पाहू लागले. गोळ्या मारताना कोणी माणसे वगैरे आम्हाला दिसत नव्हती. पण गोळ्यांचा सारखा वर्षाव अन् त्यातून निघणारे विस्तवाचे तुषार दृष्टीस पडत होते. काही गोळ्या जंगलातील झाडातून आरपार घुसून पटांगणाच्या आत पोहोचत होत्या. पण मुलांना यत्किंचितही भीति वाटत नव्हती. ती जोरजोराने हसत होती. मी त्यांना म्हटले, 'जा वर, आत जाऊन गरम कपडे घालून या. नाहीतर थंडी वाजेल.' रात्री थोडासा पाऊस पडल्यामुळे हवेत चागलाच गारठा आला होता. एक सात वर्षांचा व एक साडेआठ वर्षांचा असे माझे दोन्ही मुलगे आत गेले अन् कपडे घालून बाहेर आले. मोठ्या मुलाने बुशशर्ट घातला होता अन् धाकट्याने स्वेटर घातला होता. उघड्याच पायानी ते पळत पळत व्हरांड्यात आले. माझ्या चारी मुली पण अगात नुसते जुनेसे ओव्हरकोट अडकवून पायात काही न घालताच गम्मत पाहण्यासाठी व्हरांड्यात आल्या. या मुलींच्यातील एक मुलगी माझ्या थोरल्या दिरांची होती. थोड्याच दिवसांपूर्वी श्रीनगरला ती आमच्याकडे आली होती. आणि आमची वदली झाली तेव्हा माझ्यावरोवर मुजफ्फराबादला पण आली होती. सुदेश नावाची ही मुलगी चौदा वर्षांची होती. माझी सर्वांत मोठी मुलगी वीणा साडेचौदा वर्षांची होती. मघली मुलगी शीला साडेदहा वर्षांची व सर्वांत लहान कमलेश साडेनऊ वर्षांची होती. ही सगळी अजाण मुले गोळ्यांचे आवाज ऐकून हसून हसून मुरकुडी वळण्याच्या बेतात आली होती. कशी कोण जाणे पण त्या वेळी मीसुद्धा मनातून काही विशेष घावरले नव्हते. मुलाच्या बरोबर मीसुद्धा हे दृश्य पाहात होते. जेव्हा गोळ्यांचा वेग वाढला तेव्हा मी मुलांना आत जायला सांगितले पण माझे म्हणणे ऐकायला ती मुळीच तयार नव्हती. उलट मलाच घावरट, भित्री म्हणायला लागली.

इकडे मी मुलाशी बोलण्यात गुंतले होते त्या वेळी पटांगणाच्या बाहेरच्या बाजूला पोलिस सबइन्स्पेक्टर तेवीस शिपायांना घेऊन मेहतासाहेबाना येऊन भेटले. या शिपायांपैकी वीस मुसलमान होते. आणि तीन हिंदू होते. सबइन्स्पेक्टर स्वतः हिंदू रजपूत होते. मेहतासाहेबाना त्यानी सांगितले की हल्ला झाला आहे. आणि शत्रूचे सैन्य कृष्णगंगेचा पूल ओलांडून शहराच्या नजीक येऊ लागले आहे. इतक्यात हे आत आले तेव्हा मी त्याना म्हणाले, 'दोन मैल जाऊन तुम्ही आपली फौज का बोलावून घेत नाही?' त्यावर त्यांनी उत्तर दिले, 'गोळ्यांचा वर्षाव फार जोरात होतो आहे. जरा मधे थांबला तर दोन मैल जाईन. तू मुलांना चाहाविहा दे बर.' इतके बोलून हे गडबडीने जे बाहेर निघून गेले ते पुन्हा परत आले नाहीत. हेच माझे त्यांचे शेवटचे बोलणे नि शेवटची भेट! हो! बाहेर जाता जाता हसून एवढे मात्र म्हणाले, 'पाहा, माझी मुलं गोळ्यांच्या आवाजाला जरासुद्धा घावरत नाहीत. उलट निर्भयपणान हसताहेत. मुलांनी अगदी असच बहाद्दर झाल पाहिजे ह!'

या भयंकर संकटाच्या वेळी घरातल्या सगळ्या नोकरांची पांगापाग झाली होती. माझ्याजवळ फक्त एक नोकर ओमप्रकाश हा राहिला होता तो आमच्याच प्रांतातला होता आणि मोठा इमानी होता.

आम्ही सगळे हवालदिल झालो. काय करावे आम्हाला समजेना. शहरात चहूबाजूनी पळापळ चालली होती. गोळ्यांतील विस्तवाचे तुषार, लोकाचे चीत्कार आणि कोलाहल यामुळे मन खचून जात होते. इतक्यात बाहेरून कोणाचा तरी आवाज आला. 'हल्लेखोर हॉस्पिटलपर्यंत येऊन पोहोचले आहेत. जिथे जिथे ते जाताहेत तिथे तिथे आगी लावताहेत. हॉस्पिटललासुद्धा त्यानी आग लावली आहे. विचारे असहाय रोगी आतल्या आत जळून चालले आहेत.' हे ऐकून मी अगदी भयभीत झाले. हे हॉस्पिटल आमच्या घरापासून अगदी जवळ होते. मरंकन् मी मुलांना आतल्या खोलीत घेतले. आमचे घर बैठेच होते. दोन्ही बाजूंना व्हरांडे काढलेले होते. मागच्या बाजूला स्वयं-

पाकघर होते आणि त्याच बाजूला देवघरातून निघून पाठीमागे गेले की मुसलमानांच्या तीर्थस्थळाकडे जाणाऱ्या रस्त्याच्या दिशेने एक दरवाजा होता. काय मनात आले कोण जाणे, पण झटपट मी अंगावरचे दागिने काढले अन् कपड्यात बांधले. या वेळी माझ्या अंगावर जुने आणि पातळ कापडाचे कपडे होते. जरा जाडजूड कापडाचे मजबूत कपडे घालावे हे माझ्या त्या वेळी ध्यानातच आले नाही.

मी कशीबशी आत आल, तोच बातमी आली की सुपरिंटेंडेंट साहेबांच्या घराला आग लागली. आता मात्र काय करावे हे मला सुचेनासे झाले. माझे अगदी भान नाहीसे झाले. इतक्यात मागल्या दाराने एक मुसलमान चपरासी दार जोराने खडखडवून म्हणाला, 'बाईसाहेब आपण इथ काय करीत राहिला आहा! हल्लेखोर आपल्या झोपायच्या खोलीच दार तोडताहेत. अन् ते जवळ जवळ ६० आहेत. आपण कृपा करून मुलांना घेऊन बाहेर या. दाट जंगलातल्या त्या तीर्थस्थानाच्या आजूबाजूला मी मुलांना कुठतरी लपवून ठेवतो.' घाबरून मी त्याला विचारले, 'अरे पण मेहतासाहेब कुठ आहेत?' तो सांगू लागला की, 'साहेब आघाडीवर गेले आहेत अन् त्यांच्या रक्षणाच ते पाहून घेतील. तुम्ही झटकन् बाहेर या पाहू.' मी किंकर्तव्यमूढ होऊन स्तब्ध झाले. मनात विचार आला की माझे पति आपले कर्तव्य बजावीत आहेत आणि माझ्यावरच सध्या माझ्या मुलांच्या रक्षणाची जबाबदारी आहे, तेव्हा हरप्रकार करून हे माझे कर्तव्य मी पार पाडले पाहिजे. एक मन असेही सांगू लागले की त्यांच्या गैरहजेरीत घर सोडून जाणे योग्य होईल की नाही! मी अशा विचारचक्रात सापडले होते तोच पुन्हा बाहेरून दार खडखडले अन् आवाज आला की आता जल्दी करा नाहीतर गहजब होईल. हे लोक फार वाईट आहेत. अगदी सापडेल तिथे मारपीट अन् कापाकापी करताहेत. हे ऐकल्यावर मात्र मला धीर निघाला नाही. उघडे पाय नि मोकळ्या हातांनी फक्त एक चादर अन् गुप्ती बरोबर घेऊन, त्या मरलेल्या घरातून मुलांच्यासह मी बाहेर पडले. गुप्ती अशाकरिता जवळ ठेवली की न जाणो या निष्पाप लेकरांच्या शीलावर हल्ला झाला तर त्यांचे शील भ्रष्ट होण्यापूर्वी गुप्तीच्या साहाय्याने त्यांना कायमची निद्रा घेता येईल; आणि त्यांच्या मानधनाचे रक्षण होईल.

बाहेर पडल्यानंतर त्या क्षेत्रस्थानाकडच्या दाट जंगलाच्या व डोंगराच्या बाजूच्या रस्त्याला आम्ही लागलो. जाता जाता मागे वळून आमच्या उजाड झालेल्या त्या घरावर मी एकदा नजर टाकली; वाटले की, काही क्षणांपूर्वीच ही जागा म्हणजे माझ्या सुखी संसाराची साक्ष होती आणि आता हृदय थरारून सोडणारा संकटांचा अंधकार त्याला गडप करणार आहे. अजूनदेखील बंदुकीच्या गोळ्यांचे धाडधाड आवाज येत होते अन् कानठळ्या बसून कानांचे पडदे फाटतील की काय अशी भीति वाटत होती. आता मला मोठे आश्चर्य वाटले की त्या वेळी त्या येवढ्या अवघड वाटेने आम्ही कसे जाऊ शकलो. जर एखादे वेळी पाय घसरला असता तर शरीराचे नक्कीच तुकडे तुकडे झाले असते. थोडे दूर चालून गेल्यावर थकून आम्ही गवतावर पडून राहिलो. इतक्यात खूप जोरात पाऊस पडू लागला आणि जे काही थोडेफार कपडे आमच्या अंगावर होते तेहि भिजून चिंब झाले. मुले थंडीने कुडकुडू लागली. मी त्यांच्या अंगावर चादर घातली. ती बिचारी तिच्याखाली गुपचूप बसून राहिली.



त्या मरलेल्या घरातून मुलांच्यासह मी बाहेर पडले...

आता गोळ्यांचे आवाज आणखीनच जवळजवळ येऊ लागले. मी तिथे एखाद्या अनोळखी प्रवाश्याप्रमाणे बसले होते. इतक्यात इस्पितळातला एक बुढ्ढा नोकर चरण मजजवळ घाबऱ्या घाबऱ्या आला. मी विचारले, 'भैय्या, तू इतका घाबरला आहेस कशान?' तो म्हणला, 'माझा बारा वर्षांचा मुलगा इस्पितळात होता तो आता आगीत जळत असणार. मी ऐकल की जितके रोगी तिथ होते ते सर्वच्या सर्व जळून जाणार. माझा बाळ आता कुठ असेल कुणास ठाऊक!' इतके बोलून अपत्यप्रेमाने वेडा झालेला चरण इस्पितळाच्या बाजूला धावतच निघून गेला. मागून मग समजले की भैय्याचे प्रेत इस्पितळाजवळ पडलेले होते आणि त्याच्या पुढ्यात त्याच्या मुलाचा जळालेला देहदेखील होता.

आम्ही त्या ठिकाणी सुमारे दोन अडीच तास पडून होतो. गारठ्यामुळे मुले अगदी कोमेजून गेली होती. जणू काय त्यांच्या शरीरात रक्तच उरले नव्हते. तेवढ्यात आमचा नोकर ओम् आम्हांला शोधीत तेथे आला आणि एकदम रडू लागला. मी त्याला विचारले, 'ओम् तूं कुठ होतास, रडतोस का?' त्याला रडताना पाहून मुलेही त्याला हसून म्हणाली, 'वारे, ओम् अगदीच भ्याड दिसतोस तू; अन् म्हणत होतास मी कश्शाला भीत नाही म्हणून! असा भेकडपणान रडतो आहेस काय! बघ आम्हीसुद्धा भीत नाही!' तो बिचारा यावर काहीदेखील बोलला नाही. मी मग त्याला पुन्हा विचारले, 'अरे झालय तरी काय? सांग पाहू तुला इतक रडायला काय झाल ते?' जरा थांबून ओम् म्हणाला, 'तुम्ही जेव्हा इकड आलात तेव्हा मी घरातच होतो. चांगले साठ एक टोळीवाले आपल्या घरात आले अन् सर्व मौल्यवान दागिने, किंमती कपडे घेऊन गेले. साहेबांचे कपडेसुद्धा कपाटातून काढून अंगात घालून पाहत होते.' 'हत्तीच्या. अन एवढ्याकरिता तू रडतोस?' मी त्याला मध्येच थांबवून म्हटले 'अरे बाबा, कपडे आणि दागिने आपणच केले होते ना! जिवंत राहिलो तर पुन्हा बनविता येतील. पण तुला एक करता येईल तर पाहा. आपल्या घराकड जाऊन साहेबांचा गरम सूट तुला आणता आला तर पाहा. साहेब सकाळी साध्या कापड्यातच बाहेर गेले आहेत. त्याना थंडी

लागत असेल.' यावर त्याने एक सुस्कारा टाकला अन् तो लगेच घराकडे जायला उठला. पण जरासा गेला नाही तोच परतला अन् म्हणाला, 'मी नाही जाऊ शकणार, मी इकड येत होतो तेव्हा मला घरातून कोणाचा तरी विव्हळण्याचा आवज ऐकू येत होता.' इतके बोलून तो क्षणभर स्तब्ध झाला. तेव्हा मी म्हटले, 'बर तर जाऊ दे, नकोच जाऊस तू.' एवढ्यात आमच्या घराला आग लागलेली स्पष्ट दिसली. अन् आमच्या बरोबरचा नोकर म्हणाला. 'पाहा, आपल घर जळतय.' ते दृश्य पाहताच माझी मुलगी कमलेश धावरून जाऊन म्हणाली 'आई, आता कस ग करायच. माझ्या बाहुल्याची खोलीसुद्धा आता पेटेल अन् त्या माझ्या बाहुल्याही जळून जातील.' माझ्या लहानग्या मुलीला बाहुल्या हेच सर्वस्व वाटत होते. पण मला ब्रह्मांड आठवले. माझ्या तोंडून निघाले, 'देवा आता कस अन काय करू रे! हे स्वत: आता कुठ अन् कोणत्या परिस्थितीत असतील कुणास ठाऊक ! मी या लहान लहान मुलाना घेऊन जाऊ तरी कुठ !' इकडे माझी चिंता वाढतच होती आणि मुलाच्या तोंडावरचे हसूही पार कुठल्याकुठे पळाले होते. त्यानाही वाटायला लागले होते की काही तरी मोठे संकट आले आहे पण ती अगदी चुपचाप होती. मग आमचा नोकर म्हणाला, 'बाईसाहेब, चला बर तुम्हांला कुठतरी सुरक्षित ठिकाणी पोचवल पाहिजे. नाहीतर या असल्या गारठ्यात लहानगी मुल मरून देखील जायची किंवा ते बंडखोर आपल्याला शोधीत इकड आले तर भलतच काही व्हायच. आपल्याला इथून हाललच पाहिजे.' आम्ही सर्व उठून उभे राहिलो आणि आमचे सर्वस्व गमावून आता दारोदार आमच्या दैवाची परीक्षा पाहण्यासाठी निघालो. मुल चालत होती, पण कशी ? तर उघड्या पायांनी, अन् सारखी मागे वळून आपल्या जळत्या घराच्या धुराचा लोट आकाशात वरवर जाताना पाहत चालली होती. नुसते दु:खाचे उसासे टाकण्याशिवाय आमच्याजवळ आता राहिले होते तरी काय !

चालताचालता आम्ही एका नाल्याजवळ पोहोचलो. समोरून दहावारा लोक आमच्याच दिशेने येत असलेले दिसले. आमच्या सर्वांच्या पुढे सुरेश होता. त्याला थांबवून त्या लोकानी विचारले, 'अरे, तू कोणाचा मुलगा आहेस अन् कुठ चालला आहेस !' सुरेशने उत्तर दिले. 'मी कलेक्टर साहेबाचा मुलगा आहे.' खरे म्हणजे त्याला माहीत होते की असे सागितले असता आपल्यावर संकटच ओढवण्याची भीति आहे. परंतु नेहमी खरे बोलण्याचे शिक्षण त्याला मिळालेले असल्यामुळे या कारणाकरितादेखील त्याच्या तोंडून खोटे बोलले गेले नाही. हे उत्तर ऐकून ते लोक म्हणाले, 'अस होय, तर मग तुम्ही सगळे अगदी लवकर जा. नवावा नोकराच्या घरी कलेक्टर साहेबानी तुमची राहण्याची व्यवस्था केली आहे. नवावा हा तालुका कचेरीचा पट्टेवाला होता. रस्त्याने पडत, ठेचा खात, कसेबसे, आम्ही नवाबाच्या घरी पोहोचलो. हे घर आमच्या घरापासून सुमारे अर्धा मैल जरा उंच अशा टेकाडावर होते, अन् तिथून समोवार सर्व शहर दिसू शकत होते.

मी तिथे पोहोचल्यावरोबर नवाबाची सर्व मडळी आणि आश्रयासाठी आलेली इतर मडळी बाहेर आली आणि मला त्यांनी मोठ्या आदराने आत नेले आणि म्हणाले, 'बाईसाहेब, आपण आमच्या कर्तव्यदक्ष साहेबाच्या पत्नी आहा आणि आपल्याबद्दल पूर्वीचीच आदराची भावना आमच्या मनात आहे. हे घर आपलच आहे अस समजून निर्धास्त राहा.' मी आत गेले. तेथे आणखी कित्येक स्त्रिया होत्या. माझ्या मुलाची अवस्था पाहताच त्यांना गहिवर आला आणि हल्लेखोरावर त्यानी अपशब्दांचा भडिमार केला. मी पुरुष मंडळीजवळ मेहतासाहेब कुठे असतील वगैरे चौकशी करू लागले. ते मोठ्या नाखुशीने म्हणाले, 'आम्हाला काही कल्पना नाही बुवा ते कुठ असतील त्याची.' नतर थोड्या वेळाने पोलिस सुपरिटेंडेंट साहेबाचा शिपाई तिथे आला आणि आमच्या बरोबरच्या ओमजवळ काही बोलू लागला. तशी मी विचारले, 'शिवदयाळ, बावा, तुला तरी ठाऊक आहे का मेहतासाहेब कुठ असतील ते ! ते जेव्हा घरातून बाहेर पडले तेव्हा तू त्यांना पाहिल आहेस कारण तू तियच होतास ! शिवदयाळ म्हणाला, 'आमच्या साहेबाच्या बरोबर मेहतासाहेब आणि तेवीस शिपाई हायस्कूलच्या बाजूला गेले. काही दिवसापूर्वी याच बाजूला सैनिकानी एक तोफ रोखून ठेवली होती तिकडे ते सर्व सुरक्षित आहेत.'

मुलांकडे माझे लक्ष गेल तर ती थडीने अगदी थरथर कापत होती. ते पाहून नवाबाच्या बायकोने उबेसाठी विस्तव पेटवला. मी मुलाच्या अगातले ओले कपडे काढले अन् विस्तवाशी जरा वाळवले. अगदी कोरडे कसचे होतात ! पण जरा तरी बरे झाले इतकेच !

या जागेवरून शहर जागोजाग जळत असल्याचे दृश्य इतके भयानक दिसत होते की जणू काय प्रलयकाळ आला असे वाटावे. चारही दिशाना हाहाकार माजला होता. लोक आपल्या मुलाबाळांसकट वाट फुटेल तिकडे धावताना दिसत होते. आगीच्या ज्वाळा आभाळाला गवसणी घालायला निघाल्या होत्या. असमतात धुराच्या लोटांनी कहर केला होता. मी जिथे आश्रयाला आले होते तिथे आजूबाजूचे आणखी कितीतरी लोक जमले होते, भानावर नसल्याप्रमाणे मी आपली ज्याला त्याला मेहतासाहेबांची खुशाली विचारीत सुटले होते. कोणी काही सांगून वेळ मारून नेत होते. पण मला काही कोणी खरे सागत नव्हते. तिथे येणारे लोक एवढे मात्र म्हणत की शत्रूचे लोक पुरुषांना मारताहेत आणि स्त्रिया व मुलीना पकडून नेताहेत. ज्या ज्या घरात ते घुसताहेत तिथे लुटमार करून घराना आगी लावून देऊन दुसरीकडे जात आहेत.

आता चार वाजले होते. मुलानी सकाळपासून काहीच खाल्लेले नव्हते. भुकेमुळे ती अगदी म्लान झाली होती. हे लक्षात आल्यावर नवाबाच्या पत्नीने मक्याच्या पिठाची एक भाकरी केली आणि मुलांना देण्यासाठी मजजवळ दिली. मी त्या एका भाकरीचे सहा तुकडे केले अन् प्रत्येक मुलाला एकेक वाटा दिला.

卐 卐

## 卐 भोवऱ्यात 卐

卐 卐

रात्रीचे दहा वाजेपर्यंत आम्ही असेच बसून राहिलो होतो. दहा वाजता नवावा आला, आणि आपल्या बायकोला बाहेर बोलावून काहीतरी सांगू लागला. त्याची बायको जेव्हा आत आली तेव्हा मला म्हणू लागली, 'तुम्ही आत्ताच्या आत्ता आमच्या घरातून निघून जा. आमच्या घरात तुम्हाला राहता येणार नाही. शत्रू इकड आले अन् आम्ही तुम्हाला

आश्रय दिला आहे हे त्यानी पाहिले तर सर्वांना मारून टाकतील.' मी म्हणू लागले की, 'इतक्या अंधारात मी कुठ जाऊ. मी तर इकड कुणालाच ओळखत नाही.' पण ती माझा एक शब्ददेखील ऐकून घ्यायला तयार नव्हती. इतक्यात तिचा नवरा पण आत आला अन् म्हणाला, 'आपण ताबडतोब निघून जा. कलेक्टरसाहेब आणि पोलिस सुपरिटेंडेंटसाहेब जीपमधून कुठ नाहीसे झाले आहेत.' ही मात्र त्याची निव्वळ थाप वाटली. मी झटकन् बोलून गेले, 'तू हे काहीतरीच बोलतो आहेस. ते पळून जाण शक्य नाही.' तशी त्याने कुराणाची शपथ घेऊन म्हटले, 'नाही हो, खरच ते बेपत्ता झाले आहेत.'

दिवस असतानाच मी येथे आले होते तेव्हा नवाबाने मला मोठ्या आदराने घरात आश्रय दिला होता आणि आता रात्रीच्या घोर अंधारात तो मला घालवून देत होता. माझ्या मनात आले 'मनुष्य किती लवकर बदलू शकतो! घटकेत तो देवासारखा भासतो की क्षणात राक्षसासारखा वागतो.' परंतु मी काय करणार होते! शेवटी नाइलाज होऊन मी म्हणाले, 'माझ्यामुळ तुमच नुकसान होणार असेल तर मी आत्ता निघून जाते. जे व्हायच असेल ते होईल. मी सगळ सहन करीन पण माझ्यामुळ दुसऱ्याला संकटात लोटणार नाही. पण एक मात्र मी म्हणणार आहे. मी आमच्या बंगल्याच्या चौकीदाराच्या घरी जाईन म्हणते तर तिथपर्यंत घालवायला तुम्ही माझ्याबरोबर यायला पाहिजे.' हा चौकीदार थोड्याच दिवसापूर्वी रजेवर गेला होता. तो जातीने मुसलमान होता. पण फार सज्जन होता. या जागपासून त्याचे घर बरेच दूर होते. नवाबा म्हणाला, 'बराय! जोगिबाबाच्या गावापर्यंत मी तुम्हाला पोहोचवितो, मग पहाटेच्या वेळी त्या गावचा तलाठी त्या चौकीदाराच्या गावाला पोहोचवून देईल.' हा जोग्यांचा गाव म्हणजे गुंडाचा गाव म्हणून प्रसिद्ध होता. अन् नवाबाच्या एकंदर बोलण्यावरून त्याच्या मनात काही काळे बेरे तर नाही ना अशी शंका मला आली. अन् मी आपल्याबरोबर ओम् व शिवदयाळ याना पण घेतले. आम्हांला घरातून लवकर बाहेर काढणारा आमचा पट्टेवाला पण आमच्याबरोबर निघाला.

आमचा रस्ता डोंगरातून होता. जागजागी काटे खडे भरपूर बोचत होते. मधूनच सुळके असल्याने जरा पाय घसरला की हाडे बरगड्या मोडायची भीति वाटत होती. पाल्यापाचोळ्यातून सळसळ आवाज येत होता. त्यामुळे जिवाणूंची धास्ती वाटत होती. समोर शहर जळताना दिसत होते. आणि ज्वाळांच्या प्रकाशात जळलेली कांही घरे-पाने, फांद्या झडून गेलेल्या मोठ्या वृक्षाप्रमाणे भासत होती. तोफा अन् बंदुकाच्या गोळ्यांचे आवाज अजूनही ऐकू येत होते.

या आमच्या छोट्याशा काफिल्यात मी शेवटी चालत होते. आमच्या संकटातली ही पहिली सफर होती. असल्या भयानक रात्री काय मनात आणून आम्ही वाटचाल करीत होतो कोण जाणे! बरेच दूर चालल्यावर आम्ही पहाडातल्या एका वस्तीशी पोहोचलो. तिथे एका माणसाला बोलावून नवाबा म्हणाला, 'भाई, उजाडेपर्यंत आम्ही तुझ्या वस्तीवर राहणार आहो!' तो नवाबाच्या थोड्या नात्यातला होता. त्याने आम्हाला आपल्या घरी राहू दिले. मुलेही आता अगदी थकून गेली होती. आणखी पुढे जाण्याची त्याच्या अंगात बिलकुल शक्ती नव्हती. आधीच ती बिचारी थंडीने गारठली होती. त्यातून कपडे पण थोडे ओलसरच, त्यामुळे थंडीने त्याचे दात वाजत होते.

घरवाल्याने एक खाट, एक गोधडी अन् मोठीशी मक्याची भाकरी आम्हाला दिली. भाकरी घ्यावी की नाही असे क्षणभर मला वाटले. पण मुले भुकेली असल्यामुळे घेण्याशिवाय मला गत्यंतरच नव्हते. मुकाट्याने मी भाकरी घेतली आणि मुलाना वाटून दिली. थोडी भाकरी खाऊन खाटेवर पडता क्षणीच मुले गाढ झोपी गेली. मीही त्याच्या बाजूला खाटेवर आडवी झाले. जी गोधडी आम्हाला पांघरायला मिळाली होती ती जर आम्ही चांगल्या परिस्थितीत होतो तेव्हा आमच्या बंगल्याच्या बाजूला पडलेली आढळली असती तर ती आम्ही दूर फेकून दिली असती. इतकेच नव्हे तर ती जागा सुद्धा साफ केली असती. पण या प्रसंगी असली मळकी गोधडी मिळाली म्हणून सुद्धा आम्ही खुश होतो.

आम्ही झोपलो होतो त्या खोलीत बरेचसे धारदार भाले टांगलेले होते. ते पाहून मनात तर धस्सच झाले. मी जेमतेम अर्धा तास पडले असेन तो बाहेरच्या बाजूला कोणी तरी कुजबुजत असावे असे वाटले. मी लगेच उठले नि दार उघडून बाहेर बघू लागले. तो तीन व्यक्ति आपापसात हळूहळू काही तरी बोलत असलेल्या मला दिसल्या. त्यातला एक नवाबा होता. दुसरे दोघे काही मला ओळखले नाहीत. दुसऱ्या दोघांपैकी एकाच्या हातात चकाकणारा भाला आणि दुसऱ्याच्या हातात कुऱ्हाड होती. मी विचारले, तुमचा 'काय बेत चालला आहे?' त्याबरोबर नवाबा पुढे आला अन् गडबडीने म्हणाला, 'तुम्हाला इथ सुद्धा थांबता येणार नाही. कारण सकाळी या बाजूला हल्लेखोर येण्याची शक्यता आहे आणि तुम्हांला आश्रय दिलेला पाहिल्यावर यांचीही ते धूळधाण करून टाकतील. आपण सर्वांनी येथून निघून गेल पाहिजे.' हे ऐकून तर माझे डोके अगदी सुन्न झाले. सकाळपासून मी घोटभर पाणीसुद्धा प्याले नव्हते. या संकटाच्या चिंतेने मी इतकी व्यग्र होते की मला विचार करण्याचीदेखील शक्ती राहिली नव्हती. पण आपल्यामुळे कुणाचे नुकसान होऊ देता कामा नये एवढे माझ्या लक्षात आले म्हणून मी त्याना म्हणाले, 'मला रस्ता माहीत नाही. तेव्हा तुम्हाला माझ्याबरोबर यायला लागेल.' नवाबा म्हणाला, 'मी तर नाही येऊ शकणार. कारण माझी मुलबाळ एकटी राहिली आहेत. याच्यातला एकजण तुमच्या सोबतीला देतो पण त्याला तुम्ही वीस रुपये द्यायला पाहिजेत.' मी म्हटले, 'मी तर घरातून वीस पैसेसुद्धा आणले नाहीत, मग वीस रुपये कुठून देऊ' यावर तो म्हणाला 'तुम्ही आणले नाहीत त्याला तो काय करणार! त्याला पैसे पाहिजेत. मग तुम्ही कशीही तजबीज करा.' माझ्यापुढे मोठाच पेच निर्माण झाला. आमच्यापैकी कोणाजवळही पैसे नव्हते. आम्ही प्रश्नार्थक मुद्रेने एकमेकांकडे पाहू लागलो. तो तर भलताच चढून बोलायला लागला. 'मी स्पष्ट सांगतो की मला तुम्हाला कोणतीही मदत करता येणार नाही. तुम्ही इथून बाहेर निघा.' इतक्यात आपल्या कानात कुड्या आहेत हे माझ्या ध्यानात आले अन् मी एका कानाकडे बोट करून त्याला म्हटले. 'ही कुडी पाहिजे तर तुला देते.' लगेच त्याला लोभ सुटला अन् बाहेरून एका माणसाला बोलावून घेऊन तो म्हणाला, 'ह, द्या याला त्या कुड्या.' पण मी म्हणाले, 'इथ नाही मी ती देणार! आम्हाला त्यांनी सांगितल्या ठिकाणी पोचवलन् की मग देईन.' त्याच्या मनात येते तर माझ्याजवळचे सर्व काही हिसकावून घेऊन ते आम्हाला घालवून देऊ शकले असते. पण मजजवळ आणखी काही



त्या दोन निष्पाप मुलांचं मीलन हें अगदी अपूर्व होतें

असेल असे त्यांना वाटले नाही आणि 'ते वर' म्हणाले. मग मुलांना जागे केले. बिचारी खडबडून उठली आणि आपल्यावर काय संकट आले म्हणून पाहायला लागली. मी त्यांना म्हटले, 'उठा बाळांनो ! घाबरण्याच काही कारण नाही. संकटांना धैर्यान तोंड देण आपल कर्तव्य आहे.'

आम्ही त्या नव्या इसमाबरोबर निघालो. नवाबा आमच्याबरोबर आला नाही. रात्री एक वाजता दाट काळोखात रस्ता चाचपडत आम्ही चाललो होतो. तिथे चांगली सडक नव्हती. जिकडे तिकडे खडे व काटे विखुरलेली डोंगरातली ती एक पाऊल वाट होती. पण केवळ परमेश्वराच्या कृपेनेच आम्हांला वाटेत काटे रुतले नाहीत की ठेचही लागली नाही.

थोडेसे लांब गेल्यानंतर आमच्या मागच्या बाजूने आम्हांला कसला तरी आवाज ऐकू येऊ लागला. मी मागे वळून पाहिले तर एक शीख तरुण टॉर्चचा उजेड पाडीत आमच्या मागून मागून येत होता. माझ्या-बरोबरचे लोक त्याला ओळखत होते. त्यांनी त्याला विचारले. 'तू कुठ निघाला आहेस !' त्यावर तो तरुण मुलगा एका बड्या शीख सरदाराचे नांव घेऊन म्हणाला, 'ते आपल्या मुलाबाळांसकट पळून चालले होते. त्या वेळी त्यांचा एक दहा वर्षांचा मुलगा डोंगरातल्या दरीत घसरून पडला. त्याची प्रकृति अगदी चिंताजनक आहे. तो घटकेचा सोबती आहे. तुम्ही आपल्या मुलांना अगदी काळजीपूर्वक अन् सांभाळून घेऊन चला.' पण अशा वेळी मी तरी काय काळजी घेऊ शकणार होते ! चहू बाजूनी जणू काय मृत्यूने जबडा उघडल्यासारखे वाटत होते. सर्व मुले पुढे चालली होती आणि मी मागून जात होते. अंधारात केव्हा केव्हा आम्ही एकमेकांपासून दूर जात होतो. म्हणून मुलांबद्दल मला सारखी काळजी वाटत होती.

चालता चालता शिवदयाळ माझ्या अगदी जवळ आला आणि हळूच मला म्हणाला, 'मी थोडा पुढ गेलो होतो तेव्हा मला काही हिंदू लोक भेटले. त्यांच्याबरोबर मुजफ्फराबादचा एक थोर जमिन-दार पण आहे. तो मला म्हणाला, 'तुम्हांला जर आपल चांगल व्हावस वाटत असेल तर मुसलमानांची सोबत सोडून द्या आणि आमच्याबरोबर चला.' शिवदयाळने मला या हिंदू लोकांचे म्हणणे ऐकण्याचा सल्ला दिला. मलाही ते हिताचे वाटले म्हणून मी त्या मुसलमान वाटाड्याला म्हटले, 'भाई, तू आम्हांला बराच वेळ सोबत केलीस; तू आता जा. तुझी मुलमाणस वाट पाहात असतील. त्यांच्या रक्षणासाठी तुला जायला पाहिजे. आम्हांला आता रस्ता नेईल तिकड आम्ही जाऊ.' असे म्हणून कबूल केल्याप्रमाणे कानातल्या हिऱ्याच्या कुड्या मी त्याला काढून दिल्या. त्याने अगदी समाधानाने त्या घेतल्या आणि मला सलाम करून तो परत वळला. जाता जाता एकदा अगदी करुण दृष्टीने त्याने माझ्याकडे आणि मुलांकडे पाहिले. जणू काही आमच्या या परिस्थितीचे त्यालाही फार दुःख झाले होते. मनुष्य-स्वभावात तऱ्हेतऱ्हेच्या छटा आढळतात हेच खरे!

आम्ही थोडे पुढे गेलो आणि पाहिले तर पुरुष, बायका व मुले यांचा एक तांडाच चालला होता. आम्ही त्यांना जाऊन मिळालो. त्यांच्यातल्या एका माणसाने माझ्या धाकट्या मुलाला थकला आहेसे पाहून कडेवर उचलून घेतले. जाता जाता 'बोथा' नावाच्या एका गावी आम्ही पोहोचलो तेथे शिखांचे एक मंदिर होते. तिथे आम्ही थांबलो. आमच्या आधी आलेले तिथे आणखीही काही लोक होते. अंधारामुळे काही सुचत नव्हते की उमजत नव्हते. तहानेने जीव कासावीस झाला होता. आमच्या बरोबरच्या लोकांनी थोडे पाणी दिले. पण पाहता पाहता एक एक जण निघून चालला. अन् थोड्याच वेळात बरोबरचे सर्व लोक नाहीसे झाले. आम्हांला बरोबर चलण्या-विषयी कोणीच म्हणाले नाही. आमच्या सोबत्यांना शोधू लागलो पण तेथला प्रत्येकजण आपल्याच संकटात चूर होता. त्यामुळे आम्हांला कोणीच काही सांगू शकले नाही. मग मी शिवदययाळला म्हटले, शिवदयाळ, बाबा तू तरी आता आम्हांला एकट सोडून जाऊ नकोस. एखाद्या सुरक्षित जागी पोहोचवून मग जा.' शिवदयाळ म्हणाला, 'माताजी, माझ्या जीवात जीव आहे तोपर्यंत मी अशा संकटात तुम्हाला आणि मुलांना सोडून जाणार नाही.' मी त्याला म्हणाले, 'आपल्याला इथ राहून चालणार नाही, उजाडल्याबरोबर शत्रूचे लोक हे शिखांच देऊळ पेटवून द्यायला येतील. आपल्याला कुठ तरी आणखी पुढ गेल पाहिजे.' परंतु कुठे जावे, कोणत्या रस्त्याने जावे ते आम्हाला काहीच माहीत नव्हते आणि तिथे राहणेही आम्हांला सुरक्षित वाटत नव्हते म्हणून आम्ही निघालो अन् जो रस्ता समोर दिसला त्याने पुढे चालू लागलो. थोड्या वेळानंतर हळहळू उजाडू लागले आणि आम्ही सारखे चालतच राहिलो. चालता चालता समोरच्याच टेकडी-वर बरेच लोक लाठ्या वगैरे घेऊन उभे असलेले आम्हांला दिसले, त्यांनी आम्हाला टेकडीवर जायला मज्जाव केला. ते म्हणू लागले. 'तुम्ही कुणीकड चालला!' आम्ही चौकीदाराच्या गावचे नाव सांगि-तले. त्यावर ते म्हणाले 'खबरदार ! एक पाऊल पुढ टाकाल तर ! या रस्त्यान कोणालाही जाऊ द्यायच नाही असा सरकारचा हुकूम आहे' आम्ही जिथल्या तिथेच थबकलो. विचारले, 'मग आम्ही जायच तरी कुठ?' पण या प्रश्नाशी त्यांना काहीच कर्तव्य नव्हते. ते सर्व मुजफ्फराबादचे शेतकरी होते. या वेळी त्यांच्या डोळ्यांत खून चढ-लेला होता आणि मनात आणते तर लाठ्यांनी मारून मारून त्यांनी

आमचा केव्हाच खिमा बनविला असता. पण कसा कोण जाणे त्यांनी आमच्यावर हात टाकला नाही. आम्हांला त्यांनी जाऊ दिले. आम्ही परत फिरून, टेकडी उतरू लागलो. खरे म्हणजे, आमच्यात एक पाऊलसुद्धा चालण्याची ताकत राहिली नव्हती. थंडीमुळे मुलांचे गालओठ निळे दिसू लागले होते अन् दातखिळ वाजत होती.

पायथ्याशी आम्हाला एक म्हातारा मुसलमान भेटला. मी त्याला म्हटले, 'बाबा, एक तास दोन तास आम्हांला आपल्या घरी आसरा घाल तर फार उपकार होतील. मुलाच्या हातापायांत जरा ऊब येईल.' त्याला दया आली आणि त्याने आम्हाला आपल्या घरी नेले. तो एक गरीब शेतकरी होता. त्याच्या घरापासून मुजफ्फराबाद शहर सुमारे दहा मैल दूर होते. त्याच्या घराला पुढच्या बाजूला पडवी होती. मागच्या खोलीत एका बाजूला गाय व म्हैस बांधलेल्या होत्या आणि दुसऱ्या बाजूला चूल होती. जवळच थोडी फुटकी तुटकी भांडी अन् दोन तीन फाटक्या मळक्या गोधडया होत्या. एक दोन खाटा होत्या आणि खुटीवर टांगलेली एक तलवार पण होती. त्याची बायको, दोन मुलगे व तीन मुली एवढे कुटुंब होते. आम्हाला आत नेऊन त्याने मोठया आदराने बसवले अन् तो आपल्या बायकोला म्हणाला, 'हे आपले पाहुणे आहेत. याच आदरातिथ्य करण आपल कर्तव्य आहे. पाहिलीस का याची काय दशा झाली आहे ती! देव यांच भल करो.' मुलाना विस्तव दिसल्याबरोबर ती चुलीभोवती कोंडाळे करून बसली. आम्ही सर्वांनी हाताला ऊब आणली. त्याचा मुलगा माझ्या मोठया मुलाच्या वर्गातलाच निघाला. त्यांनी एकमेकाना मिठी मारली. त्या दोन निष्पाप मुलाचे हे मीलन अगदी अपूर्व होते. तो आपल्या वडिलाकडे गेला आणि त्याने सांगितले की, हा जिल्हाधिकाऱ्याचा मुलगा आहे. नंतर त्याची आई आमच्या खाण्यापिण्याच्या व्यवस्थेला लागली. तिने चहा आणि मक्याच्या पिठाच्या थोडया भाकरी तयार केल्या. थोडी कणसेही भाजून दिली. मुलानी चहा आणि भाकरी खाल्ली. मी कणसाचे थोडे दाणे खाल्ले. खरे म्हणजे मला खाण्याची मुळीच इच्छा नव्हती. पण गारठा, आणि भीति यानी गच्च बसलेल्या दाताना थोडी हालचाल मिळावी म्हणूनच केवळ चार दाणे तोंडात टाकले. यांच्या घरी आल्यावर आमच्या मनाला व शरीराला इतका आराम मिळाला की त्याचे वर्णन करणे अशक्य आहे.

घरमालकीणबाई जेव्हा स्वयपाक करायला लागल्या तेव्हा त्यांनी मला विचारले, 'मी शिजवलेल तुम्ही खाणार का! नाही तर तुम्ही स्वतः हातांनी बनवा.' मी म्हणाले, 'तुमच्या हातच मला चालत. मी काही इतक्या जुन्या मताची नाही. पण मला काही आता भूक नाही. मी जेवणार नाही. फक्त मुलच तेवढी जेवतील.'

गरीबांच्या झोपडीत असे काय असणार की, कितीही पाहुणे आले तरी पोटभर घालता यावे! पण त्यांच्याकडे जे काय होते ते त्यांनी शिजवले आणि सर्वांनी वाटून खाल्ले, अन् तेवढयाने सुद्धा 'मुलांना चांगली हुशारी आली. एवढे मिळाले हे तरी काय थोडे झाले! मग त्यांनी आम्हांला एक खाट दिली आणि पडल्याबरोबर मुलांना अगदी गाढ झोप लागली. शिवदयाळ आणि ओम जमिनीवर झोपले.

थोडयाच वेळात बाहेरच्या बाजूला इतकी गडबड आणि आवाज ऐकू येऊ लागला की, मला वाटले शत्रूचे लोकच जवळ येऊन ठेपले असले पाहिजेत. म्हणून मी शिवदयाळला उठवले अन् सांगितले, 'हे बघ, ही समोर तलवार टांगलेली दिसते आहे, जर शत्रूचे लोक आले तर तावडतोब तू माझी अन् मुलीची तलवारीने कत्तल करून टाक.' मुली पण बिचाऱ्या तयार होत्या. पण देवाच्या मनात काही निराळेच होते. ज्यांच्या घरात आम्ही थांबलो होतो त्याचे शेजारी त्यांच्यावर चिडले होते; आणि त्याना दम भरीत होते व पाठीस लागले होते की, 'अरे बाबानो, हे आपले पाहुणे आहेत. यांना मी घराबाहेर कसा घालवू! माझ मन मला अस करू देत नाही. तुम्हाला देवाधर्माची काहीच का चाड नाही! पाहा बर! ईश्वराला सर्व काही दिसत!' पण त्याच्या बोलण्याकडे कोण लक्ष देणार! ते लोक काही केल्या आपला हट्ट सोडीनात.

थोडया वेळाने घरचा मालक कुठे बाहेर निघून गेला. मग त्याच्या एका जवळच्या नातलग माणसाने त्याच्या बायकोला व मुलाना बोलावून घेऊन काहीसे हळूहळू सांगितले. आणि हातात बंदूक घेऊन तो आत आला. आम्ही सगळे बाजेवरून उतरून उभे राहिलो. त्याने आमच्यावर बंदूक रोखली अन् म्हणाला, 'आत्ता इथून सगळयानी चालते व्हा नाही तर बंदूक उडवीन याद राखा!' तो पूर्वी केव्हा तरी सीमा प्रांतात फौजेत होता वाटते. माझ्या मनात आले याने गोळया झाडल्या तर बरेच होईल. आम्ही न भिता गोळया खाऊ. मी त्याला म्हणाले, 'ठीक आहे तुझी इच्छाच असेल तर झाड गोळया. अशा मध्यरात्री मी कशी जाणार!' आमच्यामध्ये आता चार पावले देखील चालण्याची शक्ती नव्हती. त्याने आम्हाला खूप धमकावून पाहिले पण माझे आपले उत्तर तेच की, 'तुझी इच्छाच असेल तर झाड गोळया.' इतके झाल्यावर तो जरा नरम आला, आणि म्हणाला 'ठीक आहे. तुम्ही व मुल इथ राहू शकता. मात्र तुमच्याबरोबरच्या या दोन इसमानी इथून गेल पाहिजे.' त्यांची दोघाची जायचीच इच्छा होती. मी त्यांना सांगितले, 'तुम्ही जाव हेच बर. आमच्याकरिता उगीच तुमचा जीव धोक्यात यायला नको. ईश्वर यातून आपल्याला निभावून नेईल.' मग मुलाकडे सारखे वळून पाहात व हुंदके देत आणि डोळे पुशीत अगदी नाइलाज म्हणून शिवदयाळ व ओम् निघून गेले. आमच्याबरोबर आणलेली गुप्ती ओम् आपल्याबरोबर घेऊन गेला. तात्पुरते संकट निभावले म्हणून मी एक नि:श्वास सोडला आणि रात्रभर आम्ही तिथेच राहिलो. या दोन दिवसात मुलांना पोटभर खायला मिळाले नव्हते. मधूनमधून उगीच मुले लाब श्वास टाकीत होती. मी मुलांना म्हटले, 'बाळांनो, घाबरू नका, हिम्मत धरा. या वेळी तुमची खरी परिक्षा आहे. मी तुम्हाला आपल्या प्राचीन संस्कृतीच्या वीरश्रीच्या गोष्टी सागत असे ना! काय सांगते बर आपली प्राचीन संस्कृति? आपल्या स्वाभिमानाकरिता मृत्यूचदेखील हसत खेळत स्वागत केल पाहिजे. बस्स! हेंच तुम्हांला आता करायच आहे.'

गावातले पुरुष लुटालूट आणि दंगा करीत बाहेर हिंडत होते. स्त्रियाच फक्त घरात बसून होत्या. सारख्या बातम्या पसरत होत्या की शत्रूचे गुंड इकडे आले, आता तिकडे गेले. हा गाव लुटला, आता हा गाव आगीने बेचिराख झाला. दिवसभर धुमाकूळ चालला होता. स्त्रिया भीतीने थरथर कापत होत्या व तोंडाला येतील ते शिव्याशाप गुंडाना देत होत्या. अशाच गोंधळात रात्र झाली. कोणीही झोपले



मी ओढणीचा पदर फाडला अन् त्याच्या हातात राखी बांधली

नाही. आमच्या घरच्या मालकाने कुठूनसे पीठ आणले होते ते त्याने ओळखीच्या काही शेजाऱ्यांना थोडे थोडे दिले.

## मानलेला भाऊ

रात्री बारा वाजेपर्यंत आम्ही बसून राहिलो होतो. बारा वाजता घराची मालकीण व तिचा नातेवाईक आमच्याजवळ आला, आणि म्हणाला, 'आत्ताच्या आत्ता इथून निघून जा. आम्ही तुम्हांला घरात ठेवू शकणार नाही.' मी म्हटले, 'अहो, तुम्ही आमच्या सोबतीच्या दोघांना घालवून दिलत आणि रात्रीच्या बारा वाजता मी एकटी मुलांना घेऊन कुठ जाऊ ! रात्रभर आम्हांला राहू द्या. सकाळी आम्ही जाऊ.' पण ते काहीच ऐकून घ्यायला तयार नव्हते. त्या नातेवाइकांची दुष्ट नजर आमच्यावर रोखली होती. तो म्हणाला, 'मी तुम्हांला त्या समोरच्या उंच डोंगरावर पोहोचवितो. तिथ एक गुहा आहे, तीत तुम्ही राहा. कधी कधी आम्ही तुम्हांला पीठमीठ पोचवीत जाऊ' आता मी काय करू, कुठे जाऊ. मला काहीच समजेनासे झाले. वाटले कुठल्या कुठल्या पापांचे प्रायश्चित्त मला भोगावे लागत आहे कुणाला ठाऊक! पण केव्हा केव्हा ईश्वराचा साक्षात्कार असा काही अनुभवाला येतो की आश्चर्याने डोळे दिपावे. आम्हांला घराबाहेर काढण्याचा त्यांनी अगदी चंगच बांधला. इतक्यात एक तरुण आत आला. आणि डोळ्यांत पाणी आणून मला म्हणाला, "ताई, मी एक अगदी सामान्य मनुष्य आहे. पण तू माझ एक म्हणण ऐकशील का"? का कोण जाणे पण माझ मन मला सारख सांगत आहे की यांना मदत कर? ही अंतःप्रेरणा मला अगदी स्वस्थ राहू देईना. ताई, तू मला बहिणीसमान आहेस आणि कितीही संकट आली तरी त्यांना न जुमानता मी शक्यतोवर तुझ रक्षण करीन.' माझ्या मनात एक विचार चमकून गेला. मी ओढणीचा पदर फाडला अन् त्याच्या हातात राखी बांधली. एका बोटाचे रक्त काढून त्या रक्ताचा त्याच्या कपाळावर टिळा लावला. त्याने पण हे सगळे अगदी मुकाट्याने करू दिले. हे सर्व करीत असताना अगदी एखाद्या अद्भुत सुखाचा अनुभव मला येत होता. मी त्याला म्हटले, 'भाई, हा आपल्या पुरातन काळापासूनचा रिवाज आहे. हुमायूनच्या वेळीदेखील ही पद्धत होती. आणि राखी बांधणाऱ्या बहिणीच संकट भावाला निवारण कराव लागल होत. मी आता तुला माझा भाऊ मानल आहे. मला आशा आहे की तू आताच केलेली प्रतिज्ञा तडीला नेशील.'

थोड्या वेळाने त्याने आमच्या मालकिणीला सांगितले 'की आजची रात्र यांना इथ राहू दे. सकाळी मी यांना आपल्या घरी घेऊन जाईन.' एवढे सांगून तो निघून गेला. त्यानंतर आम्ही झोपून राहिलो.

सकाळी मी उठले तेव्हा मला अगदी उदास उदास वाटत होते. डोळे सारखे भरून येत होते. ह्यांचा (मेहतासाहेबांचा) जीव धोक्यात आहे असे सारखे मनात येत होते. पण दुसऱ्याच क्षणी माझ्या ध्यानात आले की मला रडताना पाहिले तर मुलांचा धीर खचेल आणि येणाऱ्या संकटांना धैर्याने तोंड देण्याची धमक त्यांच्यात राहणार नाही. म्हणून मी लागलीच डोळे पुसले, मन आवरले अन् मुलांच्या जवळ जाऊन बसले.

घराचा मालक व मालकीण कुठेतरी बाहेर गेली होती. घरात त्यांचा बारा वर्षांचा मुलगा होता. त्याने आम्हाला तावडतोब निघून जाण्यास सांगितले. तो म्हणाला, 'आम्ही तुम्हांला आमच्या घरी ठेवू शकणार नाही. तुम्ही अगोदर निघून जा.' त्यामुळे आम्हांला जाणे भाग पडले. ती वेळ फारच भयानक होती. अशी बातमी कळली की शेजारच्या गावातील सर्व स्त्रिया व मुलींनी एका घरात खूप मोठे अग्निकुंड पेटवले अन् स्वच्छ कपडे घालून भजन म्हणत सर्वांनी अग्नीत उड्या टाकल्या आणि अगदी हसत हसत वीरवृत्तीने जोहार केला. लोक असेही बोलत होते की टोळीवाल्या हल्लेखोरांनी जळती प्रेते बाहेर ओढून काढून त्यांच्या अंगांवरचे दागिने काढून घेतले. जवळच्या गावात हे भयंकर प्रकार चालू होते. त्याच वेळी आम्हांला घराबाहेर पडावे लागले होते. मुलांना पुढे चालायला सांगून मी त्यांच्या मागून चालू लागले. कुठे जायचे हे काहीच माहीत नव्हते. जो रस्ता दिसला त्याने सरळ चालू लागलो. थोडे दूर गेल्यावर एक टेकडी लागली. जरा वर चढल्यावर एका खडकाच्या बाजूला गुहेसारखी जागा दिसली. तिच्या आत मी मुलांना बसवले अन् मी समोर तोंडाशी बसले. आतल्या बाजूला मुली अशा बसवल्या की सहसा कोणाला समजून येऊ नये. अशा तऱ्हेने आम्ही तेथे सुमारे अडीच तास बसून होतो. आजूबाजूला गोळ्यांचे आवाज येत होते. पण आम्हांला गोळीबिळी लागली नाही. असाच थोडा वेळ गेल्यानंतर आदल्या रात्री मला मिळालेला माझा भाऊ आम्हांला शोधीत शोधीत आमच्याजवळ येऊन पोहोचला. त्याला पाहताच मुलांना फारच आनंद झाला. आणि मुले म्हणू लागली, 'आई, अग पाहिलस

का ? तुझा भाऊ आला ! ' आल्याबरोबर माझ्या भावाने आम्हाला निघण्याची अगदी घाई केली. आम्ही त्याच्याबरोबर निघालो आणि जेव्हा त्याच्या घरी पोहोचलो तेव्हा त्याने समाधानाचा श्वास टाकला. तो म्हणाला, 'आज सकाळी मी दोन मैल खुद्द हल्लेखोराच्या छावणीतच गेलो अन् त्याना विचारल की 'मी माझ्या घरात काही स्त्रियाना आश्रय दिला तर चालेल का ?' त्यानी तशी परवानगी दिली आहे. तेव्हा मी आता तुम्हांला अगदी उघडपणे मदत करू शकेन. पण न जाणो केव्हा कोणाची धाड येऊन पडेल अन् जर ते चौकशी करू लागले तर मी त्याना काय सागू बर ! तुमच्या माझ्या दिसण्यात तस काही साम्य नाही. पण मी सागायच ठरवल आहे, की ही माझी बहीण आहे आणि हिच सासर सियालकोटला आहे. चालेल ना अस सांगितल तर ! मुलीच्या रक्षणाकरिता अस काही करण जरूर आहे. मग काय, हा विचार तुला पसंत आहे ना ! तू मुळीच काळजी करू नकोस. ईश्वरावर भरवसा ठेव. तो सर्व काही ठीक करील.' त्याचे हे बोलणे ऐकत असताना मी मनातून त्याला सारखे धन्यवाद देत होते. तो स्वत: मुसलमान असूनसुद्धा आमच्यासाठी एवढे करीत होता. त्याने लगेच आम्हाला दूध व भाकरी आणून दिल्या. त्याच्या कुटुंबात एकूण सात माणसे होती. दोन लहान मुली, आई, वडील, त्याची बायको आणि एक लहान भाऊ. त्याचे घर म्हणजे दोन खोल्या व एक व्हराडा होता. गुरे वगैरे पण तिथेच बाधलेली होती. एकंदरीत त्याची आर्थिक परिस्थिति कीव करण्यासारखीच होती. पण हृदय मात्र विशाल होते.

गोठयाच्या भागात त्याने दोन खाटा आणून ठेवल्या आणि खाटांच्या खाली शेणकुरावर एक चटई पसरली. या चटईवरच आम्हांला झोपावे लागले—म्हणजेच लपावे लागले. समोवती शेणाची दुर्गंधी सुटली होती की श्वास रोखून धरावा असे वाटत होते. एकीकडे धास्ती होती की यापुढे आता काय घडणार आहे कोण जाणे ! मला फारच तहान लागली होती. घशाला सारखी कोरड पडत होती. जोराने श्वास घ्यायचीसुद्धा भीति वाटत होती. गारठयामुळे व पाणी प्याल्यामुळे मुलाना बरेच वेळा लघवीला लागली. पण आत मोरी नव्हती म्हणून त्याना बाहेर पाठवावे लागत होते आणि अशा वेळी आम्हाला गावाचे कोणी लोक पाहणार तर नाहीत ना, ही पोटात सारखी धास्ती होती.

टोळीवाले मुसलमान गावाच्या मुसलमानाना सांगत होते की तयार राहा बर ! शीख तुमच्यावर हल्ला करतील, अन् हे ऐकून गावातले सगळे मुसलमान लाठ्या, काठ्या, भाले, बरच्या, फरश्या किंवा बदूक जे सापडेल ते हत्यार घेऊन गावभर हिंडत होते. त्याना पाहून असे वाटत होते की सर्व जणू राक्षस आहेत. यांच्यात मानवतेचा लवलेशही नाही.

अशा तऱ्हेने तो दिवस सपला. जरा अंधार पडल्यावर त्याने आम्हांला त्या कैदखान्यातून बाहेर काढले. आम्ही व्हराडयात बसलो. त्याचा बाप अजून परत आला नव्हता म्हणून त्याची बहीण रडू लागली. मी तिला धीर देत म्हटले, ' बाळ ! नुसत रडून काय बर होणार ! ऊठ, भाकरी वगैरे कर. ' ते बिचारे पराधीनतेच्या पाशात इतके जखडले गेलेले होते की खाण्यापुरतेसुद्धा धान्य त्यांच्याजवळ नव्हते. त्यांच्या शेतात कणसे तयार झाली होती पण कापणीशिवाय पडून होती. या वेळी कणीक वगैरे कुठून मिळवावी हा प्रश्न होता. तिच्या भावाने कुठूनशी थोडी कणीक, तांदूळ, आणि एक काशीफळ आणले. काशीफळ कापून त्याचा तुकडा मी फोपाटयात भाजण्यासाठी खुपसून ठेवला. पोटभर खाणे मिळत नसल्यामुळे त्याची मुले अशक्तच होती. खूप भूक लागली म्हणून मुले कणसे भाजून खात होती.

इकडे गावभर लोक लूटमार करण्यात दंग होते पण माझ्या भावाला मात्र हे काही पसंत नव्हते. तो खरोखरच थोर मनाचा होता. थोडया वेळानतर मी मुलाना म्हटले, ' मुलानो आपल्यालासुद्धा काही काम करायला पाहिजे. आयत खाण पाप आहे.' हे ऐकून सुदेश आणि वीणा या दोघी त्याच्या बहिणीबरोबर शेजारी जात्यावर गहू दळून आणायला गेल्या. बाकीची मुले कणसाचे दाणे काढू लागली आणि मी साळीच्या काही ओंब्या घेऊन त्यातून तादूळ कसे काढावयाचे ते त्याच्या बायकोला विचारू लागले. ती म्हणाली, 'या ओंब्या तू पायान तुडवल्यास तर काही दाणे निघतील. ' एवढे सागून ती गुराना वैरण घालायला गेली. अनवाणी पायानी मी आतापर्यंत खूपच चालले होते म्हणून म्हणा किंवा साळी कशा तुडवायच्या हे मला नीट माहीत नसल्यामुळे म्हणा पण माझ्या दोन्ही पावलातून रक्त वाहू लागले. मला माझा स्वत:चाच अगदी तिरस्कार वाटू लागला. मनात आले की मी स्वत.ला किती ऐदी बनवून ठेवले आहे ! माझ्याने काहीच काम होत नाही मग मी मुलाना कसे सामाळणार ? चरितार्थासाठी मोलमजुरी कशी करू शकणार ? असे मनात येऊन माझ्या दोन्ही डोळयातून अश्रुधारा वाहू लागल्या. इतक्यात घराची मालकीण आली. तिने माझी रक्तबंबाळ झालेली पावले पाहिली आणि तिला अतिशय वाईट वाटले. गहिंवरून ती म्हणाली, ' तू मला धाकटया बहिणीसारखी आहेस. थाबव ते काम. तुझी स्थिति मला पाहवत नाही. जोपर्यंत मी आहे तोपर्यंत तुला काहीही काम करण्याची जरुरी नाही.' मी माननेच बरे म्हटले आणि एका बाजूला जाऊन बसले आणि यानंतर आपल्यापुढे काय काय वाढून ठेवलेले आहे असे माझे मन विचारू लागले. इतक्यात सुदेश व वीणा पीठ दळून घेऊन आल्या. त्या हसत हसत येत होत्या. पण इतक्यात त्यांच्या हाताकडे माझे लक्ष गेले. ते दळणामुळे सोलपटलेले दिसले. हे पाहून मी अगदी मुग्ध बनले. बोलणार तरी काय ! मला काही बोलताच येईना.

स्वयपाक तयार झाला. मुले जेवली. पण प्रत्येकाच्या वाटयाला इतके कमी आले की जवळजवळ काहीच नाही म्हटले तरी चालेल. मी फोफाटयात घातलेले काशीफळ खाल्ले. त्याच्या मुलानासुद्धा पोटभर जेवायला मिळाले नाही. पण ती संतुष्ट दिसली. गरीब शेतकऱ्यांची मुले कणखर असतात हेच खरे.

त्यानी आम्हाला एक खाट दिली आणि आम्ही गोठयात झोपलो. रात्रभर गावातले लोक बेचैन होते. खाटेवर बसल्या बसल्या मी आपल्या परिस्थितीचा विचार करीत होते. अधूनमधून मुले वडिलाबद्दल विचारीत होती. पण त्याच्या प्रश्नाचे मी काय उत्तर देणार ? मध्येच थोडा वेळ मला डुलकी लागली. माझ्या डोक्याशी जवळच गाय बांधलेली होती. मी झोपले असताना तिने माझे केस चाटायला व चघळायला सुरवात केली. मला एकदम जाग आली. माझे केस फारच दुखू लागले.

सकाळ झाली. आम्ही सगळी उठलो, मलाना खूप भूक लागली होती.

त्यांच्याकड खायला काही नव्हते. मुले कणसाचे दाणे काढू लागली. पण आधीच सलपटलेल्या त्यांच्या हातांतून रक्त वाहू लागले. मुले हाताचे रक्त आपल्या कपडयांना पुशीत होती. माझे तिकडे लक्ष गेले आणि मी त्यांना दाणे काढण्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला; पण ती ऐकेनात. मग मी त्यांना प्रेमाने समजावून सांगू लागले. त्यावर मुले म्हणाली, 'आता का नको म्हणतेस ! काम केल्याशिवाय खाण पाप आहे अस तूच आम्हांला सागितलस ना !' मी त्यांना 'बाळांनो, पण तुमच्या हातांतून रक्त यायला लागल आहे. त्यामुळ मक्याचे दाणेसुद्धा लाल झाले आहेत.' यावर मुले म्हणाली, 'आई, म्हणजे आमचे हातदेखील आम्हांला काम करू देत नाहीत का ?' इतक्यात घराची मालकीण आली. तिने मुलांचे हात पाहिले अन् म्हणाली, 'अग बाई ! तुला आईच हृदय तरी आहे ना ! पाहिलस का यांचे हात किती सोलपटून गेलेत ते !' इतके बोलून तिने मुलाचे दाणे काढणे थावबले. जरा वेळाने एक बाई आली. ती मला म्हणाली, 'तुमचे मालक आता जिवंत आहेत की नाही कोण जाणे ! तुमच पुढ कस होणार ! तू आपली या मुलांना भीक मागायला पाठवीत जा. दया येऊन कोणी देतीलही. तुझ आपल काम भागेल. तूही कुणाच्या घरी राहिलीस तर बरच. मुलांच पण अशान रक्षण होईल. 'कोणाच्या घरी राहण' याचा अर्थ माझ्या लक्षांत आला होता. माझ्या अंगाचा संतापाने अगदी थरकाप झाला. पण मी अशा परिस्थितीत सापडले होते की मला राग गिळून चूप बसण्याखेरीज गत्यंतर नव्हते. ती आपली एक साधी आणि सरळ बाई होती. तिला काय माहीत की स्वाभिमान व शील याच्यापुढे प्राणांचीही पर्वा करून चालत नाही म्हणून. तिला फक्त पोट भरावयाचे एवढेच माहीत होते. मग ते कसल्याही उपयांनी असो. आमचे असे बोलणे चालू होते इतक्यात माझा भाऊ आला. त्याच्याबरोबर त्याचे वडीलही होते. दोघांचेही चेहरे घावरल्यासारखे दिसत होते. मी विचारले, 'काय बातमी आहे ?' वडिलांनी सागितले, 'शेजारच्या काही लोकांनी तुम्हांला पाहिल आणि टोळीवाल्यांना जाऊन सांगितल की यांच्या घरीं काही हिंदू स्त्रिया आहेत म्हणून. मोठीच अपत्ती आली आहे. आता या मुलीच कस होणार !' 'ताई, तू जर गैरसमज करून घेणार नसशील तर मुलीच रक्षण करण्याची एक युक्ति आहे. ती म्हणजे हल्लेखोर जर आले तर या कलमा म्हणत राहतील आणि आम्ही मुसलमान आहोत अस सांगतील.' मुलांनी शाळेंत दुसऱ्या मुलाकडून ऐकून कलमा पाठ केला होता. ती म्हणाली, 'ठीक आहे. नुसता कलमा म्हटला म्हणून काही कोणी मुसलमान होऊन जात नाही.' पण मी माझ्या भावाला सागितले, 'खोट कधी लपून राहत नाही. कलमा नुसता म्हणायला माझी देखील हरकत आहे अस समजू नकोस. मला तू शिकव, मी पाठ करीन. पण खोट बोलण मला जमणार नाही. गुंड आले तर त्या वेळी माझ्या तोंडून शब्दसुद्धा निघणार नाही. मग तुम्ही कितीही धाकदपटशा दाखवा. मला वाटत परमेश्वर सर्व काही ठीक करील. तुम्ही मुळीच घाबरू नका.' यावर माझा भाऊ म्हणाला, 'आज ते घराघरातून घुमून लपलेल्या हिंदू स्त्रियांना जबरदस्तीन घेऊन जात आहेत. ईश्वराच्या मनात काय आहे कोण जाणे ?'

स्वयंपाक चुलीवर शिजत लावलेला तसाच राहिला. भीतिमुळे मूक मरून गेली. घरातल्या लोकानामुद्धा स्वत:बद्दल काळजी वाटू लागली. कारण हिंदू स्त्रियांना शोधण्याच्या निमित्ताने टोळीवाले मुसलमानांच्या घरांतून घुसत होते, लुटालूट करीत होते, आणि वेळी मुसलमान स्त्रियांनाही पळवून नेत होते. पाहता पाहता दुपारचे चार वाजले. इतक्यात दोन दांडगे मुसलमान हातात बंदूक घेऊन आमच्या घरी घेऊन पोहोचले. त्यातला एक गावचा तलाठी होता आणि दुसरा आमच्या घरी दूध घालायला येणारा होता. मी त्याला ओळखले पण ओळख दिली नाही. आल्याबरोबर ते दोघे गर्जना करून म्हणाले, 'याना इथून बाहेर काढा. चला तुम्हांला टोळीवाल्यानी बोलवल आहे.' आम्ही सर्व घराबाहेर पडलो. ते दोघे आमच्याबरोबर निघाले. रस्त्याने भराभर चालण्यासाठी आम्हांला सारखे दटावीत होते. मी दोन्ही मुलांना म्हणाले, 'बाळांनो, मला तुमची मुळीच काळजी नाही. फक्त एक गोष्ट मी तुम्हाला समजावून सागणार आहे. ती ऐका. मृत्यूला भिऊ नका. मृत्यू आपला मित्र आहे. तुमच्यावर कोणी बंदूक रोखली तर शौर्याने छाती पुढ करा. भागूबाईसारख पळून पाठीवर गोळी खाऊ नका.' दोन्ही मुलानी एकमेकाकडे पाहिले आणि म्हणाले, आम्ही मृत्यूला भीत नाही.' मी मग मोठ्या मुलीना म्हणाले, 'माझ्या मुलीनो, दैवान आतापर्यंत पुष्कळ दाखवल. आता यापुढ काय वाढून ठेवल आहे कोण जाणे. तुम्ही शहाणपणान वागायला पाहिजे. भारतातल्या वीरकन्या वेळ आली तर मृत्यूच हसत खेळत स्वागत करतात हे घ्यानात ठेवा.'

बरेच दूर त्यांनी आम्हाला एका ठिकाणी नेले. तेथे अगोदरच काही स्त्रिया व शीख पुरुष बसलेले होते आणि समोरच दोन टोळीवाले काडतुसाचे पट्टे गळयांत अडकवून व खांद्यांवर बंदुका घेऊन पहारा करीत होते. त्याच घोळक्यात त्यानी आम्हाला बसवले. इतक्यात आणखी काही टोळीवाले आले. ते फारच भयंकर दिसत होते. त्यानी आपसात काही विचारविनिमय केला आणि त्यातल्या गावच्या मुसलमानाना सांगितले, 'हे पाहा. यांना आज रात्रभर इथच ठेवा. एखादी गाय किंवा वासरू मारा अन् ते शिजवून या सगळयाना खायला घाला म्हणजे हे सगळे मुसलमान बनून जातील.' इतके बोलून ते निघून गेले; अन् मी देवाची आळवणी करू लागले;' हे प्रभो, आमची लाज आता तुलाच. माझा तुझ्यावर विश्वास आहे. शेवटपर्यंत निभावून नेणारा फक्त तूच आहेस.'

थोड्या वेळाने माझा 'भाऊ' आला अन् म्हणाला, 'ताई काळजी करू नकोस. मी जिवंत आहे तोपर्यंत तुझ्या रक्षणाचा सर्व भार मी माझ्यावर समजतो.' घरून निघताना अंगावरचे दागिने काढून फडक्यात बांधून आणलेले माझ्याजवळ होते. ते मी त्याच्याकडे दिले. तो म्हणाला, 'ताई, हे तू मला सांभाळायला दिल आहेस अस समजून मी जपून ठेवीन. तुला वाटेल त्या वेळी घेऊन जा.' आम्ही याप्रमाणे बोलत होतो. इतक्यात तलाठ्याबरोबरचा तो दुसरा इसम आमच्याजवळ आला अन् विचारू लागला. 'आपण मला ओळखलत का ! मी आपल्या बंगल्यावर दूध घालायला येत असे. त्या वेळी आपण आमच्या लोकांसमोर बाहेर येत नव्हता.' मी म्हणाले, 'होय. आणि हेही माझ्या लक्षात आहे की मी तुम्हाला दुधाचे काही पैसे देण आहे. पण मी घरून येताना पैसे आणू शकले नाही. म्हणून तुमचे पैसे देता येत नाहीत याच वाईट वाटत. शक्य झाल्याबरोबर मी तुमचे पैसे देऊन टाकीन.' मग तो म्हणाला; 'मला तुम्हाला काहीच मदत

करता येत नाही ही फार दुर्दैवाची गोष्ट आहे. टोळीवाल्याचा हुकूम मानण आम्हास भाग पडत यावद्दल मला क्षमा करा.'

卐 卐

## 卐 इस्लाम धर्माची शिकवण 卐

卐 卐

थोडयाच वेळात पहारा करणारे ते दोघे जवान टोळीवाले आले आणि म्हणाले, 'गायीच वासरू विसरू काही मारू नका. आज यांना इथून आणखी दोन मैल दूर न्यायच.' आणि मग अगदी असभ्य रीतीने ते सर्व स्त्रीपुरुषांची झडती घ्यायला लागले. कोणाजवळ पैसा किंवा सोने सापडले ते त्यांनी हिसकावून घेतले. घरातून पळून जाताना लोकांनी पुष्कळ वस्तु बरोबर घेतल्या होत्या. कित्येक स्त्रियानी सलवार व कमीज यांना नोटा शिवून ठेवल्या होत्या. कित्येकीनी आपल्या कमरेभोवती दागिने बांधून ठेवले होते. ज्याच्या कमरेला दागिने बाधलेले सापडले त्यांची सक्तीने झडती घेतली गेली. ज्याच्या कमिजांना नोटा शिवलेल्या आढळल्या त्यांना कमीज काढून द्यावे लागले.

माझी पण पाळी आली. दोघांतल्या एका धटिंगणाने माझे मनगट पकडले आणि नकळत माझ्या तोडून 'राम' असे बाहेर पडले. त्याने हिसका देऊन माझे मनगट सोडले अन् म्हणाला, 'तो खोटा धर्म सोडून दे. इस्लाम हा खरा धर्म आहे. जा तिकडच्या बाजूला जाऊन उभी राहा.' ते मग मुलांची झडती घ्यायला लागले. एकाने मुलांचे खिसे तपासले आणि त्यात जेव्हा काहीच सापडले नाही तेव्हा त्याना माझ्या बाजूला आणून उभे केले. इतक्यात माझा भाऊ तेथे आला आणि पठाणांना म्हणाला, 'खासाहेब, याना मी घरी घेऊन जातो. परवानगी आहे ना?' टोळीवाला म्हणाला, 'जा घेऊन' पण इतक्यात त्याचे लक्ष माझ्या दोन मोठ्या मुलीकडे गेले. तसा तो म्हणाला, 'सगळ्यांना नाही जाता येणार.' मी थबकले आणि माझा भाऊ अश्रूंनी डबडबलेल्या नेत्रांनी आमचा निरोप घेऊन गेला.

झडती चालू होती. ज्याच्या अंगावर उमदे कपडे होते त्यांचे कपडेच काढून घेतले जात होते. लहान मुलांचे गरम कोट, पुरुषाचे स्वेटर्स, बायकाच्या अंगांवरच्या शाली, जी मिळेल ती वस्तु घेऊन ते आपल्याजवळ ठेवीत होते. कोणाच्या अंगावर कपडा राहिला आहे की नाही याची त्यांना पर्वा नव्हती. परमेश्वरानेच जणू आम्हाला बुद्धि दिली की आम्ही घरून काही आणले नाही. अंगांवरचे कपडे पण इतके वाईट होते की ते पाहून कुणाच्या मनातसुद्धा आले नसते की आम्ही कुठल्या मोठ्या घराण्यातील आहोत म्हणून.

झडती संपली त्याबरोबर पुढे चालण्याचा हुकूम झाला. सर्वजण निघाले. सर्वांच्या पुढे ते दोघे सैनिक चालत होते, आणि त्यांच्या मागे त्यानी माझ्या दोन्ही मोठ्या मुलीना चालायला सांगितले. अशा वागण्यामुळे मला त्यांच्या हेतूबद्दल शंका वाटू लागली. मी अगदी हलक्या आवाजात मुलीना सागितले, 'हे पाहा, मरणाला केव्हासुद्धा भिऊ नका. संधि सापडली की नदीत किंवा कड्यावरून उडी मारून जीव द्या. पण जिवंत राहून आपल्या उच्च कुळाला बट्टा लागू देऊ नंका. तुम्ही त्या भारताच्या सुपुत्री आहात की जेथे स्त्रिया जिवंतपणी सती जात असत.' माझी मोठी मुलगी वीणा म्हणाली, 'आई, तू काळजी करू नकोस. तू फक्त आमच्या या लहानग्या भावंडांना सांभाळ. आम्हांला काहीसुद्धा समजावून सांगण्याची आवश्यकता नाही. आम्हाला आमच्या मनान आणि विचारशक्तीन कस ते वागू दे. ज्याला आपल्या स्वतःच्या विचारान आणि जबाबदारीन वागता येणार नाही त्याला दुसरा कितीसा मार्ग दाखवणार!' केवळ चौदा वर्षांच्या मुलीच्या तोंडचे हे शब्द ऐकून आश्चर्याने मी अगदी स्तंभित झाले अन् माझ्या मनाला थोडी शांतिही वाटली. त्यातल्या एका दाडगटाने आम्हांला बोलताना पाहून दटावले आणि आपल्या मागे अगदी जवळून चालण्याबद्दल बजावले. मुली एकट्या माझ्यापासून दूर चालू नयेत असे मला वाटत होते आणि एकीकडे लहान मुलांना भरभर चालवत नव्हते. सकाळपासून ती भुकेली होती. पण मुलींच्याबरोबर राहण्यासाठी मी त्यांना ओढीत नेत होते. त्याचे चेहरे सुकून गेले होते. मृत्यू तर जणू समोर उभा होता, जर पाय घसरला तर धपकन् नदीत पडण्याचे भय होते, तसेच सगळ्यांच्या बरोबर कुणी चालू शकले नाही तर भयंकर जगलांत एकटेच राहून जाण्याचे भय पण होते. त्या वेळी प्रत्येकजण स्वतःकडे लक्ष देण्यातच गढून गेला होता. मुलांना मदत करणे आईला शक्य नव्हते आणि पत्नीची शुद्ध पतीला नव्हती.

मी पुन्हा टोळीवाल्यांच्या जवळ जाऊन बोलायला आरंभ केला. अंधार पडत चालला होता आणि भरभर चालण्यासाठी ते सर्वांना दटावीत होते. आमच्या टोळीत काही स्त्रिया गरोदर होत्या. भीतीने त्याच्या पोटांत दुखू लागले होते. मी त्या दोघा टोळीवाल्यांना म्हटले, 'मी तर ऐकल आहे की, पठाणांची जात फार शूर असते आणि वचनाला जागणारी असते. आणि शूर लोक स्त्रियावर किंवा लहान मुलावर अत्याचार करीत नाहीत. पण तुम्ही तर या अजाण बालकाना दटावीत आहा! काय तुम्ही खुदाला विसरून गेला? तुमचा इस्लाम धर्म असच वागण्याचा उपदेश करतो का! मला नक्की वेळ सांगता येणार नाही पण सुमारे दोन दिवसापूर्वी माझे पती इथले जिल्हाधीश होते. ते आता कुठ असतील मला माहीत नाही. मी आणि मुल मात्र दारोदार धक्के खात आहो. स्वतःच्या जिवापेक्षा आम्हाला आमच शील व स्वाभिमान जास्त प्रिय आहे. शक्य होईल तोपर्यंत आम्ही या दोहोंच रक्षण करू. तू माझी एक गोष्ट ऐकशील तर मी तुझे उपकार विसरणार नाही. तू मला आपल्या टोळीच्या प्रमुखाकडे घेऊन चलशील का!' त्या दोघाना हिंदुस्थानी समजत होते. माझे ऐकून ते म्हणाले, 'खर म्हणजे इस्लाम धर्म काही आम्हाला अस शिकवीत नाही. पण आम्ही काय करणार? आम्हाला असा हुकूम झालेला आहे.' त्यांचे मन आता जरा विरघळल्यासारखे वाटत होते. लोकाना ते हळूहळू चालू देत होते. काही क्षणानी ते म्हणाले, 'आम्ही पण किती तरी लांबून लढण्यासाठी इथ आलो. आमचा परिवार आम्ही तिकडच सोडून आलो आहो. आम्हाला पण आई, वडील, बहीण, भाऊ, आहेत. आमची तर अजून लग्न सुद्धा झालेली नाहीत.' 'तुम्ही बहीणभावंडांतले आहात तेव्हा तुम्ही इतराची सुखदुःख जाणू शकता. तुमची जातसुद्धा अगदी बहादुर अशी पठाण जात आहे. तेव्हा स्वाभाविकपणेच तुमच्याकडून मी अगदी नेकीच्या वागणुकीची अपेक्षा करते. हे ऐकून ते दोघेही एकमेकाकडे डोळे ताणून पाहू लागले.

माझी मोठी मुलगी त्यांच्या बरोबर चालत होती. मी जरा मागे



लेखिका
श्रीमती कृष्णा मेहता



अनुवादिका
सौ. इंदिराबाई मायदेव

पडले कारण माझा मोठा मुलगा दमला होता. मी त्यालाही सोडू शकत नव्हते अन् मला मुलींनाही लांब जाऊ देववत नव्हते. पण मुलींच्याबद्दल मला आता विश्वास वाटत होता. मी या विवंचनेत आहे तोच माझी मुलगी आणि दोघातला एक तरुण पठाण मागे वळून माझ्याजवळ आले. तो तरुण मला म्हणाला, 'आज रात्री आम्ही तुम्हाला ज्या ठिकाणी घेऊन जात आहो तिथ फार जुलूम-जबरदस्ती चालू आहे. पण आम्ही शपथ घेऊन सांगतो की, आम्ही तुमच आणि तुमच्या मुलांच संरक्षण करू. तुम्ही आम्हाला मातेसारख्या आहा आणि या मुली आम्हाला बहिणींसारख्या आहेत.' यांच्यात एकदम एवढे परिवर्तन कसे झाले याचे मला फार आश्चर्य वाटले. मुलींनी त्यांना असे काय सांगितले की ते राक्षस होते, ते एकदम देव बनले. आता ते हळूहळू चालले होते आणि बाकीच्यांनाही सावकाश चालायला सांगत होते. त्यांच्यातली मानवता जागी झाली होती किंवा कदाचित् असेही असेल की, इस्लामी धर्माच्या खऱ्या शिकवणीची त्यांना आठवण झाली होती.

रात्री दहा वाजता आम्ही दोन मैल पोहोचलो. त्या ठिकाणी काश्मीर राजवटीतला एक जनावरांचा दवाखाना होता. हा आगीत सापडला नव्हता. हा कृष्णगंगा नदीच्या किनाऱ्यावर होता. या इमारतीतील खोल्या चांगल्या मोठ्या मोठ्या होत्या. त्यांपैकी एकीत आम्हांला ठेवले गेले. त्या इमारतीत तीन दिवसांपासून आणखीही स्त्रिया व मुले आणून ठेवलेली होती. खोल्यांतून इतका अंधार होता व इतकी गर्दी होती की, जीव गुदमरत होता. आमची टोळी त्या आवारात आली तेव्हा जंगली टोळीवाले आणि डोग्रा पलटणीचे काही बंडखोर मुसलमान, सैन्याचा हल्ला व्हावा त्याप्रमाणे आत घुसले, आणि स्त्रिया व मुलींवर टार्चचा उजेड पाडून निरखून घेऊन चालले. पाहता पाहता हाऽ गोंधळ उडाला! स्त्रिया व मुली शक्य तितका प्रतिकार करीत होत्या आणि किंचाळत होत्या. पण पाकिस्तानने पाठविलेले मुजोर सैनिक काय दम खाणार होते! ते दृश्य पाहून खरोखर असे वाटत होते की, नरक नरक म्हणून जो काही म्हणतात तो तिथेच होता. याच नरकासमान जागेत त्या दोघा तरुण पठाणांनी आम्हांला एका कोपऱ्यात उभे केले आणि स्वतः आमच्यापुढे राखणदार म्हणून उभे राहिले. आमच्या बाजूलाच बाहेर जाण्याचा दरवाजा होता. ते अत्याचार पाहून आमच्या अंगांवर अगदी काटा उभा राहिला. मी मुलांना सांगत होते, 'राम राम म्हणा' तोच आपल रक्षण करील.' ते तरुण पठाण म्हणाले, 'भिऊ नका तुमच संरक्षण करण्याच आम्ही वचन दिल आहे. शक्यतोपर्यंत आम्ही वचनाला जागू.'

त्या दोघांनी आमच्या बाजूला कोणालाही येऊ दिले नाही. तेथे फार गडबड चालली होती. ती ऐकून त्यांचा एक वरिष्ठ अधिकारी तेथे आला. तो सांगू लागला की, 'थोडा वेळ त्यांना सगळ्यांना सोडून द्या.' पण त्याचे ऐकायला कोणीच तयार नव्हते.

थोड्याच वेळात जेव्हा ते सैनिक काही स्त्रिया व मुलींना घेऊन गेले तेव्हा या दोन रखवालदारांशिवाय शत्रूच्याकडचे असे तिथे कुणीच राहिले नाही. मग त्यांनी आम्हांला दाराजवळ बसवले आणि दारात ते स्वतः बंदूक घेऊन मध्यभागी बसून राहिले. याच वेळी पलीकडच्या खोलीतून ओरडण्याचे आणि विव्हळण्याचे आवाज ऐकू येऊ लागले. या खोलीत तीन दिवसांपासून अन्नपाण्यांविना लोक कोंडून ठेवले होते. त्यातल काही मरणाच्या द्वारी होते; पण त्याचे सोयरसुतक कुणालाच नव्हते. हे सर्व पाहून मात्र मला गप्प राहवेना. मी आमच्या संरक्षकांना म्हटले, "भाई, या असहाय्य लोकांना पाणी द्या. खुदा तुमच भल करील." आणि खरोखरच ते दोघे देवतातुल्य बनले होते. ते उठले आणि माठातून वारंवार पाणी भरून आणून त्यांनी त्या लोकांना पाजले. अंधारामध्ये कितींना पाणी मिळाले आणि कितींना नाही मिळाले ते कळण्याला मार्ग नव्हता. पण काही लोकांचे प्राण तरी यामुळे खात्रीने वाचले असले पाहिजेत आणि जे नाही वाचले

[पृष्ठ ६६ वर चालू]

## एकामागे एक

एकामागे एक
लागलेत दिवे
पांगतात थवे
पाखरांचे

कुणाचे पाऊल
वाजते म्हणून
जातसे मिटून
पान पान

कुणी कोंडला की
उरातून श्वास
कुणाचा हा भास
काळोखात

किती लांबवीला
हात अंधारात
तरी त्याचे बोट
न सापडे

## इतुकी सन्निध

इतुकी सन्निध
आले तुझ्या तेव्हा
कळला विसावा
कोठे आहे

कोठे गुंतले हे
कळे मला मूळ
माझे फूल फूल
तुझ्यातून

तू मात्र जाणून
फिरविशी पाठ
ऊर काठोकाठ
तुडुंबता

तुझ्याहून तुझी
सजा मी भोगते
भरताच रिते
माप तुझे

—शिरीष पै


## तीन मुक्तके

तू मला तुझ्याच कौमुदीत आठवून घे !
वा उदास रागिणीसमान आळवून घे
मात्र एकदाच ओठ लावुनी पहाटले
तू मला फुलातल्या दवापरी टिपून घे !

संपल्या साऱ्याच वाटा; मोकळा तू एकला !
केवढा मोठा दिलासा चालताना लाभला !
तूच जो झालास माझी वाट, हेही जाणशी—
कोणता कांटा कधी पायात माझ्या मोडला !

अचानक आज तुझ्या साऱ्या फुलांना गंध कसा आला ?
कुठन तू मारित्येस हाका ?... विजेचा शब्द नभा फुटला !
कशा ग तुझिया डोळ्यांनी सजविल्या रत्नजडित रात्री...
काल तू लाविलीस मेंदी–रंग पण आज गडद झाला !

—सुरेश भट



# बाबजी बक्काळ



आनंद यादव

आमच्या गल्लीत बाबजीचे घर निर्मळ आहे. दारात सात-आठ ढोरे बांधण्यापुरती जागा आहे. त्या जागेत त्याची जळणाची खोप आहे. खोपीच्या वळचणीला लाकूड-फाटा शिस्तीने टाकलेला असतो. जरा बाजूला दोन लिंबाची झाडे पाणी घालून वाढविली आहेत. नीट-घोल आहेत. उरलेली जागा उन्हाळ्यात मोकळी असते. कधी-मधी शेण्या वाळत टाकलेल्या असतात. पावसाळ्यात वाटेकडेचा कळकीचा कूप पुन्हा एकदा घट्ट केला जातो. आतल्या बाजूला तेव्हा वरणा, घारीच्या मोपळ्याचे वेल गारेगार लागतात. कुठे राजगिरा, पोकळा, कधीतर मेथीचे डहाळे त्यातून दिसतात. पावसाळ्यात तेवढ्यात त्याचे माळवे चालते. जळणाने भरलेली खोप पावसाळ्यात सरत येते. पुन्हा पावसाळा संपला की तिच्यात हळूहळू भर पडते. सारे जळण उन्हाळभर बाबजीच गोळा करतो... रकमा मावशी घर नि जेवण संभाळून सुखात असते.

रकमा मावशी बाबजीची बायको. लग्नाची नव्हे आणि पाटाचीहि नव्हे. ती तशीच त्याच्याजवळ राहिलेली आहे. पण लग्नाच्या बायकोगत ती वागते. बाबजीहि तिला बायकोगत वागवतो. कोणी कुणाला नाव घेऊन बोलवत नाही. रकमा मावशी बाबजीला 'अहो जाहो' म्हणते. बाबजी तिला 'अग तुग' म्हणतो. त्यांचे कधी भांडण होत नाही. रकमा मावशी देवाला सोडलेली असूनहि तिने एकच नवरा मानलेला आहे. इतर जोगतिणींगत 'जोगतीण देवाची नि बायको गावाची' अशी तिची तऱ्हा नाही. गावोगाव ती परडी घेऊन हिंडत नाही. कुणा वाप्याबरोबर वाटेत बोलत नाही. जोगतिणींगत पोशाख करीत नाही. अंगात शहापुरी किंवा गुलाबी चोळी नसते. सदा पुणेरी

" ही कुडी वाजवायच्या पव्यागत देव फुंकतोय तवर वाजायची, न्हाईतर सित्या कुत्र्यागत फुटून जायाची ......" असं मानणारा हा बाबजी आहे. आंब्याच्या झाडाला पान फुटल कीं सुखान शहारणारा. याची माती निराळी आहे.

साधी चोळीच दंडाला असते. साधे ढाबळी कोष्टाऊ लुगडे तिला गोड वाटते. गुडघ्याच्या खाली त्याचा झोळ कधी येत नाही...शेत-कऱ्यांच्या इतर बायका नि तिच्यात फरक म्हणून वाटत नाही. यल्लूबाईचा वार म्हणून प्रत्येक शुक्रवारी ती आळीतलीच पाच घरे फिरते. परडी घेऊन येते; पण 'आकुदी जोगवा' असे सुद्धा म्हणत नाही. दारात येते नि घरातल्या माणसाचे नांव घेऊन 'जोगवा वाढ ग' असे म्हणते. सहसा शेता-कडे जेवण घेऊन जात नाही. बाबजीच जेवायला घराकडे येतो. शेतात कितीजरी कामे असली तरी जेवायच्या वक्ताला बाबजी घरात हजर असतो. गावातल्या हौदाचे पाणीसुद्धा ती कधीतरीच आणते. नाहीतर बाबजीच कधी पहाटे, कधी तास रातीला दोन कावडी आणून देतो...बाबजीने तिला उंबऱ्याच्या आत सुखात ठेवले आहे.

त्याचे तरुणपणी लग्न होत नव्हते. आई-बा त्याच्या बाळपणीच वारले होते. चुलतीने त्याला जवळ केले होते. दहा-बारा वर्षांचा झाल्यावर पाणी पाजाय लोकाच्या मळ्यात ठेवले होते. त्याला शेतात रान नव्हते गावात घर नव्हते. ना आई ना बा. कोण आपली पोर देऊन तिच्या गळ्यात धोंडा बाधणार म्हणून बाबजी रकमा-मावशी-संगत राहिला.

गल्लीत तोच तेवढा टापटिपीचा माणूस. अंगावरच्या धडुत्यापासून तो शेतातल्या खोपीपर्यंत त्याचे काम जिथल्या तिथे. काहीहि सागितले तर आधळ्याने जाऊन आणावे. प्रत्येक वस्तु जागच्या जाग्याला.

" बाबजीमा, इळा जरा दे गा, शेरडीला दोन पेंढ्या कापून घेतो."

बाबजी कुठेतरी मिरचीच्या रानात काही-तरी टोकणून घालत असतो. तिथूनच तो सागतो; " घे जा खोपीतला. वरतीकडच्या पाक्यात तिसऱ्या वाश्यात फडक्यात गंडाळून ठेवलाय बघ." आणि जाऊन बघावा तर दुसरीकडे कुठे सापडायचा नाही. अगदी सागितलेल्या जाप्त्यालाच तो असायचा.

अंगावर जुनाटच धडुती असतात. पण सारी धणधणीत. कुठे एकाद्या मुड्याला खोंबारा लागलाय आणि तो तसाच राहिलाय असे कधी व्हायचे नाही. लगेच तो स्वत: टाका घालतो. अगावरचे एकादे धडुते जुने झाले; विरघळले तर ते खोपड्याला बोळा होऊन पडत नाही. त्याचा धडसा भाग तो व्यवस्थित कापून ठेवतो. चौकोनी ठिगळे अगोदरच तयार करून ठेवतो. कधी नड पडली तर त्यातला एखादा काढायचा आणि तो फाटलेल्या धडुत्याला जोडायचा. अगा-वरचे घोंगडेसुद्धा असेच ठिगळलेले असते. अंगात कोपरापर्यंत येणारे माजरपाट मुडे. कमरेला धाबडे-जाड धोतर. डोक्याला कामा-निमित्ताने गावातून फिरताना पटका. एरव्ही-टॉवेलाची लाबूडकी घडी करून ती गुडाळ-लेली असते. अंगावरचे कपडे नेहमी पाढरे स्वच्छ असतात. कुठे कशाचा डाग नसतो.

पायात पायताणहि तसेच. नाल-मोळे मार-लेले. कधी त्या पायताणाचा वाद तुटलेला दिसायचा नाही. कधी टाच झिजलेली ओढळा-यची नाही. कधी अंगठ्याचा कान तुट-लेला बघायला मिळणार नाही. पायताणाला वेळेवर तेल मिळते. त्यामुळे ते मुयीचालीचे पायताण काळेभोर असते. एखाद्या वेळेला पाऊस पडतो. रानात ओल होते किंवा पाणी पाजलेल्या उसात बाबजी शेळीला शेवरी मोडायला जातो. मग पायताणाला पेंड डसतो. पण लागलीच खुरप्याने नाहीतर चिपेने तो पेंड काढून टाकतो. पायताण नेहमी सोज्वळ, मउलूस असते. कधी कुणाच्या पायात मात्र ते नडीच्या वक्तालाहि घालायला मिळत नाही.

" बाबजीमा, जरा पायताण दे गा. तेवढे शिऱ्याचे भारे घालून येतो......माझ पाय-ताण लावायला टाकलय."

" हे बघ शिदबा, पायताणाइसीक काय इचारू नग. तुझ पाय माझ पाय सारख न्हाईत. पायताणाच वाद सैल हुतील माझ्या."

" घटकाभरात काय हुतय त्येला! चिलीम वडूस्तर भार घालून येतो."

" न्हाई भागायच–वाटल तर मी येतो भार घालून. तू बस हित." बाबजीच्या उत्तरात बदल होत नसतो. ... पावसाळ्यात त्याच्या पायात हे पायताण कधी दिसत नाही. रबरी पट्ट्यांच्या खडावा घालून तो गावातून हिंडतो.

सकाळ झाली की बोळात घुगरू वाजताना ऐकू येतात. गल्लीत दारातोडाला माणसे झोपलेली असतात. उगच तोंडावर पांघरूण घेऊन पडलेली असतात. त्यानी पांघरुणातच तोड घेऊन समजावे की; बाबजी शेरडे घेऊन शेताकडे चाललाय. दीस उगवायऱ्या आधी तो शेरड्यांच्या लेंड्या भरून, पाण्याच्या दोन कावडी आणून मोकळा झालेला असतो.

कुणी तरी बापय दारातच अथरुणात उठून बसलेला असतो. डोळ्यांवरची निजेची सुस्ती गेलेली नसते. जाभया अधूनमधून निघत असतात. तो बाबजीला बघून हाक मारतो; " काय बाबजी, लौकर शेताकडे ?"

" जाऊ या की लौकर. शेरडाच्या पोटा-पाण्याचे कायतरी बघून मग कामाला लागायचे."

" ये जाशील म्हण. जरा मिसरी करून दे तंबाखूची."

मग बाबजी तंबाखू ओढायला बसतो. दोन-तीन पाढरी, बाळी शेरडे त्याच्या भोवतीनेच घुटमळतात. त्याला हुगतात. आसपास टुनटुन उड्या मारतात. शेरडे नि करडे अतिशय बाळसेदार. गल्लीत तसले पोरहि कुणाचे मिळायचे नाही.

सकाळी उठून पारोशानेच खेळणारी शेंबडी-मेकडी पोर त्या करडाना धरतात. तोडाला तोंड लावून कुरवाळतात. उराशी

धरून वर उचलतात. "वाळया, वाळया" म्हणून दोन पायावर नाचवतात.

"गप बसा रे. हाल करू नगसा त्येंच.— वाळया, चल हिकड". असे म्हटले की बारके करडू पोर आल्यागत टुनटुन उड्या मारत त्याच्याकडे येते. त्याच्या काखेतून मान काढून पुढे हातावर निवडायला घेतलेला तबाखू जिभेने चाटल्यागत करते नि तिखट लागल्यावर फुर्र फुर्र करीत निघून जाते. शेळीपाशी जाऊन उभे राहते.

चिलमीचा बटवा बावजीने पुढ्यात ठेवलेला असतो. चिट्याचिट्या असलेला हिरवा बटवा बघत राहण्याजोगा आहे. त्याला तीन कप्पे. एकात चिलीम आणि छापी, दुसऱ्यात नीट करून तबाखू भरलेला असतो आणि तिसऱ्या कप्प्यात बडीशेप आणि लवंगा टाकलेल्या असतात. चिलमीतला खडा विळयाने घोळून घोळून इतका सुरेख केला आहे की माणूस खडा बघण्यासाठी आपण होऊन बावजीची चिलीम झाडतो...बावजी गेल्यावर त्याच्या खड्याविषयी बोलत बसतो.

बावजी हळूच चिलमीत तबाखू भरतो. मधे चार बडीशेपूचे दाणे टाकतो. फूल खोवल्यागत लवंग मध्ये खोवतो. तबाखूचा हात पाठीमागे ढुगणाला झाडून टाकतो. खिशातली काड्याची पेटी काढून काडी लावली की पहिला झुरका कुणालाहि न विचारता आपण घेतो. भरपूर घेतो. लवंग नि बडीशेपू तुडतुड वाजली की झुरका सपतो. मग दुसऱ्याचा मान.

खांद्यावर आकडी, हातात लांब दांड्याची बारीक पाठीची कुऱ्हाड. पाठोपाठ शेरडे नि दोन-तीन कुत्री; असे बावाजीचे लटांबळ शेताकडे येते.

वाटेत दोन-तीन मळे लागतात. मळेकऱ्यांना तो आपला खास तबाखू ओढायला देतो. शिपीभर दूध चहाला देतो. शेतकरी खुश होतात. मग उसातली शेवरी, एरंडाची पाने बावजीच्या शेरडापुढे पडतात. शेरडे फुगून टम होतात. अखेरीच्या दिसात शेरडे शेताकडे आली की बावड्याखाली रमतात. बावजीच्या वाधावर उच उंच गेलेले दोन धावडे आहेत. तो त्यांच्यावर चढतो. आकडीने नाही तर कुऱ्हाडीने शेरडाची पोटे भरेपर्यंत डहाळे तोडतो. शेरडे थंड झाली की शेतकामाकडे त्याचे हात वळतात.

सध्याकाळी परत येताना बावजीचे डोसके कधी रिकामे दिसले नाही. काही ना काही तरी त्यावर ठेवलेले असतेच. ईळमर जोंधळ्याची धसकटे वेचून, भांगलण-खुरपण करून, कोळपे ओढून तो दमतो. कंगटतो. हात-पाय आवून गेलेले असतात. तोंडाला कडू खर आलेली असते. तरी तो सध्याकाळी कटाळा करून तसाच जात नाही. शेरडानी मुंडरे केलेले डहाळे, बाभळीची शिरी तो जळणासाठी म्हणून नेतो. खोपीवर उनात टाकतो. वाळवतो. नि जळणाला रचून ठेवतो. पावसाळ्यात गवत-वाटकाचा भारा त्याच्या डोक्यावर असतोच. बाजारात जाऊन तो विकतो. चार-दोन आणे तेवढेच गूळ-मिरचीला होतात....एखाद्या वेळेला गुरव देवाला फूल चुकेल; पण बावजीचे डोके रिकामे चुकूनही दिसणार नाही.

मधल्या बाधाला त्याची घोड-खोप आहे. झळझळीत असते. तिच्यात पान खाऊन थुकलेले नसते. खरकटे पाणी कुडावर ओतलेले नसते. कूड जिथल्या तिथे असतो. भुई आठ दिवसाला सारवली जाते. शेत वाळले असले तरी खोप कायम असते. बाकीच्या वाळल्या शेतवाल्यागत ती पावसाळ्यातच तेवढी नसते. बावजी ती उन्हाळ्यात घराकडे मोडून नेत नाही. सुगी सरली, शेतातल्या वसत्या उठल्या, जितरापे गेली, राने वावडी झाली, ढोरे फिरू लागली की बावजी खोपीभोवतीने दाट दाट कूप घालतो. मग बावड्या रानातून फिरणारी ढोरे तिला डागलत नाहीत. पोरे तिच्यात बसून भुई उकरीत नाहीत की कूड फाडीत नाहीत.

गुऱ्हाळाच्या सुगीत उसाचे फड पडले की बावजीची फेरी मळेकऱ्याकडे येते; "रईत, आम्हास्नी चार वल्ल्या शेवऱ्या द्या की."

"कशाला गा ?"

"अहो खोपीला चार वासे पाहिजेत."

"बावजी, पावसुळा अजून लांब हाय की. आताच काय करायची खोप तुला ?"

"पावसुळ्यात तुमी शेवऱ्या देता व्हय ? आताच ढीग हाईत; त्यातल्याच चार मिळाल्या तर मिळाल्या."

"हित कुठ हाईत तेवढ्या शेवऱ्या ? आम्हालाच कमी पडतील. आवदा खोप उलगडून नवी घालायची हाय."

"अहो, त्यातनच आमच्या गरिबावर नजर ठेवायची. मला लई नगत. तुमच्या चारच लागतील. तेवढ्या तुमच्या कुठबी पडून जातील." असे बावजीने म्हटल्यावर मग शेतकऱ्याला मोडवत नाही. दोन-चार शेवऱ्या तो त्याला देतो ... एकाच्या मळ्यात शेवऱ्या. दुसऱ्याच्या मळ्यात उसाचा पाला तर तिसऱ्याच्या मळ्यात मेढकी; असे करून बावजी उन्हाळ्यातच खोपीच्या सामानाची बेगमी करून ठेवतो. ... पावसाळ्यात मग त्याची खोप तरण्या पोरीगत रेखीव नि बाघेसूद दिसते. या खोपीच्या आसपास त्याच्या कुत्र्याची मैफल सदा-सर्वकाळ पडलेली असते.

त्याची कुत्री आमच्या तसरीला सर्वांना ठाऊक आहेत. नाही नाही म्हटले तरी त्याच्या पाठीमागे दोन-तीन कुत्री तरी हमेशा असतात. त्याशिवाय घरात पिल्लावळ असते ती वेगळीच. सगळी कशी इलायती कुत्र्यागत तरतरीत. एका कुत्र्याचे हाड वर दिसायचे नाही. सगळी रेड्यागत मानेत भरलेली. भरड्या आवाजाची, भारदस्त. ढुपरीच्या पाटलाने एक कुत्रा विकत मागितला; "पाव्हण्या, शंभर रुपय देतो; कुत्र एवढ दे."

"न्हाई बावा, पोरांगत पाळल्यात मी."

"रोजगारी माणूस दिसतोस. सात-आठ महिन्याची पोटगी निघती की तुझी."

"निघली तरी काय करावयाची मला ? मायला मोल न्हाई." बावजीचे बोलणे ऐकून पाटील गुमान निघून गेला.

गावात कुणाचे जरी राखणीचे कुत्रे मेले की माणूस त्याच्याकडे येते. त्याच्या वेळ्यातून आत पाऊल टाकले की फौजच्या फौज अगावर भुकत येते. 'हाड' म्हणायची कुणाची धडगत नाही. कुणाला म्हणून म्हणायचे ? हातात धोंडा-बिंडा घेऊन हात वर केला तर 'वाव् वाव्' करीत जास्तच कालवा करतात. मग मुकाट्याने माणूस खाली बसते. बावजीला हाक मारते. कुत्र्याच्या त्या वणव्याने बावजीची गाठ कोण त्याच्या घरात घेत नाही. भिकारी तर त्या बोळातली पहिली दोन घरे मागूनच परत फिरतात. म्हणून माणूस बिचकत बिचकतच बावजीच्या घरात शिरत.

"का आलाईस ?" कुत्र्याच्या थव्यातन

सोडवून घेत घेत बावजी त्याला विचारतो.

"बावजी, तुझी कुत्री माणसाचा वास आला तरी मेल्यालो उठतात बघ."

"रतीवाच दूध घेऊन घालतोय त्यास्नी. निम्मी पोटगी जातीय माझी कुत्र्याशेरडांस्नी."

"खरं हाय बावा."

"का आला हुतास ?"

"अगा, आमचा टिप्या कुतरा मेला न्हव."

माणसाने असे म्हटल्यावर बाबजीला कळायचे ते कळते. "कशान मेल गा ?" असे विचारत त्याचा चेहरा ढग आल्यागत होतो. दातात काडी घालत विचार करू लागतो. बराच वेळ तबाखू निवडत बसतो. बेता बेताने भरतो. दातात घातलेली काडी बोटाने पुसत परत चिलीम ओढतो. . बराच वेळ बाबजी गंभीर झालेला बघून मग माणूसच बोलतो "अगा, शेतात याकबी कुत्री राखणीला न्हाई."

तंबाखूचा झुरका घेऊन झाल्यावर बाबजी म्हणतो; "हे बघ रामा, माझ्या घरात कितीबी कुत्र्याची पिल्लावळ असली तरी ती मला जड न्हाईत पोटच्या पोरागतनी मी ही पिल्ली पाळतोय."

"न्हय की, मला का माहिती न्हाई ?" माणूस जरा लाचार होऊन हसत हसत म्हणतो.

"तू आता पिल्लू मागायला आलाईस; मी तुला न्हाई म्हणत न्हाई. पर त्याचा खाना तुला परवडल काय ? न्हय; तरच तुला पिल्लू मिळल."

"खाना परवडल की. त्येला काय झाल ? राखणीची काळजी मला न्हाई न्हय ?"

तुला असल गा राखणीची काळजी. पर बाकीची लोक पाळतात तस वाळल तुकड घालून कुत्र बाळगशील तर मिळणार न्हाई. तू मग रागाला येइनास मला."

"न्हाई; न्हाई. 'रागाला कशाला येऊ ? खर हाय की तुझ."

"माझ्या कुत्र्यास्नी दोन वक्ताला झाकणी-झाकणीभर जुधळ्याच्या कण्या नि ताक चारतोय; तवा तर तशी साहेबाच्या कुत्र्यागत दिसत्यात. तू तस घालशील काय ?"

"घालीन की."

"बघ; तुला परवडत असल तर न्हे, जा."

माणूस 'न्हय' म्हणतो. मग बाबजी एखादे पाढरे शुभ्र पिल्लू हातात घेतो. घटकाभर त्याला कुरवाळतो. मुकेसुद्धा घ्यायला तो कमी करीत नाही. अगावर कुठे चुकून गोमाशी, तावू किंवा गोचीड असला तर तो काढून दगडाखाली चिरडतो. आणि माणसाच्या स्वाधीन ते पिल्लू करतो...अगदी जड हाताने. "आठवणीत ठेव बर का. सात-आठ दिवसातून फेरी मारून मी बघणार हे पिल्लू. जर का खराब झाल; तर माझ मी घोगड्याच्या खोळात घालून परत आणणार. मग माझ्यासग भाडलास तरी पत्कारल." शेवटाला माणसाला हे पुन्हा जाणवून देतो. माणूस 'न्हय न्हय' करीत निघून जातो. बाबजी दारापर्यंत जातो. कुत्रे दृष्टिआड झाले की खाली मान घालून परत फिरतो. कूळ अन्न—धान्याकडून बळकट असले तरच त्याला कुत्रे मिळते. शिवाय बाबजी सांगितल्याप्रमाणे सात-आठ दिवसांनी फेरी घालतो. आणि तशी जर त्याच्या मनात अधेशी आली तर ते पिल्लू उचलून आणतो.

बाबजीचा सित्या कुत्रा रातचा गल्लीत कुणाला हलू द्यायचा नाही. उकिरड्यावर कोरव्या वडराची गाढवे जरी उठली; फुरफुर करू लागली तरी तो भुंकून सगळ्या गल्लीचे डोसके उठवायचा. रस्त्याला जिथे बोळ फुटतो तिथल्या तिकटीवर तो रात्रीचा पडून राहायचा. बाबजीच्या साऱ्या-कुत्र्यापैकी एवढाच कुतरा रातचा बेळाच्या बाहेर पडायचा बाकीची सगळी बेळाच्या आत असायची.

रानात सुगी चालली होती. बावजीची मळणी अजून व्हायची होती. दुसऱ्याच्या खळ्यावर त्याला कणसे मळायची होती. म्हणून खळ्याच्या मालकाची मळणी झाल्याशिवाय त्याला आपली कणसे खळ्यात घालायला येत नव्हती. गावात रातचे नऊ-नऊ दहा-दहा वाजेपर्यंत गाड्या भरून येत होत्या. जोंधळ्याच्या राशी टाकून जात होत्या. परगावासन कडवा, गवत येत होती. गावातून नि शेतातून गडबड उडाली होती. जो तो वाळला शेतकरी लौकर मोकळा होऊन रोजगाराला लागायच्या नादी होता.

काळोखाची रात. अकराचा सुमार होता. बाबजीचा कुत्रा तिकटीवर पडलेला होता. कुणाच्या तरी कडब्याच्या तीन-चार गाड्या आल्या. काळोखातूनच बिन-कंदिलाच्या चालल्या होत्या गाड्या खडखडत गडबडीने चालल्या होत्या. खालतीकडच्या रस्त्याने पाच-सात गाढवे कशाला तरी बुजून एकाएकी पळत अंधारातच आली. म्होरच्या गाडीचे बैल त्याना बुजले. सित्या कुत्राहि त्या गडबडीत उठून कुठेतरी भुंकत घुसला बैल कासराभर आडवे-तिडवे पळाले. गाड्या दणक्याने पुढे पळाल्या. आणि कुत्रा तोंड पसरून मोठ्याने 'कांञ कांञ' करू लागला. जास्तच ओरडू लागला. गाढवे वरतीकडे उधळत पळाली.

म्हातारी सावू इरागतीच्या निमित्ताने दाराची कडी काढून बाहेर आली. "अग एऽ रकमा, कुत्र गाडीत गावल ग तुझ" असे म्हणत बाबजीच्या घराकडे धावली. रकमा मावशी त्या गाडीवानाना शिव्या हासडत बाहेर आली. कुत्र्याच्या अगावरून गाडी गेली होती. तिने कुत्र्याची दशा बघून ऊर बडवून घेतले. घरातले माणूस गेल्यागत हंबरडा फोडला. गल्लीत कालवा झाला. माणसे घरातून उघडीच बाहेर आली. सगळी गल्ली रकमा मावशीच्या आवाजाने जागी झाली.

"बाळगोडा, त्यास्नी जाऊन बलवून घेऊन ये जा. जाधवाच्या खळ्यावर वसतीला हाईत बघ कणसापाशी. म्हणाव, कुत्र्याच्या पोटावरन गाडी कुणी वाद्यान घाटली. जा बाबा, लौकर. दवाखान्यात न्हेल पायजे झेला." बाळगोंडा कंदील घेऊन बाबजीच्या शेताकडे धावला.

रकमा-मावशीने कुत्र्याला हात घातला. त्याचे पेकट तुटल्यागत लोंबकळत होते. रक्तात भिजून काला झाले होते. त्याचे पुढचे पाय ताणत होते. खाली घासत होते. तिथेच एका बाजूला तिने ते लावले घटकाभरात ते रक्त मुतले. गचके देऊ लागले. रकमा-मावशीने त्याच्या तोंडात पुन्हा पाणी घातले. कुत्रे दमून धाऱ्या देत, 'कुई कुई' करीत शात पडले. डोळे फिरवून माणसाकडे बघू लागले.

घटकाभरात बाबजी धावत आला. भराभरा त्याने दोन-तीन काबटे कुऱ्हाडीने, चिंबवून काढली. वाखाच्या दोन चऱ्या काढल्या. कुतऱ्याचे पेकट बाघले. रुंदाड्या पाटीत घालून त्याला घराकडे नेले. वाश्याना बाधून

ठेवलेली औषधांची गठळी काढली. झाड पाल्यांचा चुरा केला. कुत्र्याच्या नाकात काहीतरी भरले. रकमा-मावशी तोपर्यंत निघेल तेवढी शेळीची धार काढून घेऊन आली. औषध दुधात कालवून कुत्र्याला घोट दिले. कुत्रे विव्हळत होते. घटकाभर गप बसत होते. घटकाभरात पायांचे तरूट देऊन टाचा घासत होते.

सकाळी कासराभर दिसाला डोक्यावर मोठी पाटी घेऊन बावजी वेळातून बाहेर पडला. डालीत पाढऱ्या कापडात सित्याचे प्रेत गुडाळलेले होते. वरून सुतळीने आवळलेले होते. रकमा-मावशी पाठीमागून जात होती. मुकी होऊन पावले उचलीत होती. तिच्या एका हातात टिकाव आणि दुसऱ्या हातात वडरी खोरे होते.

"बावजीमा, कुतरे मेले ऱ्हय गा ?" सावूच्या आप्पाजीने विचारले.

"मेल गा, रातच तीन वाजायच्या सुमाराला" बावजीचा आवाज उतरला होता. रकमा-मावशीने एकदम डोके फिरल्यागत तोड उचडले. गाडीवानाना भरमसाठ शिव्या देऊन घेतल्या. टिपे गाळीत मग निघून गेली.

"कुठ न्हेऊन पुरतोस ह्येला ?"

"जातो तिकड शेताकड. डोळचाफुडच पुरल म्हणजे घारी-गिधाड, कोल्ही-लाडग उकरायच न्हाईत." शेताकडची वाट तुडवत होता.... वोळातल्या दारा - दारातून माणूस वाकून वघत होते.

मळणी संपल्यावर दोन-तीन दिवसांनी बावजी आमच्या धावेवरच्या आंब्याखाली दादाच्या बरोबर तंबाखू ओढीत बसला होता. मी म्हशीला दावे करीत तिथेच बसलो होतो. बावजीच्या हातात एक कुंडाला आणि एक बारडी होती. त्याने आव्याची दोन रोपे आपल्या घोडे-खोपीसमोर लावली होती. पाण्याच्या एक-दोन खेपा त्यांना घालायच्या विचाराने तो इकडे आला होता.

"बावजी, आता तुझी पन्नाशी वलटली. ह्यात दुसऱ्याच. तू खंडान केलेल. ही रोप जगली तर त्यांस्नी फळ यायला दहा-पधरा वरस जातील. कशाला उगच केस तुटूस्तर रोपास्नी पाणी घालतोस ? तुला का फळ खायाला मिळणार हाईत ?" आव्याबुडी उनाचे पडल्या पडल्या दादानी बावजीला शहाणपण सांगितले. बावजीच्या मनावर अजून कुत्र्याचा परिणाम होता.

उतरत्या आवाजातच तो बारडी-नि कुंडाला तिथेच ठेवून बोलला, "रतनापा, ही रोप का मला फळ देणार हाईत म्हणून मी पोसतोय ? शेताच्या मालकाला तरी मिळतील का न्हाई ? त्यो तरी दुवा देईल. त्यो न देईल तर त्येचा आत्मा तरी देईलच की."

"पर तुला त्यात काय मिळणार हाय ?"

"मला कायबी न्हाई. माझ्या जिवाला शाती. आत्म्याला विरगुळा; दुसर काय हाय त्यात ? ही कुडी वाजवायच्या पव्यागत, देव फुंकतोय तवर वाजायची; न्हाईतर सित्या कुत्र्यागत फुटून जायची."

"कुत्रा लई चांगला हुता गा तुझा." दादा कळवळले.

बावजी पातळ झाला. "रतनापा, काय सांगू तुला ? पोटच्या पोरागत हुत गा ते मला." कळवळून तो बोलला.

"एवढा कशाला जीव लावतोस कुत्र्या-मांजरावर ?" दादा सहज बोलले.

"रतनापा, त्येची काणी येगळी हाय. जीव लावून काय लागतोय ? आपोआपच गुतून बसतोय...बारा वरस झाली. माझी बायकू गरोदर होती. 'हू ऽ' म्हणून पॉट आल होत. वाटल; आवळी-जावळी हुत्यात काय कुणाला दखल. माझ्यापाशी ती असल्यापासन दहा वरसान तिला दीस गेल हुत. मला हौस वाटली. तिचा जीव आब्यागत म्हवरला हुता. दिसात पडल्यावर किती सायास केल. जळणान खोप भरली. रगुनी तादूळ आणून ठेवल. हातरुण कावरुण घडशी करून ठेवली. पाळणा करून घेटला. बाळतिणीला बाजल हिणून घेटल. जुन्या घडूत्यांची बाळूती काढून ठेवली. फुलात ठेवल्यागत तीन-चार म्हयन ठेविली.

बाळत झाली नि पोरग आतनच मरून आल. एवढ दाडग हुत. देव त्येला जीवच घालायला इसरला.

बाहीर येऊन वघिटल तर त्याच वक्ताला माझी मोरी कुतरी येत हुती. तिला काळी-बाळी रेसमागत पाच पिल्ली झाली. सगळी ठसठसीत. नागाच्या पिल्ल्यागत अगावर तेज.

बायकू म्हणाली; "हिकडचा जीव तिकड गेला. तीच आपली लेकर. त्यास्नी जपू या. तिकडच जीव लावू या."

तवाधरन कुत्र्यावर जीव जडला. शेरडांवर जीव जडला. मुकी जनावर बी माया केल्यावर पोरागत वागत्यात. नाचत्यात, उड्या मारत्यात, अंगावर पडत्यात, बिलगत्यात सगळ पोरागतनी. पोर तोडान बोलत्यात, ती डोळ्यान बोलत्यात. मग जीव जडतोय. आत आत गुतून वसतोय.

ह्या आंब्याच्या रोपाला याक पान फुटल की माझ्या अगाला पान फुटल्यागत वाटतय, त्येला अंकुर आला की माझ्या मनाला गुदगुल्या झाल्यागत वाटतय. हे का सूख थोड हाय? आता माझ मन ह्या घोडे-खोपीवर जडलय. ह्या शेतावर, इळ्या-खुरप्यावर, कुत्र्या-मांजरावर, झाडावर-झुडपावर बसलय. त्येची उस्तवारी करताना मनात सुखाच पेव फुटतय. कशाला मग पॉर नि बाळ. एकदा तिला मेलेला गोळा झाला. त्येच्यावर आज बारा साल झाली काय न्हाई. तिचीवी माया बाहीर पसरली. देवान बरच केल म्हणतो मी. पॉर झाल असत तर माया तिथच चिमटीत पडली असती. जाऊ दे. कुणाला कळायच न्हाई हे." बावजीची तंद्री सपली. त्याने चिलीम झाडली. वेताने झाडली. छापी माडीवर घेऊन साफ केली. पिशवीत टाकली. चिलमीतला खडा बोटांनी कुरवाळला. स्वच्छ पुसला. काळा कुळकुळीत केला. चिलमीत टाकला. वेतान चिलमीला पिशवीत सोडले आणि उठला. उठला; बारडी नि कुडाला खळखळून धुतला. पाणी भरले नि जाता जाता म्हणाला; "रतनापा, तुझी म्हस सुटलीया बघ. कवळा ऊस शेंडलतीया, ऊठ लौकर."

म्हशीला केलेले दावे घेऊन मी उसाकडे पळालो.

• • •

अनार रइयाव्ह

-- एक वेधक रशियन कथा

# दोन कोट



: रूपांतर :

रतनलाल भंडारी

माझ काम काय म्हणालात ? फक्त कोट घ्यावयाचे आणि द्यावयाचे. तुम्हाला वाटेल क्लोकरूममध्ये मी कामाला असलो पाहिजे. बरोबर. त्या प्रचंड इमारतीच्या तळमजल्यावरच ही खोली आहे. इथ इतकी माणस या क्लोकरूमचा उपयोग करतात की त्या सर्वांचे चेहरेमोहरे लक्षात ठेवण अगदी अशक्य आहे. तुम्ही इतक्या घाईत असता की, काउंटरपासून कोट ठेवण्याच्या खुंट्यांच्या रांगेपर्यंत इतकी धावपळ चाललेली असते की, त्यांच्या चेहऱ्याकड लक्ष देण्यास तुम्हाला फुरसतच मिळत नाही. पण कोट .... कोटांवर नुसती नजर फिरवताच तुम्ही त्यांना ओळखू शकता. एक दृष्टिक्षेप टाकताच ते बोलू लागतात.

अर्थातच कोणत्या कोटावर कुणाची मालकी आहे हे मला चांगल ठाऊक आहे. ते कोट तरी किती निरनिराळे असतात, त्यांची शिवण, रचना, किंवा फॅशन यांत कुठतरी निराळेपणा जाणवतोच. त्यांचे बिल्ले किंवा खुंट्या चुकल्या तरी मी कधी त्यांची मेसळ करीत नाही. उगीच नाही गेली सात वर्ष याच कामांत टिकून राहिलोय. एखाद्या लहान मुलासारखे सबंध दिवसभर तुम्ही त्याच वस्त्रांशी खेळत राहिलात तर मुलांसारख्या त्यांच्या खाणाखुणा तुमच्या लक्षात राहणारच. या कोटांच्या विश्वात एकएकांच्या सांनिध्यात राहणाऱ्या कोटांनाही मी ओळखतो. काही माणसे माझ्याकडे व्यवस्थितपणे कोट देतात. अर्थातच माझ बारीक लक्ष असत, त्यामुळे त्यांचे कोटही बरोबरच अडकविले जातात. अरे हे काय ? तुम्हाला जे सांगावयाच आहे त्यापासून मी दूर वाहावत चाललो आहे.

त्याच काय झाल ... एकदा इथ अशी 'केस' आली. तस कशाला ... 'केस' हा बरोबर शब्द नसला तर 'परिस्थिती' म्हणाना. तेही पसंत नसेल तर तुम्हाला पाहिजे ते म्हणा ... तिकडे पाहा ... हा तिथच ... या रांगेच्या अगदी शेवटी तिथे आता कातड्याचा कोट लोंबकळतो आहे, ना तिथ. गेल्या दोन किंवा तीन वर्षांपूर्वी मी तिथ दोन कोट अडकवीत असे. त्यांपैकी एक स्त्रियांचा बिज (Beige) कोट होता. फार सुंदर आणि आकर्षक. दुसरा पुरुषांचा गर्द काळा ओव्हरकोट होता. घालायला थोडा दाटतच असला पाहिजे. विशेषतः त्यांच्या बाह्यांमध्ये. दिवसभर ते दोघे एकाच ठिकाणी राहत. सकाळी मी त्यांना एकदमच घेई आणि संध्याकाळीही एकत्रच परत करीत असे.

एखाद्या दिवशी ते येतच नसत. आणि दिवसभर त्यांची खुंटी आशाळभूतपणे रिकामीच राहायची. मला वाटते ते आजारी पडले तरी दोघे बरोबरच आजारी पडत

असत ... त्या दोघांचे नाते काय असेल बरे ? कदाचित तुम्हाला खर वाटणार नाही. पण हा प्रश्न मी स्वत ला चुकूनसुद्धा विचारला नाही. ते दोघे नवराबायको होते किंवा त्यांचे दुसरे काही संबंध होते हे कोडे सोडविण्याचा मी प्रयत्नच केला नाही. पण एक मात्र निश्चित की ते दोघेही अलिप्त असणे शक्य नाही.

दुसरी एक गोष्ट मला आठवते. तो एक पांढरा स्कार्फ वापरीत असे. हो हो. पण तुम्ही वापरता तसा नाही वर का ! जेव्हा तो कोट ठेवायला देई ना तेव्हा तो स्कार्फ खिशात व्यवस्थित घडी करून ठेवलेला असे. आणि कधी सर्द हवा पडली अथवा सकाळ-पासून तुरळक वर्फवृष्टि होत असली म्हणजे तोच स्कार्फ स्त्रीच्या कोटावरोवर माझ्या-कड येत असे.

मी नेहमी बिज कोट प्रथम अडकवीत असे, आणि नतर त्यावर काळा कोट अडकवी. यात काहीतरी नैसर्गिक मानवी भावना होती. काळ्या कोटाने मी तो सपूर्ण बिज कोट झाकून टाकी... जणू कुणाची अशुभ दृष्टी पडू नये म्हणून. असे होते ते दोघे, नेहमी एकमेकांच्या वरोवर.

ते कोट केव्हाही आले तरी त्याची खुंटी राखून ठेवलेली असे. कधीकधी इतकी गर्दी होत असे की सगळ्या कोटाना पुरेशी जागा नसे. तरीसुद्धा मी त्याची खुंटी तशीच मोकळी ठेवीत असे. कधीकधी खोळंबून राहिलेल्याच्या मध्ये त्याचे चोरटे चेहरे दिसत नसत, तरीसुद्धा मी ती खुंटी गुत-विण्याच्या भानगडीत पडत नसे.

माझ्या या सगळ्या 'पाहुण्यां'मध्ये एका पुरुषाचा तपकिरी कोट होता. याचा मालक हा नेहमी एकटाच येत असे. आणि इकडेतिकडे न पाहता नाकासमोरच्या रस्त्याने निघून जात असे. मला जेवढी माहिती आहे त्याप्रमाणे त्याच्या वरोवर मित्र अथवा ओळखीचे कोणीही नसे. अगदी ध्यानात राहण्यासारखा तोही कोट होता. कोरा करकरीत आणि मौल्यवान कापडाचा. एके दिवशी त्याचा अडकवायचा धोडा तुटल्याचे मला आढळून आले. सुई-दोरा घेऊन एका मिनिटात दुरुस्ती करण्याचे काम होते ते. पण दिवसामागून दिवस गेले तरी त्याची दुरुस्ती झाल्याचे दिसून येईना. मी त्याच्या व्यवस्थितपणाच्या भरवशावर अवलं-बून राहिलो तरी त्याचा उपयोग झाला नाही. क्षुल्लक गोष्ट आहे नाही ? तुम्ही निश्चित असे म्हणाल पण काहीच्या दृष्टीने ही गोष्ट निश्चित क्षुल्लक नाही. यावरून या माणसाने कधी सुई-दोऱ्याना स्पर्श केला नसला पाहिजे. शेवटी माझ्या सहनशक्तीचा अत झाला आणि मी स्वतःच ती दुरुस्ती करून टाकली.

असाच काळ जात होता आणि मग माझ्या स्मरणात राहिलेली ती सकाळ उगवली. फारच गर्दी होती. सगळ्यानाच घाई होती. माझ्या कौंटर पासून तो दरवाज्यापर्यंत लांब-लचक रांग लागली होती. या घाईत माझी खूपच तारांबळ उडाली होती. ते कोट घ्यावयाचे, त्यांना नीट खुंटीवर अडकवावयाचे, आणि पुन्हा त्याचे बिल्ले चुकणार नाहीत याची काळजी घ्यावयाची. त्यात पुन्हा माझे हातपाय गळून गेल्यासारखे वाटत होते. नतर थोडीशी गर्दी ओसरली. मी खाली बसलो. कोपऱ्यात त्या खुर्चीवर जवळजवळ कोसळलोच म्हणाना. थोडीशी उसंत मिळाली म्हणून सुस्कारा सोडला. तोच सहज खुंट्यांकडे लक्ष गेल आणि मी ताडदिशी उठलो.... मी माझ्या आवडत्या बिज आणि काळ्या कोटाची फारकत केली होती. बिज कोट आता तपकिरी रंगाच्या कोटाच्या कुशीत पहुडला होता. मी माझ्या म्हातार-पणाला शिव्या घालीत उठलो आणि बिल्ल्यांच्या नवरमध्ये काही चूक आहे का ते प्रथम पाहिल नंतर नेहमीच्या तपकिरी कोटांच्या जागी काळा कोट ठेवला आहे का ते निरखून पाहिले. पण त्याचा तियेहि पत्ता नव्हता. खुंटी रिकामी होती आणि बिल्ला आपल्या जागे-वरच पडून होता.

दुसऱ्या दिवशी हीच नवीन व्यवस्था कायम राहिली. बिज आणि तपकिरी कोट एकमेकांच्यासह ! दुसऱ्या दिवशी तेच... पुन्हा तेच ! !

असेच काही दिवस गेले. आणि माझ्या नजरेला तो काळा कोट पडला. त्याच्या मालकाने तो माझ्याजवळ दिला आणि मला स्वत ला तो दुसऱ्या खुंटीला अडक-वण्याशिवाय मार्ग राहिला नाही. अहो, मी तरी एकाच खुंटीला तीन कोट कसे अडक-वणार ? त्या दिवशी हवा अतिशय वाईट पडली होती. मला अजून आठवते, अगदी तावडे फुटल्यापासून पावसाची सारखी रिप रिप चालू होती. सारखे बर्फ पडत होते. अशातला भाग नाही. गारठ्याने अगदी हुड हुडी भरत होती असेही नाही. पण हवा विघडलेली होती. बहुतेक कोट खांद्यावर जरासे ओलसर झाले होते पण 'काळा कोट' ... त्यातून तुम्ही पिळून पाणी बाहेर काढले असतेत.

अशा रीतीने ऋतुचक्र फिरू लागले. नव्या परिस्थितीत मी थोडासा सरावलो. नंतर जवळजवळ एक महिन्याची गोष्ट, माझ्या काळ्या कोटाचा मालक आजूबाजूला कोणी नाहीसे पाहून माझ्या कानाशी लागला. बिज कोटाकडे बोट करून म्हणाला, 'प्लीज, तुमची काही हरकत नसेल तर एक क्षणभर तो तुम्ही मला देऊ शकणार नाही का ? फक्त क्षणभरच.'

वरं आहे, तुम्हाला एवढे भुवया चढवून पाहण्याची आवश्यकता नाही. तुमच्याप्रमाणे मलाहि नियम माहीत आहे. जो बिल्ला देईल त्यालाच कोट मिळेल. आणि जरी माझा भाऊ आला तरी हाच नियम सर्वत्र लागू. बिल्ला नाही... कोट नाही. त्यातल्या त्यात तो दुसऱ्याचा कोट असेल तर ...'हो, हो. मला नियम ठाऊक आहे.' पण त्या प्रसगी माझ्या अतकरणात थोडीशी उलघाल झाली. मी त्याच्याकडे पाहिले. त्याच्या चेहऱ्यावर फार कल्लोळ उसळला होता. मी स्वत.शीच म्हटले, आता या कोटाकडे नुसते डोळे भरून पाहून काय होणार आहे ! जे घडले ते घडले. अर्थातच मी यातले त्याला एक अक्षरही बोललो नाही. मी फक्त खुंटीजवळ गेलो आणि कोट काढून त्याच्या हवाली केला. डोळे भरून तो त्या कोटाकडे पाहात राहिला. आणि हळुवारपणे मला परत देऊन 'थँक यू' म्हणून तीरासारखा निघून गेला. तेव्हापासून मी त्याला पुनः पाहिले नाही.

• • •

# अगतिका

रामचन्द्र हिंगणे



"तूं सुखी रहा" हा चित्रपट लवकरच प्रकाशित होत आहे. या चित्रपटाला ज्याची कथा आहे, त्यांचीच ही नवी गोष्ट--त्याग करूनही सुखी न झालेल्या बहिणीची ! !

'ताई येतेस ना सिनेमाला ?' प्रभा रजनीला म्हणाली खरी, पण मनातून प्रभाला वाटत होते, ताई सिनेमाला न आलेली बरी. विचारले नाही तर वाईट दिसेल म्हणून प्रभाने तिला विचारले होते. नाही तरी रजनी प्रभेबरोबर सिनेमाला जाणार नव्हतीच. त्या नवविवाहित जोडप्याबरोबर सिनेमाला जाणे तिला बरे वाटलेही नसते, परंतु प्रभेने औपचारिक रीतीने सिनेमाला येतेस का म्हणन आपल्याला विचारले त्या रीतीने तिने विचारावयास नको होते. प्रभाने विचारले म्हणून रजनीला दुःख झाले. समोर धरलेले मासिक थोडेदेखील बाजूला न करता किंचित तुटकपणाने रजनी म्हणाली "माझ डोक दुखतय् तुम्हीच दोघ जाऊन या." आणि मग रजनीला वाटले आपला तुटकपणा तिच्या ध्यानात तर आला नाही ना ? रजनीचा तुटकपणा प्रभेच्या ध्यानात आला नाही. कारण तिला घाई झाली होती.

उलट प्रभा त्याच उत्तराची वाट पाहत असावी. तिने आपला पदर परत एकदा नीट सावरून घेतला. आरशात आपली छबी न्याहाळून पाहिली. ती मधल्या दाराच्या उंबऱ्यात आली. अरुण तिचीच वाट पाहत होता. ती दारात उभी राहिल्याबरोबर अरुण उठला. थोरल्या कर्त्या मेहुणीला आदर व्यक्त करण्यासाठी विचारले पाहिजे म्हणून आत वळून म्हणाला, "आम्ही सिनेमाला जाऊन येतो."

प्रभेचा पती म्हणून प्रथमच घरी आलेल्या अरुणचा मान ठेवणे रजनीला जरूर होते. रजनीने मासिक चटकन् बाजूला केले. लगबगीने खुर्चीवरून उठून ती अरुणच्या समोर आली आणि हसत हसत अरुणला म्हणाली, सिनेमा सुटल्यावर कुठे खात बसू नका, सरळ घरी या. स्वयंपाक मी करणार आहे'

'छे ! छे ! सिनेमा सुटला की, आम्ही घरीच येतो. होय ना ग प्रभा --?' प्रभाकडे वळून अरुण म्हणाला.

प्रभा अरुणच्या जवळ सरकली. त्याला खेटून उभी राहत प्रभा रजनीला म्हणाली, 'ताई ह्यांना बटाटेवडे फार आवडतात. तू करशील का -- ?'

'त्यांना निष्कारण त्रास देतेस ?' पण पुढचे वाक्य त्याला बोलू न देता रजनी म्हणाली, 'जा लवकर तुम्ही, उगीच वेळ घालवू नका --'

पडत्या फळाची आज्ञा घेऊन प्रभा--अरुण मोठ्या उत्साहाने घराबाहेर पडली. बंगल्याचे फाटक प्रभेने मोठ्या उत्साहाने उघडले. आनंद तिच्या चेहऱ्यावर कसा ओसंडून राहिला होता. अगदी आत्ताच उमललेल्या फुलावर दंवबिंदू पडून ते फूल लोभस दिसावे तसे तिचे मुखकमल दिसत होते. अरुणचा शब्द ती सारखा झेलीत होती. त्याच्या तालावर नाचत होती. त्याच्या नजरेतल्या हुकमतीत तिची हालचाल होत होती.

चिमण्यांच्या जोडप्यासारखी चिवचिव करीत ती नजरेआड झाल्यावर रजनी आत आली. आता घरात कुणीच राहिले नव्हते म्हणून की काय, रजनीचे सारे दुःख उफाळून वर आले. रजनीला एकदम थकवा आला. आपले शरीर पूर्णपणे निर्जीव होत आहे, असे

तिला वाटले. आपल्याला असे काही तरी व्हायला नको असे तिचे मन तिला सागत असतानाच तिला काहीतरी होत होते. तिला आतून कसले तरी दुःख बोचू लागले होते.

रजनीने मासिक डोळ्यापुढे धरले. ती मासिकातली अक्षरे वाचू लागली, पण त्या अक्षराचा अर्थबोध तिला होईनासा झाला. मासिकातले एक पान सपूर्ण वाचले तरी आपण काय वाचले हे जेव्हा तिला आठवले नाही, तेव्हा मात्र ती पूर्णपणे घाबरली.

'आपल्याला होतय तरी काय?' या प्रश्नाच्या बाणाने तिने आपल्या मनाचा वेध घेतला. आपण अस्वस्थ होण्याचे खरे कारण अरुणचे आपल्या घरातले आगमन आणि प्रभेचे त्याच्याशी वागणे हे आहे याची अस्पष्ट जाणीव रजनीला होताच तिचे सगळे शरीर कपायमान झाले. तिने स्वत.लाच दोष दिला. छे! आपण पापी आहोत, दुष्ट आहोत!

पण रजनीचे रजनीला समजले नाही की, अरुणचे आगमन हे आपल्या दुःखाचे मुख्य कारण नाही. प्रभेचे अरुणशी लग्न होऊन अवघे पधरा दिवस झाले होते. तेवढ्या काळात ती एकदा सासरी जाऊन आली होती. कालच अरुण तिला न्यायला आला होता. अरुण आल्यापासून प्रभेच्या चित्तवृत्ती एकाएकी फुलल्या होत्या. प्रभा आपले सर्वस्व विसरून अरुणच्या व्यक्तिमत्त्वात विलीन झाली होती. तिचे शरीर अरुणमय झाले होते. अरुणच्या हृदयसिंहासनावर बसून लहान मुलासारख्या टाळ्या पिटून ती आपल्या लाडक्या ताईला जणू सागत होती 'ताई! मी किती सुखी आहे पाहा! या अतुलनीय सुखामुळे मला वाटतय ही घटका, हे तास, हे क्षण पुढे जाऊच नयेत!"

रजनीने प्रभेचे ते जणू काही सारे बोलणे ऐकले आणि ती जास्तच व्याकुळ झाली. तिचे मन तिला सागू लागले, 'पाहा प्रभा किती सुखी आहे. तुझ्यावरची सारी माया एका क्षणात ती विसरून गेली आहे. तुझ्यावर तिची किती किती माया होती. तुझ्याशिवाय आईबापाच्या पश्चात् कशी वाढवलीस तू? —आपल्या बहिणीला स्वत.च्या मुलीसारखे वाढवलेस तू? —पण जन्माचा जोडीदार मिळाल्यावरोबर प्रभा तुला पार विसरून गेली. इतकेच काय, तू तिला नको झाली आहेस. ती तुला स्पष्ट बोलू शकत नाही पण तिला तू आता अडगळ झाली आहेस. 'ताई बाहेर जाईल तर बरे होईल! —ताई घरात नसती तर आम्हाला एकांत मिळाला असता.' असे तिला वाटू लागले आहे.

रजनीला वाटले: अरुण आल्यापासून आपण अस्वस्थ झालो आहोत. पण अरुणचे आगमन हे खरे तिच्या दु.खाचे कारण नव्हते. आपली प्रभा—जिच्यावर आपली सारी भिस्त अवलंबून होती—ती आपल्यापासून एका क्षणात दूर गेली याची जाणीव तिला बोचत होती. पण हे दुःख आपल्याला बोचत आहे, हे ती पटवून घ्यायला तयार नव्हती. हे दु.ख आपल्याला बोचत आहे. हे कबूल करणे म्हणजे आपल्या व्यक्तिमत्त्वाला सुरुग लावण्यासारखे आहे हे तिला माहीत होते.

शरीराच्या आतील बाजूला आजार असावा, त्याचे निदान न होता डॉक्टरने दुसराच रोग समजून वरूनच उपचार करीत बसावे आणि 'अजून का बरे होत नाही?' असे म्हणत स्वत: बुचकळ्यात पडावे आणि आजाऱ्यालाही घोटाळ्यात पाडावे अशातला रजनीचा प्रकार चालला होता. आपली लाडकी बहीण प्रभा आपणाला एका क्षणात विसरली याचे दु:ख तिला खरे बोचत होते आणि ती मनाशी म्हणत होती अरुण आल्यापासून आपण असे अस्वस्थ का झालो आहोत?

विचारांचे तुवळ युद्ध चालू असताना मासिकातल्या अक्षरातून निघणाऱ्या अर्थाचा बोध तिला होत नव्हता! डोळ्यापुढून फक्त अक्षरे एकामागून एक जात होती.

—ती बंगल्याच्या आवारात आली. दुसऱ्या फ्लॅटमधल्या बाई 'रजनीला' पाहून बाहेर आल्या. "प्रभेचे मिस्टर आले आहेत वाटते?" त्या बाईंनी अचानकपणे विचारले.

"हो काल रात्रीच आलेत!—"

"आता जाताना त्याना पाहिले म्हणून विचारले. छान जोडा दिसतो. मला तरी आनद वाटला." मग त्या बाईने चाळिशीच्या दरम्यान आलेल्या रजनीला आपादमस्तक न्याहाळले आणि वरकरणी सहज बोललो असे भासवीत ती म्हणाली 'बर झाल बाई प्रभान लग्न केल ते. तुमची प्रभा खरच शहाणी. वय जास्त झाल्यावर लग्न होत नाही.'

रजनीचा चेहरा खरकन् उतरला. 'प्रभेने लग्न केले हे चागले झाले हे त्या बाईला सांगायचे नव्हते. तुम्ही लग्न केले नाहीत ही मोठी चूक केली, आता तुमचे लग्न होणार नाही, असेच जणू काही तिला सागायचे होते. त्या शेजारणीच्या अभिप्रेत अर्थाने नाराज झालेल्या रजनीला संभाषणाची साखळी नीटशी जोडता आली नाही. 'जाते बाई, अरुण येतील जेवायला लगेच!' असे म्हणत रजनी घरात शिरली.

बहिणीच्या सुखासाठी आपण लग्न केले नाही ही आपली चूक? का लग्न करून आपणाला बहिणीचे सुख पाहता आले असते? —का आपल्या तीनही बहिणीनी आपला विश्वासघात केला म्हणून आपणच सकटात सापडलो? तिघीतली एक जरी आपल्यासारखी अविवाहित राहिली असती तरी बरे झाले असते. आपल्याला इतके उदासवाणे वाटले नसते. खरे कोणते? दु:खाचे खरे कारण काय?

रजनीला आठवत होते. रजनीचा पहिला घात उपाने केला. एके दिवशी संध्याकाळी ठरलेल्या वेळेच्या आत उपा आली नाही. सध्याकाळी साडेसातच्या पुढे कुणीही घराबाहेर राहता कामा नये असा रजनीचा दंडक होता. त्या दिवशी रजनी चिंताक्रांत झाली. प्रभा त्या वेळी मोठी नव्हती. लहानही नव्हती. पण आपली ताई अस्वस्थ झाली आहे, तिला काही सुचत नाही, हे जाणून प्रभा रजनीच्या मागेमागे फिरू लागली. संध्या काही काळ शात होती. नतर ती गंभीरपणाने म्हणाली, 'ताई, कशाला काळजी करतेस? काही तरी महत्त्वाचे काम निघाले असेल म्हणून तिला उशीर झाला असेल.'

पण रात्रीचे नऊ वाजले तरी उषा आली नाही तेव्हा मात्र तिघीही सकटात पडल्या. दहा वाजून गेल्यानंतर सिनेमाची वेळ टळून गेली, आता ती येण्याची शक्यता कमी झाली तेव्हा रजनी प्रभेला म्हणाली 'प्रभा, तू आणि सध्या जेवून घ्या, मी आलेच.'

प्रभेने केविलवाणा चेहरा करून संध्येकडे पाहिले कसले तरी सकट घरात नाचत असताना आपण शांतपणे जेवण करणे त्या बालमनाला पटले नाही. सध्येने प्रसगाचा गंभीरपणा जाणला होता. काही तरी अघटित घडू पाहत आहे, याची अस्पष्ट जाणीव सध्येला झाली होती. 'चल ना आपण जेवून घेऊ.

ताई येईल बाहेरून उपेला घेऊन.' संध्या म्हणाली. पण प्रमेची समजूत झाली नाही. तिच्या डोळ्यातून अश्रुधारा वाहू लागल्या.

प्रमा रडू लागली तशी रजनी सतापली. पण तिने संताप लगेच आवरला. उषा कुठे गेली हे न शोधता प्रमेच्या बालमनाची समजूत घालणे तिला जरूर होते. तिच्या कर्तव्यदक्ष मनाला तेच वळण लागले होते. प्रमेला जवळ घेऊन ती म्हणाली–'बर, चल आपण अगोदर जेवून घेऊ.'

त्या तिघीजणी स्वयंपाक घरात गेल्या. जेवणाची भांडी घेताना दह्याचे भांडे खाली घेणे जरूर होते. दह्याच्या भांड्याला रजनीने हात घातला. भांड्याखाली साप असावा. त्याचा गार स्पर्श शरीराला भीतिप्रद वाटावा इतकी ती दचकली. दह्याच्या भांड्याखाली एक पाकीट होते. कोणते संकट आपल्यापुढे आले आहे हे जाणून घेण्यासाठी रजनीचा आत्मा आतुर झाला. घाईघाईने रजनीने पाकीट फोडले नि ती वाचू लागली.

"ताई,

मला क्षमा कर. खरेच अंतःकरणापासून तुझी विनंती करते की, मला तू क्षमा कर. ज्या वेळी तुझ्या हातात हे पत्र पडलेले असेल तेव्हा मी पुण्यापासून बरीच दूर गेलेली असेन. माझा शोध घेण्याचा तू प्रयत्न करू नकोस. माझ्याकडून जे घडले त्याचे दुःख तू करू नकोस. जे आज-माझ्या हातून होत आहे ते चांगले का वाईट हे काळ ठरवणार आहे. चांगले झाले तर ते तुझ्या आशीर्वादाने झाले, असे मी मानीन. वाईट झाले तर ते माझ्या नशिबाने घडले असे मी समजेन. सुखात राहिले तर तुमच्या तिघींची अगाऊ परवानगी घेऊन जरूर भेटेन. दुःख पदरी पडले तर एकटी सोशीन. त्याची वाच्यता करणार नाही, तुम्हाला कळवणार नाही.

माझ्या एका आवडत्या माणसाबरोबर मी आज त्याच्या जन्माची जोडीदारीण म्हणून जात आहे. त्याचा माझा परिचय गेल्या तीन वर्षांचा असून त्या परक्या पुरुषाला जवळ करताना मी त्याच्या स्वभावाचा पूर्ण अभ्यास केला आहे. आम्ही कुठे तरी रजिस्टर पद्धतीने लग्न करणार आहोत.

आम्ही तिघी जणी तुला ताई म्हणत आलो आहोत. तू आमची ताई नाहीस–आई आहेस. आई म्हणून तुझ्याजवळ मन मोकळे करू नको तर कुणाजवळ करू? कोणत्याही मुलाच्या मनांत जी भावना आपल्या आई-बद्दल असते तीच भावना माझी तुझ्याबद्दल. तीच श्रद्धा तुझ्याविषयी माझ्या मनात आहे हे तुला मुद्दाम सांगण्याचे कारण तुमच्या-पासून निघून जाताना माझ्याकडून तुमच्या बाबतीत एक अन्याय होणार आहे हे होय.

मी तर चाललेच. मग जग उद्या ही बातमी बाहेर पसरल्यानतर तुमच्याकडे बोट दाखवील. ह्याची बहीण पळून गेली असे जग म्हणेल. जगात आपणा चौघींचा जो दबदबा होता तो नाहीसा होईल. सगळ्या जगातल्या-सारख्या ह्या मुली नाहीत. आईवडील नस-ताना मुली कशा चांगल्या राहत आहेत, असे लोक आतापर्यंत म्हणत होते पण माझ्या ह्या कृत्याने त्या समजुतीला सुरुंग लागणार आहे. ताई, तुम्हाला सोडून जाताना दुःख होत होते ते ह्या एकाच गोष्टीचे. ताई, आई-वडिलांच्या पश्चात् आमच्याकरिता तू सगळे सहन केलेस. तसे हे तुला सहन होणार नाही. लोकांच्या बदललेल्या नजरा पाहून तुझ्या ठिकाणी सहनशक्ती राहील की नाही याची शंका येते ग!!

प्रमा तीन वर्षांची असताना आई गेली. जाताना दादा नसताना तुला सांगितल्याच आठवतय् 'रजनी आज ना उद्या मी जाणार. तुम्हाला भाऊ नाही. वंशाच्या वृद्धिसाठी ह्यानी लाख केल, सावत्र आई घरात आली तर तुम्हा सगळ्यांना त्रास होईल. पण तूच तिघींची आई हो. प्रमा लहान आहे. आईच्या मायेने तिला वाढव. माझी उणीव तिला भासू देऊ नकोस. सावत्र आई आली नाही तर तू जातीने कष्ट उपस. पण माझ्या बाळांना आई नाही अस वाटू देऊ नकोस.'

'आई तू अस बोलू नकोस' म्हणून तू आईची आई झालीस. आईच्या मायेने तू आईचे समाधान केलस. माझ्या डोळ्यात पाणी उभे राहिले, त्याच क्षणी तू मला जवळ घेतलेस. आईच्या अमृतमय स्पर्शाची आठवण तू त्याच क्षणी मला करून दिलीस.

त्यानंतर तिसऱ्या दिवशी आई गेली. तुला सांगण्यासाठीच आईने जीव धरला होता की, काय कोण जाणे. आईच्या मृत्यूचे दुःख


# साधना

ट्वेंटिएथ सेंचुरी

स्टूडन्ट्स् **डिक्शनरी**

संपादक : प्रि. **रा. प. सबनीस,** एम्. ए. (कॅन्टब).
प्रि. डॉ. **ना. य. डोळे,** एम्. ए., पीएच्. डी.

**पृष्ठे ९४०** **किंमत रु. ६·००**

उपलब्ध असलेल्या इंग्रजी-इंग्रजी-मराठी शब्दकोशातील उणिवा दूर करून अधिक विस्तृत प्रमाणावर शब्द आणि अर्थ देणारा इंग्रजी शिक्षणाचा प्रारंभ करणाऱ्या विद्यार्थ्यांपासून पदवी परीक्षापर्यंतच्या विद्यार्थ्यांच्या सर्व गरजा भागविणारा बृहत्कोश

*कोशाची काही वैशिष्ट्ये*

(१) आधुनिक इंग्लिश पद्धतीचे प्रमाणभूत उच्चार देवनागरी लिपीत.
(२) साधित शब्दाची रचना कळण्याची मूळ शब्दाबरोबर सोय.
(३) शब्दाचे व्याकरण.
(४) अत्यंत उपयोगी अशी परिशिष्टे.

**साधना प्रकाशन, शनवार, पुणे २**

कर्तव्याच्या भरात तू विसरलीस. त्याच रात्री प्रभेला कुशीत घेऊन झोपलीस. दुसऱ्या बाजूला संध्या होती. शोकविव्हल होऊन रात्रभर तळमळत पडणाऱ्या वडिलांजवळ मला त्या रात्री झोप आली नाही. तू माया करू लागलीस म्हणून मी पण सध्येवर, प्रभेवर माया करू लागले. आपली आबाळ होऊ नये म्हणून वडिलानी लग्न केले नाही. आपल्या मायेपोटी, आपल्या घराण्यातच माया करण्याच बाळकडू मिळाल की काय कोणास ठाऊक ?

आमची काळजी घरात स्वयंपाकाला बाई ठेवली असतानाही तू करीत होतीस. वेणी-फणीपासून सगळचावर तुझी करडी नजर असे. दादांनी लग्न केले नाही पण त्यानी हाय खाल्ली होती. थोडयाच अवधीत त्यानी जगाचा निरोप घेतला. जाताना त्यानीही तुला सागितल 'मुलीची आई झालीस आता वडील हो परमेश्वर तुझ कल्याण करील.'

वडिलाची आज्ञाही तू मानलीस. त्याच्या मृत्यूनंतर जिव्हाळयातच करडेपणाची छटा आली. तू करारी झालीस. तू खंबीर झालीस. आमच्या खस्ता खाता खाता तुझें जीवनसुद्धा रूक्ष झाले. ते तुझे तुला कळले नाही. तारुण्याने मुसमुसलेली युवती म्हणून लोक तुझ्याकडे पाहात नसत तर, कर्तव्यदक्ष वहीण म्हणून लोक त्याच वेळी तुझ्याकडे आदराने पाहू लागले होते.

तुझा त्याग, तुझी थोरवी, सगळे काही विसरून मी आज तुझा त्याग करीत आहे. तुम्हा तिघी वहिणीच्या–सख्या वहिणी–पेक्षा एका परपुरुषाचे प्रेम आता मला अधिक मोलाचे वाटते. हा माझा स्वार्थ की, निसर्गाचा चमत्कार हे मला समजत नाही.

सध्या जाणती आहे तिला समजेल. प्रभा लहान आहे ती रडेल– वुचकळयात पडेल. तिची तू समजूत घाल. आईवडिलांच्या मायेने तुझ्या स्वार्थत्यागाचे आशीर्वाद मला दे. 'उषा तुझ्या, पतीघरी तुला सुख मिळेल !' तू फक्त एवढे म्हणालीस तरी माझे विवाहित जीवन सुखी होईल अशी माझी समजूत आहे. ताई, निरोप घेते.

तुझी वहीण
उषा

रजनीने पत्र वाचले. संध्येकडे पाहिले. प्रभेला जवळ घेतले. डोळयातले अश्रू पुसले. रजनी करारीपणाने म्हणाली 'चला आपण जेवून घेऊ या. उषा गावाला गेली आहे. उद्या-परवा येईल.'

आताही तिने ते पत्र नीट घडी घालून बाजूला ठेवून दिले. त्या पत्राने ती आणखी-नच व्याकुळ झाली. उषेने लिहिल्याप्रमाणे तिचा काहीच सुगावा लागला नाही. त्याचा सरळच अर्थ असा होता की, उषेचे वैवाहिक जीवन सुखाचे झाले नव्हते. रजनीला आताही वाटले, ती मनाशी कळवळून म्हणाली, "उषा मला सागितल असतस तर मी तुझ लग्न करून दिल असत. चागला जातीतला माणूस निवडून मी तुझा संसार उभा केला असता. मला तू का सागितल नाहीस ?"

आणि मग रजनी दचकली. खरेच आपण तिचे लग्न करून दिले असते, तसे आपल्या वागण्यातून प्रतीत झाले असते तर उषेने आपल्याला तसे सागितले असते. आपण तसे करून देणार नाही अशी तिची खात्री होती म्हणून की काय, तिने या मार्गाचा अवलंब केला ! तिचे लग्न करून द्यायला आपण तयार होतो, तर मग आता प्रभेचा पती घरी आल्यापासून आपल्याला असे का होऊ लागले ?

उषेने आपणाला जो जबरदस्त धक्का दिला, त्याने आपल्या करारीपणाचे पेकाटच मोडून गेले. जीवनातली आपली श्रद्धा उडू लागली. पण आप्रण सध्येवर, प्रभेवर करीत होतो त्यापेक्षा जास्त माया करू लागलो. उषा गेली तशा या लहान पोरी... ..

रजनी आठवीतच होती —

उषेची उरली सुरली माया आपल्यात सामावून आपण उरलेल्या बहिणीवर माया करू लागलो. पण ती करीत असताना आपल्या मनात खत होती. दहशत होती. कुठे तरी खोल खोल टोचणी लागली होती. जे उषेने केले तेच या दोघी करणार नाहीत कशा-वरून ? असे एकसारखे आपले मन आपल्याला टोचीत होते ––

सध्या तारुण्याने जशी उमलू लागली तशी ती एकच काळजी आपल्या मनाला लागली. ती कुठे खळखळून हसली तर आपल्या मनात येई या निर्मळ हास्यावर कुणी पुरुष फिदा झाला तर ? न्हाणीतून तारुण्याने रसरसलेली सध्या अगाभोवती पातळ लपेटून बाहेर आली की तिच्याकडे कितीतरी वेळ आपल्याला पाहात राहावे असे वाटे. तसे पाहात असतानाच आपल्या मनात येई, हे फूल पूर्ण उमलले आहे आपणहूनच त्याने एखाद्याच्या पायावर वाहून घेतले तर ? रात्री आपल्याला जाग येई. अस्ताव्यस्त झोपलेल्या संध्येकडे पाहून आपले समाधान होई. आईवडिलाची स्मृती या जीवाला होत नाही; याचे धन्य धन्य वाटे. आईच्या मायेने तिच्यावर पाघरूण घालताना मनात विचार येई. संध्येला मनातल्या मनात आपण सागत असू 'तू तरी उषेसारख करू नकोस. तू तरी आम्हाला सोडून जाऊ नकोस.'

*पण अखेरीस संध्याही आपल्याला अचानकपणे* सोडून गेली. काळाने ताप आल्याचे साधे कारण आपल्याला सागितले आणि चार दिवसात आपल्यातून ओढून नेले. काळापुढे इलाज नव्हता. दैवाला दोष देत हात चोळीत बसण्याशिवाय दुसरा कुठलाच इलाज नव्हता.

आईवडील गेले त्यापेक्षा संध्येचे रूपातर काळोखात होताना आपल्याला फार दुःख झाले. प्रभेला आपण मनसोक्त रडू दिले. आपणही खूप रडलो. चुलतमाऊ, मावसमाऊ आपले रडे ऐकून हेलावून गेले. त्या रात्री झोपताना प्रभेला आपण घट्ट आवळून धरले. आपले मन सारखे देवाजवळ प्रार्थना करीत होते, 'हिला तरी आपल्यापासून दूर नेऊ नकोस, माझ्या कष्टाचे फळ म्हणून एवढा तरी जीव माझ्याजवळ राहू दे'—

रजनी उठली स्वयपाकाची सारी साधने तिने खाली काढली. स्वयपाकाला सुरुवात केली. पण तिचे विचार कमी होण्याची चिन्हे दिसेनात.

रजनीला परत परत स्मरत होते उषा निघून गेली, सध्या देवाघरी गेली, आपल्या लग्नाचा विचार त्याना मोठे करताना आपण केला नाही. करावासा वाटला नाही, त्यागाची नशा चढली होती, मायेचा मोह झाला होता. दोघीनी दगा दिल्यावर आपले सारे लक्ष आपण प्रभेवर केंद्रित केले

प्रभा मोठी होऊ लागली होती, तरी आपणाला ती लहानच वाटत होती. तिची सगळी कामे आपल्यालाच करावीशी वाटत. तिला पुढयात घेऊन तिची वेणी घालाविशी वाटे. तिला भरवावेसे वाटे. ती आपल्याजवळ असावीशी वाटे. कामावर जाताना रजनी रोज तिला बजावून सागत असे, 'प्रभा

कॉलेज सुटले की घरीच ये, कुठे फिरायला जाऊ नकोस, मैत्रिणीकडे जाऊ नकोस. वाचनालयात जाऊ नकोस. "

हे सगळे करीत असताना आपल्या मनात एकसारखी दहशत असे. "आता प्रभा आपल्याला सोडून जाणार तर नाही ना— ?"

पण निसर्ग थांबत नाही. कुणाला क्षमा करीत नाही. वयाचा, ज्ञानाचा, श्रीमतीचा, उपयुक्ततेचा मुलाहिजा ठेवीत नाही. तो आपली कामगिरी शांत राहून चोख बजावीत असतो.

एके दिवशी तिचे चुलत चुलते तिला भेटण्यासाठी घरी आले. त्यांना पाहताच रजनीने ताडले यांचे काही तरी महत्त्वाचे काम असले पाहिजे.

'एका गोष्टीबाबत तुझा होकार घ्यायला आलो आहे मी. प्रभेचे लग्न मी करणार आहे. मुलगा आपल्या जातीचा आहे. चांगला कर्तबगार आणि सुस्वभावी आहे आणि विशेष म्हणजे मुलाला प्रभा पसंत आहे.–

रजनी चुलत्याकडे पाहातच् राहिली. असे काही तरी ते घरी येऊन बोलतील. लग्नाच्या बाबतीत ते पुढाकार घेतील असे तिला वाटले नव्हते. ती सभ्रमात पडली आहे असे पाहून तिचे चुलते किंचित कठोरपणाने म्हणाले 'उषेच्या बाबतीत जी चूक झाली ती चूक प्रभेच्या बाबतीत होऊ नये म्हणून सांगतोय्. तू नाही म्हणालीस तरीही मी काही ऐकणार नाही. उषेच्या वेळी घराण्याची जी बेअब्रू झाली ती परत होऊ नये अशी माझी इच्छा आहे–'

रजनी काहीच बोलली नाही. ती बोलणार नाही, हे ते जाणून होते. उठता उठता ते म्हणाले. " उद्या ती माणस सकाळी प्रभेला पाहावयास येणार आहेत–"

आणि रजनीचे चुलते निघूनही गेले. रजनी स्वत.वर चिडली. प्रभावर चिडली. पाठमोऱ्या चुलत्याच्या आकृतीकडे पाहत संतापाने ती म्हणाली " तुम्ही हा अधिकार माझ्या वेळी का गाजवला नाहीत ? माझ्याच बाबतीत कुणी पुढाकार कसा घेत नाही— याच्या पूर्वी का घेतला नाही ?"

आणि मग चुलत्याने जो पुढाकार घेतला तो प्रभेला पिवळी करून सासरी पाठवण्यापर्यंत. रजनी कळसूत्री बाहुलीप्रमाणे त्या सोहळ्यात वागली.

आणि काल प्रभेला येऊन चारच दिवस झाले नाहीत तर अरुण तिच्या मागोमाग तिला नेण्यासाठी आला होता.

प्रभा सासरी जाऊन आली होती. ती आगळी बनून. नवा उत्साह तिच्या शरीरात थैमान घालीत होता. ती क्षणाक्षणाला उगीच उमलत होती. उगाच हसत होती. ती बोलत होती. सारखी बोलत होती. पण त्यात अरुणच्या कौतुकाचाच भाग जास्त होता. सासूसासऱ्यांबद्दल ती कदाचित बोले. अरुणचे हसणे; त्याचा छद, त्याची जेवण्याची लकब, त्याचा मिस्किलपणा, त्याचे सारे बारकावे तिने कितीतरी वेळा रजनीला सांगितले.

ते ऐकत असतानाच रजनी दु:खी- कष्टी झाली. आपण इतकी वर्षे हिला वाढविले, जपले, एक घास तिने आपल्याशिवाय घेतला नाही– ती प्रभा आपल्याला पार विसरून गेली. 'मी सुखात आहे पण तुला एकटीला ह्या एवढ्या मोठ्या घरात वेळ जातो का ? तुला काही होत का ?' तिने एका शब्दानेही आपली चौकशी केली नाही. करण्याचे कारण वाटले नाही......आपण प्रभेवर किती माया केली आणि सिनेमाला जाण्याची तयारी पूर्ण झाल्यावर तिने विचारले, "ताई, तू सिनेमाला येतेस का ? –' आपण त्याच्याबरोबर सिनेमाला यावे असे तिला वाटतच नव्हते. आला आपण तिला अडगळ वाटत आहोत.–

आपले लग्न होणे शक्य नाही मग आपले आयुष्य ?

रजनीला ग्लानी आली. ती कॉटवर डोळे मिटून पडली. त्या अवस्थेतच तिला समोरच्या भिंतीवर एका स्त्रीची आकृती दिसली. ती दचकली. ती प्रतिमा रजनीचीच होती मग त्या भिंतीवरच्या रजनीने त्या भिंतीवर मोठ्या कुशलतेने रेघा ओढल्या. त्या तीन रेघांना तिने रूप आणले. त्या भिंतीवरच्या रजनीने त्या रेघातून तीन स्त्रियांच्या प्रतिमा तयार केल्या. अगदी हुबेहूब उषा, संध्या आणि प्रभेसारख्या. भिंतीवरची रजनी एकाग्र चित्ताने त्या चित्राकडे पाहात असतानाच कुणी एक महापुरुष आला. त्याने उषेच्या चित्रावर लालभडक रंग मारला, संध्येच्या प्रतिमेवर काळाकुट्ट रंग फासला, प्रभेच्या सावलीवर गुलाबी रंग ओतून तो काळपुरुष एका क्षणात नाहीसा झाला !–

–ग्लानी आलेली रजनी डोळे मिटून एकाग्र चित्ताने भिंतीवरच्या स्वत.च्या प्रतिकृतीचा आक्रोश ऐकत होती.

• • •


## मानव झुकतो सुखाकडे —

जीवनांतील प्रत्येक कृतीपासून मन सुखाची अपेक्षा करते.
हे जर पटत असेल तर
नित्य लागणाऱ्या वस्तु खरेदी करण्याची
उत्तम स्थळे निवडणे महत्त्वाचें आहे.
म्हणून यापुढे सर्व प्रकारच्या टोप्या, गंजिफ्रॉक्स्, सॉक्स्, स्वेटर्स, मफलर्स
तसेच
लहानमोठ्यांचे अद्यावत तयार कपडे वगैरे
खरेदी करणे असेल तेव्हा

मुंबईस, प्रार्थनासमाजजवळ,

**एन्. व्ही. गोखले**

यांच्या दुकानी खरेदी कराव्यात.



# कविता

## मुक्ता

ओवाळ माझ्यावरून
तुजे आरतीचें डोळे
कपाळावर लाव
ओठांचे टिळे
मग बघ—
पूजा कशी
जुळण्याइतकी जुळते !
तशा वेळीच
मीलनाची जाणीव
विरहाइतकी कळते.

मधुकर केचे

## झिम्मडीला वाव नाही—

मंद थरत्या चांदण्याला
गंध होता धुन्द रात्रीं
मृदुल फुलले पुलक तेव्हा
स्वप्न होते तरल गात्री...
यौवनाला डौल होता
अन्तराला ओढ होती
अंग फुलल्या पाकळ्यांनी
वाट वळणीं गात होती...
भेट होती अमृताची
निर्झराला नाद होता
जीवनाचे द्वैत सरले
तेवता एकान्त होता...
एक होती धाव तेव्हा
धावणारी वाट होती
जीवनाच्या मुग्धतेला
रंग उधळी भूल होती...
जीवनाला अर्थ होता
गंध होता चांदण्याला
भावनेला अर्थ होता
नाद होता यौवनाला...
आज झाली...वाट मळली
दूर क्षितिजीं मेघ नाही
तापल्या पुळणीत आता
झिम्मडीला वाव नाही
झिम्मडीला वाव नाही

—वसन्त के. दीक्षित

## काव्य झाले वेदनेचे...

पापण्यांच्या ओंजळीत
मळे फुलले स्वप्नाचे
आज चांदणे जाहले
गर्दावल्या तिमिराचे
पालवले माळरान
बन झुलले वेळूचे
पूर्व-पुण्याच्या राशीने
काव्य झाले वेदनेचे
जडे सोनेरी झळाळी
कवटयांच्या वाळवंटी
विद्ध तारकांच्या नेत्री
आसवांचे झाले मोती

—कुसुमानंद

## करून सवरून !

पळात ववले रूप नभाचे
पळभर राधा, पळभर गोकुळ
पिसाट वायू वेणूचेविण
विकल किनारे, यमुना व्याकुळ !

चिंध्या, कागद घट्ट उराशी
कचरा उपशित बसली वेडी
हसणे-रडणे मधेच आणिक
हाती घेउन नाचे काडी !

पथात अडवे विराट शेपुट
उभा, आडवा छेद नभा
करून सवरून असे निराळा !
कृष्ण राउळी शांत उभा !

—शान्ताराम भास्कर

## वाटचाल

किती सारवल्या भिंती
किती जोजविले मन
तुझ्या पावरीच्या वेजे
किती फुंकीले मी प्राण
तरी त्याच पिंजऱ्यात
वेडी मैना माझी झुरे
येता देशाहून हाक
पाणी डोळ्यात साकळे
पण फुलाच्या गंधाने
जाते वेडाऊनी रान
वाटचाल क्षितिजाची
करी अमृतशिंपण
पुढे भिजता भिजता
आले वेव्हाऱ्याला पाणी
एक वाट अमृताची
नि एक वाट झाली सुनी...

—ज्ञानेश्वर शंभरकर

□

## मृत्यु झाला स्वाती

आले कानांवर
गीत अनावर
लाट लाटेवर
आदळता

फुटताना मग
उधळली मोती
मृत्यु झाला स्वाती
शिंप–विश्व !

—प्रभाकर सिरास

## चांदणें

एकटी गाऊ कशी मी
बोलती ना लोचने
बांधली श्वासास माझ्या
हुंदक्यांची पैंजणे
दूर कोठे थांबलेली
पावलांची स्पंदने
जा अता घेऊन संगे
आसवांचे चांदणे

—सुधाकर देशमुख

# वेगळा!



माधव कानिटकर

शहराच्या मध्यवस्तीत असलेली खोली तरीही गजबजाटापासून अलिप्त असलेली. दार बंद केले की वेगळे जग ! अंधेऱ्या जिन्यातून लागणाऱ्या ठेचा. शालिनी आज किती तरी दिवसांनी त्या खोलीत जात होती. मागे जेव्हा गेली होती तेव्हा अल्लडपणे एक एक पायऱ्या सोडीत, नाचत शेपटा पुढे पुढे यायचा, तो पुन्हा पुन्हा मागे टाकायचा अशी. हातातली पिशवी. त्या पिशवीतली तीच तीच पुस्तके. शालिनीला आज कुठे तरी खुपल्यासारखे वाटत होते, बुजलेली जखम पुन्हा भळभळ वाहू लागली असे तिला वाटत होते. निद्रिस्त आकांक्षा जागृत झाल्या होत्या. पहुडलेली स्वप्ने उठून आळस देऊ लागली होती. तिच्या आयुष्यात येणारे हे तिसरे घर. दोन घरे तिने भूषविली, सजवली, आता हे तिसरे घर फुलविणार होती. घर कसले, चार खणांची अंधेरी खोली. तिथे अस्ताव्यस्त पडलेली पुस्तके–मळकी चादर. भिंतीला ठिकठिकाणी बसून गेलेला रंग, तेलाचे डाग, शाईचे डाग, उखडलेला चुना, सगळीकडे वुरसटलेले, मळलेले घर–खोली. तो करकर वाजणारा जुना पलंग तसाच होता. डाव्या बाजूला धुळीने माखलेले शेल्फ. वरच्या दोन फळ्यांवरची धूळ कितीतरी वर्षांत झटकली गेली नव्हती. तिसऱ्या कप्प्यात स्टोव्ह होता. स्पिरिटची उभट बाटली होती, पालथी पडलेली आगपेटी होती. आणि चहा साखरेचे दोन बुटके पेढेघाटी डबे होते. त्यामुळे तरी त्या कप्प्यांतली धूळ झटकली गेली होती. भिंतीवर लावलेली स्टॅलिनची जुनी फोटोफ्रेम तशीच अजूनही लटकत होती–त्या फोटोलाही धुळीने चौकट केली होती. उजव्या बाजूच्या भिंतीवर गांधींचे रंगीत चित्र चिकटविले होते. आणि त्या खाली Not failure but low aim is crime ही पांढऱ्या

\+ + + + +

शालिनी आपल्या आयुष्यातून कायमची गेली अशा प्रभाकरची समजूत होती. परंतु नियतीने दहा वर्षांनी तिला पुनः खेचून आणले ......

\+ + + + *

खडूने दोन लिप्यात लिहिलेली अक्षरे किती तरी पुसट आणि अस्पष्ट झाली होती. शालिनीने आपल्या खोल गेलेल्या डोळ्यांनी त्या अक्षरांकडे पाहिले, आणि तिने हसल्यासारखे केले. कुलूप उघडून खोलीत आल्याबरोबर तिने चहूकडे पाहून घेतले. त्या खोलीत विशेषसा बदल झाला नव्हता. फक्त शांता आपटे, देविकाराणी, लीला चिटणीस, याची चित्रपट-पुस्तिकावर छापलेली जी अनेक चित्रे डाव्या बाजूला भिंतीवर चिकटविलेली होती ती फाडून टाकली होती! प्रभाकरच्या खोलीत एवढाच बदल झालेला तिला दिसला. आणि खिडकीवरचा नवा पडदा! कदाचित शालिनी येणार म्हणून प्रभाकरने लग्नापूर्वी एकदोन दिवसच घेतला असावा! निदान शालिनीला तरी तसे वाटले. मागे ज्या वेळेला ती येत होती तेव्हा पडदा निळसर होता, टेबलावरचा टेबलक्लॉथ मात्र अद्याप बदलला नव्हता. तिने रेशमाने भरलेली गुलाबपुष्पाची परडी अजूनही त्या टेबलक्लॉथवर स्पष्ट दिसत होती. कदाचित शालिनीच्या लग्नानतर प्रभाकरने तो वापरणे सोडून दिले असेल व आता परत काढला, असे शालिनीला वाटून गेले. तिला एकदम हृदय भरून आल्यासारखे वाटू लागले. नेत्राच्या कडा ओलावल्या! प्रभाकरचे एकनिष्ठ प्रेम पाहून ती गदगदली, गहिवरली! भिंतीना दिलेली पिवडी अधुक झाली होती, अस्पष्ट झाली होती. मधूनच आतला पाढरा रग डोकावत होता. डाव्या बाजूच्या कोपऱ्यात बारा इच लांबी-रुंदीची मोरी होती आणि त्या मोरीच्या कट्टयावर खूप दिवस न घासलेली पिवळी बादली होती. त्या बादलीतले पाणीदेखील गार गार होते. त्या पाण्यात एक तपेली तरंगत होती.

शालिनीने पदर बाधला. खिडकीशेजारी लावलेल्या दाढीच्या आरशात पाहून कपाळावरच्या बटा सावरल्या. एक दोन दाते गायब झालेला कंगवा रुपेरी छटा नाचत असलेल्या केसावरून फिरविला. आपली बॅग पलंगामागे सारली आणि दारामागे असलेली केरसुणी उचलली. ती तिथली धूळ झटकू लागली, झाडू लागली. गेली दहा वर्षे तिथल्या वस्तूंवरून स्त्रीचा हात फिरला नव्हता. तो फिरू लागला. तिने पुस्तके गोळा केली. टेबलावर सुस्त होऊन पडलेली इग्रजी-मराठी पुस्तके. त्यावरची धूळ झटकून तिने ती हारीने लावली. टेबलक्लॉथ एका बाजूने खाली लोंबत होता तो तिने नीट चारी बाजूनी घातला. आता मध्यभागी बरोबर ती गुलाबपुष्पाची परडी आली. मग खिडकीच्या कट्टयावर ठेवलेले प्रभाकरचे पॅड–रायटिंग पॅड–तिने त्या परडीवर एका बाजूला ठेवले. त्यावर हसऱ्या बाईचे चित्र असलेला सोप फॅक्टरीचा टिपकागद ठेवला आणि त्यावर फुलाफुलाचे पेपरवेट. आता किती छान दिसत होते टेबल! एखाद्या प्रोफेसरचे टेबल आहे असे वाटत होते. मोरीच्या कट्टयावरच्या बादलीतले पाणी तिने ओतून दिले व तपेली घेऊन ती तळमजल्यावरच्या हौदावर गेली. घासून-पुसून, चिंच लावून तिने बादली चकचकीत केली. शिकेकाईचा हात फिरवायलाही ती विसरली नाही. त्याबरोबरच स्टोव्ह आणि चहासाखरेचे पेढेघाटी डबे यावरूनही लक्ष्मीचा हात फिरला. तिला आता दमल्यासारखे वाटू लागले. भरलेली बादली जिन्यावरून वर आणताना तिचा तोल जाऊ लागला. ती कशीबशी वर आली. स्वच्छ, सुदर पितळी भाडी लकाकू लागली, चकाकू लागली.

पलंगावरची चादर तिने काढून टाकली व स्वत:च्या बॅगेतली पाढरी शुभ्र चादर काढून तिने पलंगावर अथरली. तेलकट झालेला अभ्रा काढून टाकला व उशी चादरीखाली ठेवली. कोपरा न् कोपरा तिने स्वच्छ केला. चहूकडे प्रसन्नता आणि स्वच्छता यांची शिंपण केली. किती छान दिसत होती खोली. आता रंग दिला की बस!

श्रात पण तरीही समाधानाने पुलकित झालेली शालिनी पलंगावर पडली. पुन्हा पुन्हा खोली निरखू लागली. नव्या ससाराच्या आठवणीने फुलली, टवटवीत झाली.

नवा संसार! दुसरा नवा संसार! तिसरे घर! शालिनीला शहारल्या सारखे झाले. दहा वर्षांची पिसे उडाली. दिनदर्शकाची पाने फडफडली. दिवे विझले, प्रकाशले. वर्षा, वसंत, हेमंत, शिशिर, याचा शिवाशिवीचा डाव रंगला. शुक्राच्या चादणीने व्याधाच्या चांदणीला खो दिला.

दहा वर्षांपूर्वी निशिकांताच्या घरात त्याची पत्नी म्हणून शालिनीने प्रवेश केला. उबरठ्यावरचे माप लवंडून तिने समृद्धीला आवाहन दिले. नवी सून, नवीन वहिनी, सारे नवीन-नवीन. सतराअठरा वर्षांची जाईजुईसारखी कोवळी पोर. केतकी हसतीय जशी. प्रभाकरला रडत ठेवून निशिकाताचे घर शालिनीने हसविले. शालिनीच्या बाबानी बी. ए. ला वसणाऱ्या प्रभाकरला नकार दिला. शालिनी त्या दिवशी खूप रडली. नुसतीच रडली. प्रभाकरकडे घरदार सोडून धावत जाण्याची तिची हिंमत नव्हती. ती दुबळी होती. अवला होती आणि तिच्या मनावरही तसेच दुबळे सस्कार करण्यात आले होते. तिला घरदार सोडून ओढून नेईल इतके प्रभाकरचे प्रेम प्रभावी ठरले नाही. तेही दुबळेच ठरले! पण शालिनीला त्याच्या प्रीतीची जाणीव होती. सासरी गेली होती ती शरीराने, पण मनाने मात्र प्रभाकरच्या भोवती घिरटया घालीत होती. आपले शरीर तिने निशिकातच्या हवाली केले. त्याला द्यायला तिच्याजवळ मन होते कुठे? ते तिने प्रभाकरला केव्हाच देऊन टाकले होते! शरीर निशिकाताच्या कुशीत असले, तरी मन प्रभाकरला शोधीत असायचे. असे तिचे लग्न झाले. चारचौघीसारखे पण तरीही वेगळे! निराळे! दहा वर्षे शालिनीने निशिकांताबरोबर ससार केला. सासूसासऱ्यांची सेवा केली. दीर-नणदाची शिक्षणे केली पण पाण्यात राहूनही

शालिनी कोरडीच राहिली. ती आई झाली नाही. पण तिला याची कधी खंत वाटली नाही. तिच्या धाकटया जावांना दोनदोन तीनतीन मुले झाली तरी तिला काहीच वाटले नाही. उलट तिला शात शात वाटत होते. मधून मधून उफाळणारी वात्सल्याची भावना—तिने पुतण्यांवर अभिषेक केला त्याचा. त्यामुळे ससारात राहूनही दूर राहिली. सगळ्याची वेगळी बिऱ्हाडे झाली. सासू निवर्तली. मामंजी निशिकाताकडे राहू लागले. मधून ते इतर मुलांकडे जात, पण वर्षातले सहा महिने तरी निशिकात आणि शालिनी यांच्याकडेच असत. ईनमीन तीन माणसे. वेताचीच मिळकत. वेताचाच काटकसरीचा संसार. निशिकांत तसा काही फार हुशार नव्हता. सामान्य माणसासारखाच. आकांक्षांची विशेष झेप नाही. स्वप्नाचे मनोरे नाहीत. आहे त्याच्यात सुखसमाधानाने राहायचे हे त्याला ठाऊक. हे त्याच्या अगवळणी पडले होते. शालिनी त्याच्या ससारात रमली म्हणजे काय? रमली झाले! रमवून घेतले तिने! मेंडचांची आणि अळूची भाजी खाणाऱ्या निशिकांतच्या मिळमिळीत ससाराशी ती एकरूप अशी कधी झालीच नाही. प्रभाकर याच्या अगदी उलट होता. असामान्य आणि जगाहून वेगळे जीवन जगण्याचा त्याचा हव्यास अजोड होता. विवाहापूर्वी दीड एक वर्ष प्रभाकरच्या सहवासात गेले. पण त्यामुळे असले यांत्रिक आकाक्षारहित जीवन जगण्याबद्दल तिला तिटकारा निर्माण झाला होता. असल्या जीवनाबद्दल तिला तिरस्कार वाटू लागला होता. यात चमक नव्हती, तर मोहकता कोठून असणार? सारे दहाजणासारखे मिळमिळीत. पण इतके असूनही आदर्श आर्य अबलेप्रमाणे तिने निशिकाताशी एक नाही, दहा वर्षे संसार केला! कशी गेली वर्षे? सासूचा मृत्यु आणि दिराचे वेगळे होणे याशिवाय महत्त्वाचे आणि संस्मरणीय असे काहीच घडले नाही. निशिकातला दर वर्षी पाच रुपये पगारवाढ होत होती व दहा वर्षात पन्नास रुपयानी त्याचा पगार वाढला—बस्! आणि मध्येच वावटळीसारखी प्लेगची साथ आली—घरेदारे धुवून नेणारी, कर्त्या पुरुषांना ओढीत नेणारी. त्याने विमा उतरला. बँकेत चार-पाचशे रुपये ठेवले, आईच्या श्राद्धाचा दोनचार वेळा खर्च केला. कुणासाठी आणि काय करायचे? अगदी वृद्धपणी दत्तक घेण्याचा विचार त्याने केला होता पण त्याला वार्धक्य आलेच नाही. प्लेगच्या साथीत निशिकात बळी पडला! एकाचे आयुष्य सरले. तेरा दिवस शालिनी मूक आणि उपाशी राहिली. दीर-नणंदा येऊन सात्वन करून गेल्या. माहेरहून भाऊ-भावजय येऊन गेली. जावा आल्या, गेल्या. महिना झाला निशिकांतला जाऊन. काही विशेष घडले नाही. मामजीना जेवायला घालायचे. स्वतः चार घास घशाखाली ढकलायचे. बँकेतले पैसे, विम्याचे पैसे इत्यादीविषयी मामजी चौकशी करीत होते. तजवीज करीत होते. शालिनीची चिंता त्यानाही सतावीत होतीच.

—आणि एक दिवस प्रभाकर आला ध्यानीमनी नसताना. विवाहापूर्वी तिच्यावर प्रीतीचा अभिषेक करणारा गेल्या दहा वर्षात प्रभाकर तिला दोनदा भेटला होता. एकदा सासू गेली तेव्हा आणि दुसऱ्यादा शालिनीचे वडील गेले तेव्हा! बस. त्यानतर तीन चार वर्षात प्रभाकरची गाठभेट नाही—दर्शन नाही. आठवण मात्र रोजचीच!

शालिनीने पाट मांडला. प्रभाकर पाटावर बसला. नाही म्हटले तरी प्रभाकरचे बत्तीस वय सहज होते. स्वत.च्या लग्नानतर शालिनीला तो जेव्हा भेटला तेव्हा त्याला लग्नाचा अतिशय आग्रह केला पण प्रभाकर त्या विषयावर बोलायचे टाळीत होता. एवढा मोठा प्रोफेसर, पण एकांडा राहत होता. त्याचा त्याग शालिनीला लाजविणारा होता. आई, भाऊ, बहीण इतकेच काय प्रत्यक्ष शालिनीदेखील त्याच्या अविवाहित राहण्याच्या निश्चयाच्या आड येऊ शकली नाही. आईला तर त्याने स्वच्छ सागून टाकले, 'करीन लग्न तर शालिनीशी, नाहीतर जन्मभर अविवाहित राहीन. जगातल्या कुठल्याही स्त्रीवर मला प्रेम करता यायच नाही!' आईने खूप समजूत घातली. पण समजुतीने का अशा गोष्टी कुणाला पटतात? प्रभाकर अविवाहितच राहिला. जी खोली एफ्. वाय् ला असताना घेतली होती त्याच खोलीत आता तो एफ्. वाय्. च्या विद्यार्थ्यांना शिकवीत असताना राहत होता! प्रभाकर बदलला नाही. आपले नाजूक मन त्याने सैरभैर भटकू दिले नाही. व्यभिचार पत्करला नाही. प्रेमहीन जीवन शरीरधर्मासाठी जगण्याची हाव बाळगली नाही. रोज शंभर दोनशे मुलीत वावरूनही शालिनीवरचे प्रेम अभग राहिले, याचेच सर्वांना आश्चर्य वाटत होते. प्रभाकरचा हा त्याग खूप मोठा होता. आणि याची पूर्ण जाणीव शालिनीला होती, व म्हणूनच त्याची आठवण झाली की ती गहिवरून जात होती. गदगदून जात होती. तिचे डोळे ओलावत आणि निशिकांतबद्दल तिला तिरस्कार वाटू लागे.

जवळजवळ तासभर प्रभाकर शालिनीशी बोलत बसला होता. शालिनीने शोक आवरावा म्हणून प्रभाकर आला होता. त्याच्या चेहऱ्यावरची प्रौढपणाची झाक अधिक अधिक स्पष्ट होत चालली होती. प्रभाकर सुधारलेला होता, सुशिक्षित होता. शालिनीच्या जीवनाच्या अंगोपागाविषयी त्याने तिच्याशी चर्चा केली. तिच्या भवितव्याविषयी तो बोलला नि अगदी निःसकोचपणाने त्याने शालिनीला पुर्नविवाहाचा मार्ग सुचविला... आणि तिला स्थळ शोधून देण्याची जबाबदारीही पत्करली. शालिनीच्या नेत्रात अश्रू मावेनासे झाले. थोर मनाच्या प्रभाकरकडे पाहून ती विरघळली. होरपळलेल्या मनाने, बुडणारा जसा वाचविणाऱ्याला मिठी मारतो, तशा आवेगाने ती प्रभाकराकडे खेचली जाऊ लागली.

शालिनीच्या मामजीना प्रथम आपण काहीतरी चुकत आहोत असे उगाच वाटू लागले. पण त्यानी आपली समजूत घातली. आपल्या उर्वरित आयुष्याची मोजदाद केली व निराधार शालिनीकडे पाहिले. इतर मुलाची आणि आपल्या सुनाची आठवण येताच ते शहारले. शालिनीच्या भाऊभावजयीचा गरीबीचा संसार आठवून हळहळले. शालिनीला पुर्नविवाहाला परवानगी द्यायला काहीच हरकत नाही, हे त्याच्या लक्षात आले. त्या घराकडे त्यानी शेवटचे आणि पुन्हा पुन्हा पाहून घेतले. त्याच ब्लॉकमध्ये गेली दहा वर्षे निशिकात संसार करीत होता. प्राध्यापक प्रभाकर रिसबूड यांच्याशी लग्न केल्यानंतर शालिनीने तिथेच आपला ससार थाटावा अशी त्याची इच्छा होती. पण प्रभाकरने त्याना नकार दिला. इतकेच नव्हे तर त्या घरातले नैवेद्याचे भांडेदेखील नको, असे स्पष्टपणे त्याना आणि शालिनीलाही सागितले. प्रभाकरचा ससार नव्याने सुरू होणार

होता. कदाचित त्यांच्या निशिकांतशी शालिनीने लग्न केले नसते तर तो पूर्वीच मांडला गेला असता. पण योग तेव्हा नव्हता–आता होता. नोंदणीपद्धतीने काल प्रभाकर आणि शालिनी यांचे लग्न झाले !

शालिनी शहारली. तिने घड्याळाकडे पाहिले. पाचला पाच मिनिटे कमी होती. त्या घराची आवराआवर करून तिने सारे मामंजींच्या हातात दिले, नि महत्त्वाचे आणि आवश्यक तेवढे आपल्या बॅगेत भरून ती प्रभाकरकडे नांदायला आली. प्रभाकरने खोलीची किल्ली कालच तिच्याजवळ दिली होती. आज तिने त्याच्या खोलीत वधू–पत्नी म्हणून प्रवेश केला होता. प्रभाकर येण्यापूर्वी तिने गृहलक्ष्मीच्या निष्ठेने सारे घर आवरले.

पाच वाजले.

प्रभाकर कॉलेजातून परत आला. शालिनीने स्टोव्हवरच चहाचे आधण ठेवले. प्रभाकरने चहा घेतला. कितीतरी वर्षांनी त्याला आपल्या घरी आयता चहा करून मिळाला होता. प्रभाकरला काही तरीच वाटू लागले. त्याने चहा घेतला. पलंगावर अंथरलेली चादर पाहून त्याला प्रसन्न वाटले. शालिनीने कपबश्या विसळल्या व ती प्रभाकरशेजारी येऊन बसली.

'अजून टेबलक्लॉथ ठेवला होतास ना ?' प्रभाकर काहीच बोलला नाही. तो उठला, कपाट उघडले. त्यातून शालिनीचा फोटो काढला आणि तिच्यापुढे धरला.

—शालिनी हरळून गेली. तिला दाखविण्यासाठी म्हणून काढलेला तिचा तो फोटो तिने चोरून प्रभाकरला आणून दिला होता. प्रभाकरने अजून तो कोऱ्यासारखा जपून ठेवावा याचे तिला आश्चर्य वाटले. त्याच्या निष्ठेने ती लाजली. लवली.

'आता राजरोसपणे भिंतीवर लावायला हरकत नाही !'

शालिनीने तो फोटो घेतला व कपाटात ठेवीत ती म्हणाली– " आपण फोटो काढून आपल्या दोघांचा–तो लावू मग फ्रेम करून !'


'हं' असे म्हणून प्रभाकरने शालिनीला जवळ घेतले–तिच्या खांद्यावर आपले डोके ठेवले आणि भिंतीवरच्या चित्राकडे शून्य नजरेने पाहत तो म्हणाला, 'शालिनी असं काही होईल, अस मला स्वप्नांत देखील वाटत नव्हत ग !'


शालिनीचा ऊर भरून आला. प्रभाकरच्या उद्‌गारांनी ती हिंदकळली. तिच्या डोळ्यांतून पाणी पाझरू लागले.

'ह' शालिनीने हुंदका दिला.

प्रभाकरच्याही नेत्रकडा ओलावल्या. आज कितीतरी वर्षांनी त्यांचे मीलन होत होते. नवा संसार उभारायला म्हणून शालिनी आली आणि पहिल्याच दिवशी मायेने आणि प्रीतीने दोघांनी गंगा-यमुनांना वाट दिली.

• • •



. १ . + + + + + + + + + + + + + + +

# ‘ चिरशैशवातील कलिका ’

उषा मोहिनी

या चिरशैशवातील कलिकेने पर्लबकला चिकाटी शिकविली, मानव्याचा आदर करण्यास विनविले, स्वार्थीपणा सोडून निष्पाप अज्ञाणतेचा आदर करण्याची दृष्टी दिली……



पर्ल बक

पर्ल बक माझी आवडती लेखिका आहे. सध्या ‘द गाइड’ या बोलपटाचे काम करण्यासाठी ती भारतात दौरा करीत आहे. तिची ‘गुड अर्थ’ ही कादंबरी मला फार आवडते. तिची ‘पॅव्हिलियन ऑफ वीमेन’, ‘किन फोक्’, ‘लेटर फ्रॉम पेकिंग’, ‘द डेव्हिल नेव्हर स्लीप्स्’ ही पुस्तके मी वाचली आहेत. पण माझे मन तिच्या ‘द चाइल्ड हू नेव्हर ग्रू’ ह्या छोटयाशा पुस्तकाकडेच ओढ घेते. या पुस्तकात सौंदर्य आहे, आणि सामर्थ्यहि आहे. “पडता, रडता उचलोनि घेई कडेवरीं” हा प्रत्यय मला येतो. इतर पुस्तके वाचताना पर्ल बक ही प्रभावी लेखिका आहे, तिच्यावर सरस्वतीचा वरदहस्त आहे असे वाटते. परंतु हे पुस्तक वाचताना ती यशस्वी लेखिका तर वाटतेच पण तिच्या मातृहृदयाचे स्निग्ध दर्शन दर वाक्यागणिक व शब्दागणिक होते.

हे पुस्तक लिहिणे तिला फार जड गेले. दीर्घ-कालपर्यंत तिला मनाची तयारी करावी लागली. असे पुस्तक लिहिण्याचा विचार तिला करवत नव्हता. पण तरीहि हे पुस्तक लिहिलेच पाहिजे असे तिला वाटू लागले. योग्य वेळ आल्यावर, जितक्या सहजतेने एखादे पूर्ण पिकलेले फळ झाडावरून जमिनीवर पडते, तितक्याच सहजतेने तिच्या हातून हे ६३ पानांचे पुस्तक लिहिले गेले.

लेखिकेला अनेक पालकांकडून पत्रे येतात. त्या पालकांना पर्ल बककडून दोन प्रश्नांच्या उत्तरांची अपेक्षा असते. त्यांचे मूल पर्लबकच्या मुलीप्रमाणे नेहमी अजाण राहणारे असते. त्यांच्या मनात नेहमी एक प्रश्न येत असतो –“ असे मूल आम्हालाच का व्हावे ?” आणि मग ते लेखिकेला विचारतात ” (१) ‘या मुलाचे आम्ही काय करावे’ ? (२) ‘आम्ही हे दुःख सहन कसे करावे ?’ या दोन प्रश्नांना उत्तरे देण्यासाठी तिने हे पुस्तक लिहिले.

पहिल्या प्रश्नाचे उत्तर देणे तिला फारसे जड गेले नाही. त्यांच्या देशांत अशा मुलांना ठेवण्यासाठी व त्यांचे संगोपन व शिक्षण करण्यासाठी पुष्कळ संस्था आहेत. योग्य संस्थेची निवड करताना भव्य इमारत, नवीन नवीन उपकरणे व झगझगीत साधने ह्यांच्यावर हुरळून न जाता ज्या संस्थेत माणुसकीची व प्रमाची वागणूक असेल व जेथे मुलांवर त्यांच्या आवाक्यावाहेरचे शिक्षणाचे ओझे लादले जाणार नाही त्या संस्थेची निवड करण्याचा सल्ला लेखिकेने दिला आहे. म्हणूनच आपल्या मुलीला शाळेत ठेवताना तिने अनेक संस्था धुंडाळल्या. प्रत्येक संस्थेचे अंतर्बाह्य स्वरूप पाहण्याची तपश्चर्या तिने केली व ज्या शाळेतल्या हेडमास्तरांना सर्व मुले ‘अंकल एड्’ म्हणत असत ती शाळा तिला आवडली. खिशांमध्ये पेपरमिंटच्या गोळ्या ठेवून मुलांना त्या काढू देण्याचे स्वातंत्र्य देणाऱ्या अध्यापकाचे तिला कौतुक वाटले. “ Happiness first, everything follows ”––‘प्रथम आनंद, त्यानंतर सर्व’ हे ब्रीदवाक्य असणारी शाळा तिला आवडली. सहानुभूति, प्रेम व समज यांचे भाव, अनुभवांच्या रेषांतून चेहऱ्यावर व्यक्त होणारे शाळेचे मुख्याध्यापक तिला आदरणीय वाटतात व त्याच शाळेत आपल्या मुलीला ती ठेवते.

“ आम्ही हे दुःख सहन कसे करावे ?” या प्रश्नाला उत्तर देताना तिचे मन अंतर्मुख होते. मुलांची आवड व वात्सल्याचे भाव तिच्या हृदयात केव्हा उमटले ह्याचा विचार ती करू लागते. तिचे बालपण चीन देशात गेले होते. ती सात वर्षांची असेपर्यंत स्वार्थी व खेळातच धन्यता मानणारी होती. एकदा त्यांच्या घराजवळ राहणाऱ्या एका अमेरिकन बाईला निळ्या डोळ्यांची गोरीपान मुलगी झाली. त्या मुलीला न्हाऊमाखू घालतांना पाहण्याची लहानग्या पर्लबकला हौस वाटत असे. आंघोळ घालतांना साबण देणे, टॉवेल देणे, बाळाचे कपडे देणे, ही कामे ती मोठ्या आवडीने करी. आंघोळ झाल्यावर साबणाचा व पावडरचा सुगंध येणाऱ्या त्या छोटयाशा

मुलीला घेण्याचे सौख्य थोडा वेळ तिची आई तिला देत असे. त्या बाळाला घेतल्यावर तिला फारच आनंद होई. त्या बाळाच्या उबदार स्पर्शाची सुखद स्मृती अजूनही तिच्या मनात ताजी आहे.

पुढे काही दिवसानी पर्लबकला सख्खी बहीण झाली. तिच्या संगोपनाची जबाबदारी तिच्यावरच पडली. कारण तिची आई आजारी होती. संगोपनाचे आवडते काम करीत असताना आईच्या आजाराचाही तिला विसर पडला. संगोपनाची व मुलाची इतकी जबरदस्त आवड असणाऱ्या पर्लबकला जेव्हा तिला स्वत:ला मूल होणार हे कळले तेव्हा तिला असीम आनंद झाला. हॉस्पिटलमध्ये मार्च महिन्यात ही मुलगी जन्माला आली. उमलणाऱ्या प्लमच्या फुलांचा वास खोलीत दरवळत होता. शुद्धीत आल्यावर मुलीच्या निळ्या डोळ्याची व तिची दृष्टादृष्ट झाली. चिनी नर्सने तिला गुलाबी ब्लँकेटमध्ये गुडाळले होते. ती मुलीच्या आईला म्हणाली, "तुमची मुलगी फार सुंदर आहे. विशेष हेतु घेऊन ती जन्मली असावी असे वाटते." त्या नर्सचे हे शब्द पर्लबकला नेहमी आठवतात. त्याच्या देशात व इतर जगात सुरू झालेल्या दुर्बलमनस्क मुलांच्या शिक्षणाच्या व पुनर्वसनाच्या चळवळीत ह्या मुलीचा हातभार लागावा म्हणून तर ही मुलगी आपल्याला झाली नसेल ! पर्लबक परत अंतर्मुख होते आणि आपल्या मुलीच्या बालपणीचे अनेक प्रसंग तिला आठवतात.

वयाच्या तिसऱ्या वर्षापर्यंत इतर मुलाहून ही वेगळी आहे हे पर्ल बकला जाणवले नाही. तिचे उशिरा बोलणे हे दुर्बलमनस्कतेचे लक्षण आहे. हे तिच्या लक्षात आले नाही. काही मुले उशिरा बोलतात असे शेजारीपाजारी सांगत. एकदा "मुलाची वाढ" या विषयावर तिने व्याख्यान ऐकले. आपले मूल जरा वेगळे असावे अशी शंका तिच्या मनात आली. ती त्रस्त झाली व मुलीला पाहण्यास तिने काही डॉक्टराना बोलाविले त्यानी तिला पाहिले व अमेरिकेत जाऊन काही करता येण्यासारखे असल्यास बघावे असा सल्ला दिला.

याच्या पुढील कालखडात या डॉक्टरकडून त्या डॉक्टरकडे, या स्पेशॅलिस्टकडून त्या स्पेशॅलिस्टकडे अशी तिच्या जिवाची परवड झाली. आशेचे भाडवल मिळविण्यासाठी पैशाचे भाडवल सपत चालले. आपल्या मुलीला घेऊन ती किती डॉक्टराकडे गेली असेल ह्याला अंत नाही. मुलगी सुधारणार नाही हे सागण्याचे धैर्य एकालाही झाले नाही. शेवटी तिला एक जर्मन डॉक्टर भेटला. त्याचे खरे बोलणे वरवर जरी कटू व कठीण वाटत होते. तरी ते सत्य होते ! त्याच्या बोलण्यामुळे पर्ल बकला सत्याला तोंड देण्याचे सामर्थ्य येऊ शकले. म्हणूनच ती जन्मभर त्याची ऋणी राहील. तिच्यावर डोळे रोखून त्याने तिला बजावून सागितले, 'तुमची मुलगी इतर मुलाप्रमाणे कधीच होणार नाही. तिची नेहमी काळजी घ्यावी लागेल, तिला कधीच लिहिता-वाचता येणार नाही. तिचा समज फारतर ४–५ वर्षांच्या मुलाएवढा होईल. ते सागण्याचे कारण खऱ्या परिस्थितीला तोंड देण्यास तुम्ही शिकावे म्हणून ! तिला तुम्ही एखाद्या सस्थेत ठेवा व तुमचे वेगळे आयुष्य तुम्ही घालवा. असे न कराल तर या डॉक्टरकडून त्या डॉक्टरकडे जाण्यात तुमची शक्ती व पैसा बरबाद होईल."

पर्लबकला हे शब्द आठवतात. त्या माणसाचे नाव तिला ठाऊक नाही. पण तिच्या मनात त्याच्याबद्दल कृतज्ञता आहे. ही मुलगी चागली होईल व चारचौघीसारखी बोलेल व शिकेल असे म्हटले असते तर तिची कृतज्ञता कितीतरी पट वाढली असती ! पण जे घडणे शक्य नाही त्या खोट्या आशेने जगण्यापेक्षा तिला वास्तवपूर्ण विचार करावयास ह्याने शिकविले.

"आपल्या मुलीच्या मनाची वाढ का खुटली" हा प्रश्न पर्ल बकला सारखा भेडसा-

## आडमुठा

*'माणूस'च्या मे अंकातील सौ. स्नेहलता दसनूरकर यांनी लिहिलेली 'आडमुठा' ही कथा अनेकांना आवडली.*

*त्यांतील 'सदा' लहानपणी चारचौघांसारखा होता. पण कसल्याशा आजारातून तो उठला आणि त्याच्या मनावर परिणाम झाला. त्याची मानसिक वाढच खुंटली.*

*पण बोलून चालून ती कथा. कल्पनेने रंगवलेली. कदाचित् आला असेलहि एखादा 'सदा' लेखिकेच्या प्रत्यक्ष पाहण्यात. पण तिने त्याला दिले ते ललितरम्य कथारूप.*

*असे 'सदा' आपल्याहि पाहण्यात अनेकदा येतात. काही जन्मत:च दुर्बल असतात. काहींना नंतर विकृतीची बाधा जडते. ज्यात ते वावरतात त्या कुटुंबाबद्दल, व त्यांचे लालनपोषण करणाऱ्या आईवडिलांबद्दल आपली एकच भावना असते– 'अरेरे !, कस करीत असतील ते !'*

*पण केवळ सहानुभूति बाळगण्यापेक्षा आपण काही अधिक करण्याची आवश्यकता आहे.*

*नेमके काय ?*

*यासाठी हे पाच लेख येथे दिले आहेत. आपण वाचा आणि आपणच ठरवा.*

*या पाचहि लेखांच्या लेखिका केवळ लेखिका नाहीत. प्रत्यक्ष कार्यक्षेत्राशी त्यांचा जिव्हाळ्याचा संबंध आहे एवढी त्यांची ओळख पुरेशी आहे.*

—संपादक

वीत असे. वरवर ती चारचौघीसारखी हसत असे. स्वत:चे घर व्यवस्थित ठेवणे, पाहुण्याचा आदरसत्कार करणे, ही कामे चोखपणे करावयाची पण हे सर्व वरवरचे जीवन! मुलीला घेऊन ती जेव्हा आपल्या खोलीत जाई तेव्हाच तिचे खरे जीवन सुरू होई. तिला पाहून पर्ल बकला रडू येई आणि ती तशी रडू लागली की मुलीला हसू येई. हे हसणे पर्लला असह्य होई. मुलीबद्दल जास्त सहानुभूती वाटू लागे.

पर्ल बक म्हणते, 'दु:खाचे प्रकार दोन. हळुवार फुंकर मारून जे दु.ख नाहीसे होते ते पहिल्या प्रकारचे. पण दुसऱ्या प्रकारात काहीही केल्याने दु:ख दूर होत नाही. ते अटळ दु:ख असते. त्या दु:खाला जीवनात सामावूनच घ्यावे लागते. ब्राउनिंग म्हणतो, "नदीच्या प्रवाहात पडलेल्या दगडाला नदीला वाट करून द्यावी लागते. प्रवाहाला दगड मिळण्यासाठी तयार व्हावे लागते. तो दगड दूर फेकणे शक्य नसते."

अशा प्रकारचे दु.ख ज्यांनी भोगले आहे त्यानाच हे समजते. 'घायलकी गति घायल जाने!' दुसऱ्याना हे शब्दात सांगितलेले वर्णन समजण्याची पात्रता नसते. जीवनाच्या वरच्या पातळीचा थर भेदून अंतर्मनाची खोली मापण्याचे धैर्य त्याना होत नाही.

"आम्ही हे दु:ख सहन कसे करावे?" ह्या प्रश्नाला उत्तर देताना आपण हे कसे सहन केले ह्याचा ती विचार करू लागते. आता ती या प्रश्नाकडे त्रयस्थाच्या दृष्टिकोनातून बघू शकते. गत वर्षाच्या जखमांकडेही ती वेगळ्या भूमिकेवरून बघू शकते. हे तिला साध्य झाले ह्याचे कारण "असे का व्हावे?" या खोल प्रश्नावर डोके आपटून ठेवण्याचे तिने सोडून दिले. ज्या वेळी आत्मकेंद्रावरून ती परीघ आखीत होती त्या वेळी हे दु:ख तिला सहन होत नव्हते. परंतु मुलीला केंद्रबिंदू समजून जेव्हा तिने परीघ आखला तेव्हा हे दु:ख सहन कसे करावे हे समजू लागले. मुलीचा आनंद, तिच्या आवडी व तिच्या व्यक्तित्वाचा मान हे करण्यास ती शिकली. या चिरशैशवातील कलिकेने तिला चिकाटी शिकविली. मानव्याचा आदर करण्यास शिकविले, स्वार्थीपणा सोडून देऊन निष्पाप अजाणतेचा आदर करण्यास दृष्टी दिली.

काही वेळा आईबापाना वाटते, 'आपण जिवत असताना ही मुले मरावी. क्वचित असे आईबाप त्यांना मारूनहि टाकतात. अशा वेळी पर्ल बकचे मन तिळतिळ तुटते. या त्याच्या कृत्यात दुष्टपणापेक्षा प्रेम आहे हे ती जाणते. कारण काळजीच्या पोटी हा गुन्हा झाला आहे हे तिला दिसते. पण तो गुन्हा आहे खास! ती म्हणते, "निष्पाप व्यक्तीला मारणे हा गुन्हा आहे आणि परमेश्वराच्या सर्व मुलात हीच मुले निष्पाप असतात."

अशा मुलाचा स्वीकार करणे जसे जरूर आहे तसेच अशी मुले न होऊ देण्यासाठी व झाल्यावर त्यांना सुधारण्यासाठी सशोधनाची जरुरी आहे. मांटेसरीची शिक्षणपद्धती, बिनेची मानसिक वयाची कल्पना, न्यूजर्सीतील व्हाईनलंड सस्थेमधील सामाजिक परिपक्वतेची (social maturity) कसोटी हे शोध या निष्पाप बालकामुळे लागले आहेत. मंदगती चलच्चित्रपट (slow motion picture) पाहिल्याने ज्याप्रमाणे हालचालीचे निरीक्षण करणे सोपे जाते त्याप्रमाणे ह्या मुलांच्या वाढीकडे बघितल्याने मनाची वाढ कशी कशी होते हे समजते. ज्या पालकाना अशी बालके आहेत त्यांनी सघटित होऊन सशोधनाला प्रोत्साहन द्यावयास पाहिजे. शेकडा ५० मुलाना योग्य उपचार झाले असते तर त्याची अशी अवस्था झाली नसती. प्रयत्न करून अटळ वाटणारे दु:ख टळण्यासारखे आहे हे पालकाना कळल्यावर, जरी आपल्या मुलाच्या बाबतीत नाही तरी निदान दुसऱ्या मुलाच्या बाबतीत काहीतरी करण्यासारखे आहे अशी पालकाना आशा वाटेल. शेकडा ५० मुले शिक्षणक्षम (Educable) असून योग्य प्रकारे शिकविल्यास समाजाचे उपयुक्त घटक ते होऊ शकतील हे कळल्यावर त्याना स्फूर्ती येईल.

उदात्त भावनेने प्रेरित होऊन सत्य स्वरूपात पर्ल बकने जे घडले ते सांगितले व अनेक पालकाना दिलासा देऊन मार्गदर्शन केले. या पुस्तकाबद्दल तिने 'रायल्टी' घेतली नाही व या पुस्तकाचा जो नफा होईल तो प्रकाशकानीही न स्वीकारता न्यूजर्सीमधील व्हाईनलॅंड संस्थेला देण्याचे ठरविले आहे.

* * *

• २ •

# आमची हाक

**उमाबाई फडणीस**

नेहमी सुपुत्रांना जन्म देण्याचे भाग्य प्रत्येक मातेला लाभतेच असे नाही. काही माताना कमी बुद्धीच्या मुलाना जन्म देण्याचे व त्याचे सगोपन करण्याचे अवघड काम करावे लागते. हे काम अतिशय अवघड असते. याचे कारण आजपर्यंत मातांनी आपल्या अशा मुलाना समाजाच्या आड लपविण्याचा सदोदित प्रयत्न केला आहे. अशा मुलाची मी आई आहे असे सांगण्याचे धैर्य फारच थोड्या मातांना असते. बहुतेक मातांनी दुर्बलमनस्क मुलांना समारंभांना वगैरे नेण्याचे टाळून त्यांना समाजाच्या नजरेआड करण्याचा प्रयत्न केला आहे.

परंतु मातांच्या ह्या वृत्तीला समाजहि काही अशी जबाबदार आहे. असमंजस व अनुदारपणे वागवण्याची वृत्ती जणूकाय समाजात मुरली आहे. ही मुले म्हणजे पूर्वजन्मीचे पाप किंवा "आपल्या कर्माची मूर्तिमत फळे" असे समाजाने त्याच्याकडे आजपर्यंत पाहिले आहे. शास्त्रीय दृष्टी, सर्वांच्याकडे माणुसकीने पाहण्याची वृत्ती, व सर्वांना मानाने जगण्याचा हक्क या तीन गोष्टी लोकशाही राष्ट्र म्हणवून घेणाऱ्या देशाने मान्य केल्याशिवाय, कृतीत आणल्याशिवाय अशा मद बुद्धीच्या बालकाचे व त्याच्या माताचे भवितव्य उज्ज्वल ठरणार नाही.

माझ्या मनात ह्या बालकाच्या भविष्याबद्दल व त्याच्या माताबद्दल इतकी कळकळ निर्माण होण्याचे कारण मला स्वत:लाच अशी मुलगी आहे. अशा मुलांच्याकरिता आपल्या गावात शाळा क्वचितच असतात. सुदैवाने

वात्सल्याचे मूर्तिमंत प्रतीक म्हणून आपला समाज सवत्स धेनूचे पूजन करतो. पण वेगळ्या प्रकारच्या मुलाचे प्रेमाने संगोपन करणाऱ्या मातेचे समाजाने कौतुक केले आहे का ?

सीतावर्डी नागपूर येथे 'नदनवन' ही शाळा आहे. ह्या शाळेत मुलीला मीनाला घेऊन जात असताना मला कित्येकदा खालील शब्द ऐकावे लागतात–' ती पाहा वेडी मुलगी आणि तिची ती आई' माझ्या मुलीच्या मेंदूवर लहानपणी कठीण आजाराने परिणाम होऊन तिची वाढ होण्यास अडथळा निर्माण झाला. ती बरीच उशिरा बोलायला–चालायला लागली पण म्हणून ती पागल ठरणार नाही. मंदबुद्धीची मुले वेडी नसतात. वात्सल्याचे मूर्तिमत उदाहरण म्हणून सवत्स धेनूचे आपला समाज कौतुक करतो पण वेगळ्या प्रकारच्या मुलाचे प्रेमाने सगोपन करणाऱ्या मातेचे समाजाने कौतुक का करू नये ?

सरलाबाईंचे उदाहरण घेऊ ! सुदर मुलाची सुखस्वप्ने त्याना पडत होती. गरोदरपणी काही आजार नव्हता, सासरी व माहेरी सुबत्ता होती, पतीपत्नीहि निर्व्यंग व सुशिक्षित होती, सासरची व माहेरची मडळी सुदृढ होती, प्रसूती चागली झाली पण १–२ आठवड्यातच एका निष्णात डॉक्टरने त्यांना सांगितले की, तुमचा मुलगा मंद बुद्धीचा होईल. इतक्या कमी बुद्धीच्या मुलाला " मगोल " म्हणतात.

सरलाबाई सागत होत्या, " ज्या दिवशी डॉक्टरानी आमच मूल दुर्बलमनस्क होईल अस सागितल त्या दिवशी आमच्या दोघाच्या मनाची काय स्थिती झाली हे वर्णन करू शकत नाही. ह्या प्रसगान आम्ही पतिपत्नी अधिक जवळ आलो. अस मूल जन्मास आल्यान आमच्या ससारात चिंतेची व दुःखाची छाया पसरली. अस असूनही लहानग्या अरविंदान थोडासा समंजसपणा दाखवला. टाळ्या वाजवल्या, हसला, तरी वासल्यान आमची मन भरून जातात." अशा प्रेमळ सरलाबाईने व त्याच्या पतीने शेजाऱ्यापाजाऱ्याकडून व समाजाकडून सहानुभूतीची अपेक्षा केली तर त्यात काय वावगे आहे ? आपला मुलगा नाव काढील, मोठ्ठा होईल ही अपेक्षा भंग पावल्यानतर समाजानेही त्याला वेडा ठरवून त्यापासून दूर राहण्याचा प्रयत्न केल्यास कोणत्या मातेचे हृदय पिळवटून निघणार नाही ?

कालिंदीबाईंचे उदाहरण बघा. त्या कॉलेजात शिक्षिका आहेत. मदबुद्धी मुलाचे शिक्षण व सगोपन कसे करावे ह्याचा त्यानी सखोल अभ्यास केला आहे. बाहेरचे चार लोक घरी आले की 'रवीची' त्या सर्वांशी ओळख करून देतात. रवीबद्दल रवी समोर नसताना त्या पाव्हण्याना म्हणतात,' हे बघा- माझ्या मुलाला थोड कमी समजत. तो दुर्बलमनस्क आहे. त्याला तुम्ही शेकहँड केलात तर तो आनद प्रगट करील. त्याला हसू नका अ.'

कालिंदीबाई आपल्या मुलाबद्दल इतक्या कळकळीने बोलतात; ह्याचे कारण हेच की, रवीला चारचौघात कसे वागावे हे कळावे. त्या प्रेमळ मातेची इतकी चागली इच्छा आहे तर पाव्हणे व इतरानी थोडा समजूतदारपणा दाखवून त्याच्याशी २४ तास किंवा दिवस चागली वागणूक दाखवायला काय हरकत आहे ?

अशा मुलाच्या मातांना नातलग व शेजारी हळदीकुंकू व इतर समारभाना बोलवताना 'तुम्ही जरूर या. पण मुलीला लोक हसतील तेव्हा न आणलेलीच बरी !' असे सुचवतात. मुलाना नेण्यास त्याच्या माता तयार असल्यावर यजमानीणबाईंना कसले संकट ! तसेच जेवायला बोलावताना अशा मुलाना वगळूनच आमंत्रण देण्यात येते. इतकेच नाहीतर ते मूल बिचारे एकटेच राहिले असेल ह्या जाणिवेने त्याना खाऊ देण्याचे सौजन्यही दाखविले जात नाही. अशा मुलाला आई खाऊ देत नाही असा ह्याचा अर्थ नाही. पण अशा मुलाला वगळण्याचा कटाक्ष जी मंडळी दाखवतात त्याचा खेद होतो.

प्रत्येक दुर्बलमनस्क मुलाची प्रकृति वेगळी असते. ते काय करू शकतील ह्याचा अदाज पुष्कळ अवलोकनानतर करता येतो. मीनाला नदनवन शाळेत घातल्यानतर फायदा होत आहे. ती लिहिणे–वाचणे शिकत आहे, हस्तव्यवसायाची तिला आवड आहे, गायनात गोडी आहे, पुढील आयुष्यात स्वत:ची काळजी घेऊन ती थोडीफार मिळवती होईल अशी अशा आहे. ह्याउलट सरलाबाईंचा अरविंद जरी थोडेफार शिकला तरी त्याची जन्मभर काळजी घ्यावी लागेल. देखरेखीशिवाय तो काही करू शकणार नाही. कालिंदीबाईंचा रवी नेमलेले काम करू शकतो. अशा तिघाच्या तीन तऱ्हा आहेत. अशा मुलाच्या माताची हाक एकच आहे की, कुटुबातल्या व समाजातल्या लोकानी अधिकाधिक सौजन्याने व आपुलकीने वागावे. ह्या माताच्या मन:स्थितीचे चित्र कोणताहि चित्रकार रंगवू शकणार नाही. पण चित्र कलेपेक्षाही प्रभावी शक्ती मानवी हृदयात आहे. सौजन्य, सहानुभूती, व प्रेमळ वागणूक हीच ती शक्ती. रस्त्यावर बसमध्ये व इतरत्र सौजन्य प्रत्ययाला आले तर अशा मुलाचे जीवन पुष्कळच सुसह्य होईल. ह्या मुलाचे संगोपन करण्याचा गोवर्धन पर्वत एकट्या मातेलाच उचलावा लागत आहे. क्वचित प्रसंगी दुःखाने खचून जात असता त्या भाराला सर्वांचे हातभार लागले तर हाही पर्वत गोवर्धन पर्वतासारखा लीलेने उचलता येईल. मात्र आजची परिस्थिती वेगळी आहे. आम्ही दुर्बलमनस्क मुलाच्या माता आहोत. आम्हाला आमच्यानंतर आमच्या मुलाचे काय होईल ह्याची अतिशय काळजी वाटते. पण हे स्पष्टपणे सागण्यास आशा माता धजत नाहीत.

मी असे उघडपणे कबूल करते की, माझ्या मुलीची माझ्यानतर काय स्थिती होईल ह्याची मला फार काळजी वाटते. तुम्ही मुलीची काही काळजी करू नका, असे खात्रीपूर्वक आश्वासन मरणापूर्वी कोणी दिले नाही तर 'माझी चिता धगधगत असतानादेखील मला मुलीची काळजी वाटेल.'

* * *

• ३ • + + + + + + + + + + +

# दुर्बलमनस्क मुलासाठी

- इंदिरा परांजपे

## आपण काय करू शकतो ?

दुर्बलमनस्कांपैकी बरेच एखादा व्यवसाय शिकून, एखादा धंदा करून समाजाचे एक उपयुक्त घटक बनू शकतात तेव्हा शासनाने व समाजाने सर्वांगीण विचार करून त्यांच्या शिक्षणाबाबत निश्चित धोरण ठरविणे जरूर आहे.

+ + + + + + + + + + + + + +

दुर्बलमनस्क मुलाची शिक्षणक्षमता, बुद्धि-गुण्य, कल, शरीरप्रकृती इत्यादी गोष्टी विचारांत घेऊन त्यांना काय व कसे शिकवावे याचा विचार केलेला असतो; विशिष्ट पद्धतीने त्याना शिक्षण द्यावे लागते.

सामान्य जनाना, दुर्बलमनस्क मुले, त्याचे प्रकार, त्याची वैशिष्टये या गोष्टी अपरिचित असतात म्हणून या लेखाची पार्श्वभूमी म्हणून ही माहिती थोड्या प्रमाणात देणे जरूर आहे.

### दुर्बलमनस्क कोणाला म्हणावे ?

वयाच्या १८ वर्षांपर्यंत आनुवशिकतेमुळे, रोगामुळे किंवा मेंदूला झालेल्या दुखापतीमुळे ज्याच्या मेंदूची वाढ खुटलेली असते किंवा अपूर्ण राहिलेली असते, अशांना दुर्बलमनस्क म्हणतात.

व्यावहारिक दृष्ट्या विचार केला असताना—

(१) सामान्य शाळांत शिक्षण घेण्याला यांची वुद्धी कमी पडते.

(२) परिस्थितीप्रमाणे स्वत मध्ये वदल करून, समाजाशी जुळवून घेणे यांना जमत नाही.

(३) स्वतःच्या उदरनिर्वाहासाठी पुरेसे मिळवू शकत नाहीत.

(४) स्वतंत्रपणे आपले जीवन जगू शकत नाहीत.

दुर्वलमनस्क मुलाचे वर्गीकरण दोन प्रकारांनी केले जाते.

(१) दुर्बलमनस्कतेचे संभाव्य कारण विचारात घेऊन केलेले वर्गीकरण हा पहिला प्रकार.

आनुवशिकता, भोवतालची परिस्थिती, मेंदूला दुखापत व गरोदरपणी आईला किंवा पुढे मुलाला झालेला जतुदोष यांपैकी एक किंवा अनेक कारणे असू शकतात.

(२) दुसऱ्या प्रकारचे वर्गीकरण मुलातील दुर्वलमनस्कतेचे प्रमाण लक्षात घेऊन केलेले असते. या मुलाचे संगोपन, पालन, पोषण, शिक्षण व सरक्षण करण्याच्या दृष्टीने हे वर्गीकरण जास्त उपयुक्त आहे या व्यापक वर्गीकरणात त्याचे तीन प्रकार केलेले आहेत.

(१) मूढमती Idiot

(२) अल्पमती Imbecile

(३) मंदमती :— feeble minded.

ह्या प्रत्येक प्रकाराचे कनिष्ठ, मध्यम व उच्च असे उपप्रकार केले आहेत.

(१) **मूढमती :**— ह्याच्यात बुद्धीचा मागमूसही आढळणे कठीण. दैनंदिन जीवनातील साधे व्यवहारही ते आपले आपण करू शकत नाहीत. जन्मभर ह्याचा तान्ह्या मुलाप्रमाण साभाळ करावा लागतो. चव, वास, रंग असे काहीही त्याना कळत नाही. याना कोणतेही शिक्षण देणे अशक्य असते.

(२) **अल्पमती :**— हे मूढाच्यापेक्षा पुष्कळ बरे असतात. आपले सर्व व्यवहार करू शकतात. ज्या कामाला बुद्धी लागत नाही व एकाच प्रकारची कृती एकसारखी केली जाते अशी कामे ते करू शकतात. मात्र देखरेख करावीच लागते. शालेय शिक्षण घेऊ शकत नाहीत.

(३) **मंदमती :**— दुर्वलमनस्क मुलातील सर्वात वरचा वर्ग. आपले सर्व ते करू शकतात, समाजात पुष्कळसे जुळवून घेतात. शालेय शिक्षण घेऊ शकत नाहीत; परतु अगदी प्राथमिक स्वरूपाचे गणित, हिशेब, लेखन, वाचन इत्यादी याना शक्य होते. घरात वरीच कामे करू शकतात. एखादा व्यवसाय शिकण्याची पात्रता त्याच्यात असते. तरीपण याच्यात तारतम्य कमी असून व स्वतंत्रपणे जीवन जगण्याचे सामर्थ्य नसते. ह्याच्यापैकी काही अत्यत शात, आज्ञाधारक, नम्र व सहज वळण लावण्यायोग्य असतात. तर काही अगदी उलट असतात.

आणखी एक प्रकार आढळतो. त्याच्यात दुर्वलमनस्कता असून शिवाय समाजविघातक असे दोष, उदा. चोरी करणे, खोटे बोलणे इत्यादी दोष असतात. त्याच्यात सुधारणा होणे अशक्यप्राय असते. अशाना (Morally defective) दुर्मती म्हणता येईल. याना इतर दुर्वलमनस्क मुलांतूनवेगळेच ठेवावे लागते.

## समाज काय करू शकतो

ह्या दुर्बलमनस्क मुलाचा एक व्यक्ती, एक मानव या दृष्टीने समाजाने स्वीकार व सांभाळ करणे अत्यंत जरूर आहे. शिवाय त्यांना मोकळे ठेवल्यास ते समाजात उपद्व्याप करतील. तेव्हा त्यांना एखाद्या कामात गुतवून ठेवणे जरूर आहे. दुर्बल मनस्कांपैकी बरेच, एखादा व्यवसाय शिकून, एखादा धंदा करून समाजाचे एक उपयुक्त घटक बनू शकतात तेव्हा शासनाने व समाजास सर्वांगीण विचार करून त्याच्या शिक्षणाबाबत निश्चित धोरण ठरविणे जरूर आहे.

## शिक्षणातील उद्देश

दुर्बलमनस्क मुलासाठी शिक्षण देण्याच्या संस्था असतील त्याच्यापुढे मुख्य तीन उद्देश असणे जरूर आहे.

(१) त्यांच्यातील उपजत शक्ती, आपण देणार त्या शिक्षणाने वर्धमान झाल्या पाहिजेत.

(२) त्याच्यातील समाजविरोधी दोष सुधारले पाहिजेत किंवा कमी होत गेले पाहिजेत.

(३) एखादा उपयुक्त व्यवसाय, उद्योग अवगत करून घेणे त्याला शक्य झाले पाहिजे.

दुर्बलमनस्क मुलासाठीच असलेल्या विशिष्ट शाळेत सर्व प्रकारची मुलांच्या शिक्षणाची सोय त्याच्या जरुरीप्रमाणे केली जाणे जरूर असते.

दुर्बलमनस्क मुलांना दैनंदिन जीवनातील साधे व्यवहार, इंद्रिय व स्नायु – शिक्षण, रोजच्या उपयोगातील वस्तूची ओळख, स्वतःचे नाव, पूर्ण पत्ता, इत्यादी शिकविले जाते. तसेच अल्पमती दुर्बलमनस्क मुलाना, झाडलोट, सामानाची पूसपास, बगीच्यातील व घरातील कामे, कारखाने वसतिगृहे व कचेऱ्या या ठिकाणी गड्याची कामे करणे, निरोप व चिठ्ठ्या पोहोचविणे इत्यादी कामे शाळेत पद्धतशीर नीटपणे शिकवून तयार करणे शक्य आहे.

मंदमती दुर्बलमनस्क समाजात जास्त चागल्या रीतीने मिसळू शकतात. शिवाय आपले दैनंदिन जीवनातील पुष्कळसे व्यवहार ते स्वतंत्रपणे करू शकतात. त्याबाबत त्याना थोडे मार्गदर्शन शाळेने करणे जरूर असते. शिवाय शाळांतून मुलांना सुतारकाम, हात माग, वेतकाम, घरातील व बगीच्यातील काम, फाइल्स बनविणे, प्लास्टिक–केनच्या पिशव्या बनविणे ही कामे शिकविली जातीलच. ही मुले काही ठराविक वयानंतर भाजी व इतर सामानाचे दुकान चालविणे, दूध केंद्रात काम करणे, कचेरीत निरोप्याचे काम करणे, इत्यादि कामे करून स्वतःच्या उदरनिर्वाहापुरते मिळवू शकतील.

मदमती दुर्बलमनस्क मुलीहि अनेक उद्योग शिकू शकतात. उदा. शिवण, लोकरीचे विणकाम, भरतकाम, बुरुडाचे काम, घरकाम इत्यादी. याशिवाय गायन, कागदाची फुले करणे, गालीचे विणणे असे अनेक उद्योग त्या करू शकतील.

वरील प्रकारचे अनेक उद्योग ही मुले करू शकतील म्हटले तरी त्याना स्वतत्रपणे हे सर्व जमत नाही. त्याच्यावर देखरेख करण्याची अत्यंत जरुरी असते.

## काही वैशिष्टये

(१) प्रत्येक दुर्बलमनस्क मुलाच्या बुद्धीच्या मर्यादा लक्षात घेऊनच त्याला काय शिकवावे, हे ठरविणे.

(२) सर्व शिक्षण, प्रत्यक्ष वस्तु दाखवून दिले गेले पाहिजे. काही वस्तु वर्गात आणून, काही त्याना बाजारात नेऊन, निसर्गाच्या सान्निध्यात नेऊन किंवा चित्राचे तक्ते, चित्रपट अशा अनेक साधनांचा उपयोग करून शिक्षण दिले जाते.

(३) वर्गात पूर्ण स्वातंत्र्य असले तरी शिस्तीचे पालन जरूर असते.

(४) ज्ञानेंद्रिय शिक्षणाद्वारे चव, वास, इत्यादी शिकविले जाते.

(५) विषय क्रमाक्रमाने प्रगत होत जातो.

(६) एखादा व्यवहार शिकविण्यावर जास्त भर दिला जातो.

(७) शिक्षणाचा काही भाग व्यक्तिगत व काही गटात शिकविला जातो.

(८) प्रगती हळूहळू होणार हे ध्यानात, ठेवून शिक्षण जेवढे साधेल त्यात समाधान मानून शिक्षकाने आपले कार्य करीत राहावे.

## दृश्य फल काय ?

दुर्बलमनस्क मूल आपल्या भावडात, घराभोवतालच्या मुलात, सामान्य शाळात व समाजात मोकळेपणाने मिसळू शकत नाहीत. त्यांच्याच सारखी दुर्बलमनस्क मुले असलेल्या शाळेत ही मुले एकदम एकरूप होतात. त्याना या शाळेत इंद्रिये व स्नायु यांना स्फूर्ति देणारी साधने, खेळ, गाणी, मोकळे व आनदी वातावरण अशा अनेक गोष्टी व त्याशिवाय त्याना प्रेमाने, सहानुभूतीने, समजूत घेऊन वागविणारे व शिकविणारे शिक्षक असल्यामुळे त्याच्यावर फार लौकर चागला परिणाम झालेला दिसतो. अर्थात् येथे प्रगतीला मर्यादा असतेच.

शाळेत जाऊ लागल्यापासून या मुलाच्या वृत्तीत, वागण्यात, आचारात फार फरक पडल्याचा अनुभव कित्येक पालक स्पष्टपणे सांगतात.

व्यक्तिमत्त्वाची जाणीव होते. आपण आपल्या हातांनी काहीतरी करून आनंद मिळवावा, दुसऱ्याकडून शाबासकी मिळवावी अशी त्याना इच्छा होते.

एखादा व्यवसाय करण्याची पात्रता अंगात आल्याने आत्मविश्वास वाढतो. जीवनात फार महत्त्वाचा आशेचा किरण दिसू लागतो.

## पुढे काय ?

एका ठराविक वयानंतर 'पुढे काय ?' हा प्रश्न उत्पन्न होणे अपरिहार्य आहे.

शाळेत एखादा दुसरा व्यवसाय शिकून घेणे ज्याना शक्य होते, अशांना समाजात स्थान प्राप्त झाले पाहिजे. या मुलाना त्यांच्या पात्रतेप्रमाणे घरात, कचेरीत, दुकानात, कारखान्यात किंवा व्यवसायकेंद्रात नोकऱ्या दिल्या गेल्या पाहिजेत व त्यानाही, आपण स्वतंत्र जीवन जगू शकतो, आपण समाजाचा एक महत्त्वाचा घटक आहोत, याची जाणीव होऊन जीवनात व्यक्तिमत्त्वाचा आनद उपभोगता आला पाहिजे. ह्यासाठी समाजाची तयारी होणे अत्यंत जरूर आहे. त्यांना कामाला ठेवून, सामाळून घेऊन, सहानुभूतीने वागवून निदान निर्वाहवेतन देऊन त्यांचे जीवन सार्थकी लावण्याची वृत्ती समाजात उत्पन्न होऊन वाढत गेली पाहिजे.

## शिक्षणाची योजना

भारतात अलीकडे दुर्बलमनस्क मुलाच्या प्रश्नाकडे शासनाचे तसेच समाजाचे लक्ष गेले आहे. अशाही परिस्थितीत गावोगावी त्यांच्यासाठी शाळा निघणे नजीकच्या भवितव्यात तरी शक्य दिसत नाही. तरी पण

(१) मोठ्या शहरांच्या निरनिराळ्या विभागात एखाद्या सामान्य शाळेत एकदोन वर्ग यांच्यासाठी काढणे शक्य आहे. दुर्बलमनस्क मुलाना शिक्षण देण्याच्या पद्धतीचे प्रशिक्षण घेतलेला एखादा

दुसरा शिक्षक व त्याला जरूर तेवढी साधने पुरविली तर हे दुर्बलमनस्क मुलांच्या शिक्षणाचे काम अत्यंत कमी खर्चात होईल. मुंबईला सिवरी येथील श्रीमती जय वकील याच्या शाळेत शिक्षकासाठी प्रशिक्षण-केंद्र आहे. पंजाबातं चंदीगड येथेही शासकीय प्रशिक्षणकेंद्र आहे.

(२) लहान गावात किंवा खेड्यात असणाऱ्या मुलासाठी, त्या परिसरातील एखाद्या गावी दुर्बलमनस्क मुलांसाठी वसतिगृह काढून त्यांच्या शिक्षणाची सोय केली गेली पाहिजे. या वसतिगृहासाठी एखाद्या उदार धनिकाची किंवा शासनाची मदत घेणे जरूर पडेल.

(३) मोठ्या शहरात या मुलांसाठी वेगळ्या स्वतंत्र मोठ्या शाळा असाव्यात. त्या ठिकाणी शक्य तर काही मुलासाठी वसतिगृह व काही घरून येणारी मुले असावीत. अशा मोठ्या शहरातील स्वतंत्र शाळांत अनेक तज्ञ मंडळींची मदत मिळू शकेल, संशोधनकेंद्र तसेच प्रशिक्षणकेंद्रही चालविता येईल, निरनिराळे प्रयोग करून पाहता येतील, असे अनेक फायदे होतील.

**पालकांना मार्गदर्शन**

दुर्बलमनस्क मुलांच्या पालकांना पुष्कळ वेळा काय करावे ते लक्षात येत नाही. त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी तसेच ह्या मुलांकडून किती प्रमाणात अपेक्षा ठेवाव्यात, त्याना घरी कशा प्रकारे शिक्षण द्यावे, त्यांना कसे वळण लावावे. इत्यादी गोष्टी तज्ज्ञाकडून सांगितल्या जाण्यासाठी अशा तऱ्हेची केंद्रे शाळातून असणे जरूर आहे.

दुर्बलमनस्क मुलांचा सांभाळ करणे फार कठीण काम आहे. त्यातून मूढमती व कनिष्ठ अल्पमती या मुलाचा सांभाळ करणे तर किती कठीण आहे हे त्याचे आईवडीलच जाणू शकतील. त्याना रात्रंदिवस घोर असतो, की आपण आहोत तोपर्यंत ठीक आहे. पण आपल्यानंतर यांचे कसे होणार? भावडे कितीही समंजस व कर्तव्यदक्ष असली तरी हल्लीच्या परिस्थितीत त्यानाही आपल्या अशा दुर्बलमनस्क भावडाचा सांभाळ करणे कठीण होते. तेव्हा अशा कठीण घरातील दुर्बलमनस्क मुलाना वसतिगृहात आजीव सांभाळण्याची व्यवस्था होणे फार जरूर आहे.

मदवुद्धीची मुले कुटुंबात राहून आपल जीवन निभावून नेऊ शकतात. कुटुंबियांनाही त्यांना सांभाळणे तितकेसे जड जात नाही. ही मुले घरात बरीच कामे करू शकतात. आपल्या उदरनिर्वाहासाठी थोडेफार मिळवू शकतात. समाजात कसे वागावे हेही त्याना समजते. त्यामुळे समाजाचा एक घटक म्हणून ती समाजात सामावून घेतली जाणे शक्य असते.

इंग्लंड-अमेरिकेत दुर्बलमनस्क मुलाच्या संगोपनाची, शिक्षणाची, व्यवसायाची, वसतिगृहात आजन्म वास्तव्याची, अशा अनेक प्रकारच्या सोयी शासनाने व इतर संस्थांनी केलेल्या आहेत. आपल्या भारतात ह्या क्षेत्रात नुकतेच काम सुरू झालेले आहे. श्रीमती वकील याचीच संस्था फक्त बरीच जुनी आहे. नागपुरात तीन वर्षांपूर्वी नंदनवन ही दुर्बलमनस्क मुलांसाठी शाळा निघाली आहे. भविष्य काळात आपल्या इकडील गरजांच्या प्रमाणात दुर्बलमनस्क मुलासाठी शिक्षण केंद्रे, व्यवसाय-केंद्रे, वसतिगृहे, शिक्षकासाठी प्रशिक्षण केंद्रे, इत्यादी अनेक प्रकारे योजना आखल्या जातील व दुर्बलमनस्क मुलाचे जीवन आनंदी, सुसह्य व सफल होण्यासाठी प्रयत्न केले जातील व ते यशस्वी होतील अशी आशा करावयाला हरकत नाही, असे वाटते.

* * *

•४• + + + + + + + + + + +

# मॉन्टेसोरी शिक्षणपद्धती व दुर्बल-मनस्क मुले

सौ. कमल राजदेरकर

दुर्बलमनस्क बालकांना वाढविणे म्हणजे नाजूक रोपट्याची निगा राखण्याइतके कठीण आहे. हे काम मॉन्टेसोरीबाईंनी पुढाकार घेऊन व श्रद्धेने करून दाखविले.

मॉन्टेसोरी शिक्षण पद्धतीचा उपयोग सामान्यतः तीन ते सहा वर्षे वयाच्या बालकाकरिता जगभर केला जातो.

डॉ. मारिया मॉन्टेसोरी ह्यांचा जन्म इटाली देशातील चिराव्हली ह्या गावी इ. स. १८७० मध्ये झाला. त्या वेळी इटालीत स्त्रीशिक्षणाकडे फारसा भर देत नसत, मग उच्च शिक्षण तर दूरच. अशाही परिस्थितीला तोंड देऊन मॉन्टेसोरीबाईंनी रोम विश्वविद्यालयातून उच्च वैद्यकीय शिक्षण पुरे केले व इ. स. १८९६ मध्ये डॉक्टरीची पदवी मिळविली. इटाली देशात उच्च शिक्षण घेणारी ही पहिली स्त्री म्हणून त्याचा गौरव केला गेला. पुढे सार्वजनिक रुग्णालयात त्यांची नेमणूक झाली.

त्या रुग्णालयात दुर्बलमनस्क बालकेही होती. त्या बालकावर उपचार करण्यासाठी बाईंची नेमणूक झाली. वैद्यकीय उपाययोजनेपेक्षा शैक्षणिक मार्गदर्शनाने ह्या मुलाची प्रगती अधिक होते असे त्याना आढळले. त्यानी शोधून काढलेल्या साधनाचा व शिक्षण-पद्धतीचा दुर्बलमनस्क मुलाना शिकवण्यास अतिशय उपयोग झाला.

बाईंनी प्रथम दुर्बलमनस्क बालकावर प्रयोग केला व त्याना शिक्षणाची तत्त्वे सापडली. मॉन्टेसोरी पद्धतीचा उपयोग करून अनेक बालकाना आज भारतात शिकवले जात आहे. परन्तु दुर्बलमनस्क बालकांना ह्या शिक्षण तत्त्वाचा कितीसा उपयोग होतो ह्याचा विचार करणे जरूर आहे.

दुर्बलमनस्क बालके ३ ते ५ टक्के असतात. सर्वसामान्य शाळामध्ये अशा बालकाची कुचवणा होते. वर्गात त्याना ' ढ ', ' मठ्ठ ', ' विनडोक्याचा ' म्हणून हिणवतात. वर्गबधू त्याना आपल्या खेळात खेळावयास घेण्यास कुरकूर करतात. अशी मुले एका वर्गात दोन-तीन वर्षे नापास होतात. त्यामुळे वर्गशिक्षक त्याना सहानुभूतीने वागवीत नाहीत.

आईवडिलाना अशा मुलाबद्दल निराशा वाटते. तो पास होत नाही, कारण त्याला अभ्यास करावयास नको, टिवल्याबावल्या करावयास पाहिजेत, असे ते बोलत असतात. आपल्या इतर मुलाच्या मानाने हाच मुलगा असा का मागे राहतो, हे त्याना कळत नाही. सहसा मुलालाच ह्याचे दूषण दिले जाते.

काही वेळा मुले शाळेत घालण्याच्या पात्रतेची नसतात. त्याना स्वतःची बटणे लावता येत नाहीत. आपले विचार व्यक्त करता येत नाहीत, दुसऱ्याची भाषा समजत नाही. घरापासून शाळेपर्यंत व शाळेपासून घरापर्यंत ती ये जा करू शकत नाहीत.

रंगाची ओळख, परोचा व अक्षरे ओळखणे त्याना कितीही शिकविले तरी जमत नाही. त्याच्या चालण्यात व पळण्यात इतकी सफाई नसते. अगदी लहानपणी मुलांची लाळ गळते. पण ह्या मुलाची लाळ काही वेळा सहा-सात वर्षांचे झाल्यावरही गळते. अशा मुलाना शाळेत पाठवता येत नाही व घरी ठेवल्यास त्याची शिकवणी घेण्यास सर्वसाधारण शिक्षक नाकबूल असतात.

भारतीय घटनेनुसार सर्व बालकाना शिक्षण घेण्याचा व आपली जास्तीत जास्त प्रगती करून घेण्याचा अधिकार आहे. कमी बुद्धी असणे हा काही ह्या बालकाचा किंवा त्याच्या आई-बापाचा दोष नसतो. शिक्षणासबधी ज्या निरनिराळ्या परिषदा व परिसंवाद होतात त्यात दुर्बलमनस्क मुलाच्या शिक्षणाचा मुळीच विचार होत नाही. शिक्षणाचे माध्यम कोणते असावे, विद्यार्थ्यांना किती भाषा शिकवाव्या, हे प्रश्न महत्त्वाचे आहेत. दुर्बलमनस्क मुलाच्या शिक्षणाची बाब दुर्लक्ष करण्याइतकी क्षुल्लक नाही. वर सागितल्याप्रमाणे अशी मुले तीन ते पाच टक्के आहेत व हा आकडा नजरेआड करण्यासारखा नाही. हा प्रश्न, शिक्षणतज्ज्ञानी, पालकानी, जनतेने व सरकारने योग्य वेळी हाताळला नाही तर तो आपल्या आटोक्याबाहेर जाण्याचा संभव आहे.

फ्रान्समध्ये १८९६ साली मॉन्टेसोरी बाईंनी हा प्रश्न हाताळला. ' दुर्बलमनस्क मुले ही इतर बालकाप्रमाणे प्रथम ' बोलके ' आहेत हे विसरता कामा नये ' असे त्या म्हणत. त्यानाही चौकसबुद्धी असते. खेळण्याची हौस असते, मोठ्यांना मदत करण्याची इच्छा असते, त्याचे कौतुक केल्यास त्याना आनद होतो.

मॉन्टेसोरीच्या मते ह्या बालकात उपजत कोणताच अवगुण नसतो. उलट जन्मतःच अनेक गुण बालकात बीजरूपाने असतात व योग्य सधी मिळताच ते दृग्गोचर होऊ लागतात. आवडता खेळ किंवा कृति करण्याची संधी मिळताच त्याची चिकाटी, एकाग्रता, महत्त्वाकाक्षा इत्यादी गुण आपोआपच दिसू लागतात.

त्याचे गुण प्रकट होण्यास व गुणाची वाढ होण्यास, बाईंच्या मते, स्वातंत्र्य व स्वयंशिक्षण ह्याची अत्यंत जरूर आहे. दुर्बलमनस्क मुलाना सर्व जग अतिशय गुतागुतीचे वाटते. आपणास साधे वाटणारे काम त्याना अवघड वाटते. कशाचा परिणाम काय होईल ह्याचा अंदाज त्यांना घेता येत नाही. ह्यासाठी ह्या बालकांना किती व कसे स्वातंत्र्य देता येईल व त्यांचे स्वयशिक्षण कसे साध्य करता येईल ह्याचा विचार केला पाहिजे.

थोडे थोडे व तेच तेच बालकाला चिकाटीने शिकविल्यास फायदा होतो. इद्रिय व स्नायु-शिक्षणाचे महत्त्व त्या बालकाच्या विकासामध्ये फार मोठे आहे.

दट्टापेटचा, रगीत चकत्या, भूमितीच्या आकृती, स्पर्श-पेटचा, आवाज-डब्या, वास-डब्या, स्वाद-साहित्य, भाषा व गणित शिकविण्याचे साहित्य ह्या सर्वांचा उपयोग होण्यासारखा आहे. ह्या साधनाचा उपयोग करताना किंवा वर्गात त्याना चागल्या सवयीचे शिक्षण देताना, स्वावलंबन शिकविताना किंवा खेळाची दीक्षा देताना शिक्षकाने अत्यत प्रेमाने व चिकाटीने शिकविणे जरूर आहे.

बालकाना शिकविणे व त्याच्या व्यक्तित्वाचा विकास करणे हे रोपटचांना वाढविण्यासारखे अवघड आहे. पण दुर्बलमनस्क बालकाना वाढविणे नाजूक रोपटचाची निगा राखण्याइतके कठीण आहे. हे काम मॉन्टेसोरी बाईंनी पुढाकार घेऊन व श्रद्धेने करून दाखविले. त्यांच्यामधील चिकाटीचे अभ्यासपूर्ण संशोधन व श्रद्धेचा कित्ता गिरवण्यासारखा आहे.

* * *

• ५ • + + + + + +

# मानसिक वय-कसोट्या

□ कु. मीना सप्रे

गरज ही शोधाची जननी ठरते. वर्गात मागे राहणाऱ्या मुलांच्या समस्येतून बीनेला बुद्धि-मापनाचा शोध लागला.

निरनिराळे शोध लावणाराचे आपणास नेहमी कौतुक वाटते. इलेक्ट्रिसिटी, बिनतारी तारायत्र, रेडिओ असे कित्येक शोध लावल्यामुळे आपले जीवन सुखकर झाले आहे. पण अशा कित्येक शोधापेक्षा मानसशास्त्रात जे शोध लागले जातात त्या शोधाचे मला विशेष कौतुक वाटते.

फ्रेंच मानसशास्त्रज्ञ आल्फ्रेड बीने याचाच शोध पाहू या. दूध मोजण्यासाठी लिटर, कापडासाठी मोजण्यास मीटर, फूटपट्टी, टेप, वेगवेगळी वजने, आपण रोज पाहतो. पण ज्या बुद्धीचा वास येऊ शकत नाही, जी दिसत नाही व जी हाताळता येत नाही, अशा बुद्धीचे मापन करण्यास फ्रेंच बीने सज्ज झाला. इद्रियापलीकडील ब्रह्मतत्त्वाला पकडून ठेवण्यासारखे हे कठीण काम आहे.

फ्रान्स १९०५ सुमाराला शाळेमध्ये शिक्षकांना मागासलेली मुले फार आढळली. त्यामुळे शिक्षकांना कसे शिकवावे हा मोठा प्रश्न पडला. मागासलेली मुले ही राष्ट्रीय समस्याच होऊन बसली. फ्रेंच सरकारने ही समस्या सोडविण्याची जबाबदारी शिक्षण समितीवर व आल्फ्रेड बीने या मानसशास्त्रज्ञावर सोपविली.

केवळ शिक्षकांच्या मनावरून एखाद्या मुलाला मागासलेला समजणे योग्य होणार नाही, हे बीनेने जाणले. वस्तुनिष्ठ साधनाशिवाय अशा मुलांना वेगळे करणे आणि त्याची वर्गवारी लावणेही शक्य नाही. वस्तुनिष्ठ कसोट्या निर्माण करण्यासाठी त्याचे प्रयत्न सुरू झाले आणि १९०५ मध्ये पहिली test (कसोटी) त्याने तयार केली.

आपल्याला लहानपणी वय वाढवावेसे वाटते तर मोठेपणी ते चोरावेसे वाटते. मानसिक वय चोरण्याकडे मात्र कोणाचीच वृत्ती जाऊ शकत नाही, ही मानसिक वयाची कल्पना बीनेला १९०८ मध्ये सुचली. त्याच्या मते मानसिक वय जास्तीत जास्त १६ असू शकते. काही मानसशास्त्रज्ञाच्या मते हे वय १८ वर्षांपर्यंत जाऊ शकेल.

मानसिक वय कसे काढतात हे आता पाहू. प्रत्येक वयवर्गाकरिता कसोट्या ठरविण्यात आल्या आहेत. जर ज्या वयाच्या कसोट्या त्या वयात सोडविण्यात आल्या तर त्याचे शारीरिक (कालिक) व मानसिक वय एक आहे असे समजण्यात येईल. उदा. एखाद्या ६ वर्षे वयाच्या मुलाने ५ वर्षे वयाच्या कसोट्या सोडविल्यातर त्याचे (कालिक) व मानसिक वय ६ वर्षे आहे असे समजावे. जर त्याने ८ वर्षांच्या वय-वर्गाच्या कसोट्या सोडविल्या तर त्याचे मानसिक वय ८ धरावे. पण केवळ मानसिक वयाची कल्पना येऊन भागत नाही, तर त्याच्या हुशारीची खरी कल्पना येण्यासाठी गुणोत्तर पद्धतीचा अवलंब करणे आवश्यक आहे.

गुणोत्तर पद्धती मानसिक वयाचा शोध लावल्यानंतर टर्मन या मानसशास्त्रज्ञाने गुणोत्तर पद्धती काढली. अमेरिकेतील स्टॅनफर्ड विश्वविद्यालयात टर्मनचे संशोधन झाले. मुलांच्या मानसिक वयाला (Mental Age) कालिक वयाने (Chronological Age) भागावयाचे व येईल तो भागाकाराचा आकडा मुलाच्या 'तौलनिक हुशारीचा' (brightness) समजायचा. समजा, पहिला मुलगा ५ वर्षांचा आहे व दुसरा १२ वर्षे वयाचा आहे. ५ वर्षे वयाच्या मुलाचे ८ वर्षे 'मानसिक वय' असणे तीव्र बुद्धीचे द्योतक आहे. त्याचा बुद्धिगुण्य $\frac{८}{५}$ = १·६ आहे दुसऱ्या मुलाचा बुद्धिगुण्य केवळ $\frac{८}{१२}$ = ·६७ असून मंदबुद्धी आहे. ह्या ठिकाणी 'कालिक' वयाची 'मानसिक' वयाशी तुलना करून बुद्धीचे प्रमाण ठरविले गेले आहे. बहुधा वरील अपूर्णांकाला १०० ने गुणून बुद्धिगुण्य काढण्यात येतो.

$$\left.\begin{array}{c}\text{बुद्धिगुण्य}\\ \text{(Intelligence Quotient)}\end{array}\right\} = \frac{\text{मानसिक वय}}{\text{कालिक वय}} \times १००.$$

हजारो लोकाना दिल्या गेलेल्या बुद्धिपरीक्षाच्या परिणामावरून जनसंख्येत बुद्धीचे प्रातिनिधिक विभाजन खालीलप्रमाणे आढळते.

| बुद्धिगुण्य | शेकडा जनसंख्या | वर्णन |
|---|---|---|
| १४० च्यावर | १ | अलौकिक बुद्धी |
| १३० ते १३९ | २ | तीव्र बुद्धी |
| १२० ते १२९ | ८ | |
| ११० ते ११९ | १६ | वरिष्ठ बुद्धी |
| १०० ते १०९ | २३ | सामान्य बुद्धी |
| ९० ते ९९ | २३ | |
| ८० ते ८९ | १६ | मद बुद्धी |
| ७० ते ७९ | ८ | सीमागत बुद्धी |
| ६० ते ६९ | ·२ | मानसिक अभावग्रस्तता |
| ५० ते ५९ | | मानसिक अभावग्रस्तता |
| २४ ते ४९ | १ | न्यूनमती |
| ० ते २३ | | मूढ |

वरील तक्यावरून हे स्पष्ट होईल की अतिबुद्धिवान व दुर्बलमनस्क व्यक्ती समाजात कमी आढळतात. सर्वसाधारण शिक्षणसंस्था व अभ्यासक्रम सामान्यासाठी योजलेले असतात. या सामान्याच्या चौकटीत अतिबुद्धिवान व कमी बुद्धिवान मुलांची परवड होते. वर्गात त्याची कुचंबणा होते. वेगळेपणामुळे त्याची व्हावी तेवढी प्रगती होऊ शकत नाही. परदेशात तीव्र व अलौकिक बुद्धीच्या मुलांसाठी वेगळ्या शाळा असतात किंवा सामान्य शाळांमध्येच त्यांना जास्त शिकविण्यासाठी सोय केली असते. सामान्य विद्यार्थ्यांच्या वर्गात बसून काही वेळा ही मुले कटाळतात व शिक्षक तेच तेच फार वेळा समजवतात ही त्याची तक्रार असते. व्यक्तिगत शिकविल्याने ही तक्रार दूर होते. उलट पक्षी मदबुद्धीच्या मुलाना सामान्य मुलांच्या शाळेत बसविल्याने त्याची तिरपीट उडते. वर्गात सांगितलेला विषय समजत नाही. अशा मुला-


# पांढरे डाग

पांढऱ्या कोडाचे अनुभवसिद्ध प्रसिद्ध गुणकारी औषध. अनेक बक्षिसे व हजारो अभिप्राय मिळाले आहेत व नित्य मिळतात. औषधाची किंमत ६ रुपये पो. ख. १ रु. माहिती मागवा. मोफत पाठवू. नकली वैद्यापासून सावध राहावे.

**वैद्य बी. आर. बोरकर, आयुर्वेद भवन,**

**मु. पो. मंगरूळपीर, जि. अकोला (महाराष्ट्र)**

- **व्यक्तिमत्त्वाचा विकास** २=६० 
  ग. वि. अकोलकर
- **आचारसंहिता अहवाल** ३=५०
- **लोकमत** २=००
  सदाशिव आठवले

सभासदग्राहकांना २५ टक्के सवलत

इतर प्रकाशनांसाठी लिहा :

**समाज प्रबोधन संस्था**

१२४२ सदाशिव पेठ, विद्यापीठवाडा, पुणें २

साठी सामान्य शिक्षण संस्थांमध्ये विशेष लक्ष देऊन व्यक्तिगत शिकविले तर त्यांना निश्चित फायदा होतो. ही मुले काही विषय, सामान्य मुलांबरोबर शिकू शकतात. पण काही विषयात त्यांना व्यक्तिगत लक्ष देण्याची आवश्यकता असते.

**साधनांच्या मर्यादा**

बुद्धिमापन ही एक मनोमापनाची तांत्रिक पद्धती आहे. ते एक साधन आहे व त्याच्या मर्यादाही ओळखणे आवश्यक आहे.

आपल्या देशात बुद्धिमापनाच्या कसोटयांचा सर्रासपणे उपयोग केला जात नाही. मोठ्या शहरातून हाताच्या बोटांवर मोजण्याइतकी Child guidence clinics आहेत. शिवाय पुष्कळश्या कसोटया (tests) परदेशीय वातावरणातच लागू पडतात. त्यांची रचना इंग्रजी भाषेत असते. वातावरणास योग्य व आपल्या भाषेतून त्यांचा जेव्हा विपुल प्रमाणात उपयोग होईल तेव्हा त्या किती उपयुक्त आहेत हे ठरेल.

मनुष्याच्या व्यक्तित्वाची बुद्धी ही केवळ एक बाजू आहे. अतिशय हुशार असणारी व्यक्ती समाजविरोधी कार्य करू शकते. सर्व बुद्धिवान् लोक सद्गुणी असतात असे नाही. उलट कमी बुद्धीची मुले निष्पाप असतात. ती योग्य शिक्षण व संधी दिल्यास समाजोपयोगी कार्य करू शकतील.

जसा चांगुलपणा बुद्धीवर अवलंबून नाही तशी सामाजिक परिपक्वता बुद्धीवर अवलंबून नाही. बुद्धी कसोटयांबरोबर पूरक कसोटया म्हणून इतर अनेक कसोटयांचे उपयोग करणे अगत्याचे आहे. व्हाईनलँड न्यूजर्सी येथील दुर्बलमनस्क मुलांच्या शाळेत सामाजिक परिपक्वता (Social Maturity Tests) कसोटयांचा उगम झाला.

दुर्बलमनस्क मुलांच्यामुळे मानसिक वय, बुद्धीच्या कसोटया व सामाजिक परिपक्वतेच्या कसोटया यांचा शोध लागला व या मुलांनी मानसशास्त्रात व शिक्षणशास्त्रात भर टाकून आपली उपयुक्तता सिद्ध करून दाखविली आहे.

[ र. वि. पंडित व कोठुरकर यांच्या पुस्तकांच्या आधारे ]

* * *

# नंदनवन

●

हे दालनच आपल्याकडे नवीन आहे. श्रद्धेने, कळवळीने शिक्षणाच्या या दालनात संथ पावले टाकणाऱ्या नागपुरातील एका संस्थेची ही त्रोटक माहिती.

●




पुष्पा पोहनरकर
नवार विणीत आहे

●

**स्थापना**—गेल्या ४२ वर्षांपासून स्त्रियांच्या व मुलांच्या कल्याणासाठी सीताबर्डी, नागपूर येथे मातृ-सेवा-संघ ही संस्था कार्य करीत आहे. या संघाच्या परिसरांतील अपंग व्यक्तींनी जमून १५ आगस्ट १९५९ या दिवशी नंदनवन क्लब स्थापन केला. नंदनवन क्लबमधील कार्यकर्त्यांना अपंग व दुर्बलमनस्क मुलांसाठी शाळा स्थापन करावी असे वाटू लागले. मंदबुद्धीच्या व दुर्बलमनस्क मुलांच्या शिक्षणासाठी नागपूर येथे काही सोय नव्हती. मुलांच्या एकंदर संख्येत शेकडा ३ ते ५ अशी मुले असल्यामुळे ही गरज तीव्रतेने भासू लागली. नंदनवन क्लबच्या प्रेरणेने मातृ-सेवा संघाने एप्रिल १९६० मध्ये नंदनवन शाळा स्थापन केली व राज्य सरकार व केंद्रीय सरकारकडून सहकार्य व अनुदान मिळविले.

**उद्देश**—कमी बुद्धी असल्यामुळे जी मुले अजिबात शाळेत जात नाहीत, त्यांना प्रवेश देणे, तसेच जी मुले एका वर्गात सारखी नापास होतात व सामान्य शाळांचे शिक्षण ज्यांना झेपत नाही, अशा मुलांना प्रवेश देऊन त्यांचा सर्वांगीण विकास करणे, निरनिराळे हस्तव्यवसाय शिकवून त्यांना स्वावलंबी करण्याचा व चांगले नागरिक बनविण्याचा प्रयत्न करणे.

६ ते १८ वर्षांपर्यंत मुलामुलींना प्रवेश



नंदनवन शाळेत हस्तव्यवसायाला फार महत्त्व आहे. आनंद जोशी आणि श्याम दिवेकर लाकूड काम करीत आहेत.

●



स्वतःची काळजी घेण्याचे शिक्षण चंदा कोठारी चौकटीवर बंदाची गाठ बांधण्यास शिकत आहे.

●

देण्यात येतो.

**अभ्यासक्रम** –– शाळेचे, पूर्ववाचनतयारी, वाचनतयारी व वाचनलेखन असे तीन वर्ग आहेत. प्रत्येक मुलाकडे व्यक्तिगत लक्ष दिले जाऊन त्यांना दैनंदिन व्यवहार शिकविले जातात. शाळेच्या अभ्यासक्रमात विद्यार्थ्याला जे झेपेल तेच शिकविले जाते. शालेय अभ्यासक्रमाशिवाय विणकाम, वेतकाम, कागदकाम, शिवणकाम, भरतकाम, बगीच्याचे काम, मातकाम इत्यादी कामे शिकविली जातात. हे सर्व शिकविण्यात मुलांना आनंद मिळावा, त्यांचे इंद्रिय व स्नायुशिक्षण व्हावे आणि त्यांना पुढेमागे दोन पैसे मिळविता यावेत हा उद्देश असतो.

आज पटावर एकूण ५० मुले असून २९ मुलगे व २१ मुली आहेत.

केंद्रीय सरकारच्या व राज्यसरकारच्या आर्थिक साहाय्याने व जनतेच्या सहकार्याने ही संस्था चाललेली आहे.

**शाळेची वैशिष्टचे** –– अशा प्रकारच्या शाळेत पालकांच्या व शिक्षकांच्या सहकार्याची विशेष गरज असते. १५ सप्टेंबर १९६२ पासून संस्थेत पालक-शिक्षक-संघ स्थापन झाला असून पालकांना व शिक्षकांना उद्देशून या क्षेत्रातील तज्ज्ञ लोकांची भाषणे होतात.

तज्ज्ञ मंडळाचे मार्गदर्शन वेळोवेळी शाळेस होत असते. मंडळात डॉ. ए. एम्. सूर (pediatrician), डॉ. आय. के. मुझ्झावार ( psychiatrist ), डॉ. व्ही. एन्. वांकर (orthopaedic surgeon), रेव्हरंड ए. जी. मालीन (testing expert), मानसशास्त्रातले प्राध्यापक श्री. पेंढारकर, श्रीमती इंदूताई परांजपे, शिक्षणतज्ज्ञ, कु. उषाताई मोहनी (Occupational therapist) हे सहकार्य देतात.

इतर शाळांप्रमाणे राष्ट्रीय दिन, स्नेहसंमेलन, गणेशोत्सव इत्यादी कार्यक्रम शाळेत साजरे केले जातात. शिवाय सहलीचे व मनोरंजनाचे कार्यक्रम आखले जातात.

शाळेतील सर्व कर्मचारी प्रेमाने, चिकाटीने व आपुलकीने शाळेतील विद्यार्थ्यांना शिकवितात. आधुनिक शिक्षणपद्धतीच्या तत्त्वानुसार विद्यार्थ्यांना शिकविण्याकडे शिक्षकांचा कल असतो.

* * *

● ● ●



मॉंटेसोरी पद्धतीने इंद्रिय-स्नायु-शिक्षण दिल्यास विद्यार्थ्यांना फायदा होतो. रामू माचवे आणि विनायक दाणी मनोरा रचीत आहेत.

●



सुशीला रेवतकर वेणी घालण्यास शिकत आहे

●

# समीक्षा

सरकारी बक्षिसांच्या यादींत

# ढळढळीत वैधव्य लाभलेला

## जी. एं. चा कथासंग्रह

" **निळासावळा** " या कथासंग्रहात मराठी वाचकांच्या मनाची पकड घेतलेल्या जी. ए. कुलकर्ण्यांचा " हिरवे रावे " हा कथासंग्रह वाचून खाली ठेवला, की पावसात चिंब झाल्यासारखे वाटते. नाहीतरी एखाद्या मासिकांत तुरळकपणे अवतरणारी जी. एं. ची कथा ही प्रदीर्घ चालणाऱ्या पावसाच्या सरीसारखी वाचकावर कोसळते. आशयाने आणि आकारानेही जी. एं. ची कथा ही एक स्वतंत्र खंडकाव्यच असते.

अत्यंत गंभीरपणे त्यांची कथा सुरू होते; आणि त्यात चित्रित केलेल्या जीवनाच्या पडछाया समोर येऊ लागल्या, की बाटलीतून निघणाऱ्या राक्षसाला पाहावे त्याप्रमाणे वाचणारा दिङ्मूढ होऊन जातो. जी. एं. चीच आवडती उपमा द्यावयाची तर त्यांची कथा वाचकांच्या मनोराज्यात गिधाडाप्रमाणे पंख पसरून घिरट्या मारू लागते आणि जीवनाचा जो लचका तिच्या तोंडात वाचक पाहातो, तो रक्तामांसांचा गोळा पाहाताच त्याचे मन बहुधा शहारते—थरारून जाते.

" **गिधाडे** " या कथेत त्यांनी रंगवलेला बापू पाहा. पैशाची अफरातफर करून काही क्षण धुंदीत जगलेला हा प्राणी—नोकरी सुटल्यानंतरच्या यातना मख्खपणे भोगीत असतो. आकड्यावर पैसे लावतो. स्वतःच्या मुलीला चॉकलेट देता येत नाही म्हणून शरमेने बधिर होतो. पण उंदरासारखा जगणारा हा बापू साठ रुपये चोरून रेनकोट घालून हिंडणारा पाटील भेटताच, त्याच्या आयुष्यात आपले प्रतिबिंब पाहून त्याच्या व्रणात आपली गिधाडी चोच खुपसण्याचे सुख हावरेपणाने पकड लागतो. आपले भळभळीत वाहणारे दुःख विसरतो.

" **पारधी** " ही हंसच्या १९१३ च्या दिवाळी अंकात प्रथम प्रसिद्ध झालेली कथा. या रत्नभांडारातील कोहिनूर आहे. या कथेची रचना, त्यात सफाइने घेतलेली आवर्तने ही सूर्यप्रकाशात उजळलेल्या कोळ्याच्या प्रचंड जाळ्यासारखी वाचकांना हरकून टाकतात. दादासाहेब वकील यशाने धुंदी चढलेले. कणा नसलेल्या आसपासच्या माणसाकडे चकाकणाऱ्या पात्यासारखे पाहाणारे. यल्लुभीमाला जन्मठेप होते. तो देवाण्णाला ठार मारल्याचे कबूल करून त्यांच्या वकीलीतील कौशल्याचा टायरच पंक्चर करतो. कोर्टातून जाताना दादासाहेबांनाच नमस्कार करून समाधानाने कोर्टाबाहेर जातो. दादासाहेबांना हे बोचते. नाहीतरी रक्ताच्या शिकाऱ्याला लाभणारे सुख त्यांना दुर्मिळच झाले होते. यश मिळावे तेव्हा धगच संपलेली असावी. माडाम-ब्लाऊझ घालून घरात जिरॅनिअमचे आयुष्य कंठणारी माई त्यांची दुसरेपणाची बायको म्हणून घरात आली. एकदा उर्मटपणे तिच्या बापाने त्यांना नाकारल्यावर मग ! आणि तो यल्लूभीमा एका बेरड बाईसाठी देवाण्णाचा खून करून आयुष्य भिरकावून गेला तो कसा? ही नशा माणसाला का चढते? तेच दादासाहेबांना कळत नाही. बाईविषयी आसक्ती म्हणावी तर फुकट मिळाली तरी एक रात्र कुणी जवळ करणार नाही अशी ती कुरूप होती. त्यांचे मन पारध्याच्या सावधतेने ह्या प्रश्नांचे उत्तर शोधू लागते. काय लागते त्यांच्या हाती? सुधीर त्यांचा मुलगा—पैसे चोरून रमी खेळतो. माई आपले वांझोटे आयुष्य, रात्रंदिवस काळा चश्मा घालणाऱ्या प्रॅक्टीसवर निखारा पडलेल्या डॉक्टरशी प्रेमाचे चाळे करून घालवते. ती बाई नव्हतीच. एक मद्यपात्र होते. तारुण्य हिंदकळणारे ! दादासाहेब घरी येतात. त्यांना डॉक्टर घरीच माईजवळ बसलेले दिसतात. त्यांना वाटते यल्लूभीमाने देवाण्णाला का मारले त्याचे उत्तर सापडले. परंतु देवाण्णा जे चोरून करीत होता ते हा डॉक्टर उघडउघड त्यांच्या देखत करीत होता. छुपेपणा नव्हताच. धूर्तपणाही नव्हता. जणू काही दादासाहेबांना सर्व माहीत आहे, असेच माई आणि डॉक्टर धरून वागत होती. हा पारधी मग गोंधळला ! श्वापदाचा माग लागेना. पाऊलवाटच दिसेना. यल्लूभीमाचे धैर्य ! मग त्यांनी उसने दत्तक घेतले आणि त्या ओझ्याखाली अखेर हा पारधी कोसळला. दोन झाला. डॉक्टरांचा गैरसमज होऊ नये म्हणून हातातला विळा खाली आणताच सौजन्याने नवा मुखवटा घालून 'आय् ॲम् सॉरी' म्हणाला—वलयामधून वलये निर्माण करणारी ही कथा वाचून मन तृप्त होते. आम्रफलांनी वाकलेल्या डेरेदार वृक्षाकडे पाहताना मिळणारे समाधान वाचकांच्या अनुभवास येते.

" **शिक्षा** " या कथेतील शोभा वडिलांच्या घरात आपले विस्कटलेले आयुष्य घेऊन जगू पाहते. लहान तुरुंगात शिक्षा भोगणाऱ्या माणसाचे ते घर ! काही वेळा फक्त एकमेकांना गजातून हात हलवायचे ! कोपऱ्यावरचा पानपट्टीवाला तिच्या आयुष्याला चुडा लावतो. पत्रे लिहितो. तिचे वडील तिरीमिरीत कोर्टात जातात. आणि कोर्टात बचावाच्या नावाखाली त्या पानपट्टीवाल्याचा वकील तिच्या अंगावरचे एकेक वस्त्र काढतो. रोज तासदीडतासाचा कार्यक्रम पाह्यला फुकट्यांची कोर्टात गर्दी होते. वर्तमानपत्रात भडक बातमी ! अखेरचा उपाय म्हणून वकील तिचे एक प्रेमप्रकरण

---

**हिरवे रावे**

जी. ए. कुलकर्णी

पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

सहा रुपये

---

# भेसळीतून
## अन्नवस्तूहि सुटत नाहींत !

कधीं वस्तू स्वस्त विकण्यासाठीं भेसळ केली जाते – कधीं दुसऱ्या कारखान्या-कडून माल तयार करून घेतांना परस्पर भेसळ केली जाते.
बेडेकर खाद्यवस्तूंची मात्र आपण खात्री बाळगूं शकतां. नेहमीच उत्तम कच्चा माल वापरून स्वतःच्या अनेक कारखान्यांतून, तज्ज्ञ माणसांच्या देखरेखीखालीं वस्तू तयार केल्या जातात – किंमत स्वस्त नसते – योग्य असते.
सतत ५२ वर्षे ग्राहकांच्या भरंवशाला उतरलेले सर्व तऱ्हेचे मसाले, लोणचीं, पापड, चटण्या व मुरांबे; सीलबंद डबे व बाटल्यांतून मुंबई, महाराष्ट्र व भारतांत बहुतेक ठिकाणीं मिळतात. – ठाकुरद्वार, दादर, फोर्ट, परेल व भुलेश्वर, – मुंबई तसेंच पेरुगेट पुणें या कंपनीच्या दुकानांतून, तसेंच भारतभर विखुरलेल्या शेंकडों स्टॉकीस्टकडून सीलबंद बेडेकर खाद्यवस्तु घेत चला.

**बेडेकर**
**मसालेवाले**
**मुंबई - ४.**





कोर्टात आणतो. वडिलांना हे नवीन असते. त्यांचे जगच फाटते. शोभाने पत्रे लिहावी आणि कोर्टात आपल्याला हे कळावे हे दुःख त्यांना सहन होत नाही. शोभा मास्तरीण होते. तासांचा ढिगारा. निबंधांची धुणावळ ! रोज घरीं जाताना अंगावरचा डाग लपवावा तशी चोरट्या मनाने ती घरी येते. कुणी विचारील ! – " तुम्ही शोभा नाईकच ना ? " मग किंचित हसेल. सर्व माहीत असल्या-सारखा, ही कथा वाचीत असताना अरविंद गोखल्यांच्या एखाद्या कथेचा तोंडावळा पुढे येतो. दोघांच्या निवेदनातला फरक जाणवतो. गोखल्यांचे चित्रण गोऱ्यापान कातडीतून निळसर शिरा दिसाव्या तसे कोमल; तर जी. एं. च्या रक्ताचा एकच थेंब सांकळून काळा दिसावा तसे घोटीव !

" **राक्षस** " आणि " **अखेरचा दिवस** " या कथातून जी. एं. चा आणखी एक पैलू स्पष्ट होतो. भीषणतेचे त्यांचे वेड. हे वेड साहित्यात प्रथम सदानंद रेग्यांनी आणले. एक जीवनाचा अविभाज्य भाग म्हणून. पण त्याला कलात्मक रंग भरले ते जी. एं. नीच. " राक्षस " या कथेतील पुढील वर्णन पाहा.

त्याने सुरी गुणीपुढे केली. भीतभीत मुलीने सुरी हातात घेतली व ती तिच्याकडे गुंगून पाहू लागली. तिची मूठ झगझगीत असून तिच्यावर संतापलेल्या डोळ्यांप्रमाणे दोन लाल खडे बसवलेले होते व त्यांमध्ये बदनासारखा एक सोनेरी चौकोन होता. तो तर त्या माण-साच्या चकाकणाऱ्या दातांप्रमाणे होता. पण सर्वात भीषण सौंदर्य होते, हे तिच्या धारदार कडात. हात जरा हलवताच त्याच्यावर प्रकाश झरकन सरके आणि दोन्ही कडा जेथे मिळाल्या होत्या त्या निमूळत्या टोकावर तर आता ठिणगीच पडते की काय असे वाटे. आता टोकावर रक्तच ठिबकत असल्यामुळे ओलसर लाल ठिणग्या निघतच आहेत, असा कदाचित भासही झाला असता. तिने सुरी हातात घट्ट धरली व त्याच्याकडे पाहिले. तो हसला नाही. त्याने मुकाट्याने कुंड्याकडे बोट दाखविले व तो बुटावर टकटक काठी आपटू लागला.

गुणी कुंड्याजवळ आली…

[पृ. ११९]

ही गुणी आहे सातआठ वर्षांची. बापाने डागलेली कोवळी पोर. आणि तो बुटावर टकटक करणारा माणूस, तिला सुरी कुठे चालवा-याची हे शिकवीत आहे.

'**अखेरचा दिवस**' मध्ये नवऱ्याला पैशाच्या लोभाने विष देणारी सावित्री वाचकाला अस्वस्थ करून जाते. " लीला " या कथेतील निपुत्रिक दांपत्याच्या संसारात जी. एं. ना दिसलेला पोकळपणा त्यांनी हळुवारपणे चित्रित केला आहे. यातली चिमुरडी लीला तिच्या वयाला न शोभणारे एकही वाक्य बोलत नाही, की कृती करीत नाही. श्री. गंगाधर गाडगिळांशी पैजा घेणारे बालमन जी. ए. च रंगवू शकतात. गाडगिळांच्या नकला अनेकांनी करून पाहिल्या आणि पाच वर्षांच्या मुलाच्या तोंडातून अशी मुक्ताफळे वाचकांपुढे ठेवली की ती पाहून वाचकांना घेरीच यावी ! केवळ बालमन रंगवण्याकरिता जी. ए. ते रंगवीतच नाहीत. ही लीला येते ती, भाऊरावांच्या एका अस्ताव्यस्त संध्याकाळी. ती सायंकाळ आणखी उध्वस्त करण्यासाठी. " भाऊ किनई तुमच नाक रताळ्यासारख आहे. " असे म्हणत ही त्यांच्या गळ्यात पडते, आणि त्यांच्या गळ्याला तात लावते. भाऊ-मामीच्या मनात मात्र एक भयाण कृत्य साकारू लागते. कोकणचा चुडा करून बेसनामधून लीलाला चारावा. मग त्याच नाचणाऱ्या डोळ्यांची, त्याच केसांची मुलगी इथे येईल. आपली कूस उजवील. परंतु हे धैर्य त्यांना होत नाही.

'**तक्षक**' या कथेतील सुटून आलेला रायण्णा आपणाला ठार मारणार या भीतीपायी लोळागोळा झालेले अण्णाराव ! कुंपणाबाहेर ढकललेल्या माकडाच्या पोराचे दुःख स्वतः भोगणारे " माकडाचे काय ? माणसाचे काय ? " या कथेतील सुभराव ! ही आणखी दोन अविस्मरणीय चित्रणे आहेत.

'**माणूस नावाच्या बेटा**' या लिखाणाला कथेच्या पिंजऱ्यात

बंदिस्त करणे हा एका अर्थाने कथेचा सन्मान आहे आणि एका अर्थाने तो अपमान आहे. अपमान अशाकरिता की ही कथा नाही. हा एक अत्यंत गतिशील चित्रपट आहे. कादंबरी वाङमयात ' वॉर अॅन्ड पीस 'ला जे अजस्र मोठेपण आहे ते मराठी कथावाङमयात या कथेला लाभलेले आहे. सन्मान अशासाठी की मराठी कथेत ती जन्मली ! या कथेत डोकावणाऱ्या असंख्य पात्रांचे मनोव्यापार जी. ए. नी इतक्या वेधकपणाने टिपले आहेत, की ते थोडे व्यापारी वृत्तीचे असते, तर या एका कथेतून पन्नास मनोविश्लेषणात्मक कथा त्यांना चिवडता आल्या असत्या. परंतु ज्याची झेप गरुडाची आहे त्याला हे कावळेपण कसे सुचावे ? दत्तू जोशी एक शाळामास्तर. त्याच्या आयुष्यातील एका दिवसाचा हा विलक्षण आलेख ! अनेक प्रश्नांच्या कवड्या त्याच्यापुढे खळखळून फेकल्या जातात. दुबळ्या आयुष्याला भांबावून टाकणाऱ्या –

" सगळे पत्तेच, सगळी माणसेच ! इसेक्स जहाज बुडाल्यावर बाराशे मैलांच्या प्रवासात लाइफबोटमध्ये कॅप्टन एकेकाला मारून त्यांचे रक्त पिऊन स्वतः जगतो तर टिटॅनिक बुडताना एक म्हातारा खलाशी आपल्या कुत्र्यासाठी माघारी येतो व कुत्र्याबरोबर बुडून मरतो. किरकोळ भांडणात मुलगा जन्मदात्या आईच्या जिव्हारी लाथ मारतो, बहीण भावाचा विश्वासघात करते; तर सिडनी कार्टन कुणाच्या तरी साठी मरतो. डेस्डेमोनाचा दीप अंथरुणात विझतो, आणि वासंती नायलॉनचे पातळ लयीत हलवीत हसत निघून जाते. एखादी वेडी पतीच्या मृत्यूने छातीत सुरी खुपसून घेते, तर दुसरी चेंगरलेल्या स्तनांच्या मध्ये लॉकेट रुतवून घेते. एकजण तारुण्यातील एका आठवणीवर आयुष्याला धार लावीत बसतो, तर दुसरा चौदाव्या दिवशी बोहल्यावर चढतो. मालकंसाचा भव्य विस्तार, मोटरीखालची किंकाळी, बाळंत होत असतानाचा आक्रोश, विमान-हल्ल्याचा मन फाडणारा आवाज, चुंबनाचे चुटकसंगीत, प्रेत बाहेर नेत असतानाची कालवाकालव. सारी माणसेच, सारे माणसांचे आवाज ! रशियाजर्मनींमध्ये कॅंपमध्ये ब्रेडच्या तुकड्यासाठी एक तरुणी पंधरा जणांना जाहीरपणे शरिराचे दान करते. दान घेणारी व देणारी माणसेच. दारांच्या फटीत बोटे घालून चिरडणारी, नखाखाली टाचण्या खुपसणारी ! बेलसेनमध्ये कैद्यांना जिवंत जाळणारी माणसेच. हिरोशिमामध्ये अपंग झालेली हजारो माणसे – व तो प्रसंग त्यांच्यावर आणणारी ! आपले मांस कपोतांना देणारा शिबी आणि नररुंडांचा गोपूर रचणारा तैमूर ! क्रुसावर हातापायांत खिळे ठोकल्यावर वेदनेने Eloi, Eloi, असे उद्गार काढणारा ख्रिस्त, आणि त्याच क्रुसाखाली त्याचे कपडे कुणाला मिळावे यासाठी कवड्या खुळखुळवणारे पहारेकरी – दोघेही माणसेच ! या साऱ्याच बिंदूंना छेदून जाणारे ते विशाल वर्तुळ तरी कोणते ? सगळा माणूस तरी जाऊ दे, पण त्याच्या नुसत्या पावलांविषयीदेखील हीच गत आहे. त्याचा पूर्वज दिनोसॉर याचे चौपन्न इंच लांबीचे अजस्र पाऊल, बुटक्या ओबडधोबड पावलांचा टूलो लॉट्रेक, सारे शरीर अमर करून घोट्यातच रात्रंदिवस मृत्यु बाळगून ठेवणारा अॅकिलिस, आणि गिझेलची नृत्यरम्य कहाणी सांगणारी युलानोव्हाची कबूतरासारखी पावले !

या सगळ्यांना एकत्र आणणारी, त्यात जीव भरणारी ही विश्वाची नाडी तरी कोणती आहे ? त्यात सिक्वेन्स कोणता ? दैनंदिन आयुष्यात अनुभवांची रास पडते, त्यांना कोणत्या आकृतीत बसवायचे ? खेळण्याचे नियम माहीत नसता खेळायला कोण बसवते ? आणि हे सारे विचारायचे तरी कुणाला ? देवाला ? "

दत्तूला हे प्रश्न सुटत नाहीत. हॅटला चार भोके का ? कोटाच्या अस्तनीला बटने का ? या प्रश्नांच्या जनानखान्याप्रमाणेच हे सर्व प्रश्न वांझोटे राहतात. त्याला वाटते बिनतक्रार गाडी ओढणारे बैल व्हावे पण हे माणसाचे आयुष्य नको ! ' वुई आर् हॉलो मेन; वुई





विक्रीस तयार ! विक्रीस तयार !

मुंबई विद्यापीठाच्या नवीन वर्षाच्या अभ्यासक्रमांत
इंटरवर्गासाठी नेमलेले

अण्णासाहेब किर्लोस्करकृत

संगीत सौभद्र

अण्णासाहेबांच्या पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना
व श्री. पु. रा. लेले यांच्या 'सौभद्राची लोकप्रियता" या लेखासह

तीन रंगी मुखपृष्ठ, ६ फोटो
पृष्ठे ९६, किंमत १।। रु., ट. ख. निराळा.

बलवन्त पुस्तक भांडार
गिरगांव नाका, मुंबई ४

आर् स्टफ्ड् मेन....' या जंजाळापेक्षा रेनमार्टिनचे ग्रामर, किंवा दर मासिकाचे मुखपृष्ठ कुटणखान्याची खिडकी करणाऱ्या चित्रकारांची चित्रे परवडली. नवी पिढी शिकवणाऱ्या आजच्या मास्तराच्या ठसठसत्या दु:खाची ही कहाणी सांगून 'जी. एं. नी मराठी कथावाङ्मय समृद्ध केले आहे. ही कथा म्हणजे आजच्या जीवनातील व्यथावर व ढोंगीपणावर लिहिलेला प्रचंड टीकालेख आहे.

जी. एं. च्या भाषाशक्तीचा डौलही नेहमी भारदस्त असतो. तिचा बोज कधी जात नाही; तोल कधी ढळत नाही. त्यांच्या प्रतिमांचे विश्व तर असे समृद्ध आहे की सजीव-निर्जीव हे जीवनाचे भागच ते नष्ट करतात. उदाहरण म्हणून काही वाक्ये देण्याचा मोह सुटत नाही. तेवढीच ती अभ्यासकाला एकत्र पाहता येतील :—

१. हजारो लोक आपल्याला पाहत आहेत असे वाटून त्याच्या अंगाला भोके पडू लागली. तोच चौकोनी चेहऱ्याची लोकल आली.

२. माईंना पातळ चापून चोपून नेमण्याची आवड होती आणि त्यामुळे त्यांचे पूर्ण तारुण्य कपड्याच्या रेषेबाहेर येई.

३. कारकून टेबलावर कायम प्रश्नचिन्हाप्रमाणे वाकला होता.

४. ती थोडी स्थूल झाली होती व लग्न झाल्यावर कृतकृत्य झाल्याचे चीड आणणारे चिकट सुख तिच्या चेहऱ्यावर होते.

५. मालतीच्या कडेवर मोठ्या अ‍ॅस्प्रोच्या गोळीसारखे गोल पांढरे मूल होते.

६. म्हाताऱ्याच्या पाठीवरील आवाळूप्रमाणे वाटणाऱ्या गावात ती आली.

७. साऱ्या पायऱ्या पाण्यात उतरत व त्याच्याकडे पाहता पाहता रमाचे मन भरल्या सुपाप्रमाणे होत होते.

८. मळक्या अंगठ्याप्रमाणे दिसणारे गुराख्याचे पोर, दोन गायी व एक शेळी घेऊन चालले होते.

९. दुसऱ्या वळणापर्यंत जाईपर्यंत पिंपळाची सळसळ वाझोट्या पावसाप्रमाणे ऐकू येत होती.

१०. त्या हालचाली घाणेरड्या पाण्याच्या ठिबकणाऱ्या थेंबाप्रमाणे त्याच्यावर पडत होत्या.

११. झरंकन झिप सरकवून पर्स उघडावी त्याप्रमाणे ती हसली.

१२. मान्या आयुष्यावर गिधाडाची छाया पसरून गेल्याप्रमाणे त्याना वाटले.

१३. त्याचा आवाज विहिरीत सोडलेल्या दोराप्रमाणे आत आत गेला.

१४. गाडीच्या चाकांनी करकरत स्वत.भोवती अंधार गुंडाळण्याचा प्रयत्न केला.

१५. तो चिडला नाही. फक्त चुटकन् लाल चिंधी थुंकला व हसला.

१६. स्वत:च्या पायांनी टाके घालीत चालल्याप्रमाणे जाणारे जज्ज साहेब आज नक्की भेटणार.

१७. हेडमास्तर सगळ्यांपुढे पातळ कणकेप्रमाणे हसत.

१८. बाहेर आकाश पिवळ्या काजूप्रमाणे दिसत होते.

१९. सगळेच शेवटी सागाड्याचे पोस्ट डेटेड चेक्स. सहज म्हणून वेगळे केलेले हे जी. एं. चे प्रतिमाविश्व. वाक्ये वेगळी काढताना-देखील एखाद्या सुंदर स्त्रीचे सुंदर केस कापून पुढे टाकावे तसे कृत्य केल्यासारखे मला वाटले.

जी. एं. चे अनुभवविश्व तर इतके समृद्ध आहे की त्याच्या कथेत इतस्तत: उधळलेले त्या अनुभवाचे उल्लेख वाचकास स्तिमित करतात. त्याचे अनुभवविश्व पुरेपूर श्रीमंत नसते तर इतकी रसरशीत कथा कशी अवतरली असती ? त्याच्या कक्षेत येणाऱ्या एखाद्या क्षुल्लक व्यक्तिरेखेचा साधा नामोल्लेखही ते सहजपणे फेकताना त्यात रंग भरून त्यातून असे इंद्रधनुष्य निर्माण करतात की वेगाने पुढे सरकणारा वाचक क्षणभर थबकतो. त्याच व्यक्तिरेषेला शोधू लागतो.

गाडगीळ आपल्या कथालेखनात सामान्य माणसाविषयी सहानुभूतीने लिहिताना जो स्वत:चा उपरोधिक सूर लावतात त्याचा संसर्ग जी. एं. ना होत नाही. ते माणसाला समजून घेतात. या अर्थाने समजून घेतात की, जीवनाचा हा खेळच चमत्कारिक आहे. त्याना माणसाबद्दल प्रेम वाटते. अत्यंत आस्थेने ते त्याचे दु ख शोधतात. त्याचा वेध इतका अचूक असतो, की ती जखम चटकन् भळभळू लागते. परंतु जी ए. भांबावत नाहीत की डोळे मिटून घेत नाहीत. प्रतिमांचा, शब्दांचा आधार घेत त्या गुंतवळीतून ते कथेला आकार देतात. सामान्य लेखकाना हे समजणारच नाही.

असे हे "हिरवे रावे" ! हिरवे रावे असे संग्रहाला नाव देण्यात जी. एं. चा अमुकच मानस आहे असे सांगण्यात अर्थ नाही. कारण तो "अव्यापारेषु व्यापार" ठरण्याचाच संभव अधिक. त्याच्या अनुभवविश्वाशी हे रावे कसे जखडले गेले आहेत हे त्याचे त्यानीच स्पष्ट करावे हे उत्तम. कदाचित् १९६२ च्या कथासंग्रहात बसल्यावर हे रावे उडून जातील व मागे फक्त 'पोपटी चौकट' उरेल असे स्वप्न त्यानी पाहिले नव्हते ? यंदाच्या सरकारी बक्षिसांच्या यादीत "हिरवे रावे" नाहीत. त्यामुळे नुकसान झाले आहे. ते जी. ए. चे नाही. ते नुकसान जाणवेल विद्याधर पुंडलीक व शंकर पाटील यानाच. कारण "वधुवराच्या मेळगी । वऱ्हाडिया लुगडी लेणी ।।" शोभून दिसतात. नवरदेवाला हुसकावून निघालेल्या मिरवणुकीला वरातीची कळा चढत नाही. उलट ती "धिंड"च ठरते !

रा म. शास्त्री

• • •


**दर्शन ज्ञानेश्वरी.......**

विद्यार्थ्यांस व अभ्यासकांस अत्यंत उपयुक्त

संयोजक :
वि. ग. कानिटकर

प्रमुख विक्रेते
इनामदार बंधू प्रकाशन
९९१ सदाशिव, पुणे २

# मी पाहिलेल्या पर्ल बक



**लीला चिटणीस**
यांची
**वसन्त भालेकर**
यांनी
घेतलेली एक घरगुती मुलाखत

जगद्विख्यात कादंबरीकर्त्या श्रीमती पर्ल बक यांच्याविषयी तसे मी आजवर खूप ऐकले होते. त्यांच्या गाजलेल्या ‘ गुड अर्थ ’ या कादंबरीवरील त्याच नावाचा इंग्रजी चित्रपटदेखील मी चांगला तीन चार वेळा पाहिला होता नि त्यातील पॉलमुनीच्या बहारदार अभिनयाने मला मंत्रमुग्धही केले आहे.

पर्ल बक यांच्या साहित्याने तसे अवघ्या विश्वाला वेड लावलेले आहे. देशोदेशी दौरे काढून तेथील जीवन अगदी जवळून पाहून, त्याचे चित्रण आपल्या लिखाणातून करण्याच्या त्यांच्या पद्धतीमुळे त्यांच्या साहित्यात जसा जिवंतपणा आढळतो तद्वत प्रत्येक व्यक्तिरेखा सजीव नि सचेतन स्वरूपात पाहायला मिळते. बारीकसारीक प्रसंगांचेही त्या अशा काही खुबीने विवरण करतील की वाचकांचेही देहभान हरपून जावे.

अशा या कसदार लेखिका भारतात यापूर्वी अनेकदा येऊन गेल्या. पण या वेळी त्यांचे आगमन झाले ते निराळ्याच कारणासाठी, चित्रपट निर्मितीसाठी – हे जेव्हा मला कळले तेव्हा खरोखरीच आश्चर्याचा धक्का बसला मला आणि म्हणूनच त्यांच्या एकंदर हालचालींकडे अत्यंत उत्सुकतेने डोळे लावले होते मी. त्यांच्या चित्रनिर्मितीची जेवढी माहिती मिळवता येईल तेवढी मिळविण्याचा प्रयत्नही केला.

येथील एक लोकप्रिय अभिनेता नि निर्माता देव आनंद यांच्या भागीदारीत त्यांनी इंग्रजी चित्रपट काढण्याची योजना आखली असून त्यासाठी त्या आपले सहकारी श्री. टॅड डेन्युलिस्की यांच्यासह येथे आल्या आहेत. यापूर्वी अमेरिकेत देव आनंद व त्यांची पत्नी कल्पना कार्तिक यांच्याशी त्यांची भेट झालेली होती. आनंददांपत्य त्यांचा तेथे पाहुणचारही झोडून आले होते नि देवचे एकंदर व्यक्तिमत्त्व अमेरिकन लोकांना भुरळ पाडणारे असल्याचे त्यांचे ठाम मत असल्याने त्यांनी भारतातील इतर कोणत्याही लोकप्रिय अभिनेत्या – निर्मात्यापेक्षा देवचीच आपल्या चित्रपटाचा भागीदार म्हणून निवड केली. त्यांच्या अमेरिकन व्यक्तिमत्त्वामुळे त्यांनी त्यांची आपल्या चित्रपटाचा नायक म्हणूनदेखील निवड केली.

श्री. आर. के. नारायण या भारतीय लेखकानेच लिहिलेल्या ‘ दि गाइड ’ या चित्रपटाची त्यांनी आपल्या या पहिल्या हिंदी-अमेरिकन चित्रनिर्मितीसाठी निवड करून त्यावरून स्वत:च पटकथा तयार केली आहे व संवाददेखील त्यांनीच लिहिले आहेत. या कादंबरीत भारतीय जीवनाचे वैशिष्ट्यपूर्ण चित्रण झाले असून ते अमेरिकन लोकांना पाहायला गमतीदार वाटेल, उद्‌बोधक वाटेल असे त्यांचे स्पष्ट मत आहे.

श्री. टॅड डेन्युलिस्की यांचे दिग्दर्शन लाभलेल्या या चित्रपटातील दि गाइडची – वाटाड्याची – प्रमुख भूमिका देव आनंदच करीत असून इतर सर्व कलावंत भारतीय आहेत. पण त्यातही एका नावाने मला अधिक आकर्षून घेतले. ते म्हणजे ‘ लीला चिटणीस ! ’

लीला चिटणीस यांनी एक नामवंत चरित्र अभिनेत्री म्हणून भारतीय चित्रसृष्टीत आपल्यासाठी वेगळे नि आगळे स्थान मिळविलेले आहे. आज प्रायः त्या सहृदय आईच्याच भूमिका करताना आढळतात. पण एके काळी त्यांनी येथे नानाविध व्यक्तिरेखांत गहिरा रंग भरलेला आहे. एका जमान्यात सुविद्य नि अभिनयसंपन्न अशा या अभिनेत्रीने मराठी रंगभूमी चांगली गाजविली होती नि १९३६ साली त्यांचा भारतीय चित्रसृष्टीशी संबंध आल्यापासून गेल्या २६-२७ वर्षांत त्यांनी अनेक हिंदी मराठी (विशेषत: हिंदीच) चित्रपटातून भावपूर्ण भूमिका करून सिनेरसिकांना मंत्रमुग्ध केलेले आहे.

**अशोक ऋण मानतो**

हिंदी चित्रसृष्टीतील सदा सतेज नायक अशोककुमारच्या अभिनयाला वेगळे वळण लावणारी अभिनेत्री म्हणून त्यांचा अभिमानाने उल्लेख करावा लागेल. एका जमान्यात अशोक - लीला चिटणीस ही जोडी विलक्षण गाजलेली होती नि लीलाबाईंकडूनच आपण अभिनयातील अनेक बारकावे शिकलो अशी स्पष्ट कबुली आजही अशोक देत असतो.

आपल्या वाट्याला आलेली कोणतीही भूमिका तिच्याशी एकरूप होऊन वठविण्यात लीलाबाई वाकबगार. भूमिकेची लांबीरुंदी शोधीत न बसता हाती आलेल्या कामाचे सोने करण्याकडेच त्यांचा कल अधिक त्यामुळे त्यांची लहानातील लहान भूमिकाही दीर्घ काळपर्यंत स्मरणातून जात नाही. कारण त्यांच्या अभिनयात स्वाभाविकता

असते, मोकळेपणा असतो. भूमिकेची उत्कृष्ट समजूत आणि तज्जन्य स्वाभाविक आविष्कार हे लीलावाईंचे उल्लेखनीय गुणविशेष आहेत. त्यांच्या अभिनयात जसा अतिरंजितपणा औषधाला सापडत नाही, तद्वत जरुरीपेक्षा आपल्या भूमिकेला जादा उठाव देण्याची धडपड त्या कधी करीत असताना दिसणार नाहीत. चेहऱ्यावरील यथायोग्य अभिनयाला स्वराच्या भावकंपित आदोलनाची जोड देण्यास लीलाबाई कधी चुकत नाहीत, त्यामुळे त्याची प्रत्येक भूमिका प्रेक्षकावर उत्कृष्ट छाप पाडून जाते.

एके काळी त्याचे खूप गाजलेले छाया, अर्धांगी, तुळशीदास, कगन, बंधन, झूला, मनोरमा, चार आखे, यांसारखे चित्रपट घ्या, नाहीतर त्यानी चरित्रअभिनेत्री म्हणून आपल्या सिनेजीवनातील नव्या पर्वाला प्रारंभ केल्यानंतरच्या शहीद, माँ, आवारा, वसंत वहार, साधना, अपना हाथ जगन्नाथ, धूलका फूल, काला बाजार, बेवकूफ, हम दोनो, प्रेम आंधळं असतं, आसका पंछी, आशिक आणि गगाजमना इत्यादी चित्रपटातील त्यांच्या भूमिका दृष्टीसमोर आणा. ही प्रत्येक भूमिका ठसठसीत स्वरूपात उभी करण्यासाठी त्यानी खूप परिश्रम घेतल्याचे दृष्टोत्पत्तीस येईल.

अशा या अभिनयनिपुण पदवीधर मराठी अभिनेत्रीला 'दि गाइड' सारख्या चित्रपटात एक महत्त्वपूर्ण भूमिका मिळाली आहे नि त्याच्या भूमिकेचे बरेचसे चित्रणही पार पडले हे कळल्याने खरोखरीच निर्दोष अभिमान वाटला मला. प्रांताभिमानीपणाचा दोष पत्करूनही एका भारत-अमेरिकन कलाकृतीसाठी आमच्या मराठी अभिनेत्रीची निवड झाल्याच्या वार्तेनेही अंगावर मूठभर मास चढले माझ्या, हे प्रांजलपणे कबूल करायलाच हवे.

आणि म्हणूनच लीलाबाईंची भेट घेऊन या चित्रपटाविषयी नि विशेषत: पर्ल बक याच्या विषयीची माहिती विचारावी याच हेतूने मी त्यांना फोन केला. बाई अलीकडे खूप गडबडीत असतात. चित्रपटांचे चित्रण, टोटल थिएटर्सची संपूर्ण जबाबदारी, घरचे सारे कामकाज आणि त्यांत त्या स्वत.चे आत्मचरित्र लिहिण्यात गुतलेल्या असल्याने त्याची भेट मिळणे तसे कठीणच. मात्र सुदैवाने त्या फोनवर भेटल्या नि आमच्या भेटीची वेळही निश्चित झाली.

या! आपलीच वाट पाहात होते! आपण मस्तपैकी चहा घेऊ आधी गरम गरम नि मग बसू गप्पा मारायला. कस? — माझे स्वागत करीत बाई अत्यंत सौजन्याने म्हणाल्या आणि नाही तरी त्यांच्या बोलण्या-चालण्यात सभ्यतेबरोबरच स्नेह, प्रेम, आपुलकीही ओतप्रोत भरलेली असते सदैव! त्यांचे व्यक्तिमत्त्व जसे प्रभावी, तद्वत् बोलणे, चालणे नि वागणेही गोड—समोरचा माणूस भारावून जावा असे.

"बोला, काय हुकूम?" चहाचा गरम घोट घेता घेताच लीलाबाई म्हणाल्या.

"बाई, मी फोनवरून माझा मनोदय व्यक्त केलाच आहे आपण सध्या दि गाइड या चित्रपटांत भूमिका करीत आहात. आजवर अनेक हिंदी-मराठी चित्रपटातून आपण भूमिका केलेल्या असल्याने व नाही म्हटले तरी पाव शतकावरचा काळ या चित्रसृष्टीत आपण व्यतीत केल्याने, येथील भलाबुरा अनुभव आपल्या जमेला आहेच. तेव्हा त्याचा विचार करता या चित्रपटाच्या वेळचा आपला अनुभव काय? आणि मुळात म्हणजे या चित्रपटाच्या एक निर्मात्या नि पटकथा-सवाद-लेखक पर्ल बक याच्याविषयी आपल्याला काय वाटत?" मी एका दमात सारे काही विचारून मोकळा झालो.

"बाप रे, प्रश्नाचा भडिमारच केलात की हो?" बाई मनमोकळेपणाने हसून म्हणाल्या, "आपण अस करू, मी प्रारभी पर्ल बकविषयी मला काय वाटत नि त्यांच्या भेटीनतर त्यांच्या विषयी माझ मत काय झाल ते सागते. त्या अनुषंगान इतर गोष्टीची आपोआप चर्चा होईलच की!"

"थोडक्यात म्हणजे 'मी पाहिलेल्या पर्ल बक' असच की नाही!" मी चटकन म्हटले. "हो" "पण बाई, त्याच्याविषयी आपल्याला काय माहिती होती हो तुमची त्यांची ही भेट होण्यापूर्वी?"

"पर्ल बक बाईंच्या कादबऱ्या आवडीन वाचणाऱ्यापैकी मी एक आहे. त्याच्या साहित्यान अनेकदा देहभान हरपल आहे माझ. त्याच्या साहित्यावरून त्याची निरीक्षणशक्ती अती सूक्ष्मतम असावी याची सहज कल्पना येते. बारीकसारीक गोष्टीतही त्या अशी कोटीगंमत निर्माण करतात की वाचणाराला आगळाच आनद व्हावा. प्रसगाची रंगत वाढवीत असतानाही त्यातील तपशीलही त्या सविस्तरपणे सागून मोकळ्या होतात आणि इतक असूनहि कुठ रुक्षपणा औषधालाही सापडायचा नाही.

खर सागू! त्याच वाङमय वाचल्यानतर त्याच्या विषयीच मी माझ्या मनापुढ चित्र उभ केल होत ते काही वेगळच होत. एक काहीशी अबोल, थोडीफार गर्विष्ठ नि बरीचशी तडफदार अशीच ही लेखिका असावी अस वाटत होत मला. मानवी मनाचा हा गुणधर्मच आहे. कोणतीही व्यक्ती पाहिली नसताना तिच्या विषयीच्या वेगळ्याच कल्पना मनात घर करून राहिलेल्या असतात!

पण त्याना जेव्हा मी पहिल्यादा पाहिल तेव्हा मी माझ्या मनापुढ चितारलेली त्याची व्यक्तिरेखा साफ कोलमडून गेली नि वेगळच दर्शन घडल मला.

'दि गाइड'च्या निमित्तान त्या जेव्हा आपले एक भागीदार व या चित्रपटाचे दिग्दर्शक श्री. टॅड डॅन्युलिस्की याच्या बरोबर आल्या तेव्हा त्याच्या सन्मानार्थ देवन एक शानदार खाना दिला. त्यामाग त्याचा हेतू हाच होता की, द गाइडमध्ये भूमिका करणाऱ्या कलावंताचीही त्या निमित्तान ओळख व्हावी.

### पहिली भेट

या भोजन समारंभप्रसंगी बाईंशी पहिलीच माझी ओळख झाली. आणि मला त्याच अगदी जवळून दर्शन घडल ते अगदी वेगळच. एक अत्यत शालीन, सौजन्यशील, प्रेमळ अशी भारतीय आजीबाईच वाटल्या पर्ल बक बाई मला! त्यांच वागणच सौजन्यशील नव्हे तर बोलणहि तसच प्रेमळ नि आपुलकीन ओतप्रोत भरलेल. आपण जगद्विख्यात लेखिका आहोत याचा मागमूसही आढळला नाही त्याच्या वागणुकीत कुठ. या पाश्चिमात्य देशातील एक अत्यत लोकप्रिय विदुषी आहेत हे सागूनही खर वाटणार नाही त्याना पाहिल्यानंतर!

"पण या पहिल्या भेटीत आपल फारस बोलण झाल नसेल नाही?"

"अहो! बोलून चालून ती पहिलीच भेट. त्यांतून ती अत्यत घाईगर्दीची. त्यामुळ तिथ फारस बोलता आल नाही. पण आम्ही बाह्य चित्रणासाठी जेव्हा उदयपूरला गेलो तेव्हा मात्र मला बाईंचा भरपूर

सहवास लाभला. नि त्यानंतर मेहबूब स्टुडिओत जेव्हा आमच चित्रण सुरू झाल तेव्हाहि सेटवर अनेकदां मोकळेपणान गप्पा मारल्या आम्ही.

सेटवर त्या कधी ढवळाढवळ करणार नाहीत. पण प्रत्येक गोष्टीवर बारीक नजर त्यांची. कामाची पद्धती तरी किती वेगळी ! वेळच्या वेळीं कामाला सुरुवात झाली पाहिजे हा दंडक कटाक्षान पाळला जातो. सकाळी काम सुरू झाल की उपाहारापर्यंत फक्त कामच. फालतू गोष्टींकड मग लक्ष नाही जाणार कुणाच. त्यांना ते आवडतच नाही. तीच परिस्थिती उपाहारानंतर जी लंचची वेळ असेल ती संपली की फिरुन कामाला सुरुवात ते अगदी शूटिंग पॅक अप होईपर्यंत !

हे बोलत असतांना बाई मध्येच खुदकन हसल्या.

'का हो, हसलात का ? मी उत्सुकतेने विचारले. 'अहो, आम्हा हिंदी कलावंतांना हे नवीनच आहे. ! अशी वेळच्या वेळीं नि सबंध दिवस अंग मोडून काम करायची संवय नाही कुणाला; शूटिंगपेक्षा इतर गोष्टींनाच फाजील महत्त्व इथ !'

'बाई कशा वाटतात आपल्याला ?'

'मी मघाशीच म्हटल ना ? बाई कमालीच्या साधेपणान वागतात. अघळपघळ गप्पा मारण आवडत नाही त्यांना. त्या मोजकच बोलतात. पण त्यांतही स्नेह असतो. आपुलकी असते नि बोलणही खूप अर्थपूर्ण असत त्यांच. पण त्यांची भिरभिर नजर सदा काहीतरी शोधीत असते. त्या कमल्याही प्रकारचा बाऊ करणार नाहीत पण आपण मानवी स्वभावधर्माच्या एक अभ्यासक आहोत याचाही त्यांना विसर पडत नाही. अधूनमधून आपल्या डायरींत कसली ना कसली त्या सदैव नोंद करीत असतात !

त्यांच आणखी एक वैशिष्टच म्हणजे त्या कधी थकत-दमत नाहीत. वास्तविक तशा त्या वयस्कर. त्यात तेथील एकंदर हवामानही वेगळं. पण त्यांना तरीही कामाचा कंटाळा कसा तो येतच नाही. सकाळ-पासून रात्री चित्रण संपेपर्यंत त्या सेटवरून कधी हलणार नाहीत

एकदा मी त्यांना म्हटले, 'मॅडम, सध्या अधिक उष्मा होतो असं नाही वाटत आपल्याला ?'

'वाढला आहे थोडा' अगदी सहजपणे त्या बोलून गेल्या. पण त्यांतही कुठे नापसंती नाही, की गैरसोयीबद्दल तक्रार नाही. तस पाहिल तर त्यांना हें सार वातावरणच अगदी नवीन. याउलट आम्हा कलावंतांच असत. इथच आमच जीवन गेलेल. त्यामुळ येथील सार हवामान आम्ही पचवलेल असूनहि आम्ही अनेकदा उष्म्याची कोण तक्रार करीत असतो !' फिरून लिलाबाई खळखळून हसल्या.

'खरच गंमत वाटते मला त्यांची. आताशा उन्हाळा वाढलेला, अनेकदा त्यांना उन्हातहि बसाव लागत. शूटिंगच्या वेळी त्यांच्यापाशी पंखा असेलच अस नाही. अस असूनहि काहीच तक्रार नसते त्यांची. यावरून मला वाटत जीवनाकड अती विशाल दृष्टिकोनांतून पाह-णाऱ्या नि संस्कारक्षम मनाच्या या थोर बाई तितक्याच सहनशील व समंजसहि आहेत. प्राप्त परिस्थितीला, अगदी हसत वेगळचाच समाधानान तोंड देण्याची त्यांची वृत्ती खरोखरीच कौतुकास्पद नि अनुकरणीय आहे !"

### हिंदी चित्रपटाविषयीं मत

'भारतीय चित्रपटसृष्टिविषयी काय मत आहे त्यांच ? भारतीय



—दोन माता

चित्रपटसृष्टीविषयी तसा त्यांचा दृष्टिकोण अत्यंत सहानुभूतीचा आहे. अनेक हिंदी चित्रपट त्यांनी पाहिले नि त्यांतील हम दोनो, गंगा-जमनांसारखे चित्रपट त्यांना आवडलेदेखील. भारतीय कलावंतांच्या कामाबद्दलहि त्यांना खूप समाधान वाटत. त्यांच्या बोलण्यांतील व अभिनयातील सफाई त्यांना खूप आवडली. पण एकाच कलावंतान एकाच वेळी अनेक चित्रपटांतून भूमिका कराव्या याच मात्र त्यांना विशेष आश्चर्य वाटल व त्याबद्दल थोडीफार नापसंतीहि दृग्गोचर झाली त्यांच्या चेहऱ्यावर. अमेरिकेला हा विचारच सहन होणार नाही. एक कलावंत एवढी जबाबदारी सांभाळतो कशी याचच कुतूहल वाटेल अमेरिकनाना अस त्यांनी बोलूनदेखील दाखविल एकदा. पण याबाबत त्या अधिक खोलांत शिरल्या नसल्या तरी एकाच कलावंतान अनेक जागी एकाच वेळी स्वतःला जखडून घेतल्यान कलेशी प्रतारणा होऊन पैशाचा नि वेळेचाहि खूप अपव्यय होतो असच त्यांची मुद्रा सांगत होती त्या वेळी मला.'

'चित्रपटाव्यतिरिक्त इतर कोणत्या गोष्टीत बाई अधिक रस घेतात ?"

आम्ही एकमेकींना भेटतो ते चित्रपटाच्या सेटवरच. कारण इतर वेळी त्यांचा कार्यक्रम इतका घाईगर्दीचा असतो की भेटू म्हटल तरी ते शक्य होत नाही. आखेरच्या मुदतीत चित्रपट पूर्ण झालाच पाहिजे यावर त्यांचा भारी कटाक्ष. आणि ते बरोबरहि आहे. विलंब लागण सर्वच दृष्टींनी त्यांना गैरसोयीच आहे. खर्चही वारेमाप वाढतो. वेळेचा अपव्यय होतो. त्यामुळ चित्रण संपल की, दुसऱ्या दिवसाच्या चित्रणाच्याच गोष्टी त्यांच्या डोक्यात अधिक. त्यामुळ मग त्यांना

भेटून त्याचा मौल्यवान वेळ केवळ गप्पा गोष्टीत घालवायचा हे मला तरी इष्ट वाटत नाही. त्यामुळ त्याच्याशी सेटवर अनेकदा बोलण होत ते चित्रसृष्टीच्या अनुषंगानच. इतर विषयाना त्या बोलता बोलता स्पर्श करून जातात. पण अगदी ओझरता. पण चित्रणाच्या बाबतीत मात्र त्यांची एकदर तयारी कौतुकास्पद आहे. त्या पटकथा व संवाद-लेखिका आहेत. या चित्रपटाच्या पण त्यांनी लिहिलेल्या प्रत्येक दृश्यात कलावतांची हालचाल, कॅमेऱ्याचे अँगल्स आणि एकदर प्रकाशयोजना आदी गोष्टीचीही अगदी काटेकोरपणे नोद केलेली असते. यावरून त्यानी या विषयाचा किती पायाशुद्ध अभ्यास केलेला आहे याची सहज कल्पना येते.

' दि गाइड ' हा चित्रपट रंगीत असल्याने चित्रणाच्या वेळी एकदर रंगसंगतीबाबतहि त्या अत्यंत चोखदळ असतात. कारण रंगाचा माणसाच्या मनावर चटकन परिणाम होत असतो. पात्राची प्रकृती, त्याच्या तोंडचे सवाद व त्या वेळच एकदर वातावरण यांचा विचार करून रंग वापरले तर ते अधिक परिणाम करून जातात आणि म्हणूनच त्या पात्रांच्या वेषभूषेच्या बाबतीतदेखील अधिक बारकाईन लक्ष देतात.

पर्ल बक तशा एकसाथी लेखिका. पण तरीही त्या चित्रपट निर्मिती-क्षेत्रात उतरल्या ते आपले विचार अधिक लोकाभिमुख व्हावेत. म्हणूनच. कारण साहित्य वाचणारे लोक कमी, चित्रपट पाहणारेच अधिक, त्यामुळ आपले विचार अधिक लोकांपर्यंत पोहोचतील या भावनेन त्या आपली चित्रकृती सर्वोत्कृष्ट करण्यासाठी धडपडत असतात सदैव ! '

### भारतदर्शन घडविणारा ' दि गाइड '

' दि गाइड ' विषयी आपल काय मत आहे ?

' चांगल कथानक नि त्याचा उत्तम आविष्कार यांमुळ हा चित्रपट उत्कृष्ट ठरेल अस मला वाटत. एका भारतीयाचीच मूळ कथा असल्यान त्यात भारताच वास्तव चित्रण केलेल आहेच. चित्रकथा अशी आहे की, त्यामुळ भारताच्या विविध अंगाच कौशल्यान दर्शन घडाव. ' वाटाड्या ' या शब्दावरून आपल्याला चटकन बोध होतोच की, येथे प्रवास असणार, बाहेरचे लोक पाहायला आलेले असणार नि त्यांना येथील माहिती सागितली जाणार. या चित्रपटद्वारा सपूर्ण भारताच दर्शन घडणार नाही हे खर. पण जे घडेल ते कलात्मक असेल. अनेक लोक, त्याच्या रीती-भाती, बोलण-चालण, त्याची वेषभूषा आदि गोष्टीच लालित्यपूर्ण दर्शन घडेल या चित्रामुळ. राजस्तानच कलात्मक दर्शन निश्चित डोळ्याना आगळ सुख देऊन जाईल. तस एकंदर चित्रणहि केल गेल आहे अत्यत खुबीन. अनेक प्रसंग, स्थळ व जमाव यावर कॅमेरा अशा काही कौशल्यान फिरविला गेला आहे नि ती सारी दृश्य इतक्या बारकाइन टिपली आहेत, की सर्वमामान्य अमेरिकन जनतेला भारताविषयी अनेक प्रकारची चागली माहिती मिळेल नि भारतातील अनेक सौंदर्य स्थळ त्याचे डोळे निश्चित दिपवून टाकतील ! '

' या चित्रपटातील आपल्या भूमिकेविषयी काय वाटत आपल्याला ? '

' एका सहृदय मातेची भूमिका करते आहे या चित्रपटात मी. ' दि गाईड 'ची, देवकी आई आहे मी या चित्रात. तशी ही भूमिका नेहमीच्याच भूमिकांसारखी आहे. पण त्यातहि वेगळीच गंमत आहे. आपल्या मुलाच्या भवितव्याकड लक्ष लावून बसलेली एक आई रगविताना वेगळाच आनद होतो मला. कारण अशी व्यक्तिरेखा रंगविताना मला कधी अभिनय करावा लागत नाही. कारण आज प्रत्यक्षात मी तेच जीवन जगते आहे. माझी मुल आता मोठी झाली आहेत. पण अजून त्यानी ससार थाटला नाही तोवर त्याच्या बारीक सारीक गोष्टीवर त्याची घाई म्हणून मलाच लक्ष द्याव लागत नि मग सारखी तारांबळ उडते. तेव्हा हे अस आईच जीवन जगत असताना पडद्यावर ' आई 'ला साकार करण तस अवघड का पडाव हो ? देव तर नेहमी म्हणतो, ' प्रेमळ, वत्सल आईची आठवण झाली की लीलाबाई तुम्हीच मर्रकन डोळ्यापुढ येऊन उभ्या राहता ! ' लीलाबाई काहीश्या हसतच म्हणाल्या.

' या चित्रपटातील आपल्या भूमिकेविषयी पर्ल बक बाईंना काय वाटत ? '

' तस त्यानी कधी बोलून दाखविल नाही. पण माझी भूमिका मला चित्रणापूर्वीच समजावून देण्यात आली नि माझ चित्रपटातील स्थानहि सागितल गेल पण त्यानतर मात्र प्रत्येक वेळी मला चागल प्रोत्साहनच दिल त्यानी. कलावतांची फाजील प्रशंसा त्या करणार नाहीत. आपल्या हिंदी चित्रसृष्टीसारखे ' साखर पेरणारे ' तोंडापुरत गोड बोलण त्या मडळीना जमत नाही. पण कलावतांना त्या नाराज, निरुत्साही करणार नाहीत. एखाद्या कलावताचा अभिनय त्याना खरोखरीच खूप आवडला तर चटकन् त्या आपला आनदहि व्यक्त करून मोकळ्या होतील. '

### भाग्याचा क्षण

उदयपूरला एक दृश्य चित्रित करण्यात आल होत माझ्यावर. रेल्वे स्टेशनजवळच चित्रणाची सारी तयारी झाली. संध्याकाळच दृश्य होत ते आणि त्यासाठी सूर्यप्रकाशाची जरुरी नसल्यान एका भल्या मोठ्या फळीन सूर्यकिरण झाकण्यात आली होती. मोठमोठे जनरेटर्स लावून नि प्रचंड दिवे पेटवून हवी तशी प्रकाशयोजना करण्यात आली होती: सारच काही भव्य होत. तीन कॅमेरे तीन बाजूनी लागले होते व त्यावर जाल, फली व सिन्हा असे तिघेहि प्रथम श्रेणीचे छायालेखक काम करीत होते. मी तेथील एका दुकानात काही खरेदी करीत असते, इतक्यात काही माणस तिथ येतात व माझ्या मुलाबद्दल एकमेकात काही वाईट बोलत असतात. माझ्या मुलाची चाललेली ही निंदा माझ्या कानावर पडल्यान मला सहाजिकच दु:ख होत. पण त्याना ते न दाखविताहि मी हे दु:ख माझ्या चेहऱ्याद्वारा व्यक्त करते तस हे लहानस दृश्य. त्यात सवादहि काही नाही. सार काही मुद्राभिनयान दाखवायच. पण या वेळचा माझा अभिनय श्री. टॅड डॅन्यु लिस्की व पर्ल बक या दोघानाहि एवढा आवडला की दृश्य सपताच त्यानी माझी खूप प्रशसा केली. पर्ल बकनी तर बराच वेळ माझा हात हाती घेऊन ' वा फार छान अभिनय झाला तुमचा ! ' असे हर्षातिशयान उद्गार काढले. खरच, इतका आनद झाला म्हणून सागू ! ही माझी तारीफ माझ्याच तोंडून करते आहे अस समजू नका. पण आत्यंतिक आनदाचा क्षण होता तो. कलावत नाहीतरी शाबासकीचाच भुकेला असतो. त्यात जगन्मान्य लोकाकडून अशी पाठीवर शाबास-

(पृष्ठ ५७ वर चालू)

# यशोदाबाई वाईकर

★

आमच्या प्रतिनिधीकडून

★

'आमच्या नादी लागणारी पुरुषजात किती दिवस आमच्या नादी लागणार हे आम्हाला माहीत असत' –– बाईंचे हे वाक्य ऐकून मी गारच पडलो. कारण आडपडदा न ठेवता अशा गोष्टी मोकळेपणे बोलण्या-ऐकण्याची मला कधीच सवय नव्हती.

★



डावीकडून – यशोदाबाई वाईकर, कौसल्याबाई कोपरकरीण, राधाबाई बुधगावकर

तमाशाच्या कामुक वातावरणात हयात घालविलेल्या बाईचा परिचयलेख द्यावयाचा हे निश्चित झाल्यानंतर माझ्यापुढे मोठा प्रश्न पडला. आता ही 'बाई' भेटायची कुठे? आणि कशी? आणि हा परिचयलेख देणे आपल्याला इतर परिचयलेखासारखे जमणार आहे का?–

–चारआठ दिवस असेच टाळाटाळ करण्यात गेले. आणि एके दिवशी राजाभाऊ थिटयांना मी माझी अडचण सांगितली.

थिटे म्हणाले, "त्यांत अवघड कांही नाही. आपण परवा तमाशाला जाऊ. तिथ मी तुमची ओळख करून देतो. नियमितपणे आठदहा दिवस तुम्ही जा. आणि मग पाहिजे तर त्या बाईचा परिचयलेख तुम्ही द्या!–"

–आपल्याला आज कांही तरी नवीन पाहावयास मिळणार–एका नव्या जगाची आपल्याला ओळख होणार या उर्मीत आम्ही थिएटरमध्ये पाऊल टाकले. थिएटरचे वातावरण एकूण भकास होते. प्रेक्षागृहात आमच्यासुद्धा एकूण चार माणसे होती. त्यात आम्ही दोघे फुकटे. परंतु मला आश्चर्य वाटले ते हे की, चार प्रेक्षकांसमोर जो नाच चालला होता, तो समोर हजारो प्रेक्षक बसले आहेत ह्या जाणिवेने. चार लोकांकरिता आपण काय नाचायचे, ही भावना फडातल्या लोकात मुळीच दिसली नाही. कसेहि नाचले तरी थिएटरकडून आपल्याला जे पैसे मिळणार आहेत ते मिळतीलच, ही भावना त्यांच्या ठिकाणी दिसली नाही.

त्या कंटाळवाण्या प्रकारांत आम्हाला कसलाच रस वाटला नाही. प्रेक्षकगृहातून आम्ही आत असलेल्या खास खुर्च्यांत जाऊन बसलो. एव्हाना बारी बदलली होती. नवीन बारी यशोदाबाईची होती. राजाभाऊंनी आम्हाला त्यांच्याजवळ नेले. बाईना आम्ही संकोचल्या मनाने नमस्कार केला. ४५च्या दरम्यान रेंगाळणाऱ्या बाईंनी आपल्या तोंडावर हसू आणून म्हटले. नमस्ते!–"

राजाभाऊ यशोदाबाईंना म्हणाले, 'यांना तुमचा परिचय 'माणूस' मासिकात द्यावयाचा आहे. उद्या सकाळी ते तुमच्या घरी येतील!"

मासिक, परिचय वगैरे शब्दांचा अर्थ बाईंना नीटसा समजला नसावा. तथापि कसले तरी काम असावे आणि त्याला आपण मदत केली पाहिजे या भूमिकेने यशोदाबाई म्हणाल्या "या ना, सकळी मी घरीच आहे–"

यशोदाबाईंच्या कार्यक्रमाला सुरुवात झाली. त्या गाताना दिसल्या नाहीत. त्यांच्या सख्ख्या दोन बहिणी आणि बहिणीची मुलगी गाऊ आणि नाचू लागल्या. प्रेक्षकांची संख्या आता दहाबारांच्या दरम्यान झाली होती. हाही फड कमी प्रेक्षकांची दखल न घेता थिएटर गच्च भरले आहे या समजुतीने नाचत होता–गात होता.

दुसऱ्या दिवशी सकाळी ८॥ वाजता बाईच्या घरांत आम्ही पाऊल टाकले. रात्रीं बाईशी मी बोललो होतो, त्यांना जवळून पाहिले होते, तरी मी त्यांनाच प्रश्न केला––'यशोदाबाई आहेत का;–'

"या की," किंचित् हंसून यशोदाबाई म्हणाल्या, "मीच की, यशोदाबाई. रात्री तुम्हीच आला होता ना!" रात्रीच्या नि सकाळच्या यशोदाबाईंच्या पेहरावात, चेहेरेपट्टीत इतका कमालीचा फरक दिसला की, त्या माझ्या समोर उभ्या असताना मी त्याना ओळखू शकलो नाही.

रात्रीचे आणि सकाळचे रूप पाहून मला जसे आश्चर्य वाटले तसेच मोठे आश्चर्य दुसरी गोष्ट ऐकून झाले. रात्री तमाशाच्या फडात आपल्या परिवारासह नाचणाऱ्या यशो-

दावाई सकाळी उठल्यानंतर पुण्यातल्या महत्त्वाच्या देवाची दर्शने घेऊन येतात हे ऐकून 'यशोदाबाई वाईकर' तमाशा पाहणारे लोक त्याना ओळखत असले तरी, त्याचे गाव वाई नाही. त्याचे गाव आहे जेजुरी. वाईच्या परिसरात त्याचे गाव गेले असल्यामुळे आणि त्यांच्या दोनहि जीवनांना वाईपासून सुरुवात झाली असल्यामुळे लोक त्याना वाईकर म्हणतात. तमाशा क्षेत्रातले बरेच लोक गावाच्या नावावरून ओळखले जात आहेत. त्याचप्रमाणे त्याची पण परिस्थिती झाली आहे.

यशोदाबाईंचे वय ४५ च्या दरम्यान कुठे तरी रेगाळत असावे. त्याच्या वयाच्या मानाने त्याची शरीरप्रकृती उत्तम दिसते. त्याची जात कोल्हाटी आहे. त्याचे जवळजवळ सगळेच नातलग तमाशाच्या धंद्यात आहेत. राधाबाई बुधगावकरीण त्याच्या मावळणीची मुलगी. मुबईतल्या यमुनाबाई सख्खी चुलत बहीण. त्याचप्रमाणे अनुसूया जेजुरीकरणीशी त्याचे नाते आहे. याशिवाय सारेच सगेसोयरे या धद्यात गुतलेले आहेत.

यशोदाबाईंची संगीत बारी आहे. दोन वहिणी, एक वहिणीची मुलगी नि, त्या स्वत:. भाऊ तबला वाजवण्याचे काम करतो.

पहिल्या भेटीत त्या फारश्या मोकळेपणाने बोलल्या नाहीत. त्याची सारी माहिती काढून घेण्यासाठी एकूण चार वेळा आम्हाला त्याच्या घरी जावे लागले. त्यानी सागितलेली माहिती एकत्र करून सागण्यापेक्षा आमची प्रश्नोत्तरेच देणे जास्त उठावदार होईल.

"काल आम्ही नाचताना पाहिल तो कार्यक्रम किती वेळाचा असतो ?"

"पधरा ते वीस मिनिटाचा !"

"त्या कामाबद्दल, इतक्या लोकासकट तुम्हाला किती पैसे मिळतात ?"

बाईंनी किंचित् नाराजीच्या स्वरांत म्हटले. "त्या सगळ्या कामाबद्दल आम्हाला चार रुपये मिळतात–"

सध्याच्या जगात कोणताहि साधा माणूस एवढ्या मिळकतीवर खुश होणे शक्य नाही. प्रपच चालवणे त्याहून अशक्य. कमी मिळकतीचे मला वाटलेले आश्चर्य मनातल्या मनात दाबून मी म्हटले, "मग एवढ्या लहानशा मिळकतीत तुमच भागत तरी कस ?"

खाली घातलेली मान वर न करताच त्या म्हणाल्या, "दौलत जादा म्हणून एक दोन रुपये मिळतात. चार-सहा रुपयात रोजचा शिधा रोज आणून करून खातो आम्ही ? पण रोज याला आम्हाला दहा रुपये लागतात."

"आणि एखाद्या दिवशी दौलत जादा मिळालाच नाही तर ?"

"तर मग चटणीभाकर !"

यावर आणखी खोलात जाणे जरूर होते. मी विचारले "डॉक्टर किंवा दुसरा एखादा खर्च वाढला तर ?"

"ते तर नेहमीच चालू असतच. त्या वेळी मग कसतरी करायच."

"काल आम्हाला प्रेक्षक फार कमी दिसले. तस नेहमीच असत का ?"

"नाही. आमचा कार्यक्रम नेहमीच चालत असतो. त्यामुळ लोक येत नाहीत. नवीन माणसांचा तमाशा आला तर तिकिट सपून जातात."

"या धंद्याच्या निमित्तान तुम्ही कोणती गाव पाहिलीत ?"

गावाची नाव पण सागावीत तशा त्या म्हणाल्या, "बडोदा, अहमदाबाद, औरगाबाद, सुरत, मुंबई, जळगाव, धुळ, आकोला, अमरावती, मालेगाव, सोलापूर, बार्शी, कोल्हापूर. खेडी तर किती आहेत !"

"प्रत्येक गावच्या प्रेक्षकात काही फरक वाटतो का सगळे सारखेच आहेत ?"

"तस काही सागता येणार नाही. बहुतेकाची जात सारखीच असते !"

वयाच्या कितव्या वर्षी तुम्ही नाचायला सुरवात केली ?"

"वयाच्या पधराव्या वर्षापासून."

"नाचायला सुरवात करण्यापेक्षा लग्न करून ससार केला असता तर बर झाल असत अस तुम्हाला वाटत नाही ?"

माझा हा प्रश्न त्याना खुळचटपणाचा वाटला. हा साहेब काही तरीच विचारतोय असा भाव क्षणभर त्याच्या चेहऱ्यावर उमटला आणि मग त्या म्हणाल्या, "अस वाटण्याच काय कारण ! आमचा धदाच नाचण्याचा ! तुम्हाला खोट सागायच कशाला ?"

मग पुढचा प्रश्न मला विचारावयाचा होता. पण तो कोणत्या स्वरूपात, कोणत्या मापेत विचारावा हे मला समजेना. पुढच्या प्रश्नाची उर्मी मनातून जाईनाही. माझा हा गोंधळ त्यानी ओळखला की काय कोण जाणे, त्या होऊनच म्हणाल्या "माझ इतक वय झाल. मी तशीच थोडी राहिले असेल ? माझ्याही हातून काही तरी घडल असेलच की ! बाणी काही केल तरी गूळ खाणारच. पडद्याच्या आत जाऊन खाईल एवढच !"

"तुम्हाला वाचता—"

"येत नाही."

"मग लावण्या–"

"५०० च्या पुढ पाठ आहेत."

"इतक्या कशा पाठ केल्यात ?"

"तशाच !"

"दारूबंदीचा तुमच्या धद्यावर काय परिणाम झाला ?"

"दौलत जादा कमी झाला. भिंगाणा कमी झाला !"

"सरकारन बऱ्याच तमासगिरांना मदत केली. बक्षिस दिली त्यात तुमच नाव कधी दिसल नाही ?"

या माझ्या प्रश्नावर मात्र त्या नाराज झाल्या. त्या नाराजलेल्या स्वरात म्हणाल्या, "साहेब लोकाची मर्जी. यदा मदतीच्या यादीत नाव आहे अस म्हणतात पण पैसे मिळतील तेव्हा खर !"

"सरकारन तमाशातल्या अश्लीलतेवर बधन घातली हे चागल केल की वाईट ?"

"चागलच झाल ! त्यान तमाशात सुधारणा झाली. मोठमोठे लोक तमाशा पाहायला बायकापोरानिशी येऊ लागले !"

"पण त्यामुळ तमाशातली खरी रग नाहीशी झाली अस म्हणतात ते खर का ?"

यावर त्याना नीटसे उत्तर देता आले नाही गोधळून त्या म्हणाल्या.

"अस काही म्हणता येणार नाही."

"तुम्हाला नाचायला, गायला कुणी शिकवल ?"

"आमची जात हाच आमचा गुरु. लहानपणापासून मी तमाशाच्या फडातून हिंडले. त्यामुळ मला ते आपोआपच आल."

मघाशी त्यानी दिलेले उत्तर मला राहून राहून आठवत होते. तेव्हा मी परत विचारले, "मघाशी तुम्ही म्हणाला होता माझ्याहिकडून काही घडल असेल –!"

"होना. पण ते तेवढ्यापुरतच. आमच्या नादी लागणारी पुरुष जात किती दिवस

आमच्या नादी लागणार हे आम्हाला माहीत असत. आपल्याजवळ तरुणपण आहे तोपर्यंत आम्हाला तो विचारणार. एकदा का वय झाल की, तो आपल्याला सोडून जाणार. नाही तर त्या मार्गाला न गेलेल बर. नाही पेक्षा त्याचा लोभ तेवढ्यापुरताच ! "

बरीच वर्षे तमाशाच्या धद्यात घातल्यामुळे पुरुषाच्या स्वभावाचे अचूक निदान त्यानी केले होते व त्यांनी निर्भिडपणे ते बोलून दाखवले होते. आता गप्प बसण्याची पाळी आली होती माझी ! !

" तुम्ही वहिणीवहिणी नाचता, गाता, मग भावजयाना का नेत नाही – ? "

माझा हा प्रश्न त्याना मुळीच रुचला नाही. ससार उभा करणाऱ्या बायका कशा नाचतील बरे, असा भाव त्यांच्या चेहऱ्यावर उमटला. त्या क्षणाचाहि विलब न लावता म्हणाल्या, " त्या कशा नाचतील बर ! – "

यशोदाबाईंच्या मालकीचे घर कसब्यात आहे आणि त्या आपल्या घरातच राहात आहेत. घर दुमजली असून बऱ्याच वर्षांपूर्वी त्यानी ५०० रुपयाना जागा घेतली होती. त्या जागेवर नतर काही वर्षांनी घर बांधले. घरातील वातावरण, कपडे-लत्ते ठीक वाटले. कॉट, रेडियो, आरसा, कपाट या वस्तू दिसल्या, कारकुनाच्या घरापेक्षा त्या खोलीतला बडेजाव जरासा मोठा वाटला.

यशोदाबाई त्या घरातल्या कर्त्या. दोन भाऊ, दोन भावजया व त्यांची चार मुले; कृष्णा, भागीरथी, शकुतला या तीन बहिणी; एक मृत भगिनीची मुलगी. एवढे प्रचंड कुटुंब त्या घरात राहात आहे. खालची जागा भाड्याने दिली आहे. त्याचे भाडे त्याना २५ रुपये मिळत असते.

रोजच्या आहारात डाळ, भात, भाजी. सणावारी गुळाच्या पोळ्या. आठवड्यातून दोन वेळा बहुतेक करून मटन आणतात. साधारण बऱ्या ससारी माणसासारखा त्यांचा आहार वाटतो.

अनेक प्रश्न विचारून काही खास माहिती मिळते का हे पाहण्याचा आम्ही प्रयत्न केला. पण प्रश्नाचा रोख बदलून बऱ्याच वेळा त्यांनी आम्हाला चकवले. त्यांची ती चलाखी मोठी वाखाणण्यासारखी आहे.

तमाशात कलगी आणि तुरा असे दोन पंथ आहेत. यशोदाबाई कलगीच्या बाजूच्या आहेत.

पुण्याच्या तमाशागृहात त्याचा कार्यक्रम ठरलेला असतो. बाहेरगावाहून कधी बोलावणे आले तर त्या रात्रीच्या कामाबद्दल त्याना २० ते ४० रुपये मिळतात. त्या मिळणाऱ्या पैशातले निम्मे पैसे थिएटर मालकाला मिळतात सोल एजन्सीचाच हा प्रकार असावा.

एखादी मुलगी लग्न न करताच गरोदर राहिली तर त्यांची जात त्या मुलीला वाळीत टाकते. अशा वेळी त्यांच्या जमातीची बैठक भरते. त्या मुलीला परत जातीत घेतले जात नाही. मात्र काही दंड भरून तिच्या नातलगांना जमातीत घेतले जाते.

सुमारे पचवीस वर्षांपूर्वी बाईकराच्या सागण्यावरून यशोदाबाई पुण्याला आल्या. पहिल्या प्रथम त्या पुण्याच्या विजयानंद थिएटरात उभ्या राहिल्या. त्या वेळी त्याना एका रात्रीचे दहा रुपये मिळत होते.

यशोदाबाई जेजुरीच्या राहाणाऱ्या असल्यामुळे म्हणा, की दुसऱ्या काही कारणामुळे म्हणा, त्याचे आराध्य दैवत जेजुरीचा खडोबा आहे. शिवाय काळूबाई पण आहे. दसऱ्याच्या दहा दिवसात त्या जेजुरीला जाऊन राहतात. जेजुरीला घट बसतात. मग त्या माघारी येतात. खडोबाची सोमवती त्या सहसा चुकवीत नाहीत.

१९६० च्या खानेसुमारीत मी गणतीदार होतो. एका अगदी अशिक्षित–नुकत्याच मावळातून आलेल्या बाईच्या दारात माहिती साठी गेलो होतो. बाई बाळतपणातून नुकतीच उठली होती. १५ दिवसाच्या तिच्या अर्भकाची नोद मी घेतल्यानतर तिला त्या गोष्टीचे भारी कौतुक वाटले. बोबड्या भाषेत ती रागडी मुलाला उद्देशून कौतुकाने म्हणाली, " माझ्या छबड्याच नाव सरकारात गेल–"

आणि तोच भाव, तेच कौतुक, तोच आनद मला रोज तमाशात नाचणाऱ्या यशोदाबाईंच्या चेहऱ्यावर दिसला. आपल्या भावाच्या लहान मुलाला खेळवता खेळवता आम्हाला ऐकू येईल अशा आवाजात त्या म्हणाल्या " आमच्या बाळाच पण नाव छापून आणा. त्याला पण काही विचारा. ' — त्या छबड्याच नाव आहे यशवत किंवा राजू.

● ● ●

( मी पाहिलेल्या पर्ल बक ...... पृष्ठ ५४ वरून ...... )


कीची टाळी पडायला खरोखरीच भाग्य लागत. ते भाग्य मला लाभल यातच समाधान ! " लीलाबाईंच्या डोळ्यात या वेळी पाणी चमकले.

' पर्ल बक याच्याविषयी आणखी काम वाटत आपल्याला ? ' मुलाखत आटोपती घेण्याच्या इराद्यानेच मी अखेरचा प्रश्न केला.

"त्या तशा मला सनातनी, कुटुबवत्सल गृहिणी वाटल्या. अमेरिकेतील सध्याच घरसोडीच जीवन त्याना तितकस पसत पडत नाही. घटस्फोटाचे प्रकार तर त्याना उबगच आणतात. या विषयावर आम्ही कधी सविस्तरपण बोललो नाही. पण एकत्र कुटुबपद्धतीवर त्याचा विश्वास बसावा अस दिसत. त्याच्या बोलण्यावरून त्या भात्र इकड आल्या तरी सदैव आपल्या मुलाबद्दल, नातवडाबद्दल, लेकीसुनांबद्दल सदैव बोलत असतात. सर्वसामान्य आईसारख. या विषयावर बोलताना मात्र त्या खूप खुलतात. मग आपल्या मुलाच कौतुक सागतील, नातवाच्या खट्याळपणाच वर्णन करीत बसतील. एकदा त्यानी माझ्या कुटुंबाची माहिती विचारली. मी माझ्या मुलांची माहिती सागून माझा एक मुलगा अमेरिकेत शिकत असल्याच सांगताच त्यानी त्याचा चटकन् पत्ता टिपून घेतला. '

उदेपुरला त्यानी खूप खरेदी केली. नानाविध वस्तूची पुडकी पुढ ठेवून त्या हॉटेलच्या दर्शनी भागातच बसल्या होत्या. मी त्याना उत्सुकतेन विचारल, ' हे काय बाई ? ' ' हे होय. तुमच्या भारताचा सगळा ठेवा खरेदी केला आहे. हे माझ्या मुलासाठी, हे माझ्या नातवंडासाठी, हे माझ्या सुनेसाठी नि हे माझ्या मुलीसाठी ! ' एक एक पुडका बाजूला करीत अगदी मोकळेपणान त्या सागत होत्या. त्या वेळी त्या एक विश्वविख्यात लेखिका आहेत हे साफ विसरल्या होत्या आणि मलाहि त्यांच्या ठायी दिसत होती ती एक सहृदय माता, प्रेमळ आजी आणि कर्तव्यदक्ष सासूबाई ! ' लीलाबाई बोलता बोलता थाबल्या. त्याच्या आवाजात कमालीचा कप निर्माण झाला होता. 'एका थोर व्यक्तीच असे अगदी वेगळ नि आगळ दर्शन घडण्यातहि काही विलक्षण आनद असतो नाही ?'

● ● ●



कु. विनोद दिवेकर

श्याम फडके यांचा फार्स

# 'तीन चोक तेरा'

## एक जमलेला हिशोब

[आमचे प्रतिनिधीकडून]

ठाणे येथील स्वाती थिएटर्सच्या कलाकारांनी रंगभूमीवर सध्या गाजत ठेवलेला श्री. श्याम फडके यांचा "तीन चोक तेरा" हा गमतीदार हिशोब हा एक प्रेक्षकांना पटलेला हिशोब आहे. मुंबई व पुणे येथे आतापर्यंत याचे बरेच प्रयोग मुद्दाम जाऊन पाहणारा प्रेक्षक 'झोपी गेलेला जागा झाला' व 'दिनूच्या सासूबाई राधाबाई' या फार्सांनी गुदगुल्या केलेला प्रेक्षक होता. श्री. बबन प्रभू व आत्माराम भेंडे या दुकलीच्या अभिनयाचा मोठा वाटा मान्य करूनही हे दोन फार्स पाहतांना प्रेक्षक या फार्सची जातकुळी इंग्रजी आहे हे विसरू शकत नाही. या दोन गाजलेल्या फार्समधील पुष्कळसे विनोद हे निव्वळ इंग्रजी विनोदांचे मराठी तर्जुमेच होते. असे असूनही या दोन फार्सांनी मराठी रंगभूमीवर जो वेगळा प्रवाह निर्माण केला त्याचे महत्त्व यत्किंचितही कमी होत नाही.

'तीन चोक तेरा' या विनोदी नाटकाला लेखक फार्सच म्हणतो. वर उल्लेखलेले साहेबी जातकुळीचे यशस्वी फार्स पाहूनच आपण प्रस्तुतचे विनोदी नाटक लिहिले असे श्याम फडके यानी प्रस्तावनेत म्हटले आहे. 'तीन चोक तेरा" चा सर्व चेहरामोहरा हा अस्सल मराठी असल्यामुळे आता हा प्रवाह नीट वळणावर आला असे म्हणण्यास हरकत नाही. तो वळणावर आणण्यात श्याम फडके यानी यश मिळवले, ते खरोखर कौतुकास्पद आहे.

फार्स हा प्रकार व्यंगचित्रासारखा आहे. उत्तम चित्रकार नसला तरी चालतो. परंतु वेगवेगळया व्यक्तींचे चेहरेमोहरे त्यांतल्या वैशिष्ट्यासह त्याला उभे करता आले पाहिजेत. या वैशिष्यातूनच विनोद निर्माण करता आला पाहिजे. परंतु एवढयाने काही व्यंगचित्र होत नाही. त्या त्या व्यक्तीच्या संबंधातील एखादें वक्तव्य वा प्रसंग टिपून त्या अनुषंगाने असे चित्र काढता आले पाहिजे, की जे पाहताच त्यातील मर्म समजून पाहणारा हसत सुटला पाहिजे. फार्स लिहिणारा लेखक म्हणूनच, उत्तम नाटककार असो वा नसो, त्याला आठदहा वैशिष्टयपूर्ण पात्रे जन्माला घालता आली पाहिजेत. एकदा ही पात्रे उभी राहिली, की प्रसंगांची गुंफण जरी कच्ची असली तरी अंगविक्षेपांच्या जोरावर त्यातील पात्रे आपली वैशिष्ट्यें पुनःपुनः प्रेक्षकांच्या प्रत्ययाला आणीत. हास्याचा प्रवाह वाहता ठेवू शकतात. आर्थातच "जो गल्लादास तो कालिदास" या कै. माधवराव जोशी यांच्या मताप्रमाणे एकदा नाटक चांगले चालू लागले की, लेखक उत्तम नाटककारही होतो.

### संविधानक

"तीन चोक तेरा" या नाटकाचे यश लेखकाचे आहेच, परंतु त्याहून अधिक महत्वाचे यश आहे ते दिग्दर्शकाचे. आणि कलाकरांचे मूळ नाटकाचे संविधानक फारच साधे सोपे आहे. वासुअण्णा मालवणकर हे 'उचापती आणि कंपनी'चे मालक. आपल्या स्वरूपा नावाच्या कन्येसाठी 'जावई कम सेक्रेटरी' पाहिजे अशी जाहिरात ते देतात. त्याअनुसार राजा शिंदे, वसंत कोरडे, शरद गोसावी व शशिकांत देव हे चार तरुण मालवणकरांकडे दाखल होतात. यांतील पहिले पंजाब बी. ए. फेल, दुसरे जवळजवळ जीवनाच्या शाळेतच शिकलेले, तिसरे शम्मीकपूरच्या जातकुळीचे आणि चौथे देवबाप्पा जाहिरतीपूर्वीच मालवणकरांच्या मुलीशी संधान बांधलेले असतात. स्वरूपेचे जे रूप प्रथम या उपवरांना दिसते ते गडकऱ्यांच्या इंदूबिंदूचे मिश्रण असते. पहिले तिघे पस्तावतात. परंतु देव मात्र अंदरकी बात जाणत असल्यामुळे काळचा रंगाशी लग्न लावण्याचा बेत जाहीर करतो.

एवढ्यात 'मावशीकडे जाते' अशी थाप देऊन स्वरूपा अदृश्य होते. श्यामलेच्या गोंडस रूपात ती स्वरूपाची चुलत बहीण म्हणून त्या घरात परत येते. पहिले तिघे श्यामलेला आळवू लागतात. परंतु अनेक वर्षे साधू बनलेले स्वरूपाचे काका अवतीर्ण होऊन स्वरूपाशी लग्न लावणाऱ्यास पन्नास हजार रुपयांचे बक्षीस देण्याचे आमिष दाखवतात व अट म्हणून जावयाने योगसाधना केली पाहिजे असे सांगतात. पहिले तिघे पैसापंढरीचे वारकरी बनून या काकांच्या नादी लागतात. अखेर त्या पन्नास हजार रुपयांच्या नोटा 'वर सुभाष खाली गांधी' छापाच्या निघतात व तिघे पस्तावतात. मालवणकर हर्षभराने स्वरूपा देवांनाच दिल्याचे सांगतात व आपण चुकीचा हिशोब मुद्दाम मांडून सर्वांना कसे बनवले हे खुशीत सांगू लागतात. देवबुवा आपले यापूर्वीच स्वरूपाशी संधान होते व असा चुकीचा हिशोब मांडल्यामुळे उलट मला चांगली संधी मिळाली असे सांगून वासुअण्णांचा नक्षा उतरवतात.

या सर्व गोंधळांत वासुअण्णांची बायको

लक्ष्मीबाई, मुलगा नंदकुमार व 'आचारी कम प्यून' विनायक यानीही बराच हलकल्लोळ निर्माण केला आहे.

**वैशिष्टयपूर्ण विनोद**

यत्किंचितही अद्‌भुतता या कथानकात नाही. साधे सरळ कथानक आहे, परंतु प्रत्येक पात्र वैशिष्टयपूर्ण आहे–विशिष्ट लकबाचे आहे. बायकोच्या बडबडीकडे दुर्लक्ष करून–भरपूर मिशा ठेवून, पाऊण पॅन्ट घालणारे 'उचापती आणि कंपनी'चे मालक वासूअण्णा, त्याची "हो ...... क्का" म्हणून पदोपदी हेटाळणी करणारी बायको लक्ष्मीबाई, घरात घोटाळे माजवणारा आचारी कम प्यून विनायक याच्याकरवी पहिल्या अंकात शाब्दिक विनोदावर हास्य रस निर्माण होऊं लागतो व जावई दाखल होताच प्रासंगिक विनोदाची जोड मिळून पहिल्या अंकाची विनोदी फिरत अखेरपर्यंत टिकते. या अंकातील फडके याचे खास विनोदही वैशिष्टयपूर्ण आहेत. उदा:–

शिंदे–मला माझी जागा हवी आहे आणि ती मी घेणारच.

कोरडे–छान आहे! आपण टिळकचरित्र वाचता वाटत हल्ली?

किंवा–

वासुअण्णा–आमची स्वरूपा हुशार आहे.

नंदु–स्वरूपाताई प्रेमळ आहे.

विनायक–स्वयंपाकपाणी सगळं येत तिला.

नंदू–ती केरम उत्तम खेळते.

विनायक–पोहण्याची बक्षिस मिळवली आहेत तिनं. टिळक टॅंकात वरून खाली सुट्टी उडी मारते.

नंदू–बक्षिसाचे हे पेले.

विनायक–त्यातूनच हल्ली पाणी पितो आम्ही.

या विनोदांचा उल्लेख पुरेसा आहे.

**कलाकारांचे यश**

दुसरा अंक श्री. प्रभाकर केळुसकर यांनी साकार केलेल्या वसंत कोरडे या पात्रामुळे फारच रंगत घेतो. श्री. केळुसकर यांनी दाखवलेल्या चॅप्लीनच्या चालण्यातल्या लकबा, दोस्तांना उठवण्याकरिता काढलेल्या कोंबड्यांचा आरव, आणि रॉक अ‍ॅन्ड रोल नृत्याच्या प्रसंगात त्यांनी केलेले अनृत्य हे त्यांच्या अभिनयकौशल्याची साक्ष पटवतात. त्यांच्या सहजसुंदर अभिनयापुढे प्रभाकर पत्की (शरद गोसावी) व रमाकांत मोरे (राजा शिंदे) हे थोडेसे फिके पडतात. त्यांच्या अभिनयातील अभिनय जाणवतो एवढाच दोष! एरवी त्यांची कामेही सफाइदार झालेली आहेत.

तिसऱ्या अंकात मजा भरली आहे ती रघुकाकांमुळे! रघुकाकाचे संवाद म्हणताना "तुझे आहे तुजपाशी' मधील काकाजीचे जे नर्म विडंबन केले आहे ते जाणत्या प्रेक्षकांना आवडल्याशिवाय राहणार नाही. या बाबतीत दिग्दर्शक मुकुंदराव कोठारे व रघुकाकांचे काम करणारे टाकळकर यांचे कौतुक करावयास हवे.

"या इथं अशी मैफल भरली होती. बाई गात होती पुरिया......" या 'तुझे आहे तुजपाशी' मधील काकाजीच्या संवादाप्रमाणे सादर केलेले–

"आमचे आजोबा असे परसात उभे राहायचे आणि ओरडायचे–रघ्या......बस!.. हे रघुकाकांचे प्रदीर्घ भाषण उत्तम गद्य विडंबनाचा नमुना आहे. "इथं एक बाज होती. एकवीस बाळंतपण पाहिली होती तिनं........" या पुन:पुन: सांगितलेल्या माहितीमुळे निर्माण होणारा विनोद म्हणजे 'भटाला दिली ओसरी' या नाटकातील मास्तरीण बाईंनी— "जागा कशी केर काढून—शेणाने सारवून लख्ख केली होती–" या पुन:पुन: सांगितलेल्या माहितीमुळे निर्माण होणाऱ्या विनोदाची सुधारून वाढवलेली उत्तम रंगावृत्ती आहे.

या नाटकाच्या यशात आणखी दोघांचा प्रमुख वाटा आहे. कु. विनोद दिवेकर यांनी स्वरूपाचे व श्यामलेचे काम अत्यंत मोकळेपणाने व सफाईने केले आहे. त्यांच्या कामात उत्तम गोडवा आहे आणि फार्सचे भानही आहे. विनायकाची भूमिका करणारे बाळ देवसाळी यांनी घाणेकराच्या पद्धतीने विनोद करण्याचा यशस्वी प्रयत्न केलेला आहे. मात्र स्वत:चे वैशिष्टय सापडण्यासाठी श्री. शंकर घाणेकर यांची कुबड विनायकाच्या कामात त्यांनी सोडायला हवी. मात्र देवसाळी यांनी उत्तम रंग भरला आहे.

**आक्षेपार्ह बदल**

श्याम फडके यांनी प्रस्तावनेत म्हटले आहे "हा फार्स गलिच्छतेपासून दूर ठेवण्याचा मी प्रामाणिक प्रयत्न केला आहे. म्हणूनच हा फार्स रंगभूमीवर करणारांनी त्याला गालबोट लावू नये..." परंतु या सूचनेकडे प्रभाकर पत्की या शरद गोसावीची भूमिका करणाऱ्या पात्राने दुर्लक्ष केले ते जाणवते. मूळ नाटकात त्याच्या तोंडी पृ. ५७ वर खालील वाक्य आहे.

गोसावी– प्रकाश निघून जातो तेव्हा माणूस खरं प्रेम करतो

हे वाक्य रंगभूमीवर म्हणताना पत्की त्यात जो बदल करतात त्याकडे श्याम फडके यांनी दुर्लक्ष का करावे? हा बदल निश्चित आक्षेपार्ह आहे. याहून आक्षेपार्ह आहे. वासूअण्णानी वाळयाच्या पडद्यावर केलेला गलिच्छपणा!

पृ. ३५ वर मूळ नाटकात खालील वाक्य आहे–

वासूअण्णा घ्या, घ्या. स्वरूपेनेच बॉर्डर शिवली आहे. घ्या-वारा. थंड वाटेल तुम्हाला.

यापुढे वासुअण्णा जो विनोद करतात —

"फक्त बॉर्डर स्वरूपाची आहे. वाळा नाही." — हा मूळ पुस्तकात नाही. हा विनोद .. आधी विनोद नाही आणि असे गलिच्छ उल्लेख घुसडल्यामुळे नाटकाविषयी बरे झालेले मत क्षणार्धात डागळते त्याचीहि स्वाती थिएटर्सनी दखल घ्यावी.

हे विनोदी नाटक फार्सपद्धतीने बसविण्याची कामगिरी कोठारे यांनी यशस्वीपणे पार पाडली आहे. किंबहुना कोठारे यांचे कुशल दिग्दर्शन झाले नसते तर हे नाटक कदाचित वहावत गेलेही असते. कोठारे यांना-सर्वच कलाकारानी उत्तम साथ दिली आहे.

श्याम फडके यांनी यापूर्वी काही नाटय लेखन केले असल्यास रंगभूमीवर त्याचे फारसे प्रयोग झालेले नाहीत. त्या दृष्टीने अगदी साध्या कथानकाचा हा विनोदी फार्स लिहून त्यांनी जे यश संपादन केले आहे व फार्स प्रकाराचे इंग्रजी वळण मोडण्याची जी कामगिरी केली आहे, त्याबद्दल आम्ही त्याचे अभिनंदन करतो. त्यांच्या या कामगिरीचे मराठी प्रेक्षक यथोचित स्वागत करीतच आहेत. निर्मळ मनोरंजनासाठी प्रत्येकाने हा नाटयप्रयोग अवश्य पाहावा. ● ● ●

**तीन चोक तेरा**

श्याम फडके


सादरकर्ते–स्वाति थिएटरर्स, ठाणे.

पुस्तक प्रकाशक–रामकृष्ण बुक डेपो, मुंबई.

नेहमीपेक्षा वेगळे नाटक

# एक असतो राजा

: समीक्षक : अभ्यासू



शं. ना. नवरे

“काही माणसांना आकाशातच राहायला आवडते तारे म्हणून ...... ते तियेच चमकतात. जमिनीवर आले की ते दगड होतात... शोधून सुद्धा मिळत नाहीत...” आपले मन राजा बोलून दाखवतो.

आकाशात तारा म्हणून राहू इच्छिणाऱ्या राजाला जमिनीवरच्या सामान्य गोष्टींचे आकर्षण कसे वाटणार? त्याला समाधान कशातच नसते. कॉलेजात गेला तिथे समाधान नाही. म्हणाला मला आर्टस स्कूलला जायचे होते. मग म्हणाला मला नोकरी करायची होती. आजोबांनी त्याला ब्रह्मे सॉलिसिटर्सकडे नोकरी मिळवून दिली. पण तिथे तो नीट कामच करीना. सारखा दांड्या मारू लागला. का आला नाहीस, म्हणून विचारले तर थापा मारू लागला—अगदी तोंडाला येतील त्या!

अन त्याला थापा मारण्याची सवयच जडली. प्रत्येकाला तो थाप देऊ लागला. छोटी थाप आणि मोठी थाप. तीन वेळा तीन मुलींना त्याने लग्नाचे वचन बेधडक दिले. ऑफिसच्या पैशांचा तो गैरवापर करू लागला. लग्नाच्या थापा आणि पैशांचा गैरवापर यांमुळे तो गोत्यात आला.

असा हा जगावेगळा राजा. मला तो भेटला ५ मे या दिवशी. मुंबईच्या जयहिंद कॉलेजच्या नाटचगृहात. ‘एक असतो राजा’ या नाटकाचा तो नायक. नाटककार शं. ना. नवरे यांनी निर्माण केलेले हे पात्र आगळे आहे. हे नाटकही आगळे आहे. नाटकाच्या नेहमीच्या मोजपट्टया लावल्या तर या नाटकावर अन्याय होईल. स्थूल स्वरूपाचा संघर्ष या नाटकात नाही. सरळपणे सांगता येईल असे स्थूल स्वरूपाचे कथानक येथे नाही. ओढून ताणून आणलेला, हसविण्याची प्रतिज्ञा करून पेरलेला विनोद येथे नाही. करुणरसाचा धबधबा येथे नाही. आणि तरीही हे नाटक प्रेक्षकांना खुर्चीत खिळवून ठेवते. नाटककाराचे यश आहे ते या ठिकाणी!

### परस्परविरोधी पात्रे

नवरे यांनी परस्परविरोधी स्वभावांची पात्ररचना खुबीने करून नाटयाची रंगत साधली आहे. मनाने अस्मानात भराऱ्या घेणारा राजा तर जमिनीवर घट्ट पाय रोवून उभा असलेला, रुक्ष, व्यवहारी बापू (राजाचा बाप) राजा थापाड्या आहे हे कळूनही त्याच्याशी लग्न करू इच्छिणारी मालू तर त्याचा खोटेपणा कळताच लग्न मोडणारी अलका. राजासारखीच स्वप्नाळू मधुराणी. सगळ्यांपेक्षा अगदी वेगळे वाटणारे, पेन्शन, पासबुक, विमा यांचा ध्यास घेतलेले, भूतकाळात मनाने रमणारे नाना! राजाची साधीभोळी आई शारदा. या साऱ्या मंडळींच्या भिन्नभिन्न स्वभावातून नाटच उमलते आणि फुलते. घटनांची घोडदौड नसतानाहि भरपूर नाटच येथे आकारास येते.

तिसऱ्या अंकात राजाला मधुराणी भेटते. दोघांच्या मनाच्या तारा सुरेख जुळून येतात. पतित जिणे जगलेली एक्स्ट्रॉ नटी मधुराणी आणि अनेक गोंधळ निर्माण करून ठेवलेला राजा — आयुष्याचे नवे पान लिहिण्याचा संकल्प सच्चेपणाने केला जातो. थापा मारण्याच्या — नव्हे थाप हेच सत्य मानून त्यात गुंगून जाण्याच्या — सवयीप्रमाणे राजा मधुराणीला सांगतो की ‘मला लेखक म्हणून मद्रासच्या जेमिनी स्टूडिओत नोकरी मिळाली आहे.’ दोघे मद्रासला जाण्याचे निश्चित करतात. तिकिटे काढायला मधुराणी स्टेशनकडे जाते. आईबापांचा निरोप घेऊन, हातात बॅग घेऊन राजा घराबाहेर पडतो.

नाटक येथेच संपले काय? तसे ते संपले तर वास्तवता कोठे उरली? राजाला मद्रासचे नोकरीचे निमंत्रणच नव्हते. तो जाणार कसा? — जरा वेळाने स्वारी बॅगसह खिडकीतून उडी मारून घरात प्रवेश करते. करणारच! — जीवन हे असेच नाही काय?

या नाटकात राजाच्या वेगवेगळ्या थापांमुळे आणि बापूंनी पदोपदी घेतलेल्या त्याच्या हजेरीमुळे आपोआप भरपूर विनोद निर्माण होतो. नाना कालच्या आठवणी काढतात अन् त्याच वेळी राजा उद्यांची स्वप्ने रंगवतो. हा विरोध हृद्य वाटतो. राजा आणि त्याचा दोस्त चंदू यांची भेट ऐतिहासिक नाटकातील संवादांतून घडविण्याची नवरे यांची युक्ति राजाच्या नाटकाच्या वेडावर एकदम प्रकाश टाकते. तिसऱ्या अंकातील राजा-मधुराणीचा प्रवेश काव्याच्या स्तरावर जातो. वृद्ध नानांचे जीवन आणि मरण कठोर वस्तुस्थितीचे दर्शन घडविते. पति आणि पुत्र यांच्या संघर्षातील शारदाबाईंची कुचंबणा एकदम परिचित वाटते.

### प्रसन्न संवाद

चांगले संवाद ही या नाटकाची मोठीच जमेची बाजू. नाटकी खटकेबाजपणा त्यात नाही. पण मन प्रसन्न करण्याचे सामर्थ्य त्यांत निश्चित आढळते. लेखनाच्या ओघात नवरे अनेक सुभाषितवजा वाक्ये लिहून गेले आहेत. ‘शब्द आपल्या धर्माने बरोबर अर्थ देत असतील या भरंवशावर स्वस्थ बसून त्या शब्दांचा मी फक्त ध्वनि ऐकत असते.’ ‘नव्या आयुष्याची सुरुवात करावयाची म्हणून रोज रोज मी दिवसाचं एकेक पान उलटून टाकतो, पण माझ्या दिवसाच्या पानाचा कागद असा आहे, त्याच्यावर नशिबाची शाई फुटते. नव्या दिवसाचं पान उलटलं तर पुन्हा त्याच्यावर डाग असतोच — दुर्दैवाचा.’ यासारखी वाक्ये मनाला वरच्या दर्जाचा आनंद देऊन जातात. नाना हे नाटकाशी

[पृष्ठ ६४ वर चालू]

कालेलकरी चाकोरी न सोडणारा....

# "हा माझा मार्ग एकला"

: समीक्षक :

रंगा भराठे



सचीन ! आतां 'युकिवारिसू' भेटेपर्यंत थांबायचं नाहीं हं !

चित्रपट निर्मितीचा राजमार्ग सोडून काहीतरी निराळचा प्रेक्षकापुढे ठेवावयाचे या विचाराने निर्माते श्री. सुधीर फडके यांनी ह्या चित्रपटाची आखणी केली आहे. अर्थातच गल्ल्यासाठी उपयोगी पडणारा मालमसाला न वापरता चित्रपट यशस्वी करण्याचा प्रयत्न करताना धोका पत्करावा लागतो. तो धोका पत्करण्यासारख्या इतर काही जमेच्या बाजू चित्रपटाला लाभाव्या लागतात. श्री. राजा परांजपे यांचे दिग्दर्शन आणि एका नव्या बालकलाकाराची अभिनयनिपुणता यांवर विसंबून हा धोका निर्मात्यांनी पत्करला आहे व या प्रयत्नात ते बरेच यशस्वी झालेले आहेत. शंभर टक्के यश मिळाले नाही याचे कारण दिग्दर्शन कमी पडले किंवा बालकलाकाराची शक्ती कमी पडली; हे नसून त्याला अन्य कारणे आहेत. परंतु या चित्रपटाच्या निर्मितीने बालनट सचीनचा उदय झाला हीच एक मोठी जमेची बाजू मानायला हवी. इतका प्रभाव हा चिमुरडा सचीन प्रेक्षकांवर पाडतो.

### कथा

अतुल या सावत्र आईच्या जाचात सापडलेल्या मुलाची आणि त्याचा लळा लागलेल्या एका मोटर मेकॅनिकची ही कथा आहे. अतुलची सावत्र आई (जीवनकला) त्याला जाच करते. त्याचे वडील (राजा पटवर्धन) आपल्या कजाग बायकोचा प्रतिकार करू शकत नाहीत. अतुलची सावत्र आई अतुलवर चोरीचा आळ आणते व अतुलला त्या रात्री अंथरुणासह ओटीवर फेकण्यात येते. आपल्याला सकाळी पोलिसच्या हवाली करण्याचा सल्ला वडिलांना आई, देत आहे हे अतुल आपल्या घरात चाललेल्या कुजबुजीवरून ऐकतो व घाबरून घर सोडून पळून जातो. रस्त्यात त्याची आणि मोटर मेकॅनिक शंकर (राजा परांजपे) याची गाठ पडते. दारू पिऊन शंकर घरी परतत असतो. त्याच्या मागोमाग अतुल त्याच्या घरी जातो व ती रात्र त्याच्याच खाटेखाली झोपून काढतो. सकाळी खाट उचलल्यावर शंकरला अतुल दिसतो. त्या अजाण मुलासंबंधी हळूहळू त्याच्या मनात—अनुकंपा-सहानुभूति व अखेर लळा निर्माण होतो. तो त्याला आपल्या घरी ठेवून घेतो. अतुल एके दिवशी शंकरकडून दारू पिणार नाही असे कबूल करून घेतो. त्याच्यावरील प्रेमापायी शंकर दारू सोडतो.

आणखी एक धागा अतुलला शंकरशी जखडून टाकतो. अतुलची आई ही शंकरची प्रेयसी असते. शंकरशी तिचे लग्न होऊ शकलेले नसते. परंतु तिचा मुलगा मात्र अशा रीतीने त्याच्या आसऱ्याला आलेला असतो. शंकरकडे उमा (सीमा) चा फोटो असतो, तो पाहतांना अतुल तिला आई म्हणून ओळखतो.

इकडे अतुलच्या बेपत्ता होण्यामुळे त्याचा बाप अस्वस्थ होतो. ऑफिसात त्याचे लक्ष लागत नाही व कामावर न गेल्यामुळे अफरातफरीचा आळ येऊन त्याची नोकरी जाते.

याच सुमारास शंकरला लाटरीचे बक्षीस लागते व तो 'अतुल-गॅरेज' काढतो. अतुलच्या पायगुणानेच हे नशीब उघडले असे तो मानीत असतो. अतुलच्या बापाला शंकरच्याच गॅरेजमध्ये नोकरी लागते. याचमुळे अर्थात अतुल म्हणजे आपलाच मुलगा आहे हे त्याच्या वडिलाना समजते. घरी त्याच्या सावत्र आईला अतुलच्या वैभवाची बातमी कळताच ती दुष्ट बाई या संधीचा फायदा घेण्याचे ठरवते. नवऱ्याला पुढे घालून अतुलची आई शंकरकडे अतुलची मागणी करते. मुलगा मिळत नसल्यास पंचवीस हजार रुपये मागते. शंकर मागणी फेटाळतो. प्रकरण कोर्टात जाते व निकाल आईवडिलांच्या बाजूने लागतो.

अतुल घरातून जाताक्षणीच शंकरला जीवन असह्य होते. परंतु अतुलच पुन: पळून त्याच्याकडे येतो. त्याच्या निष्पाप प्रेमापुढे सगळे तुच्छ आहे अशी शंकरची खात्री पटते.

अतुलचे आईवडील पुन: येऊन अतुलची मागणी करतात. अतुलची आई आणखी एक पर्याय सुचवते. अतुलच्या बदल्यात शंकरचा बंगला मोटर सर्व मिळाल्यास पुन: कोर्टात जायचा प्रसंग न आणण्याचे ती आश्वासन देते. शंकर या कसोटीला उतरतो. वैभवावर लाथ मारून अतुलला घेऊन तो निघून जातो.

### उधारउसनवारकथा

चित्रपटाची वरील कथा–पटकथा व संवाद मधुसूदन कालेलकरांचे आहेत. वस्तुत: चार्ली चापलीनच्या व या मूकपटाचा हा विषय. त्यावरून हिंदीत काही वर्षापूर्वी 'मस्ताना' हा चांगला चित्रपट येऊन गेला. मोतीलाल व मास्टर रोमी यांनी त्यात अप्रतिम भूमिका केलेल्या होत्या. तरीपण चित्रपटाच्या टायटल्स्मध्ये सर्व काही कालेलकरांच्या नांवे जमा दाखवतो आहे. याचा अर्थ मूळ चांगल्या कथेत जे न पटणारे फेरबदल आहेत ती कालेलकरांची खास कलमबहादुरी आहे एवढाच घ्यायला हवा.

श्री. कालेलकरांच्या या कथेत योगायोग खच्चून भरलेले आहेत. शंकर-अतुलांची भेट, अतुलची आई हीच शंकरची प्रेयसी निघणे, लॉटरीचे तिकीट फुटणे, अतुलच्या वडिलांना नेमकी शंकरच्या गॅरेजमध्येच नोकरी मिळणे एवढे योगायोग या चित्रपटात आलेले आहेत. आता कालेलकरांना–राजाभाऊंसारखा दिग्दर्शक व सचीनसारखा गोड छोकरा अतुलच्या कामाला मिळाला हा खरोखर त्यांनी योगायोग समजावा ! बरे पटकथा बरी म्हणावी तर सुरवातीची सगळी दृश्ये सावत्र आईच्या जाचाचीच. एखाद्या परिकथेतल्या दुष्ट राणीसारखे संवाद आणि दुष्ट राणीच्या दिमतीला एक पोचट राजाही आहे ! जणू या सावत्र आईला मुलाला सारखे बदडण्याखेरीज दुसरा धंदाच नसतो. सावत्रपणाचे रंग किती गडद करावे याचाही पोच कालेलकरांना नाही. चित्रपट गति घेतो तो शंकरच्या व अतुलच्या भेटीनंतर. पण मग कालेलकरांना फारसे कामच नाही. राजा परांजपे व सचीन यांच्या अभिनयकौशल्यावर पुढचा चित्रपट उभा राहतो.

### अभिनय

राजा परांजपे यांनी टोप घालून तरुण मोटर मेकॅनिक शंकरचे काम चांगले वठवण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु टोप घालून टक्कल लपले तरी वय लपत नाही. ते डोळ्यांमधून, चेहऱ्याच्या स्नायूंमधून, कातडीच्या रेषा ओलांडून बाहेर येतेच. त्यामुळे या शंकराच्या कृत्रिम जटेत जेव्हा उमा अवतरते त्या वेळी राजाभाऊंची कीव येऊ लागते. शंकराच्या प्रेयसीचा हा भाग घुसडल्यामुळे चित्रपटाला यत्किंचितही उठाव आलेला नसून त्यामुळे वाजवीपेक्षा अधिक तरुण दिसण्याची न पेलणारी जबाबदारी राजा परांजपे यांच्या शिरावर पडली आहे. (मग निदान बराच कालावधि दाखवून प्रेयसी तरी अधिक प्रौढा दाखवायची !) या प्रणयप्रसंगाचा ताण या वयांत परांजपे यांना सहन होत नाही. राजा परांजपे हे उत्तम नट असले तरी अभिनयाच्या जोरावर वयांतले किती अंतर कापणार. त्यालाही मर्यादा आहेतच ना ! जिथे उमेचा संबंध येत नाही त्या सर्व प्रसंगांत राजाभाऊंनी आपल्या भूमिकेला पुरेपूर न्याय दिलेला आहे. सीमाला फारसे काम नाहीच व जीवनकलेने सावत्र आई संवादावरहुकूम उभी केली आहे. अतुलच्या बापाच्या भूमिकेत राजा पटवर्धनांनी गाडगिळांचा वंडू का उभा करावा कळत नाही ! का वंडूचे भूत त्यांच्या मानेवरून आता उतरणारच नाही ? एरंडेल प्याल्यासारखा चेहरा केला की, हतबल नवऱ्याची भूमिका स्पष्ट झाली असा समज त्यांनी का करून घेतला आहे ? बरे राजाभाऊ परांजप्यांनी सचीनसारख्याला उत्तम अभिनय शिकवला आणि या वाढलेल्या नटवर्याला मोकळे का सोडले ?

### सचीनचे यश हे राजाभाऊंचे कर्तृत्व

सचीन या छोकऱ्याकडून परांजपे यांनी अतुलचे काम उत्तम करून घेतले आहे. अर्थात सचीनच्या ठिकाणी विलक्षण समज आणि जन्मत:च अभिनयकौशल्य असल्याखेरीज हे यश लाभले नसेल. या उत्तम दिग्दर्शकाला एवढा गुणी बालनट यापूर्वी सांपडलाच नव्हता असे सचीनची भूमिका पाहतांना वाटले. सचीनने अभिनयाचा उच्चांक गाठला आहे तो मात्र सरबत म्हणून तो दारू पितो त्या वेळेच्या प्रसंगात ! ह्या प्रसंगात सचीनने राजा परांजप्यांना अशी साथ दिली आहे की, हा प्रसंग पाहताना प्रत्येक प्रेक्षकाचे अंत:करण हेलावल्याखेरीज राहात नाही. राजाभाऊ परांजप्यांना सचीन सापडला हा या चित्रपटाच्या एकल्या मार्गावरचा मोठा लाभ असे आम्ही म्हणालो ते याचसाठी.


### संगीत व छायाचित्रण

सुधीर फडके यांनी स्वत:च संगीताची बाजू सांभाळली असून संगीताचे योग्य तेवढेच महत्त्व राखले आहे. चित्रपटात एकूण चार गाणी असून त्यातली "हा माझा मार्ग एकला" व "मंपली कहाणी माझी" ही दोन समयोचित आहेत. शिशुसमूहगीत रविंद्र भटांनी चांगले जमवले आहे. परंतु ते गीत व उमाच्या तोंडी घातलेले अंगाईगीत ही दोन्ही चित्रपटात अवश्य होतीच असे नाही, गोर्ले यांचे छायाचित्रण उत्तम आहे.

### यश शंभर टक्के नाही !

असे सर्व असूनही सर्व चित्रपटाचा असा जो एक संकलित परिणाम व्हावयास हवा तो जाणवत नाही. (जसा : देवबाप्पा किंवा युकिवारिमू या चित्रपटाचा होतो) याचे कारण ज्या एकल्या मार्गाने फडकेपरांजपे जाऊ इच्छित होते तो त्यांचा रस्ता कालेलकरांना ठाऊक नाही हेच आहे.

• • •



कुशल दिग्दर्शन--
तंत्रदृष्ट्या प्रगत—
तरीहि--
फि. फा. कॉच्या आर्थिक सहाय्याच्या ओझ्याने खचलेले

★


चित्रशारदाकृत

★

# तें माझें घर

★

: समीक्षक :
श्रीकांत रानडे



रमेश देव व सीमा

चित्रपट हे जन-मनावर आणि मतावर खोलवर ठसा उमटविणारे एक प्रभावी माध्यम असल्यामुळे साहित्य, काव्य, चित्र यांप्रमाणेच त्यातहि ' सत्यं, शिवं, सुंदरम् ' यांचाच प्रत्यय घडावा याबद्दल कुणाचे दुमत नाही. त्याचबरोबर चित्रपट ध्येयवादी असावा व त्यातून लोकरंजनाबरोबर लोकशिक्षण साधले जावे ही आजच्या युगाची 'पुकार' आहे. हा मुद्दाहि सर्वसाधारणपणे मान्य व्हायला हरकत नाही. पण कधीकधी गुणाचाहि अतिरेक झाला तर तोच दोषहि ठरतो.

## आजचे हे चित्रपट

सध्या चित्रपटांचे प्रकार पाडायचे झाले तर तीन पाडता येतील. एक म्हणजे कथा–चित्रपट (Feature Film), दुसरा माहितीपट (Documentary) आणि तिसरा जाहिरातपट. यांपैकी जाहिरातपट हे जाहिरातीसाठीच असतात, माहितीपट हे लोकशिक्षणासाठी तयार केले जातात व कथाचित्रांचे प्रमुख कार्य प्रथमतः लोकरंजन हेच असते. या तिन्ही प्रकारच्या चित्रपटांच्या कलात्मक मूल्यांच्या कसोटचा अर्थातच वेगवेगळचा आहेत. पण त्यांविषयी फार खोलात जाण्याचे इथे प्रयोजन नाही. सांगायचा मुद्दा एवढाच की, कथा–चित्रपटाचे प्रमुख कार्य लोकरंजनच असते. त्यांतून ध्येयवाद प्रतीत व्हावा, पण तो मुद्दाम सांगायला लागू नये. दुसरे असे की, या ध्येयवादाच्या डोहात पडल्यावर या ध्येयवादाचा (तो कितीहि चांगला असो, कितीहि आवश्यक आणि कितीहि सद्हेतूने घातलेला असो.) तोल सुटून तो चित्रकथेवर कुरघोडी करू लागला तर मात्र एका 'चांगल्या' कथा–चित्राचे रूपांतर प्रचारी थाटाच्या माहितीपटांत कसे होते. याचे उदाहरण म्हणून चित्रशारदाच्या पहिल्याच 'ते माझे घर' या चित्रपटाचा अभ्यास करणे रसिक, टीकाकार आणि निर्माते–दिग्दर्शक या सर्वांच्याच दृष्टीने बोधप्रद ठरेलसे वाटते.

## कथानकाचे ऊर्ध्वमूलमधःशाख

'ते माझे घर' ही एका तरुण, शहरात वाढलेल्या ध्येयवादी डॉक्टराची कथा आहे. अलीकडच्या शहरी जीवनाची चटक लागलेल्या पदवीधरात आणि शहरात लहानाचा मोठा होऊनही आपल्या खेडचाकडे ओढ घेणाऱ्या या डॉक्टरात फार मोठा फरक आहे. आपली कर्मभूमी शहर नसून खेडे आहे व 'तेच माझे घर' आहे असे मानणारा हा डॉक्टर एका उत्कृष्ट कथेचा विषय व्हावा असाच आहे. हा डॉक्टर (शरद) परीक्षा पास झाल्यावर आपल्या दोन मित्रांना घेऊन खेडचात जातो व तिथे बापू मास्तरांच्या घरी उतरतो. खेडचातील लोकांची सेवा करावी अशी त्याची इच्छा असतेच. (त्याच्या त्या दोन मित्रांची मात्र नसते. डॉक्टरची परीक्षा पास झाल्यावर सहा महिने खेडचात काम केल्याशिवाय डिग्री देत नाहीत म्हणूनच ते नाईलाजाने तिथे आलेले असतात.) लौकरच तो एका साप चावलेल्या मुलाला वाचवतो व लोकांच्या मनांत आपल्याविषयी प्रीति निर्माण करतो. पण यामुळे त्या खेडचातील एका मंत्र–तंत्रवादी वैदूच्या मनात मत्सर व द्वेष निर्माण होतो.

बापूंची सीमा नावाची लग्नानंतर वर्षभरात विधवा झालेली मुलगी असते. तिला त्यांनी हिंगण्याच्या आश्रमात ठेवलेले असते. शिवाय त्यांची आणखी एक मानलेली लहान मुलगी असते– उमा ! ही चिमुरडी छोकरी शरदला केव्हाच आपलासा करून घेते. हे गाव सोडून जाणार नाही असे वचन ती त्याच्याकडून घेते. दुर्दैवाने घटसर्प होऊन उमा मृत्युमुखी पडते पण उमाला दिलेले वचन पाळण्यासाठी शरद तिथेच राहतो. त्यावरून त्याचे वडील व त्याची शहरी जीवनात व सुखोपभोगात रमणारी त्याची प्रेयसी, यांच्याशी भांडण होते. खेडचातच राहण्याचा निश्चय करून तो तिथे दवाखाना काढतो.

थोडचाच दिवसांत उमेची जागा सीमा घेते. सीमा ही शरदची लहानपणची मैत्रीण असते. ती शरदला त्याच्या कामात मदत करू लागते. लोकांची सेवा करण्याच्या या प्रयत्नात शरदला पैसा मिळणे तर दूरच राहिले पण पदरमोडच करावी लागते व आपले घडचाळ व अंगठी सावकाराकडे गहाण ठेवण्याचीहि पाळी येते. त्याच्या या प्रयत्नात गावचे बापू मास्तर व गावचे भल्या वृत्तीचे पाटील त्याला सर्वतोपरी मदत करतात.

सीमा आणि शरद यांच्यातील मोकळेपणाचा फायदा उठवून गावचा वैदू यांच्याबद्दल गावकऱ्याच्या मनात किल्मिष निर्माण करून त्यांना बदनाम करण्याचा प्रयत्न करतो. हे पाहताच सीमा त्याच्यापासून दूर दूर राहू लागते. शरद राहत असतो ते बापूमास्तरांचे घरहि तो वैदू गुंडांच्या सहाय्याने पेटवून देतो. त्या भयानक आगीतून शरद सीमाला वाचवतो आणि आपण तिच्याशी लग्न करणार असल्याचे जाहीर करतो. गावकऱ्यांना एकदम उमज पडतो व ते श्रमदान करून बापूना घर व शरदला दवाखाना स्वयस्फूर्तीने बाधून देतात. 'वैदू 'ला पोलीस घेउन जातात. आणि शेवटी सगळे काही 'गोड' होते.

कथानक तसे म्हटले तर वाईट नाही; पण ते माडताना त्याचे जे मूळ 'खेड्याकडे चला' आहे त्याच्या भोवताली इतर अनेक प्रश्नाची गर्दी झाल्याने 'ग्रामीण विकासा'वरील ऊर्ध्वमूलमध.शाख – असा प्रकार झाला आहे. चित्रपटाची पटकथा एखाद्या पाठ्य पुस्तकासारखी काहीशी झाली आहे. त्यामुळे एका तरुण डॉक्टराच्या ध्येयवादाबरोबरच 'विधवाचा प्रश्न', 'आयुर्वेदाचे महत्त्व', 'ग्रामीण भागातील साफसफाई', 'मत्र-तत्राचे खूळ', 'श्रमदान' इत्यादी विषयही बराच भाव खाऊन जातात व मूळ विषयाला मारतात. (या सगळ्या विषयातून 'हरिजना'चा प्रश्न कसा काय नजरेतून सुटला आहे कोण जाणे !)

### शंकांची बांडगुळे

आता काही शंका ! मूळ म्हणजे उमा वारल्यानंतर शरद खेड्यातच राहायचा निश्चय करतो तो त्याच्या ध्येयवादामुळे की उमाला दिलेल्या वचनाकरिता ? असा प्रश्न प्रेक्षकाच्या मनात आल्यास नवल नाही. अर्थात् कथानकाला कलात्मकता आणण्यासाठीच त्या वचनाचा आधार आहे हे त्याचे समर्थन पटण्यासारखे असूनहि हा प्रश्न सामान्य प्रेक्षकाच्या डोक्यात घोळतच राहतो. उमाला हे वचन शरदने देण्यापूर्वीच त्याचा ध्येयवाद प्रेक्षकासमोर उलगडला गेला असता तर हा दोष टाळता आला असता. पण तसे घडत नाही. तोपर्यंत शरद थोड्या दिवसानी शहरात परत जाणार असेच प्रेक्षकाना वाटत असते, आणि कदाचित् शरदचाहि बेत खरोखर तसाच असावा असेच सूचित केले जाते

सीमा आणि शरद याचे संबध दाखवतानाहि लेखक-दिग्दर्शक असेच घोटाळले आहेत. सीमाला विधवा दाखवून त्यानी 'विधवा विवाहा'चा प्रश्न भरीला भर म्हणून उपस्थित करण्यापलीकडे काय साधले आहे ते समजत नाही. कदाचित् पुढे गावकऱ्याना त्या दोघाना नावे ठेवायला सोपे जावे हा उद्देश असल्यास नकळे. या दोघाच्या सबधाबाबत प्रेक्षकाच्या प्रथमत: सरळ अपेक्षा असतात की या दोघांचे प्रेम जमून त्याचे लग्न होणार ! शेवटी लग्न तर होतेच, पण सुरुवातीला दिग्दर्शक ते सबध अशा स्वरूपात सादर करतात की, तसे काही नाही हो ! ते अगदी बहीण-भावडासारखे आहेत ! सुरुवातीलाच नव्हे तर जवळजवळ अखेरपर्यंत हेच सूचित केले जाते. आणि यांतच प्रेक्षकांचा विरसहि होतो. त्यांच्याबद्दल गावकरी टीका करू लागल्यानंतर अगदी शेवटच्या प्रसंगात बापूमास्तर आपल्या मुलीला म्हणतात की, 'लोकाच्या टीकेकड आपण लक्ष देऊ नये ! आपल मन शुद्ध असल म्हणजे झाल !' त्यावर सीमा म्हणते, 'बापू मला तीच भीति वाटते ! ' इथे सीमाचे मन उघडे होते, पण ते फाऽऽर उशिरा. या वेळपर्यंत प्रेक्षकांना (त्याच्या रास्त अपेक्षेला डावलून) बुचकळ्यात ठेवण्यात दिग्दर्शकांनी काय साधले कोण जाणे ! प्रेक्षकांना मात्र या पात्राचा थागपत्ता शेवटपर्यंत न लागल्याने त्याच्या दृष्टीने ते चाचपडत राहतात व त्यामुळे शेवटी शरदने 'मी सीमाशी लग्न करणार आहे' असे जाहीर करणे हा चमत्कारच वाटतो. शिवाय शरदच्या मनांत तर तसे कधीच काही नव्हते असे वाटते. त्यामुळे त्याने शेवटी जाहीर केलेला निर्णय हा त्याच्या ध्येयवादीपणावर कळस चढविण्यासाठी तर त्याच्या माथी मारलेला नाही ना अशी शका येते. हे इतके टाळण्याऐवजी सीमा विधवा न

---

एक होता राजा ·········· पृष्ठ ६० वरून चालू.

प्रत्यक्ष फारसा संबंध नसलेले पात्र नवरे यानी कथेत चागले बसविले आहे.

बांधेसूद नाटके करण्याबद्दल ख्यातनाम असलेल्या इंडियन नॅशनल थिएटरने याच्या नाटकाचा प्रयोग आपल्या कीर्तीला साजेशा नेटकेपणाने केला आत्माराम भेंडे यांच्या चतुर दिग्दर्शनाचा हात या प्रयोगावरून फिरलेला होता. भूमिकात डावेउजवे झाले असले तरी एकूण प्रयोग बंदिस्त वाटला. थप्पड मारल्याशिवाय आवाज न देणारा रेडिओ, हा भेंडे याच्या वास्तव दिग्दर्शनातला एक छोटासा बारकावा. उचित पार्श्वसगीताने वातावरणाला उठाव येत होता. रघुवीर तळाशीकर याच्या कलापूर्ण नेपथ्याने नटलेला दिवाणखाना खराखुरा भासत होता.

बबन प्रभूनी राजाच्या भूमिकेत बहार केली. बबन प्रभु राजाची भूमिका करीत होते की राजा बबन प्रभूची भूमिका वठवीत होता, असा संभ्रम पडण्याइतके प्रभु त्या भूमिकेशी एकरूप झाले होते. शिडशिडीत, उंच रमेश चौधरी नाना म्हणून सर्वार्थाने शोभले. त्यांनी नाटकाची सुरुवात खालच्या सुरात केली, हे खटकले. आशा पोतदार एक्स्ट्रा नटी न दिसता नायिका दिसत होत्या. हा दोष वगळला तर त्यानी काव्यात्म मधुराणी सुरेख रंगविली. सडेतोड वृत्तीच्या अलकाचे काम लता म्हापसेकर यानी योग्य त्या ठसक्याने नटविले. यशवंत वैद्य (बापू) व विमल राऊत (शारदाबाई) यानी आपल्या भूमिका मनापासून वठविल्या. कमी पडला तो त्यांचा आवाका ! मधु साठे याना चद्रूची भूमिकेत गमत आणायला जो थोडाफार वाव होता त्याचा नीट उपयोग केला नाही. शालिनी पंड्या ठीक वाटल्या.

स्वप्ने रगविणाऱ्या राजाने आंघोळ करू नये, कपडे पालटू नयेत, हे खटकते. राजाला मारण्यासाठी बापूने त्याचा शर्ट पकडला. हे पटत नाही. बाप मुलाचा कान धरील, थोबाडात मारील. असा शर्ट पकडणार नाही ! पहिला अंक जरा फिकट वाटला. दुसऱ्या अकापासून नाटकाने चागली रंगत घेतली. या पहिल्याच अनुवादित नाटकान नवरे याची नाटककार म्हणून स्वत:बद्दलच्या अपेक्षा उचावून ठेवल्या आहेत. खरे म्हणजे आता त्यांच्याकडून स्वतत्र नाटकाची मागणी प्रेक्षकानी करणे स्वाभाविक ठरेल !

● ●

दाखवता कुमारिकाच दाखवली असती तर ?... तर कदाचित् मूळ विषयाला मागे सारणारा एक पोट-विषय मागे पडला असता. पण लेखकाला बहुधा प्रेक्षकाच्यासमोर कारुण्य उभे करून दोन अश्रू मिळवायचे असावेत व शरदची एक प्रेयसी आधी दाखवली असल्याने आपल्या या 'ध्येयवादी' चित्रपटाला प्रणयत्रिकोणामुळे कमीपणा येईल असे वाटले असावे मात्र ते तसे केले असते तरच कथानक थोडे सुगम झाले असते हे नक्की !

### आगंतुक प्रेमपुराण

खेड्यात राहू इच्छिणारा म्हणून शरदला लाथाडणाऱ्या शरदच्या शहरी प्रेयसीची गोष्ट अशीच. विरोधाभास हवा म्हणून हे पात्र घालण्यात आले असावे. त्यातून विरोधाभास काय साधला असेल तो असो पण चित्रपटात त्या पात्राचे काम एका गाण्याची भर घालण्यापलीकडे फारसे महत्वाचे दिसत नाही. केवळ रंजकतेत भर म्हणूनच हे पात्र शोभेला (Decorative) असेच मुद्दाम घातले असेल तर मात्र मग बोलणेच खुंटले. बापूमास्तर व शरद यांना सर्व प्रकारची मदत करणारे गावचे पाटील हे गावचे पाटील असावेत हे फक्त तशा उल्लेखावरून कळते. कारण त्याचा व गावाचा वा गावकऱ्याचा संबंध कधी आलेला दिसत नाही. बापूना मदत करणे एवढेच याचे काम.

### गणेश भटांचे सुयश

हे सगळे असूनहि हा चित्रपट 'चांगला' आहे असे वाटते. याचे मुख्य कारण म्हणजे राजा परांजपे आणि अनत माने सोडले तर आजकाल मराठी चित्रपटात लुप्त झालेला चित्रणाचा सफाईदारपणा या चित्रपटांत जाणवतो आणि जे आहे ते परिश्रमपूर्वक सादर करण्याचा प्रयत्न यात दिसून येतो. निर्माते व दिग्दर्शक यानी घेतलेले कष्ट जाणवतात. गणेश भट याच्या 'टेकिंग' मध्ये त्याच्या गुरूची राजा पराजप्यांची सफाई आहे. त्याची स्वतःची चमकहि आहे. ज्याला 'शूटिंग स्क्रिप्ट' म्हणतात तो त्यानी काळजीपूर्वक योजला असावा. ज्यांच्याविषयी नव्या आशा बाळगाव्यात असे हे नवे दिग्दर्शक वाटतात. बरेचसे बाह्य चित्रण आणि तेहि योग्य व वास्तव ठिकाणे निवडून त्यानी केलेले असल्याने चित्रपटाच्या दृश्य परिणामात भर पडलेली आहे. फक्त शरद व त्याची शहरी प्रेयसी याच्यातले प्रसंग घाईघाईने व थोडेसे भडकपणाने घेतल्यासारखे वाटतात.

### संवादलेखन वादातीत

यशवंत रांजणकराच्या कथेवर दिनकर द. पाटील यांनी बरीचशी चागली पटकथा लिहिली आहे. त्यांच्या अलीकडील पटकथांत तरी हीच पटकथा सरस ठरेल. त्याचे सवादहि यथायोग्य असेच आहेत. अलीकडे मराठी चित्रपटाच्या संवादलेखकानी पात्रांत एकाएकी भयानक साहित्यिकी सवाद बोलायला लावण्याचा पायडा पाडला आहे (त्या लेखकात दिनकर द. पाटील व माडगूळकरहि आहेतच) तसा प्रकार इथे फारसा आढळत नाही हीहि एक प्रकारे कौतुकाचीच गोष्ट. आता बापूमास्तर कधी कधी तसे बोलतात, पण ते या चित्रपटातले 'तत्वज्ञानी' च असल्याने तेवढे क्षम्य समजायला हरकत नाही.

### उत्तम भूमिका

शरदच्या भूमिकेत रमेश देव यानी चांगले काम केले. त्यांनी भूमिका समजावून घेतलेली दिसते व दिग्दर्शनाची साथ मिळाल्याने त्याचे काम उठून दिसते. राजकपूर याची अभिनय-पद्धति हा आदर्श तर त्यानी चांगला ठेवला आहे. एखादी तशीच भूमिका मिळाली तर ते ती कशी करतील हे पाहण्यारखे ठरेल. 'सीमा'च्या भूमिकेत सीमा यांनी भूमिकेला साजेलसा गंभीर आणि सात्त्विक चेहरा ठेवला आहे. त्याना फार भावनात्मक संघर्ष दाखवायला वावहि नाही. पण त्यांचे कामहि ठाकठीक आहे.

बापू मास्तराची भूमिका ही तर राजा पराजप्यांना 'फिट्ट' बसणारी भूमिका ! त्यात त्यांनी गहिरे रग भरले आहेत. बापूमधला देवमाणूस पण व्यवहारी देवमाणूस त्यांनी यथार्थ साकार केला आहे छोटया चिमुरड्या 'उमा' च्या भूमिकेत उमा या बालतारकेने खूप मोकळेपणा दाखवला आहे. गणेश भट यांची या पात्राची हाताळणी कौतुकास्पद आहे. विशेषतः ती शरदजवळ 'मी पण तुझ्याबरोबर पुण्याला येणार' म्हणून हट्ट धरून आपले पण सामान भरायला सागते तेव्हा तिने अगदी सुरेख काम केले.

बाबूराव पेंढारकराचा पाटील हा त्याच्या जुनेपणाचा आणि जाणतेपणाचा नमुना आहे. त्यांच्या मुरब्बीपणाची साक्ष ही भूमिका देते. शरद तळवलकरानी गावचा वेंडू नेहमीच्या सफाईने उभा केला आहे. कोणत्याहि प्रकारची, नायकापासून खलनायकापर्यंत व विनोदी पात्रापासून तत्वज्ञान्यापर्यंत कुठलीहि भूमिका ते करू शकतील—नव्हे, यापूर्वी त्यांनी ते सिद्धच केले आहे म्हणा ! त्यांची अभिनयाची समज फार मोठी आहे. मोहन चोटी, नायमपल्ली यांनी आपापल्या छोट्या भूमिका व्यवस्थित पार पाडल्या आहेत.

### तंत्रदृष्टचा पुढचे पाऊल

तात्रिक दृष्टचाहि हा चित्रपट इतर मराठी चित्रपटात थोडा उजवाच आहे. विशेषतः दत्ता गोर्ले याचे छायाचित्रण व दादा ठाकर याचे कलादिग्दर्शन वाखाणण्यासारखे आहे. दत्ता गोर्ले यानी ट्रॉली, शॉट्स यांचा अधिक उपयोग केला असता तर दुधात साखर पडली असती. ध्वनिमुद्रणाच्या बाबतीत मात्र प्रगती दिसत नाही. बाह्य चित्रणाच्या वेळचे ध्वनिमुद्रण तर पार बिघडलेले आहे. गीते आणि सगीत यांना फारसे स्थानच नाही. पण एक भूपाळी (उठी श्रीरामा) व 'मानवतेचे मंदिर माझे' ही गीते बरी वाटतात. रविंद्र भट याची रचना नवी नसली तरी जुनाटहि नाही इतकेच. सुधीर फडके यांच्या संगीताबद्दलहि तेच. सकलनाच्या बाबतीत मराठीच्या प्रातात बाळ कोरडेच आघाडीवर आहेत हे पुन्हा एकदा दिसते.

एकदरीत या चित्रपटात काही दोष असले तरीहि तो एक चांगला चित्रपट आहे. रविंद्र भट व गणेश भट यांनी श्रमहि भरपूर घेतलेले आहेत हे दिसते. पण फिल्म फायनॅन्स कॉर्पोरेशनकडून मिळालेल्या आर्थिक सहाय्याची छाया चित्रपटावर किती पडू द्यायची याचा तोल या नव्या दमाच्या व पहिल्यानेच या क्षेत्रात पडलेल्या निर्मात्या दिग्दर्शकांना उत्साहाच्या भरात न साधल्याने त्यांनी घेतलेल्या श्रमाचे चीज प्रेक्षकाकडून कितपत होईल याची थोडी शकाच वाटते.

—पण ते चीज प्रेक्षकाकडून व्हावे असे वाटते. आणि ते रसिकानी जरूर करावे असे आवर्जून सांगावेसे वाटते, हेच या चित्रपटाचे अपयशातील यश आहे !

● ● ●

# आतमधर्म-मंगलार्थ मरण मी वरी

[पृष्ठ १६ वरून]

त्यानी मानवतेच्या या वागणुकीबद्दल अन्यवाद देत देत या जगातून परलोकी प्रयाण केले असणार!

कित्येक स्त्रिया कोपऱ्यात अग दुमडून पडलेल्या होत्या. त्यांची मुले रडत होती. कित्येकींनी तर आपल्या शीलाच्या रक्षणाकरिता आपल्या मुलांचा बळी दिला होता. कित्येकींनी शौचाला जाण्याचे निमित्त करून बाहेर पडून कृष्णगंगेच्या उदरात आसरा घेतला होता. कित्येक मातानी आपल्या जिवंत मुलांना कृष्णगंगा नदीला अर्पण केले होते.

या बातम्या टोळीवाल्यांच्या प्रमुख अधिकाऱ्यांच्या कानांपर्यंत गेल्या. त्याना स्त्रियांनी असे आत्मबलिदान केलेले पसंत नव्हते. हाल-हाल होऊन त्यांनी मरावे अशी त्यांची इच्छा होती. म्हणून त्यांच्या-वर सतत पहारा बसला. सैन्याची एक नवी तुकडी आली. त्यांनी, सर्व पुरुषांना पकडून निराळ्या खोल्यात ठेवले. आपल्याला आता ठार मारण्याकरिता नेत आहेत असे सर्वांना वाटत होते. निरोप घेण्याचे ते शवटचे दृश्य हृदयविदारक होते. मुले वडिलाना मिठ्या मारून विलगत होती· पण त्याची पर्वा कोणालाच नव्हती.

माझ्या शेजारी दोन तीन स्त्रिया बसलेल्या होत्या. त्यातल्या दोन मायलेकी होत्या. मुलगी गरोदर होती आणि तिला प्रसववेदना सुरू झाल्या होत्या. या मुलीच्या नवऱ्यालाही दुसरीकडे नेले गेले. जेव्हा सगळे निघून गेले तेव्हा आमच्या सरक्षकांनी माझ्या दोन्ही मोठ्या मुलीना झोपवले आणि त्याच्या अगांवर कांबळे पसरून ठेवले. जो कोणी विचारी की 'इथे कोण आहेत?' त्याला ते सागत की 'दोन शिपाई झोपले आहेत.' मी त्यांना विचारले 'तुम्हाला जेवण वगैरे घ्यायच नाही का?' तेव्हा ते म्हणाले, 'असे किती वेळा तरी आम्हाला उपास काढावे लागतात. आम्ही येथून गेलो तर तुम्ही संकटात सापडाल.'

काही वेळाने मिरपुरचे टोपीवाले आणि जम्मूचे मुसलमान बड-खोर सैनिकाबरोबर हातात टॉर्च वगैरे घेऊन तेथे आले. हेही टॉर्चने शोधून स्त्रियांना नेऊ लागले. पुन्हा हाहाकार उडाला. टोळीवाल्यां-पेक्षाही हे बंडखोर सैनिक जास्त निर्दय होते. त्यांनी माताच्याजवळून मुले हिसकावून बाजूला केली आणि आयाना फरफटत ओढीत नेले. जी बाई प्रतिकार करी आणि आरडाओरड करी की 'माझा जीव घ्या पण मला नेऊ नका. मी तुमच्या बरोबर येणार नाही.' तिला दोघेतिघे मिळून उचलून नेत. जिकडे आम्ही बसलो होतो त्या बाजूला येण्याचादेखील कांहीनी प्रयत्न केला पण प्रत्येक वेळी आमचे रक्षक पठाण बंदुकीच्या दस्त्यांनी त्याना दटावीत किंवा मारीत आणि म्हणत, 'या बाजूला वाकडा डोळा करून पाहा तर खर, तुमची हड्डीच नरम होईल.'

मी मनात म्हणू लागले अशा तऱ्हेचे हे बंडखोरांना किती वेळ थोपवून धरू शकणार. आता मुलांना घेऊन आपल्यालासुद्धा कृष्ण-गंगेचा आसरा घ्यायला हवा. पण दुसरे मन म्हणे की सहापैकी माझे एखादे जरी मूल जिवंत राहिले तरी त्याची काय दशा होईल? माझ्या पतीना किती दुःख होईल? जोपर्यंत परमेश्वर आपले रक्षण करतो आहे तोपर्यंत आत्महत्या नाही करायची आणि जर मरायचेच तर काही तरी मर्दुमकी गाजवून मरायचे. भ्याडपणाने आत्महत्या करण्याबद्दल मला तिरस्कार वाटे.

मध्यरात्रीनंतर थोडी शांतता झाली. तेव्हा ते दोघेही तरुण म्हणाले, 'आता आमच्या दोन मित्रांना तुमच्याजवळ ठेवून आम्ही जातो. आम्हाला वाटते की या दोन्ही मोठ्या मुलीना दुसरीकडे कुठे तरी सुरक्षित जागी ठेवले पाहिजे. सकाळी या कुणाच्या दृष्टीस पडल्या तर काय प्रसंग ओढवेल सागता येणार नाही. तुमचा विश्वास असेल तर आम्ही यांना आमच्या घरी घेऊन जातो. मग तुम्ही एखाद्या चांगल्या ठिकाणी पोहोचला की आम्ही यांना तुमच्याजवळ आणून सोडू. तुम्ही काळजी करू नका, देव तुम्हांला साहाय्य करील.' इतके बोलून ते दोघे निघून गेले. अन् त्यांच्या जागी दोन जरा बावळटसे पठाण आले. आल्याबरोबर त्यांनी मुलाना आपल्याजवळचे सफरचद अक्रोड वगैरे खायला दिले. मुले भुकेली होती त्यानीही ते लगेच घेतले. मी त्या रक्षकाना म्हटले, "इथल्या जिल्हाधिकाऱ्यांच शत्रून काय केल तुम्हाला सागता येईल का? त्यातच माझे पती होते. ते इथले कलेक्टर होते," त्यातला एक म्हणाला, "मी त्याना ओळखत नाही पण सर्वांत अगोदर अधिकाऱ्यांना खतम करून टाकण्याचा आम्हाला हुकूम होता. आम्ही आल्याबरोबरच सर्वांना मारून टाकल." हे ऐकून मला एकदम घेरी आल्यासारखे वाटले. नंतर तो म्हणाला, 'का कोण जाणे पण तुमच व मुलाच रक्षण करा अस सारख माझ मन मला सागतय.'

मी अगदी विचारपूर्वक व सांभाळून त्याला म्हणाले, 'खुदाची आठवण कर. सध्या माणुसकीलाच जणू शेवटची घरघर लागली आहे आणि श्वास कोंडून तिचा जीव जाऊ पाहात आहे. अशा वेळी असे-लही कदाचित् की ईश्वरान आमच्या रक्षणाकरिता तुमच्या स्वरूपात देवदूत पाठवला आहे.' हे ऐकून तो 'कलमा' म्हणू लागला अन् मला म्हणाला, 'तुम्ही पण म्हणा.' मी सांगतले 'मला येत नाही' तशी ते मला शिकवू लागले.

इतक्यात बाहेर आणखी एक इसम आला. खोलीत रडारड सुरू झाली. आणखी दोन लुटारू आमच्या बाजूला आले अन् विचारू लागले, 'इकडे कोण आहे!' या दोन रक्षकानी उत्तर दिले, 'इकडच्या बाजूला येऊ नका. खतम् होऊन जाल.' मग ते दुसरीकडच्या दरवा-ज्याने खोलीत शिरले. अन् स्त्रियांना ओढून नेऊ लागले. माझ्याजवळ दोनतीन स्त्रिया होत्या. त्या आमच्या आधाराने बचावल्या. थोड्या

वेळाने आमचा एक रक्षक विचारू लागला, 'तुम्हांला आमच्या मुलखात यायला आवडेल का! तिथ मी तुम्हाला एखाद्या तीर्थाच्या ठिकाणी राहायची सोय करीन.' मी म्हणाले 'मला आपल गाव व घरदार सोडून तुमच्या देशात कस येता येईल? माझे पती आहेत, मुलबाळ आहेत. इतक्यात अजून क्षेत्राच्या ठिकाणी आयुष्य घालविण्याचे माझे दिवस झाले नाहीत.'

आम्ही याप्रमाणे बोलत होतो त्या वेळी हुंदक्याचा व कण्हण्याचा आवाज येऊ लागला. असे दिसले की काही स्त्रिया बाहेर जात होत्या आणि इतराना सोडून जाताना त्याची क्षमा मागत होत्या. म्हणत होत्या, 'आमच्या अपराधाची क्षमा करा. कोणत्या पापाच प्रायश्चित आम्हाला मिळत आहे कुणास ठाऊक? मला आता जगायची इच्छा नाही.'

हे बोलणे ऐकून मला काय करावे कळेना. त्या वेळी काही विचारण्याची सोय नव्हती किंवा काही करणेही शक्य नव्हते. एखादी विस्मयजनक बातमी ऐकू येणार असे मला वाटले.

## कृष्णगंगेच्या कुशीत

संधी सापडताच त्या दोन तरुण पठाणांनी बोलल्याप्रमाणे माझ्या दोन्ही मोठ्या मुलीना आपल्याबरोबर नेले. मुलीच्या वागणुकीवर माझा आता पूर्ण भरवसा होता. अन् त्या शूर नवजवान पठाणाबद्दलही काही कमी विश्वास वाटत नव्हता. त्यानी आपला जीव धोक्यात घालून आमचे रक्षण केले होते. जवळ बसलेल्या बायका मला म्हणू लागल्या, 'काय तुम्ही याच्यावर विश्वास ठेवणार !' हे ऐकून मला त्यांचा राग आला. रात्रभर त्या लोकांनी आमचे जिवापाड रक्षण केले होते. त्यांना जर घात करायचाच असता तर कोणाचीही पर्वा न करता ते मुलीना घेऊन जाते. परंतु ईश्वराने त्यांच्या विचारात बदल करून टाकला होता. असा विचार मनात येऊन मी म्हणाले, 'त्याच्या हेतूबद्दल मला मुळीच संशय येत नाही आणि माझ्या मुलीच्यावरही माझा पूर्ण भरवसा आहे. तशीच वेळ आली तर जीव देण्यास त्या मागपुढ पाहणार नाहीत.'

चागले उजाडल्यावर तेथे उरलेल्या सर्व स्त्रियांना बाहेर आणले आणि दोन मैल दूर असलेल्या कृष्णगंगेच्या किनाऱ्यावर प्रातर्विधीसाठी नेले. मीही त्यांच्याबरोबर होते. त्या दिवशी नदीच्या तीरावर मी जे रोमाचकारी अद्‌भूत दृश्य पाहिले ते मी या जन्मात कधीही विसरणे शक्य नाही.

काही स्त्रिया नदीच्या काठावर उभ्या राहिल्या व काही नदीच्या प्रवाहातील खडकांवर उभ्या होत्या. त्यातल्या कित्येक माता आपल्या बालकांना नदीच्या प्रवाहात फेकून देत होत्या. काही मुले एकदोन गटांगळ्या खाऊन प्रवाहाबरोबर वाहून गेली. तर काही आपल्या आईच्या पायाना घट्ट विळखा घालून बसली. पण आया त्याचे विळखे सोडवून स्वतःच्या हृदयाचे प्रत्यक्ष तुकडेच अशा त्या बालकांना पुन्हा पाण्यात फेकून देत होत्या. त्या वेळी त्या स्त्रिया महाभयंकर भासत



त्यानी माताच्या जवळून मुलें हिसकावून बाजूला केली
आणि आयांना फरफटत ओढीत नेले.

होत्या. त्यांचे डोळे रडून सुजलेले आणि चेहरे प्रेतवत् भावहीन, रक्तहीन आणि शक्तिहीन झालेले होते. एवढ्यावरच त्या थांबल्या नाहीत तर मुलाच्या मागोमाग पाहता पाहता त्यानी स्वत ही नदीच्या वेगवान प्रवाहात धडाधड उड्या टाकण्यास सुरुवात केली. हे पाहून किनाऱ्यावर उभे असलेले बंडखोर सैनिक धावले. पण त्यानी काही करण्यापूर्वी प्रवाहात खडकावर उभ्या असलेल्या स्त्रियानीही प्रवाहात पटापट उड्या टाकल्या. त्याबरोबर टोळीवाले पुलावर जाऊन बंदुका रोखून उभे राहिले आणि वाहात येणाऱ्या त्याच्या शरीरावर गोळ्या झाडू लागले.

त्या दिवशी किती स्त्रिया व मुलांनी नदीला आत्मसमर्पण केले, त्याचा बरोबर आकडा मी सागू शकणार नाही. पण मला इतकी आठवण आहे की त्या रात्री वाचलेल्या स्त्रिया म्हणून आम्ही जेवढ्या त्या खोलीत होतो त्या म्हणजे मी स्वतः व आमच्या आश्रयाने बसलेल्या त्या दोन तीन स्त्रिया एवढ्यांनी फक्त नदीत जीव दिला नाही. हृदयावर जणू धोंडा ठेवून अगदी बधिर अशा मनाने मी ते करुण दृश्य पाहात होते. एखाद्या यंत्राप्रमाणे आपोआप माझे विचारचक्र चालू होते. माझ्या मनात आले की आजदेखील भारतीय स्त्रियाच्या ठिकाणी आत्मबलिदानाची भावना इतकी प्रबल आहे. शील व स्वाभिमान याच्या रक्षणाकरिता त्या काहीही दिव्य करू शकत आहेत. अशा तऱ्हेने मत्रमुग्ध होऊन मी उभी आहे तोच माझा मोठा मुलगा धावत नदीकिनाऱ्यावर गेला. त्याला पाहताच मी त्याच्या मागे धावले अन् त्याला पकडले. तो म्हणाला, 'आई मला सोड. मीसुद्धा नदीत उडी टाकून मरणार आहे. माझ्या आयाबहिणींशी कोणीही

अशी असभ्य वागणूक करावी हे मला आता सहन होत नाही.' असे म्हणून एकदम जोर करून तो पुढे सरकला. पण मी त्याहीपेक्षा जोर करून त्याला मागे ओढले अन् म्हटले. 'तू भित्रा आहेस. कोणताही पराक्रम न करता भेकडाप्रमाणे मरण्याचा हा तुझा विचार आहे. मरणाची भीती बाळग, असे मी तुला कधीच म्हणणार नाही. पण अशा मरणाच स्वागत कर की जे तुला अमर करील.' परतु इतके सागूनदेखील तो शांत झाला नाही व म्हणाला, 'सगळ्या घरंदाज स्त्रिया नदीत उड्या टाकून मरून गेल्या. कोणीही जिवंत राहिल्या नाहीत. तूसुद्धा जा ना आई ! या मुलींना घेऊन नदीत उडी टाक. आम्हा दोघा भावांना सोड. नाहीतर मी तरी नदीत जीव देतो. मला हे अत्याचार आता पाहवत नाहीत.' मी अगदी मोठ्या पंचाइतीत पडले. काही करावे तर दोन मोठ्या मुली मजजवळ नव्हत्या आणि माझे मनही आत्महत्या करण्याची अनुज्ञा मला देत नव्हते. मला असाही विश्वास वाटत होता की काही तरी घडेल अन् परमेश्वर मला मदत करील. म्हणून मी त्याची समजूत करीत म्हटले, 'बाळा तू का बर असा हट्ट धरला आहेस ? मला नदीत उडी टाकता येईल. पण तुम्ही एवढ समजू शकता की ही बातमी ऐकल्यावर तुमच्या बाबाना फार दु ख होईल. जोपर्यंत तुमच्या वडिलाच्यावद्दलची बातमी आपल्याला कळली नाही तोपर्यंत मी अशा तऱ्हेच काही करणार नाही.'

इतक्यात एक पठाण माझ्याकडे आला आणि म्हणू लागला, 'तुम्ही का नाही नदीत उडी टाकत ? टाका ना ! आम्ही काही तुमच्या आड येणार नाही !' मी सागितले, 'मी अस नाही करणार' एवढे बोलून मी किनाऱ्यापासून सडकेवर आले. मी पाहिले की, कित्येक बंडखोराच्या डोळ्यातून अश्रु वाहात होते. हे हत्याकाड पाहून त्याना आपल्या वागणुकीचा पश्चात्ताप झाला होता. हे पाहून मला धैर्य आले आणि अगदी बेधडक त्या टोळीच्या मध्यभागी जाऊन मी बोलले, 'आता का उगीच अश्रू ढाळता ! आणि आपण केलेल्या कृतीबद्दल पश्चात्ताप करता ? तुम्ही काय अशा तऱ्हेची लढाई लढण्याकरिता इकडे आला आहा ? अशा तऱ्हेने वागून तुम्ही काय स्वतःला कृतार्थ समजता ! काय तुम्ही देवाच्या डोळ्यातही धूळ फेकू शकता ! लक्षात ठेवा हे खून तुमच्या डोक्यावर बसून तुम्हाला जाब विचारतील. तुम्ही जस वागाल तस फळ तुम्हाला मिळेल.' मला असे बोलताना ऐकून बरोबरच्या त्या दोन तीन बायकांनी मला गप्प राहण्याबद्दल खुणावले. त्या म्हणाल्या, 'तू ह्यांना हे काय सांगते आहेस ! आपल्यावर उगाच नसत सकट का ओढावून घेतेस!' मी जे जे बोलले ते त्याच्यापैकी किती जणाना समजले कोण जाणे पण त्यांच्यातला एक माझ्याजवळ आला अन् म्हणाला, 'तुम्ही जे काय सागता आहा ते योग्य आहे. मला सागा मी तुम्हाला कोणती मदत करू !' तो कोणी अधिकारी होता वाटते. मी त्याला काय सागणार ! मला माझ्या मुलीची आठवण झाली. त्या कुठे असतील, मी त्याना कशी भेटू शकेन. अशा प्रकारे माझ्या मनात विचार चालू होते. इतक्यात तो म्हणाला, 'मी तुमच्याबरोबर एक विश्वासू मनुष्य देतो. तो तुम्हाला सुखरूपपणे तुरुगापर्यंत पोहोचवील. तेथे आणखीही काही वाचलेले हिंदू बंद करून ठेवले आहेत.' मी त्याचे आभार मानले आणि मुलाना घेऊन त्या मनुष्याबरोबर निघाले.

आम्ही जरा पुढे गेलो तोच त्या दोन तीन स्त्रियाही आमच्या मागोमाग आल्या आणि आदल्या रात्री दुसऱ्या कोठडीत बंद करून ठेवलेले काही पुरुषही आमच्यामागे आले. बरोबरच्या एका स्त्रीला प्रसववेदना होत होत्या. तिला पाऊल उचलणेदेखील मुश्कील होत होते. पण कशीबशी स्वत.ला ओढीत, कण्हत, कुथत ती येत होती.

आता आम्हाला शहराच्या बाजूला जायचे होते. तिकडेच एका टेकडीच्या माथ्यावर जेल होता. तो सगळा रस्ता जळलेल्या व कोसळलेल्या घरांच्या मधून गेलेला होता. आमच्याबरोबर एक दोन शिपाई होते. त्यांच्याजवळ बंदुका होत्या. ते सगळ्या लोकाना 'पाकिस्तान झिंदाबाद' असे म्हणायला सांगत होते आणि कुणी नाही म्हणाले तर त्याना दम देत होते.

जो चागला पठाण माझ्याबरोबर मुद्दाम दिला होता तो जेमतेम बावीस वर्षांचा असावा. चालता चालता मी त्याच्याशी बोलू लागले, 'तू इतक्या दूर इथ कसा आलास ?' तो म्हणाला, 'पाकिस्तानी अधिकाऱ्यांनी टोळीवाल्या जमातीत अशी बातमी पसरविली की, इस्लाम धर्म संकटात आहे, काश्मीर राज्यात मुसलमानांवर फार जुलूम होत आहेत. आपल्या सुना, मुली सुखी नाहीत.' यावर मी त्याला म्हणाले, 'चार दिवसापूर्वी या राज्यात सर्व काही ठीकठाक होत, पण तुम्ही लोकानी इथ येऊन वादळ निर्माण केल आहे.' त्याने पुन्हा पहिल्यासारखेच म्हटले की, 'पठाण जिवंत असताना त्यांच्या मुलीसुनांकडे कोणी वाकड्या नजरेन पाहतो आहे हे त्याना केव्हाही सहन होणार नाही. पाकिस्तानन अगदी बरोबर सागितल की, इकड आमच्या आयाबहिणीवर अत्याचार होत आहेत.' मी जरा वेळ अगदी स्तब्ध राहिले. जरा वेळाने पुन्हा म्हणाले, 'तुम्हाला पगार वगैरे काही मिळतो का ?' त्याने सागितले, 'अजून नक्की अस काही ठरलेल नाही. त्यांनी आम्हाला एवढच सांगितल की, हिंदूची कत्तल करा. त्याच्या बायका किंवा मुली तुम्हाला पसंत असतील तर त्यांना घेऊन जा. तुम्हाला जो माल सापडेल तो लुटा. घराना आगी लावा. आम्हांला फक्त जमीन पाहिजे आहे.' मी म्हटले, 'भाई, वाईट मानू नकोस, मी समजत होते की, पठाण जमात फार शूर असते. पण जे काही मी इथ पाहिल तसली कृत्य एखादा भ्याड किंवा हलकटसुद्धा करणार नाही. तुम्ही आपल्या सद्वर्तनाशी बेइमान होऊन हे सर्व खून पाडले आहेत. ते आता तुमच्या मानगुटी बसतील.' तो म्हणाला, 'आमच्या देशातून कित्येक लोक नुसते इथ लुटमार करायला आले आहेत. आम्ही ऐकल आहे की, 'काश्मीरमध्ये खूप सोन आहे.' मी विचारले, 'तुम्ही इथल्या लोकाना अस तुरुंगात का डाबून ठेवता आहा.' माझ्या बोलण्याला काही उत्तर न देता तो म्हणाला, 'पुरुषाना तर आम्ही सापडले तितक्याना खतम् करून टाकल. पहिल्या दिवशी जे कुणी इकड तिकड लपून राहिले तेच तेवढे बचावले. ज्या स्त्रिया मोकळ्या राहिल्या आहेत त्या एकतर फार म्हाताऱ्या किंवा जखमी झालेल्या आहेत. हो ! काही तरुण स्त्रिया तुरुंगात कैद करून ठेवलेल्या आहेत.'

वाटेने चालता चालता आम्हाला कित्येक स्थानीय मुसलमान येऊन मिळाले. त्यातल्या काहीना माझी ही दुर्दशा पाहून फार दुःख झाले, पण काहीना मनातून आनदही वाटला. अधूनमधून टोळीवाल्याच्या पलटणीच्या पलटणी भेटत होत्या. काहीच्या पायात फाटकी तुटकी पायताणे होती. तर काही अनवाणीच चालत होते. त्यांच्या खांद्यांवर बंदुका आणि गळ्यात काडतुसाच्या माळा होत्या.

ते अकाळविकाळ हास्य करीत इकडे तिकडे हिंडत होते. काही लुटीच्या मालासाठी आपापसात झगडत पण होते.

एका जागी त्यानी माझा मुलगा विमल व मुलगी कमलेश यांना पाहिले अन् लगेच म्हणाले, ' वा ! या मुलांची ही जोडी काय छान दिसते आहे. याना आपल्यावरोबर नेऊ या. ' आमच्या बरोबरच्या शिपायानी कायसेसे त्यांना सागितले. आम्हाला काही ते समजले नाही. नतर ते म्हणाले, ' याना जेव्हा तुम्ही जेलमध्ये सोडून द्याल, तेव्हा आम्ही त्याना तेथून घेऊन जाऊ. ' तसे पाहिले तर जेलमध्ये पोचवीपर्यंत तरी ते का थांबले; त्यांना हिसकाहिसकी करून बळजबरीने, होतो तेथूनसुद्धा नेता आले असते. पण ईश्वर साहाय्य असल्यावर एखाद्याच्या केसाला देखील धक्का लावण्याची कोणाला हिम्मत होईल का ? ते आशाळभूत नजरेने मुलांकडे पाहात राहिले नि आम्ही पुढे गेलो.

आता आम्ही इतक्या जवळ पोहोचलो की त्या ठिकाणाहून आमच्या बंगल्याच्या भिंती दिसू लागल्या. आम्ही जरा थबकून उजाड झालेल्या आमच्या घराकडे पाहिले. स्वयपाकघर जळाले नसल्यामुळे ते शाबूत दिसत होते. मी आमच्यावरोबरच्या शिपायाला म्हणाले, ' हे पाहा आमच घर. ' तो म्हणाला, ' सध्या तिथ आमचे लोक राहतात. ' आम्हांला तेथून पुढे जायचे होते. मन तर त्या जागी इतके गुतून राहिले होते की, नुसते घराकडे बघत तिथेच बसून राहावे असे वाटत होते. पण नुसते त्या दिशेकडे नजर वळवणे हा सुद्धा आता गुन्हा होता. त्यामुळे निरुपायाने आम्हांला पुढे जावे लागले. थोड्याच वेळात आम्ही जेलच्या फाटकापाशी पोहोचलो.

या जागी काही लोक पहारा करीत होते. आम्हांला आत नेण्यात आले. आमच्यावरोबरच्या शिपायानी सलाम करून आमचा निरोप घेतला. आत जाऊन पाहिले तर स्त्रिया, मुले व पुरुष तिथे भरले होते. जणू काय ठिकठिकाणची गर्दी तेथे एकत्र आणून कोंडली होती. कित्येकाच्या हातावर, पायांवर किंवा अगावर सहासहा सातसात गोळ्या लागलेल्या होत्या आणि गोळ्या शरीरात तशाच घुसलेल्या असल्यामुळे त्याना असह्य वेदना होत होत्या. एका बाजूला लहान लहान बालके मूक व तहानेने व्याकुळ अशी तळमळत होती. कुणी आपल्या मुलासाठी, तर कुणी मातलगासाठी दुःख करीत होते. कुणाची मुलगी पळवून नेली म्हणून तो शोक करीत होता. काही तरुण स्त्रियानी आपण कुरूप दिसावे म्हणून तोंडावर शेण, माती आणि चिखल थापला होता. हे दृश्य बघून माझ्या हृदयाचा अगदी थरकाप झाला. पण इतक्यात मला तेथे शिवदयाळ व ओमप्रकाश आढळले. ते आमच्या जवळ आले आणि आम्हाला एका खोलीत घेऊन गेले. ती खोली कसली ! साक्षात् नरककुड होते.


**सहा साहसे**

**दा. सी. देसाई**

दोन रुपये

**राजहंस प्रकाशन,**

४१९ नारायण पेठ, पुणे २


## मेहतासाहेबांचे बलिदान

मी एका मोडक्या पलगावर बसले. बसल्याबरोबर मी शिवदयाळ व ओमप्रकाशला मेहतासाहेबाच्याबद्दल विचारू लागले. त्यांच्याबरोबर जेलचा पूर्वीचा फौजदार होता. तो म्हणाला, ' माताजी, काय सागू शब्द उमटत नाही. मेहतासाहेबाना तर पहिल्याच दिवशी......

मी क्षणात सर्व काही समजले. माझ्या डोळ्यापुढे अधेरी आली' अग थरथर कापू लागले. असे वाटले की आता प्राण निघून जाणार. पाच मिनिटेपर्यंत माझी अशी अवस्था राहिली. मग मी स्वतःला सावरले आणि त्यांना विचारले, ' तुम्ही त्या वेळची सर्व हकीकत सांगू शकाल का ? ' यावर ओम् म्हणाला, ' मी त्या वेळी तेथेच होतो. पण याबाबत मुद्दामच मी तुम्हाला काही सांगितल नाही. न जाणो तुमच भान हरपल असत अन् काय नेम सांगावा मुलाना घेऊन तुम्ही घराकडे धावला असतात अन् पेटलेल्या घराच्या आगीत उडी टाकली असतीत. तुम्ही जिवाच काही बरवाईट केल असतत, तर मग मुल उघडी पडली असती. समजा कदाचित् तुम्ही जगला असता पण तुमच मन दुबळ बनल असत आणि विचार करा वर इतकी संकट तुम्ही कशी सहन करू शकला असतात ! ' शोक करीत मी त्याना म्हटले, ' हे तुम्ही काय केलत, माझा असा पण होता की जिवात जीव असेपर्यंत मी त्याची साथ सोडणार नाही. त्याच वेळी तुम्ही मला हे सागितल असतत तर मुलासह मी आगीत भस्मसात होऊन गेले असते. आता माझ्याजवळ मरणाच काहीही साधन नाही आणि मोठ्या दोन मुलीही मजजवळ नाहीत. ' मला अशा तऱ्हेने विलाप करताना पाहून ओम् म्हणाला. ' मी शपथ वाहून सांगतो की तुमच्या मृत्यूनतर मी तुम्हाला मेहतासाहेबाच्या जागेवरच शेवटचे सस्कार देईन. मग यासाठी मला कितीही त्रास पडो. ' भोळ्या बिचाऱ्या ओम्‌ला वाटत होते की त्याने मला असे म्हटले की माझे प्राण भरकन् शरीराबाहेर उडून जातील. ईश्वराने असेच करायला पाहिजे होते, पण अजून मला कितीतरी पाहायचे होते व भोगायचे होते मग असे कसे घडेल ? मी त्याला म्हटले, ' मृत्यूसुद्धा माझा तिरस्कार करतो आहे. माझ्यापर्यंत येऊन पोहोचतच नाही. बर पण तू आता मला हे साग की हे सर्व कस कस घडल ? '

यावर फौजदार म्हणाले, ' जिकडे तिकडे मेहतासाहेबाच्या वीरश्रीच्या मृत्यूबद्दल चर्चा चालली आहे. त्यांनी मोठ्या शौर्यान व इमानदारीन मरण पत्करल. तुम्ही ओमला विचारा. जेव्हा मेहतासाहेब आपल्या बंगल्यातून बाहेर आले, तेव्हा ते पोलीस सुपरिंटेंडेंट, सबइन्स्पेक्टर आणि तेवीस पोलिसचे शिपाई याच्यासह हायस्कूलच्या बाजूला गेले. तिकडच्याच बाजूला काही दिवसापूर्वी एक तोफ आणून ठेवलेली होती. आणि या तोफेवर नऊ डोग्रा शिपायाची नेमणूक होती. परंतु हे सर्व तोफ सोडून पळून गेले. सर्वांनी मेहतासाहेबांना पण तिकडे जाऊ नका म्हणून अडवले. परंतु त्यानी कोणाच ऐकल नाही. आणि ते तोफेजवळ गेले. तेथे कोणीच जबाबदार शिपाई नव्हता. गावचे काही मुसलमान जमा झाले होते. ते मेहतासाहेबाना म्हणाले ' तुम्ही कधीच कोणाच वाईट केल नाही. आम्हाला आपल्या

मलेपणाबद्दल खात्री आहे. आम्हाला वाटत की तुम्ही आपला जीव नाहक गमावू नये. या वेळी तुम्ही काहीही करू शकणार नाही. पाकिस्तानी सैनिक हजारोनी आले आहेत आम्ही तुम्हांला अस वचन देतो की बुठ ना कुठ लपवून आम्ही तुम्हाला वाचवू.' पण त्यांनी कोणाचही सांगण मानल नाही. उलट ते म्हणाले 'तुमचा देश संकटात आहे. एकजूट करून त्याला वाचवायच सोडून मलाच काय उलट सागल बसला की छपून रहा म्हणून. चला जिथ पोलीस आहेत तिथ मोर्चे लावू '

पण त्यांच कोणीही ऐकल नाही. त्यानी जोरान पुकारा करून सर्वांना एकत्र जमविण्याचा प्रयत्न केला परतु लोक तर सोडाच कित्येक पोलीससुद्धा इकडे तिकडे पागले. काही थोड्या लोकासह ते पोलीसपार्टीपर्यंत येऊन पोहोचले, पण तेथेही कोणी मोर्चा बांधला नाही. जेव्हा कोणीच त्यांच म्हणण ऐकेना तेव्हा निराश होऊन ते म्हणाले, 'शत्रूशी सामना देण्यासाठी मी खूप खटपट केली पण कोणी ऐकत नाही. प्रत्येकाला आपली स्वतःची काळजी दिसते आहे. आता मी तुम्हांला वाचवू शकत नाही. आता मी घरी जातो. घरी जाण हेच माझ आता कर्तव्य आहे.' लोक म्हणाले, 'तुमच्या घरात टोळीवाले घुसले आहेत, तिकडे 'जाऊ नका.' पण ते थोडेच ऐकणार होते ! ते आपल्या बंगल्याकडे आले. त्यांच्यावरोबर एक रजपूत पोलीस सब-इन्स्पेक्टर होता. तो फाटकाच्या बाहेरच थाबला. मेहतासाहेब आत गेले.

एवढे बोलून ते थांबले. त्याचा गळा दाटून आला होता. ते म्हणू लागले याच्यापुढच आता ओमलाच विचारा.' एखाद्या यत्राप्रमाणे मी ओमच्या बाजूला मान वळवली. त्याच्या डोळ्यातून धारा चालल्या होत्या. दाटलेल्या आवाजात तो म्हणाला, 'मेहतासाहेब जेव्हा आत आले तेव्हा मी आंघोळीच्या मोरीत लपून बसलो होतो. खिडकीच्या काचेतून मी त्यांना आत येताना पाहिल. त्याच माझ्याकडे लक्ष गेल. ते म्हणाले, 'ओम्, तुझ्या बाईसाहेब कुठ आहेत ? मी त्याना खुणेनच तीर्थस्थानाच्या बाजून गेल्या म्हणून सागितल. माझ्या सागण्याचा अर्थ समजून त्याच्याबरोबरचा पोलीस ऑफिसर मागच्यामाग परत गेला. पण ते तिथल्या तिथ उभे राहिले. ते म्हणाले, 'अशा वेळी काय पळून जायच ! ही तर बलिदान करण्याची वेळ आहे. सर्वांनी मिळून मृत्यूला मिठी मारावी या हेतून तर मी घरी आलो.' मी हळूच त्याना म्हटल, 'आपण येथून निघून जा. घरात साठ बडखोर घुसलेले आहेत. पण ते तेथून हालले नाहीत.' एवढे सागून ओम् लहान मुलाप्रमाणे ओक्साबोक्शी रडू लागला.

मी त्याला म्हटले, 'ओम्, निधड्या छातीच्या माणसांना मृत्यू मित्रासारखाच वाटतो. ते त्याला मीत नाहीत. मी मात्र भेकडासारखी पळून गेले आणि आता त्याच फळ भोगते आहे. बर मग पुढ काय झाल ? 'तो म्हणाला, 'इतक्यात हल्लेखोर बाहेर आले. आणि साहेबाना पाहून सर्वांनी आपल्या बंदुका सरसावल्या अन् म्हणाले, 'दुष्टा, पाकिस्तानची सत्ता कबूल कर अन् ती डोक्यावरची हॅट काढ.' तरी ते गप्पच राहिले. पुन्हा टोळीवाले म्हणाले, 'बोल तू कोण आहेस ? हिंदू की मुसलमान ? तरीही ते गप्पच. इतक्यात आपल्या शेजारचा एक मुसलमान तिथ आला आणि म्हणाला, 'साहेब मुसलमान आहे म्हणून सागून टाका ! जीव तरी वाचेल. तुमची कच्चीबच्ची आहेत. का उगीच विनाकारण मरण ओढवून घेता.' पण नाही. कलेक्टर-साहेब म्हणाले, 'मी हिंदू आहे. मुसलमान नाही.' मग काय विचारता सर्वांनी आपल्या बदुका रोखल्या अन् फाड्...फाड्...फाड्. एकीमागून एक गोळचा सुटू लागल्या. चौथ्या गोळीला मेहतासाहेब धाडकन् खाली पडले. छाती ताठ ठेवून, राम. .राम...म्हणत ते या जगातून निघून गेले. हे हत्याकांड पाहून धावत धावत मी तुमच्याकडे आलो. त्या वेळी माझ्या डोळ्यांपुढे अंधेरी आल्यासारख झाल होत. पुढचा रस्तासुद्धा दिसत नव्हता. म्हणून तर तुमच्याजवळ पोहोचलो तेव्हा मी रडत होतो.' मी पुन्हा यत्राप्रमाणे बोलले, 'याच्यानतर काय झाल, काही तुला माहीत आहे का ?' तो म्हणाला 'ते शिवदयाळला माहीत आहे.' मी शिवदयाळला विचारल, 'साग, शिवदयाळ पुढ त्याच्या मृत शरीराच काय झाल ? ते कुठ आहे ?' त्याने सागितल, 'शेजारचा रामचंद आपल्या घरातून पळून चालला होता. जाता जाता त्यान मेहतासाहेबाच शव पडलेल पाहिल. त्याबरोबर तो तिथच थबकला. त्याच वेळेला शेजारचा एक मुसलमान तिथ आला. त्या दोघांनी मिळून त्याना उचलून आपल्या झोपायच्या खोलीत नेऊन ठेवल आणि त्यांच्या पायातले बूट काढून टाकले. नतर घराला आग लावली गेली. तेव्हा दहन तिथच झाल.'


*महाविद्यालयीन ग्रंथालये*

*इतिहासाचे अभ्यासक*

*यांनीं संग्रहीं ठेवावा असा ग्रंथ*

**गुजराथेतील मराठी राजवट**

वि. गो. खोबरेकर

सात रुपये

[ महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळ पुरस्कृत ग्रंथ ]

**राजहंस प्रकाशन**

४१९ नारायण पेठ, पुणें २.

मी बऱ्याच मुसलमान लोकांच्या तोंडून ऐकले की त्यांना मारून टोळीवाले बाहेर आले तेव्हा म्हणत होते की 'आज आम्ही एक जवान डोग्रा मारला. त्याच्या शौर्याची आठवण आम्हांला कायमची राहील. त्याला जिवंत पकडून आणा, असा वास्तविक आम्हांला हुकूम होता. पण त्यान इतक्या शिष्टपणान आम्हांला जवाब दिले की आम्ही चिडून गेलो अन् बंदूक मारून त्याला खतम करून टाकल.' मी विचारले, 'म्हणजे त्यांना काय माहीत होत की ते जिल्हाधिकारी होते म्हणून!' शिवदयाळ म्हणाला, 'खर म्हणजे त्यांना माहीत होत की ते जिल्हाधिकाऱ्यांच घर होत आणि ते आलेले खुद्द जिल्हाधिकारीच होते. पण ते त्यांची परीक्षा पाहात होते.' हे ऐकताच मोठ्या कष्टाने आवरून धरलेले माझे अश्रु घळघळा वाहू लागले. पण लगेच मी स्वतःला सावरले अन् म्हणाले, 'मला फार आनंद वाटतो की त्यांनी कर्तव्यपालन केल. खरच आहे की दडून राहाण त्यांना शोभल नसत. पहिल्यापासून ते सत्याचे उपासक होते. शेवटपर्यंत त्यांनी सत्य सोडल नाही. त्याच्याकरता प्राणसुद्धा दिला.' मी मुलांना म्हणाले, 'पाहिलत, तुमच्या वडिलांना वीराच मरण आल. तुम्हीसुद्धा असच वागायला शिकल पाहिजे. मला त्याच वेळी समाधान होईल की जेव्हा आपल कर्तव्य पालन करीत असताना आपण हसत हसत आत्मबलिदान करू. तुम्ही मोठे भाग्यवान् आहा की तुमचे वडील एवढे बहाद्दर होते.' मग आम्ही सर्वांनी शपथ घेतली की, 'आम्ही कधीही अस काम करणार नाही की ज्यामुळ त्यांच्या धवल कीर्तीला काळिमा लागेल अगर त्यांच्या आत्म्याला दुःख होईल.' त्या वेळी मी वेड्यासारखी मुलांना उपदेशच करीत सुटले. त्या अजाण बालकांना माझे बोलणे नीट समजत तरी होते की नाही कोण जाणे! माझ्या हृदयावरचे दुःखाचे ओझे हलके करण्याकरिता मी आपली त्यांच्या शौर्याचे वर्णन करीत सुटले होते. चारी बाजूंनी संकटांचा गराडा पडला की, मनुष्याला आपोआप धैर्य प्राप्त होते. माझेसुद्धा असेच झाले. पण हळूहळू वेळ जात चालला तशी मोठ्या मुलींबद्दल माझी काळजी वाढू लागली.

● ● ●

श्रीमती कृष्णा मेहता यांनी लिहिलेल्या 'काश्मीरपर हमला' या मूळ हिंदी पुस्तकाचा सौ. इंदिराबाई मायदेव यांनी केलेला मराठी अनुवाद पुस्तकरूपाने लवकरच प्रकाशित होत आहे. या आगामी मराठी अनुवादातील ही पहिली काही प्रकरणे फक्त येथे उद्धृत केलेली आहेत. पुढचा कथाभाग—श्रीमती मेहतांचा पुढचा खडतर वनवास, तुरुंगवास, पाकिस्तानांत निर्वासित कँपातील त्यांचे धीरोदात्त वर्तन, हिंदुस्थानांत पुनरागमन, पंडित नेहरूंची भेट इ.—— यांसाठी वाचकांनी मूळ पुस्तकच पाहावे.


—संपादक

## क्षमस्व

श्री. मधू मंगेश कर्णिक, श्री. ज. जोशी, वि. ग. कानिटकर, मनमोहन व वि. शं. पारगावकर यांचे साहित्य या अंकात येऊ शकले नाही. ते पुढील अंकांतून यथाक्रम प्रसिद्ध होईल.

तसेच 'दीर्घायुष्य व कायाकल्प' या श्री. पु. ना. ओक यांच्या लेखमालेवर उलटसुलट मतप्रतिपादन करणारी बरीच पत्रे आमच्याकडे आली आहेत. ती सर्व प्रसिद्ध करणे जागेअभावी शक्य नाही. परंतु अमदावादहून श्री. अ. र. गर्दे यांनी 'शास्त्रीय पद्धत म्हणजे काय?' यासंबंधी एक विशेष चांगले पत्र धाडले आहे. जागेअभावी ते या अंकात देता आले नाही. पुढील अंकात त्याचा समावेश होईल.

—संपादक




पंच——" माफी मागा माझा निर्णय चूक म्हणण्याबद्दल ! "



# पुरुषार्थसाधना

दोन वर्षे पूर्ण झाली. ' माणूस ' या अंकापासून तिसऱ्या वर्षात पदार्पण करीत आहे.

दुसरे वर्ष तसे पाहिले तर अणिबाणीचे गेले. पण एका दृष्टीने ते इष्टही ठरले. ' आपण कोण आणि कशासाठी ' याचा शोध ' माणूस 'ने अधिक जारीने घेतला आणि त्या दृष्टीने अंकाच्या मांडणीत अवश्य त्या सुधारणा केल्या.

महाराष्ट्रांत शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक क्रांती घडून येत आहे. या क्रांतीचे नेतृत्व करणाऱ्या नव्या सुशिक्षित वर्गाची सांस्कृतिक विकासाची गरज भागविणे हे ' माणूस 'चे कार्यक्षेत्र आहे.

मागे एकदा ' माणूस 'च्या एका अंकावर अभिप्राय व्यक्त करतांना एस्. एम्. जोशी यांनी लिहिले होते ' साऱ्या मराठी जनतेच्या मनांत पुरुषार्थाची ईर्ष्या निर्माण व्हावी. असेच ' माणूस 'मधील साहित्य आहे. ' त्यांना म्हणायचे होते ' माणूस 'मध्ये येणारे साहित्य स्फूर्तिदायक व उद्‌बोधक असते.

पण वेगळ्या अर्थाने व व्यापक दृष्टीने पुरुषार्थ हा शब्द आपले पूर्वज योजीत असत. पुरुषार्थ म्हणजे केवळ पराक्रम नाही; तर एका यशस्वी व परिपूर्ण जीवनाची शास्त्रशुद्ध उपासना. चतुर्विध पुरुषार्थांच्या साधनेंत जीवनाच्या सर्व अंगोपांगांचा विकास अभिप्रेत आहे.

म्हणूनच ' माणूस 'ला कोणताही विषय वर्ज्य नाही. फक्त दृष्टी रचनात्मक पाहिजे, वृत्ती कलापूर्ण पाहिजे. सत्य-शिव-सुंदरांची भेट घेण्याचा ध्यास त्यात कुठंतरी दिसून आला पाहिजे.

मागच्या उणिवा आणि अपयशे यांच्या स्मृती, पुढच्या विकासाची व यशाची स्वप्ने उराशी बाळगत ' माणूस ' तिसऱ्या वर्षाच्या वाटचालीला आरंभ करीत आहे.

वाचकांनी व लेखक-मित्रांनी असाच कृपालोभ कायम ठेवावा हो विनंती.

—संपादक



Regd. No. : B 9304



# शिवचरित्र प्रसार योजना

**आजच्या आणिबाणीच्या प्रसंगी**

छत्रपति शिवरायांच्या चरित्राचा आणि चारित्र्याचा आदर्श साऱ्या भारतीयांपर्यंत नेऊन पोहोचविणे प्रत्येक मराठी माणसाचे कर्तव्य आहे.

'राजहंस प्रकाशन संस्थे'ने श्री. ब. मो. पुरंदरेकृत 'राजा शिवछत्रपति' या दशखंडात्मक शिवचरित्रग्रंथाचा प्रसार करण्याची एक अभिनव व आटोपशीर योजना तयार केली आहे.

आमच्या असंख्य हितचिंतकांना
या योजनेत
सहभागी होता येण्यासारखे आहे.

*कृपया पत्राने वा समक्ष चौकशी करावी*

**राजहंस प्रकाशन संस्था**

४१९ नारायण पेठ, पुणे २.

संपादक : मुद्रक : प्रकाशक : **श्री. ग. माजगावकर** ◻ प्रकाशनस्थळ : **राजहंस प्रकाशन**, ४१९ नारायण पेठ, पुणे २.

मुद्रणस्थळ : **संगम प्रेस प्रा. लि.**, ३८३ नारायण पेठ, पुणे २.